UNIVERSAL
LIBRARY
OU_184541
UNIVERSAL
LIBRARY

SELECTIONS FROM THE GOVERNMENT RECORDS IN THE ALIENATION OFFICE POONA

SANADS & LETTERS.

SELECTED BY

The late Rao Bahadur Ganesh Chimnaji Vaidya B A

Alienation Assistant to the Commissioner C D Poona

AND EDITED BY

PURSHOTAM VISHRAM MAWJEE, C I E M R A S

AND

D B PARASNIS

PUBLISHED WITH THE PERMISSION OF THE GOVERNMENT OF BOMBAY

BY

PURSHOTAM VISHRAM MAWJEE, J P, M R A S

Vishram Bhuvan, Mahalaxmi, Bombay

PRINTED -Keshav Raoji Gondhalekar, at the

Anand 432 Poona City

Price Rs, (2-4-0)

1913

SELECTIONS FROM THE GOVERNMENT RECORDS IN THE ALIENATION OFFICE POONA

SANADS & LETTERS.

SELECTED BY

The Late Rao Bahadur Ganesh Chimnáji Vad, B A.

Alienation Assistant to the Commissioner C, D , Poona

AND EDITED BY

PURSHOTAM VISHRAM MAWJEE, J P , M. R A. S

AND

D B PARASNIS

PUBLISHED WITH THE PERMISSION OF THE GOVERNMENT OF BOMBAY

BY

PURSHOTAM VISHRAM MAWJEE, J P , M R. A S. Bombay

PRINTER —K R Gondhalekar, " Jagadhitechu " Press, Poona-City

[Price Rs 2-4-0]

1913

Checked 1963

Checked 1969

INDEX.

1. Sanads by Hindu Kings before the Mahomedan period. .. . .1——6
2. Papers of the Mahomedan period. 7–100
3. Papers containing reference to ancestors of Shivaji Maharaj. 101–110
4. Papers containing reference to Shivaji Maharaj. 111–160
5. Papers of the period of Sambhaji, Rajaram and Shivaji II. 161–221

अनुक्रमणिका

प्रकरण		पानें
१	मुसलमानी राजाच्या अगोदर हिंदु राजानी दिलेल्या सनदा	१ ते ६
२	मुसलमानी राज्यातील सनदापत्रे	७—१००
३	शिवाजी महाराजाचे पूर्वज्याचा ज्यात सबध आहे अशीं सनदापत्रे	१०१—११०
४	शिवाजी महाराज यांचा ज्यात सबध आहे असे कागद.	१११—१६०
५	सभाजी, राजाराम व दुसरे शिवाजी महाराज याचे वेळचे कागद	१६१—२२१

सनदापत्रांतील माहिती.

प्रकरण १ लें.

मुसलमानी राज्याच्या अगोदर हिंदु राजांनीं दिलेल्या सनदा.

१

श्री विद्याशंकर.

नमस्तुगशिरश्चुबिचद्रचामरचारवे ॥ त्रैलोक्यनगरारभमूलस्तंभाय शभवे ॥ हरेर्लीलावराहस्य दष्ट्रादतः सपातुवः ॥ हेमाद्रिशिखरा यत्र धात्री छत्राश्रिय दधौ ॥ वदे गुरुपादुका ॥ श्रीमत्परमगुरवे नमः ॥ श्रीजगपत्यनेकोस्तु ॥ श्री शकर शासन ॥ अस्ति स्वस्तिमतीवमान्यविदितश्रृंगेरिसिहासन तत्र स्वस्ति सरस्वतीगुरुवरश्रीशकराशोद्भवः ॥ श्री विद्यानगरे प्रतिष्ठितमहाभूमडलाधीश्वरो विद्यारण्यमुनीश्वरो विजयते बागीश्वरः पातुवः ॥ पचाशन्मत कोटियाजनभवः × गुरु × द्विसप्तासन लोका. × जनाः × अष्टादश सहस्राणि ऋषयः शौनकादयः × शकरः + जयति वितत कीर्तिः + रुद्रशक्तिः + सोय सर्वेश्वरो भाति + शकरो विजयायते + इति शकर विजयेत्वेवमुक्त + स्वस्ति समधि गत पच महाशब्द पृथिव्यप्तेजोवायुराकाशादि पंच विशति तत्वाश जीव ब्रह्मैक्य ॐकारालयस्यातरब्रह्मशुद्धजबुद्वीपावृत्त चतुःसमुद्रमध्ये मेरु–हिमाचल–मलय–ब्रह्म–महेद्रक–त्रिकूट–विध्य–सह्य–ग–वराह–भद्र–ब्रह्म–नील–वरुणाकन्यश्रृगस्त्याचलादि–चतुर आधद्राविडवितुरुमलयकेसरकशामूलत्रैगर्तकुरु–गाधार=कर्नाटक–विन्हय–मद्रलाट पाड्य–पुड्र–कग–कुरु–तुरुष्क–सात्वत–गौड–केरल–कोंकण-कराढणोंद्र–पारासिधुमुख्यसहस्र देशभाषज्ञ राजमान्य प्रचातुर्यमस्तकप्रष्फटसभाष्यप्रमाणकलहकोलाहलसकलराजराजेश्वरभारतींद्रगुरुस्थानाचार्यवासिष्ठ–विश्वामित्र–काश्यपात्रि–देवल–नारदादि–देवस्थानाद्यनुष्ठानात्तप्रागादिऋषिमुनिगणस्तुतप्रस्तुतललामतरदेवताद्वात्रिशदासनविदित प्राज्ञस्वाधिष्ठानादिसहस्रारातर्वर्तिबलप्रतापज्ञ पुराणकालादिकगणयोगमहायोगब्रह्मयोगपरिणतदेवदानवादिराकागणैर्ह्री–श्री–मातुस्थानस्थितिप्रदनिजस्वरूपज्ञनिगमागमकूटराद्धातवेदातप्राभाकरन्याययगणितगाधर्वछंदोनिरुक्तिकाव्यनाटकालकारअक्षरलक्षण कायधारणतत्रमतरक्षणसामुद्रि शकुनसूपशास्त्रभरतगायनवादनरतपराजचित्रकलाद्यनेकप्रशाधिसकलशास्त्रश्रवणपारगतपरकायप्रवेशश्वशाद्याकर्षणादि चतुरशीतिविद्यापति श्रीविजयशकरभारतीगुरुभट्टाचार्यविश्वरूपाचार्यवैभवप्रणक-

दाचार्यरामानुजागमश्रीभगवदाराध्यश्रीकठाराध्यवज्रनखरदेवाराध्यपरमहायंत्रनिलयश्रीविमतसमत .....समतताराध्यकाशीवासब्रह्मांशसरस्वतीगुरुमडनमिश्रकलाकालज्ञ सरस्वतीवाग्विजयशं-करभारतींद्रस्वतत्रस्वेच्छाविहारपरपारंगतवेदमहाशंकापराहताकारिरुद्राशविदिताष्टषाष्टिशिवक्षेत्रवि-ष्णुक्षेत्र ९६ शक्ति २१ गणपतिस्थान ९२ आदित्य चौषष्टियोगिनीमुख्यस्थान ३२ भैरवैकाद-शरुद्रकोटिरामेशलक्ष्मणेशरुद्रपादविष्णुपादहरिहरहिरण्यगर्भश्रीविद्यादेवतापादपद्माराधकआदिशु-द्धमिश्रशैवाचारज्ञविभूतिरुद्राक्षमतोद्धाररुद्राचरणपरकाषायवस्त्रदडकमंडलालाछनश्रीस्थानमठस-हस्रनिलयस्थानाचार्यमान्यसर्वदेशपूज्यपादुकअशनतृषायाचित दानवशृगवर्यरक्षदक्षकादबरराय * भरण देवराज राजपरम * श्रीपृथ्वी उद्धारकतरश्रीवराहयुक्त उभयाकित साक्षिनागमुद्रा ।Λ ह्यारगचद्रगुप्तारता १=राजपूजित पादुकासमेत स्वानुभवपरतरश्रेष्ठकादबवशान्वय पुरदरराय शालिवाहन शक १०७९ नेया श्रीमुख माघ वद्य १४ सोमवार पुण्यकाल दलु + श्री + द्वादशसंवृतदेशमध्ये देशरामचद्र + श्री + वेनूरकपण दलुसाबपुरेवृत्ति १३ त्रयोदश भूसंकेत-शिलास्थापित श्रीविद्याशकरार्पित धर्माभिषेक + लिग शैलसज्ञेय वृत्ति २ द्ववस्य वरदा दक्षि-णस्थिता नागमुद्रा + ब्रह्मरुद्र अडिगे बहिर्ग्रामे शिवपुरा भद्रनगर प्रत्येकनिष्क द्वादशाः कम-ढक्षेत्रे कतशान्वयक पुत्रब्रह्मपुगारामचन्नेहरुवगद्याण १० आदापुर वृत्ति २ नागमुद्रा *** पुरदर भार्या वहाम + श्री गुरु आदि कैटभेश्वर सन्नद्ध सत्रयधर्मत्मारतियोगान्वयमाहिषीपुरा-चातुर्गडियलुवृत्ति १२ उभय नागमुद्राशिलामूलगुरु कागिनेले तिलवलीतडसकुरुगालहीस्तनाव-तिभीमेशपाडुरंगमुख्यसत्रमाहिषपुर=नगर गौरीपुर वृत्ति १२८ अडिगे सुधापुर शिवपुर=गोकर्ण गोमत काशीपुर तत्तत्स्थाने मा=कसरदापुरश्रीशैलदेशरामसेतुअनतमुख्यपद्मनाभनगरपत्तूरकपट्ट-णअग्रहारपुरपल्लीकोप्य मोदलाद अग्रपूजा आराधन ७ वाम १४ मत्त १० कुलेसैरसमतभू-तिरुद्राक्षकाषायवस्त्रकदेहश्रीभागीरथी मुख्यसहनदीतीर्थकमडलुजलसुमात्रदेहपवीत्रीकृतवामजित-कुलविद्यागुरु श्रीमत्परमहसपरिव्राजकाचार्यवर्यपदवाक्यप्रमाणपारावारपारीणयमनियममौनतपःश्व-क्रवर्तिअनादिगुरुपरंपराप्राप्तषट्दर्शनस्थापनाचार्यवेदातव्याख्यानसिहासनाधीश्वरसाख्यत्रयप्रतिपा-लकसकलविद्याविशारदनिगमागमसार हृदयवैदिकमार्गप्रवर्तकभूमडलाचार्यऋष्याश्रमनरसिहक्षेत्र-विद्यानगरस्थविद्याशकरसरस्वत्याराधक सर्वदेशसालमूलगे परतर श्री सपर्य वैभवक्के गुरुस्थान-मान्यमठमुद्राचारआदोलिकद्विपसमुखाश्वपदातिछत्रचामरादितालनृत्यतोरणध्वजशखचक्रपचवा-वाद्यढक्काडिंडिमझल्लरीपटहजाघटकादिवाद्यभाट्टस्तोत्रस्वर्णरजतकराकितनिजसेवकभक्तपालनमभी-ष्टप्रदहरिहरहिरण्यगर्भश्रीमद्विजयशकरभारती श्रीपादपूज्यकश्रीगुरु परपरादि गळिगे+सोमाशका-ववकुलतिलकपुरदररायदत्ता ॥ आदित्यचद्रावनिलोनलश्च द्यौर्भूमिरापो हृदय यमश्च ॥ अहश्च रात्रिश्च उभेच संध्ये धर्मश्च जानाति नरस्य वृत्ति ॥ + धर्मेण वर्धते पुत्रा ॥ धर्मेण पुण्यवर्धन स्वदत्ता पुत्रिका धात्री पितृदत्ता सहोदरी ॥ अन्यदत्ता स्वयमाता तस्माद्दानच पालयेत् ॥ सा-मान्योयं धर्मसेतुर्नृपाणा काले काले पालनीयोमहद्भिः ॥ सर्वानेतान् भाविनः प्रांजलिः सन् भूयो भूयो याचते रामचंद्रः ॥ श्रीगुरुविद्याशंकरसरस्वती श्री पुरानित्य सिंधु कृपात्रचक्रे क्षितिविशाति-

कृतधर्मकीर्तिः ॥ नित्यं त्सादविला आहे । हरि हर कर नित्यं परिपूरितधर्मकीर्तिः श्रियं भवतु श्रीगुरु धर्मराज पाल्यते विजनैर्हि श्री मंगळ महाश्री श्री. श्री. श्री.

२

श्रीगणेशायनमः ॥ नमस्तुंगशिरश्चुंबिचद्रचामरचारवे ॥ त्रैलोक्यनगरारंभ मूलस्तंभाय शंभवे ॥ १ ॥ हरेर्लीलावराहस्य दंष्ट्रादंडः स पातुवः ॥ हेमाद्रिः कलशोयस्य धात्री छत्रश्रिय दधौ ॥ २ ॥ जयत्यादिवराहोय येन धात्री समुधृता ॥ अगसंगादिनाद्यापि सस्यैः पुलकवंतुरा ॥ ३ ॥ लोकैकावासहेतोरुपगतवसतिर्हेमकूटाचलेंद्रे स्थित्यर्थेकावगम्योत्यखिलजनदयादत्तसंदर्शनश्रीः ॥ कामं नामावशेष विदधदपि सदा सर्वकामप्रदोऽसौ भूयाद्भूत्यै जगत्या त्रिजगदधिपतिः श्रीविरूपाक्षदेवः ॥ ४ ॥ कल्पाणायास्तुतद्धाम प्रत्यूहतिमिरापह ॥ यद्गजोप्यगजोद्भूतो हरिणापिच पूज्यते ॥ ५ ॥ अथ क्षीरमयेदेवैर्मथ्यमाने महाबुधौ ॥ नवनीतमिवोद्भूतमपनीततमो महः ॥ ६ ॥ तस्यासीत्तनयस्तपोभिरतुलैरन्वर्थनामा बुधः पुण्यैरस्य पुरोरवाः पुरु भुजैरायुर्द्विषा निघ्नतः तस्यायुर्नहुषोथ तस्य तनयो युद्धे ययातिः क्षितौ ख्यातस्तस्य पुरूरवो वसुनिभः श्री देवयानीपतिः ॥ ७ ॥ प्रख्यातरूपः परिकर्म भूमे रावासभूमिर्महता मनोज्ञः अत्युच्छ्रितो जन्म गुणो गुणाना जागर्ति वशो यदुपुंगवाना ॥ ८ ॥ विभूषयामास तमन्ववायं श्रीसगमाख्यो नृपतिर्गुणेन ॥ श्रीमान्नृतूनामिवसतमेक काले वसतः कुसुमोदयेन ॥ ९ ॥ यस्य वारणघटाकटस्थलीनिःस्सरत्प्रमदवारितरगाः अभ्यकार्षुरभितः कलिदजाराषगास्तदितरा निरतर ॥ १० ॥ हरिहरनृपबुक्कभूमिपालाविति सुगुण ग्रथितौ सुतावभूता ॥ पुनरपि भुवनाभिरक्षणार्थं समुपगताविवरौहिणेयकृष्णौ ॥ ११ ॥ हरिहर नरपालः पालयामास पृथ्वीमथ जितनृपराजो बुक्कराजाग्रजन्मा ॥ शिरसि सततमाज्ञापत्रिकाधारयत. स्रजमिव नरपाला यस्य सेवामकार्षुः ॥ १२ ॥ यस्य प्रसृतमात्र एव यशासि प्रालेयपृथ्वीधरक्षोणिमासलमानवीयाहिमिकासदोहसंदेहदे कैश्चि निश्चित वेदिभिरसु मन सा गोष्टी गरिष्ठैर्जनैश्च (?) स्तत्क्षणमादिराजगणना वै मुख्य मालंबते ॥ १३ ॥ अथानुजस्तस्य जगत्प्रतीतः श्रीबुक्कराजो विजयाभिधानः पुरदरश्री पुरमध्य वाछि (?) द्रम्यामिव द्वारवतीं मुकुदः ॥ १४ ॥ लक्ष्मीवान् यदुपुगमौक्तिकमणिः प्रोद्यद्बलिध्वंसनः सद्वृंदावनवर्तनैकरसिकः सत्यानुरक्ताशयः ॥ उन्मीलद्बलभद्रमूर्तिरभितः पृथ्वीभृदुन्मूलनप्रौढः क्ष्मामशिषन्मुरांतक इवश्रीबुक्कपृथ्वीपतिः ॥ १५ ॥ सतप्ता गरलोष्मणा फणिफणा चक्रे स्वयं मेदिनी नित्यं सौख्यकरं पर पुनरसावाकाक्षमाणा पर नीरध्रा (म) भजिष्ट निर्वृतिमति प्रौढोदयं संश्रिता छायापल्लवशाखिन निरुपम प्रत्यक्षकल्पद्रुमं ॥ १६ ॥ तस्माद्बुक्कमहीपालात्श्रीमान् हरिहरो नृपः ॥ आविरासीत् कलाश्लाघ्यः क्षीराब्धेरिव चंद्रमा. ॥ १७ ॥ तामेव नगरीमध्यमध्यवात्सीत्सभूपतिः पित्राभिरक्षितां पूर्वमयोध्यामिव राघवः ॥ १८ ॥ प्राकारो हेमकूटः परिकरपरिखा तुंगभद्रातिभद्रा साक्षाद्रक्षाकरोयं हतभुवनभयः श्रीविरूपाक्षदेवः ॥ राजा राजाधिराजो हरिहरनृपतिः

क्षोणिकांक्षीव कार्चीश्लाघ्या शाखा पुरश्रीः कथमपि वचसागोचरास्यादिहास्या ॥ १९ ॥ उन्मीलन्नस्वकाति (१) मौक्तिकमणिश्रेणीमनोहारिण· छायापल्लवितान्स्फुरत्करतलप्रत्यक्षकल्पद्रुमात् ॥ दानक्षीरपयोनिधेर्हरिहरक्ष्मापालचूडामणेः सपूर्णः सतत तुषारकिरणः कीर्त्यात्मना जृम्भते ॥ २० ॥ कावेरीमाशुबध्वा बहुतरलजला ता विलघ्यैव शत्रून् जीवग्राह गृहीत्वा शमितनिजबलस्तश्च (स्व१) राज्य तदीय ॥ कृत्वा श्रीरगपूर्व तदनु निजवश पट्टण योरिऽदेशे कीर्तिस्तंभ निधाय त्रिभुवनजनत स्तूयते चावनीशः ॥ २१ ॥ वीर चोलच पाड्य तमपिच मधुरावल्लभ मानभूप वीर्योदग्र तुरष्क गजपतिनृपती श्चापिजित्वा तदन्यान् ॥ आगगतीरलक प्रथमचरमहुत् तद्धितातानितातामुख्यातिः क्षोणीपतीना स्रजमिव शिरसा शासन योव्यतानीत् ॥ २२ ॥ नाना दानान्यकारीत्कनकसदसिय. श्री विरूपाक्षदेवस्थाने श्री कालहस्तीशितुरपि नगरे व्येंकटाद्रौचकाच्या ॥ श्रीशैले शोणशैले महति हरिहरे चोभले सगमेच ॥ श्रीरगे कुभकोणे हततमसि महानदितीर्थे निवृतौ ॥ २३ ॥ यस्योर्दचत्तुरगे व्रजति खुरघटी तत्तलाभ्युत्थितैस्तै धूलिस्तोमैरुदीर्णैरपि जलधिरभूच्छुष्यदापस्तदानीम् ॥ पश्चादाशैलनानाविधबहलमहादानवारिप्रवाहैः पूर्णः शत्रुः क्षितीशान्निजजलपतितान् पातु मेषक्षमो भूत् ॥ २४ ॥ कीर्त्या यस्य समततः प्रसृतया विश्व रुचैक्य व्रजेदित्यालोच्य पुरापुरारिरभवत्फालेक्षणः प्रायशः ॥ पद्माक्षोपिचतुर्भूजोऽजनि चतुर्वक्त्रोऽ भवत्पद्मभू· काली खड्ग मथादिमाच कमल वीणाच वाणी दधौ ॥ २५ ॥ शत्रूणा वासमेषः प्रददति(१)रुषा किनु सप्ताब्धुराशि नानासेनातुरगत्रुटितवसुमतीधूलिका पालिकाभिः ॥ सशोष्या श्वानृथास्तत्प्रतिनिधिजलधिस्वर्णकैर्यो व्यधत्त ब्रह्माडस्वर्णमेरुप्रमुखनिजमहादानतोयैरमेयैः ॥ २६ ॥ भूजालाननिबद्धस्य प्रतापमदहस्तिनः ॥ मदरेखाश्रिय धत्ते यस्य जाकिणवल्लरी ॥ २७ ॥ इतिहासपुराणादिधर्मशास्त्रदृढव्रतः अय हरिहरो राजा भूत्वा भूदानलोलतः ॥ २८ ॥ राजा हरिहरः पूर्व धर्मस्थापनया धिया ॥ पुण्यकीर्तिप्रवृध्यर्थं पितृणा मुक्तिहेतवे ॥ २९ ॥ रोषकृत्प्रतिपार्थिवदडः शेषभुकृक्षितितारणशौडः ॥ भाषिगेतपोरायरगंड. दोषकृ नृपहा(दा)रणचडः ॥ ३० ॥ राजाधिराज इत्युक्ते यो राजा परमेश्वरः ॥ मुरुरायर गंडश्च पररय भयकरः ॥ ३१ ॥ हिदुराय सुतत्राणः दुष्ट शार्दूल मर्दनः ॥ गजौघगड भैरुड इत्यादि बिरुदावलि· ॥ ३२ ॥ एव तस्य वशावलिमुक्त्वा तस्य दान क्षात्रादिकं प्रशास्यैतादृश हरिहर महाराजः कदाचित् सुप्रसन्नो हेमाद्रि आचार्यविदुषे ग्रामभूमिवर्षानित्यान्नादिसर्वमान्याग्राहारादिरूपेण दत्तवानिति वक्तु तत्र देश काल प्रतिगृहित्रुगुणसर्वमान्याग्रहारदेश मर्यादा दानप्रकरणप्रकारच क्रमेण विवृणोति । श्री मद्विष्टण्वीश्वराभ्या स्वभयहरगुरो श्री क्रियाशक्तिमूर्ते राज्ञा माकर्ण्यताभ्या सशिखशिखिनिशानाथसख्याशकाख्ये सिद्धर्थ्यद्वेच ज्यष्टया कुजयुतसुदिने व्यक्त सोमोपरागे दत्ता श्रीत्तुगभद्रातटचटुलविरूपाक्षसाक्षात्समीपे ॥ ३४ ॥ ज्योति काणादाक्षपाददक्षिजे यज्ञशालिने कमलाचार्यपुत्राय हेमाद्रियाचार्यशर्मणे भारद्वाजसगोत्राय सदापस्तबसूत्रिणे अधीताध्यापितछात्रधृतचारित्रशाखिणे धर्माधर्मवचो वक्त्रमराळायुतबुध्धये ॥ ग्रामभू-

दानपात्राय भूमिदेवाग्रयायिने ॥ अशेषवेदवेदांतनिगमागमवेदिने ॥ विनीताय विशिष्टाय प्रशाताय महात्मने ॥ रायचूर समीपस्थयरिगेरी निवासिने ॥ सिंगापूरहोसुराभ्यां वरदिवरदातटे ॥ नरेगल्ल तटाकस्य सेतुदक्षणसीमनि ॥ नागनूराभिध ग्रामः कूडलिसगमान्वितः ॥ सोदरग्राम सयुक्त इतिग्रामद्वय तथा ॥ आडरु पूर्वदेशस्थं तथा कृष्णा सरित्तटे ॥ गुळवाळाभिध ग्रामोद्वार प्राकार देशगः कुरु कोप्पाभिधग्रामो बादामीविषये स्थितः ॥ मलापहारीतीरेपि कुरुराजप्रतिष्ठित. ॥ पच ग्रामास्तथा भूमित्तत्तद्देशेति विस्तर ॥ अद्र नित्याशन स्थानं बहुमान विशेषतः आदोलिका गजं छत्र प्रायच्छन्नृपपुगवः ॥ ४३ ॥ भूमि मर्यादा महा ॥ तिर्यग्यवोदराण्यष्टावूर्ध्वाव्रीह्यस्त्रयः ॥ एतदगुलमाख्यातं मध्यामागुलमध्यम चतुर्विंशतिकैरेतैर्हस्त मान प्रकीर्तित ॥ सार्धहस्तेन तै मुष्टिसप्तकेनच सयुतैः ॥ सप्तभिः स्याद्धनुमान सीमा तद्विंशतिर्यदि ॥ पश्चात् षडिभः पुरुषड्भिर्मातृपादैः सुसगत ॥ षट् त्रिंशति कसीमाभिर्न्यग्रोधोय भविष्यति ॥ चत्वारिंशत्धनुर्मानै सीमार विपदान्विता ॥ ताभिः षट् त्रिंशसख्याभिर्महान्यग्रोध उच्यते ॥ ४७ ॥ तन्मानमेतत्सर्वंच लिख्यते देश भाषया ॥

॥ ६ ॥ स्वस्ति श्री जयाभ्युदय शालिवाहन शक १३०१ हदिमुरु नूरा वदनेय सिद्धार्थि सवत्सर, ज्येष्ठ शुद्ध १५ पौर्णिमा, मंगळवार सोमग्रहण पुण्यकालदल्लि तुगभद्रातीरस्थ श्रीविरूपाक्षदेवर सनिधियल्लि श्री क्रिया शक्ति गुरु निरूपदि श्रीमहाराजाधिराज परमेश्वर वीर प्रताप धर्म मूर्ति हरिहर महारायरु रायचूरु परगणे वळगिन यरगेरि ज्यौतिष वारानिधि वेदशास्त्र सपन्न शेषभट्ट पौत्ररादं कमलाचार्यर पुत्ररादं हेमाद्रि आचार्य रिगे पोपा हस्तिना वतिगे सल्लुवा बेल्लव नाड वल्लगादलकुडि व्यटेयक्के सल्लुवा अर्ध व्यळवनाडवल्लगाद आडूर नाड वल्लगाद नरेगल्ल समतिन वरदानदीतीरदल्लि इरुव वरदी ग्राम सिगापुर होसुरू नरेगल्लक्यरेनीरु तूम मजरे सहितवागि नागनूर ग्राम कूडलापुर सगम मजरे सहितवागि हागे महा व्यल्लवनाड वल्लगाद बागडिकोटे व्यटेयक्क सल्लुवा व्यणूर समतिन कृष्णावेणि तीरस्थ हिरेगुल्ल बालग्राम मजरे सहितवागि हागे बादामी व्यटेयक्केसलुवा जालीहल्ल समतिन मलापहारीतीरस्य कुरुवन कोप्प ग्राम हागे बागडिकोटे ग्रामदल्लि नाग ल्लबी जवरिय भूमि वदुचावरा बेउर ग्राम दल्लि हदनारु कोल्ल गदबीज वरिय भूमि नाल्कु चावरा बादामि व्यंटेयक्केसल्लुवा मलापहारितीरस्थ कातरकिग्रामदल्लि इक्कल्लबीज वरिय भूमि यरडु मारु जालिहाल्ल व्यटेयक्केसल्लुवा हडगलिग्रामदल्लि यंटुकोल्ल गदबीज वरीय भूमि यटु मारु रोणग्रामदल्लि हन्यरडुकोळ गदबीज वरिय भूमि मुरु चावरा अन्बिगेरिग्रामदल्लि यटु कोल्लगदबीज वरीय भूमि यटु मारु निडगुंदिग्रामदल्लि हत्तुकोल्ल गदबीज वरिय भूमि हत्तुमारु इव इष्टु भूस्वास्तिगळंमहान्यग्रोध परिमाणदि अल्लसिकोट्टु बागडिकोटे भडारदल्लि प्रतिवर्ष वर्षासन रुपय ऐदुनूरु प्रतिदिन खर्चिगे नाल्कुरुपया नडोहांगे शाश्वत मर्यादिये माडिकोट्टु ईग्राम भूस्वास्ति गल्लल्लुनिधिनिक्षेपजलपाषाणअक्षिण्या-

गामि सिद्ध साध्यगळेंब अष्ट तेजः स्वाम्य आय स्वाम्यहिटु हुग्गि मोदलाद समस्त कुलबल्लि सहवागि सर्व मान्यैक भोग्याग्रहार हेमाद्रि आचार्य्‌रिगे सुवर्णधारापूर्व समर्पिसि कोट्टि (हवा) दकारणा आचद्रार्कस्थांथि इधर्मवन्नु नाउ पुत्र पौत्रादि वश पारपरियवागि नडिसिकोंडु बाहि उ येंदु बरसिकोट्ट ताम्र शासनदम्याल हरिहरयर वप्यवद ॥ दान-पालनयोर्मध्ये दानाच्छ्रेयोनुपालन ॥ दानात्स्वर्गमवाप्नोति पालनादच्युत पदं ॥ स्वदत्तां परदत्तांवाञ्च योहरेवसुंधरां ॥ षष्ठि वर्ष सहस्राणि विष्टाया जायते क्रिमिः ॥ ब्रह्मस्व तु विषं घोर नविंष विष मुच्यते ॥ विषमेकाकिनहंति ब्रह्मस्व पुत्रपौत्रकं ॥ एकैक भगिनी लोके सर्वेषा मपि भुभूज ॥ न भोग्या न करग्राह्याविप्रदत्ता वसुधरा ॥ सामान्योय धर्मसेतुर्नृपाणा काले काले पालनीयो महद्भिः ।। सर्वानेतान् भाविनः पार्थिवेंद्रान् भूयो भूयो याचते रामचद्रः ।। गृण्हातु र्यावतः पासुनुदत्या मसुबिदवः ।। विप्राणा हृतचित्ताना वदान्यानां कुटुंबिनां ।। राजानो राजकुल्याश्चता वतो द्वाग्निरकुश ॥ कुभिपाकेषु पच्यंते ब्रह्मदायापहारिणः ॥ स्वदत्ता पुत्रिका धात्रि परदत्ता सहोदरी ।। परदत्ता स्वमाताच दत्ता धात्रीं परित्यजेत् ॥ ९ ॥ मद्वशजाः परमहीपतिवशजा वा ये ये नृपाः सतत मुद्गत-धर्मचित्ताः मत्धर्म मेव सकलं परिपालयतु तत्पादपद्मयुगल शिरसा वहामि ।। ६ ।। उपायनार्थं शुष्कार्थं ग्रामरक्षार्थमेववा ॥ येगृण्हंत्यग्रहारेस्मिंस्ते सर्वे मातृगामिनः ॥ ८ ॥ ४

प्रकरण २ रें.

मुसलमानी राज्यांतील सनदापत्रें.

१ बेदरच्या बादशाहाचें ताम्रपत्र.

इनामपत्र येसाजी नाईक चिबे, हैबतजी नाईक खोमणे, हणमतजी नाईक भाडवलकर यास बेदर पादशाही सुरुसन सबा समानीन खमस मया, हें ताम्रपत्र लिहिलें जेः— किल्ले पुरधर येथें शेंदरी बुरजास काम लाविलें, तेव्हा काम शेवटास जाईना. सबब पादशहास दृष्टांत जाहला जे, जेष्ट पुत्र व जेष्ट सून अशीं उभयता बुरुजांत दिल्हीं असतां काम शेवटास जाईल असा दृष्टांत होतांच, पादशाहा जागृत होऊन, येसाजी नाईक चिबे यांस वर्तमान सागितलें. तेव्हां येसाजी नाईक ह्मणों लागले जे, मी आपला पुत्र व सून देतों. मग बहिरनाक सोननाक याचा पुत्र नाथनाक व देवकाई अशीं उभयतां आश्विन वद्य ८ अष्टमीस शेंदरी बुरुजांत गाडली. मग बुरुजाचें काम सिद्धीस गेलें. मग पादशाहा बेदराहून निघोन किल्ले पुरंधरास आले. तेव्हा शेंदरी बुरूज पाहून बहुत खुषमर्जी होऊन, येसाजी नाईक यास पुरंधर किल्ला सरजामसुद्धा दरोबस्त बक्षीस दिल्हा. बहिरनाक सोननाक यास किले पुरधर येथें होन २०५ दोनशें पांच होन दिल्हे; व न्हावी, मोंगोली सातशें पाच होनाचे दोन गाव दिल्हे नतर पादशाहाची स्वारी निघोन बेदरास गेली येसाजी नाईक समागमें गेले. तेथें गेलेवर एक वर्ष जाहलें. नंतर आबदुलशाहा यांजवर येसाजी नाईक व व्यकटजी नाईक या उभयतांस रवाना करून दिल्हे. तेथें जाऊन लढाई करून परशत्रू याचा पराभव करून, यश घेऊन बेदरास आले. तेव्हां पादशाहाची मर्जी प्रसन्न होऊन गावगन्ना इनाम जमिनी करून दिल्हाः—

७॥ सिवरें साडेसात चावर.	८३॥ परिंचे साडेतीन चावर.
२ बेलसर दोन चावर.	३ वाघोली
२ काळदरी दोन चावर.	१० खेडेबारें.
१ पिपलें चावर.	२ सिहगडचे माचीस चावर.
१॥ माहूर दीड चावर.	१ किकवीवर चावर.
१॥ मांडकी दीड चावर.	१। नारायणबाग.
२ सूपें चावर	८२ खळद दोन चावर.
५ सासवड चावर.	

येणेंप्रमाणें गांवगन्ना इनाम जमीन करून दिल्हे. नतर पादशाहाची स्वारी शिकारीस निघाली. ते समयीं येसाजी नाईक याणीं वाघ मारून, पादशाहास दाखवाकरितां आणिला. तेव्हां पादशाहाची मर्जी प्रसन्न होऊन, नस्त किले येथें सरनाईकी करून दिल्ही.

५००० लोहोगड.	२००० रांवेरी
२००० कमलगड.	१००० प्रतापगड.
५०० वर्धनगड.	५०० नांदगिरी.
१००० दातेगड	१००० राजगड.
१००० मोरगिरी	१००० तोरणा.

पकूण अकरा किल्ले येथे सरनाईकी करून दिल्ही पुढें पादशाहा निघोन पन्हाळ्यास गेले. तेथे जाऊन येसाजी नाईक यांणीं राजहंसाची पिले धरून आणिली तेव्हां मर्जी प्रसन्न होऊन बक्षीस मागावें, ह्मणून आज्ञा जाहली. मग येसाजी खुरनिशे करून उभे राहिले * * *

२ विज्यापूरच्या बादशहाची सनद.

सनदपत्र बेशमी तारीख छ ११ माहे रमजान, रोज सोमवार, कार्तिकमास, मृगशीर्ष नक्षत्र, सुरसन ९३० इबराम जगत्गुरू पादशाहा व काजी, कोतवाल त्रिवर्ग जमीदार खाही किले, सोा सरकार बत्तीस महाल, आठरा परगणे नौठाणें देशमूख व देशपांडे व नाडगवडा, भोरगाव, दारुलजफर विजापूर मामलेपूर नुर ताा, हणम नाईक वल्लद मासिगी नाईक, नाइकवाडी, प्राा काणूर, तोा, तालीकोट यानी अमलात मौजे मजकुराहून फौजबदी करून, सरकार साहेबांजवळ पादशाहापाशी विजापुरास जमाव करून, येऊन चाकरीस राहिले त्या लोकात एकएकास कजीया होऊन तुमचे बिर्दी काय, ह्मणून विचारलेवर, यानी सागितलें की आमचे बिर्दी दाखवितो, ह्मणवील की खुलगेचे शिरासी, सात कोरा एकावरी एक बाधून ऐसे सात कोरा बाधून बितीचे आत बादणें. समस्त नाईक व साब वगैरे बैसून कचेरीत बैहीसून पाहणे. आह्मी तीर दोन मारितों. ती सर्वही पार करून ती रेडा मारून घेवा ह्मणून आह्मास साहेब लोकानी काय बिर्दी देता तो इनाम द्यावा. या प्रमाणें मोकरार करून, याप्रमाणें लोकावर. त्याप्रमाणें नाईक दुसरे दिवशी सरकार तजयाप्रमाणें करून, खुलगास आणून याजकडून तिरदाजी करवील त्याप्रमाणे खुलगेसी तीर पार होऊन मरून पडले वर सरकारात मशारनिल्हे नाईकास इनाम दिल्ही तपशीलवार गांव मौजे काणूरच ऐन जमीन सासष्टी चावर पैकीं नाईकास इनाम वीस चावर दिल्हे. पैकीं दहा चावर मोर्डी, दहा चावर रेगड येकूण वीस चावर इनाम दिल्हे शिवाय रत्कमान्या दोन चावर नाईकास पहिले पान, पहिले तश्रीफ रसत पैकी पहिले हर्षेत रुपये दहा, शिवाय बलुती, एक गावात लग्न जाहलें तर गुगळेस पारडी एक. मेटी मापाशिवाय पसगी पळगी, तेल घाणेस नौटाक, पडदी, गावात दुकानास सणवार द्यावे कोष्टी व धनगर मागास पावलाप्रमाणें शिरस्ता द्यावा सालागार माग. दर वर्षास चर्मी जोडा एक एक द्यावा. तालीकोट, पारगाणें खेडेपाडें वगैरेन नाईकास बकरा एक द्यावा. येणेंप्रमाणें कुलबाब कुलकानू वगैरे चालून द्यावयाचा मोकरारः—

गोही.	मोहर.
१ राणो देवजी देशमुख.	गुरापा पटणशेटी.
१ गुंडो शामाजी नाडगोवडे.	कामालखान उमराव.
१ शाषदेवजी देशपांडे तर्फ हवेली.	उदाडपा पाटील.
१ राजेखान उमराव.	सिलेमान उमराव.
१ पीर महमद उमराव.	लाडखान उमराव.
१ अल्लीसाहेब उमराव.	हुसेन साहेब उमराव.
१ गुजरत साहेब उमराव.	मोमदखां उमराव.
१ परवतगौडा पाटील, प्रांत चानकेट.	लिगनगवडा पाटील, कसबे हवेली.
	बसवनगवडा पाटील, कसबे बागेवाडी.

मोहर.

नरसो श्रीनिवास देशपांडे, देशकुळकर्णी, कसबे मजकूर.

मरी नाईक पाडावर परगणे मजकूर.

---

३ बुऱ्हानखान वजिराची सनद.

थोर पदवीचा फर्मान देशपांडे व मोकदम लोक परगणे एरडोल यांणीं जाणावें कीं, खुलासे मुकरीबन व अजम वजीरान बुऱ्हानखान यांणीं दरबारांत अर्ज पोंचविला कीं, एक हत्ती रंजीत नामचा व हिऱ्याचे दोन तुकडे घेऊन, त्याचे ऐवजीं सुमारी नऊ औत जमीन विकत मिळावी. ह्मणजे तेथें मुकरबा व मशीद व खानका व बाग बाधू ह्मणोन. खानमजकूर यांच्या अर्जाप्रमाणें हत्ती व हिऱ्याचे दोन तुकडे त्याची किंमत ४५००० मुजफरी मुकरर झाली. त्याचे ऐवजी सुमारी नऊ आउतें जमीन, कसबे एरडोल पैकीं विकत दिल्ही असे. यास्तव जाणीजे कीं, हा थोर हुकूम समजून जमीन मजकूर मोजून खान मशारनिल्हे यांजला देणें. या बाबतींत ताकीद जाणावी. तारीख १५ माहे रजब सन ९५३ हिजरी.

---

४ मलीकंबर याची सनद.

अजरष्टखाने खुदायेवद मलीक सर्फ मलीकंबर दुलीदयाम दौलत हु बजानेबु कारकुनांनी व मुतालिकांनीं मुकासा ई हाल व इस्तकबल व मोकदमानी, कसबे ओतूर बिदानंद सुरुसन खमस अलफ भटांनीं नफर २.

नरसिंहभट बिन विश्वनाथभट. केशवभट बिन नरसिंहभट.

बियार्थी केशव चैतन्य महानभाव साकीन ओतूर हुजूर मालूम केलें जे, आपणासी इनाम जमीन यावर एक नजीक मठ व झाडें मठाजवळील केशव चैतन्याचे दरसवाद कसबे मजकूर बरहुकूम हुजती व शिके खास व भोगवटे वजीरांनीं कारकीर्द दर कारकीर्दी चालिवलें आहे. हल्ली कसबे मजकूर साहेबांस अर्जानीं जाले, हुकूम मरहामती फर्माऊन

खुर्दखताची रजा होय मालूम जालें. बाराये मालुमाती खातीरेस आणून नरसिंहभट बिन विश्वनाथभट व केशवभट बिन नरसिहभट यासी इनाम जमीन चावर एक, नजीक मठ व मठाजवळील झाडें, केशव चैतन्याचे बरहुकूम हुजती व शिक्के खास व भोगवटे व तसरुफांत वजीरांनीं व मुकासाद कारकीर्द दर कारकीर्द चालिवलें असेल, तेणेंप्रमाणें चालवीजे. अवलाद अफलाद चालवीजे. हर दरसाल खुर्दखताचा उजूर न कीजे. तुह्मीं तालीक घेऊन अस्सल फिराऊन दीजे. तारीख ८ माहे मोहरम.

५ मलीकंबर याची सनद.

अजरष्टखाने खुदायवद मलीक * * * मलीकबर दुलीदयाम दौलत हु बजाने ब कारकुनांनीं हाल व इस्तकबल व देशमुखानी, परगणे पांडीया पेडगाऊ व हुद्देदारानीं व मुकासाई यांनी कसबे पेडगाऊ, परगणे मजकूर बिदानंद सुरुसन सीत अलफः—अकोबा बिन गोदोबा गोसावी बडवे पुजारी श्रीविठ्ठल देव कसबे मजकूर हुजूर मालूम केलें जे, आपणांस इनामाबद्दल * * * चावर एक गजसरायेनी दरसवद कसबे मजकूर.

बाबाजी चिखलठाणे निम चावर ॥ नामाजी चिखलठाणा निम चावर ॥·

* * * नष्ट यातीं तालुके ठाणें, तर्फ देहाय कुलबाब, कुलकानू, व बाजे पट्टीया व वेठी बेगार बदल हुजती * * * वजीरानीं चालिवलें आहे. हल्लीं परगणे मजकूर साहेबास अर्जानीं जाले, बद्दल मन्हामती फर्माऊन खुर्दखत होये. मालूम जाले. बाराये मालुमाती खातीरेसी आणून, एकोबा बिन गोदोबा गोसावी बडवे पुजारी यासी इनाम जमीन चावर एक गजसरायेनी दरसवाद कसबे मजकूर * * *

बाबाजी चिखलठाणें ॥ नामाजी चिखलठाणें ·॥·

देखील नष्ट यातीं तालुके ठाणें, तर्फ देहाय कुलबाब, कुलकानू व बाजे पटीया व वेठी बेगारी बरहुकूम हुजती . .... वजीरानीं सालाबाद तसरुफाती चालिवलें असेल, तेणेंप्रमाणे चालवीजे. हरदरसाल खुर्दखताचा उजूर न कीजे .... .. तालीक घेऊन अस्सल फिराऊन दीजे. बरहुकूम हुजती .. .... तसरुफाती चालत असेल तेणेंप्रमाणें चालवीजे. मोर्तबसुद.

तारीख १० जमादिलाखर

६ निवाडपत्र.

राजमुद्रा.

मुनसिबदार.	एको पडित.
	नागो पडित.
राजीब, तर्पे उदरगाव,	दाउदखान शाई, मौजे मोसर.
गोत	
परगणे हवेली.	तर्पे मोस मोकदम, देहाय.
तावजी पाटील मोकदम, मौजे करडु.	कोंड पाटील मोकदम, मौजे सापटण.

राज पाटील मोकदम, मौजे झइसगांव.
मोकदम, मौजे शिराळ.
राजी मोकदम, मौजे जालगांव.
सटुजी मोकदम, मौजे वडसिंगें.
परस पाटील मोकदम, मौजे बारलोणी.
बहेरजी मोकदम, मौजे चिंचगांव.
दावल पाटील मोकदम, मौजे आकुलगांव.
तपे करकंब.
देशमुख.
भराट पाटील व बाबजी पाटील मोकदम, कसबे मजकूर.
मोकदम, मौजे मोडलिंब.
नरस पाटील मोकदम, मौजे आरण.
येस पाटील मोकदम, मौजे रोपळें खुर्द.
नरस पाटील मोकदम, मौजे भेड.
सत पाटील मोकदम, मौजे वरवड.

बाजी पाटील मोकदम, मौजे आष्ट, तर्पे उदरगांव.
कमाजी व जावजी देशमुख.
कृष्ण तुकदेव अजाहत देशकुळकर्णी.
नरस पाटील मोकदम, मौजे श्रीपत पिंपरी.
झसाजी व तुकोजी पाटील मोकदम, मौजे तडवळ.
बहेरजी मोकदम, मौजे उपळाई खुर्द.
सर्जेराव अजाहत व तुकोजी व उमाजी, मौजे माढ.
मोकदम, मौजे ओहळ.
मोकदम.

या विद्यमानें निवाडा जाहला सुरसन तिसा अलफ, शके १५३५ कीलकनाम सवत्सरे, कार्तिक वद्य ११ ते दिवशीं महजर जाहला ऐसाजेः—मौजे घाटण, तर्पे करकंब व मौजे भोसर, तर्पे उंदरगांव या दोन्ही गावांस शिवेचा तटा होता. याबद्दल याचा निवाडा करावयास हुजूरून मिया आजम पाठविला. तेहीं हवेलीचे व हामशाईचे मोकदम बोलाविले. सदरहू गोतास व हरदू गांवचे महार चालिले होते त्या हद्द मोहदूद दाखविले. या देही बेदेही यास राजी जाहलीयावरी सदरहू गोतास हवेलीचे पाटलास रजावंद जाहले जे, हरदू जणांमध्यें अग्रवादी यानें तो आपली क्रिया स्मरून, कुळस्वामी स्मरलीयावर हवेलीचे पाटील वेगळे बसून क्रिया स्मरून विचारून बोलिले जे, भोसरकर आपला शिवार म्हणतो ग्वाही देतात. तरी हे अग्रवादी येहीं दिव्य घेणें. ऐसें इमान जाहलीया मग छ २० मिनहू (रोजीं) दोही गावचे महार सभेस आणिले.

भोसरीयाचे महार.
कान्हा बिन खेळो

घाटणीयाचे महार.
यादू बिन उका.

या दो जणांचे हातार्चीं नखें काढून व हातास साबण लाऊन हात धुतले. हाताचे डाग निशाणें कागदी लिहिले. हातास पिशव्या घातलीयावर मोकदमाचे कतबे लिहिले. छ २२ मिनहू सोमवारीं मोईन केली. दिवस मुदत जाहले. दोही तप्याचे देशमुख व मोकदम राजी झाले.

आयरणी व मोत, मौजे कुरडु, तर्पे हवेली.

दहीभात व कुमारीचें सूत व पिपळाचीं पानें मौजे म्हइसगांव, तपे हवेली.

या विषमानें इनाम करून दिव्येचे दिवशीं आणिली. हरदो गांवचे कोळसे आणिले. मौजे लउळ व मौजे भोसर व मौजे घाटण या तिही गांवचे तिंवष्याहून भोसरीयाचा महार चालला होता. तिंवधा ऐरणी तावों घातली हरदो गांवच्या महाराच्या हातच्या पिशव्या काढून आघोळी करून आले. भोसरीयाचा महार दिव्यास हात पुढें दिल्ही- यावर अमीन हरगोत पिपळाचीं पानें ७ कोवारीच्या सूत सुतविली. दहीभात वजनें ६६॥९ जोखून पसरलीयावर लोणी वजन ६६९ घातलें. कुरडूचा खाती जाख राहूत तेणें आयरणी उचलून हातावर ठेविली. धाटणीयाचे महाराकडून सावली करविलीयावर कान्ह्या बिन खेळो यानें घेऊन सूर्यामुखें जाहला. चालोन आयरणी कडबीयाचे भान्यावर टाकली. कड- बीयाचे भान्यास आग लागली. मग हरदो गांवांच्या महाराच्या हातास पिशव्या घातल्या. हरदो गांवचे मोकदम घेऊन मलीक मशारुल तर्फ उदरगाव तेथें गेले. छ मजकुरीं तिसरे दिवशीं हरदो महारास आणिलें. सदरहू गोतास बोलावून हरदू महाराच्या पिशव्या काढून हात पाहिले. भोसरीयाचा महार कान्ह्या बिन खेळो दिव्य लागला. उजव्या हाताच्या आंगो- ठ्यास आतील बगेस फोड येऊन फुटला. डाव्या हातास आगोठ्यावरल्या बगेस फुटला. आं- गोळी जवळील मधील पेरा फुटला. येणेंप्रमाणें दिव्य लागलें. भोसरीयाचा महार व घाटणी- याचा महार यादू बिन उका याचे हात चखोट निघाले. तो दिव्यीं उतरला. आपले हद्देनें चालला होता. निशाण दो गांवची निशाण शिवची ४८.

छ २४ मिनहू निशाणें घातलीं. निशाण ३२

तपशील.

१ पहिलें निशाण तिवधा पूर्वेस, दोन्ही नदीचे मेळी खडकाळी आसरा.

२ निशाण मध्यें खिळा दगड.

३ निशाण खिळा.

४ निशाण दगड.

५ निशाण गोंधणी जवळील धोंडा.

६ निशाण संवदडीचे खोडी दगड

७ निशाण आपटीयाचे खोडी चिरा

८ निशाण आराचे खोडी दगड

९ बामळचे खोडी दगड निशाण.

१० निशाण आपटीयाचे खोडी दगड.

११ निशाण संवदडीपाशीं दगड.

१२ निशाण दगडाचा खिळा.

१३ दोही वाटेमध्यें दगड.

१४ निशाण भोसरयाचे वाटेवरता जवळला चिरा.

१५ निशाण सवदडीपाशीं खिळा.

१६ निशाण दक्षणेनजीक सिलरुती.

१७ निशाण तरटीचे खोडी खिळा.

१८ निशाण आराडी नजीक कोळजाई.

१९ निशाण जोरीचे काठी, संवदडीपाशीं खिळा.
२० निशाण जोरीचे काठी खिळा व घोंडे.
२१ निशाण जोरीचे काठी खिळा.
२२ निशाण जोरीचे काठीवरता खिळा.
२३ निशाण जोरीचे काठी खिळा.
२४ निशाण जोरीचे काठी खिळा.
२५ निशाण जोरीचे काठी खिळा.
२६ निशाण जोरीचे काठीवरता खिळा.
२७ निशाण जोरीचे काठी खिळा
२८ निशाण वावरांत यलतरा आळा.
२९ निशाण जोरीचे काठी खिळा.
३० निशाण वावराचे काठी संवदडीपाशीं खिळा.
३१ निशाण वावरांत खिळा.
३२ निशाण वावरामध्यें खिळा, दगड व काठी.

छ २५ रोजीं राहिली हद्द घातली, निशाण सोळा १६.

३३ निशाण चणीयाचे वावरी खिळा.
३४ निशाण आपटीयाचे खोडी खिळा.
३५ निशाण आपटीयाचे खोडी दगड.
३६ निशाण खिळा दगडाचा.
३७ निशाण जोरीमधील खिळा
३८ निशाण आपटीयाचे जवळील दगड.
३९ निशाण जोरीमध्यें खिळा.
४० निशाण जोरीमधील खिळा.
४१ निशाण हसीवरील वावकली वरील खिळा.
४२ निशाण जोरीमधील खिळा.
४३ निशाण जोरीमधील खिळा.
४४ निशाण टाकाळीचा आळा.
४५ निशाण लबी कापसात खिळा.
४६ निशाण लबी कापसात सात दगड वावरी
४७ निशाण कापसात रुती खिळा.
४८ निशाण आठेताळीसावें निशाण दुधाय कविरा दक्षणेस तरवड खिळा.

येणेंप्रमाणें शिवेची हद्द मोहोदूद जाहली असे. उत्तरेस भोसरीयाची शिवार, दक्षिणेस घाटणीयाची शिवार, येणेंप्रमाणें शिवेचा निवाडा जाहला असे. हें केलें जो मोडलि तो दिवाणाचा गुन्हेगार. दिवाणास पाच शिर (पाव) व पाचशें होन द्यावे. हरगांवीं यानें हे पाड कोणी सोडून, हें केलें जो मोडील तो गोताचा खोटा हा महजर सही.

---

७ मलीकंबर याची सनद.

श्रीगजानन.

अजरख्तखान खुदायवद मलीकसर्फ मलीकबर दुलीदयाम दौलत हु बजानी कारकुनांनीं हाल व इस्तकबाल सरकार जुन्नर बिदानद सुरुसन तिस्सा अलफ. मंगो नरसिंह चिटणीस सरकार मजकूर मालूम केले, आपली चिटणविशी पिढी दरपिढी मिराशी आहे. तैनातबद्दल यारेदी बरहुकूम महतोज दरमाहे होन पांच गहदम चालतातीं. मुसलम नक्त यासी जागा महसूल कमाविस व हासल साहाणे व सारी व महिनेमाल व रायतले व उबरल व पळसविहिरा

व साहासोली व हरएक जागा आदा होत होता मोंगलाईचे फितरतीकरिता परागंदा जालों होतों. सरकार मजकूरचें साहेबाकडे ठाणें आलें, तेपासून ठाणें चाकरी करीत असो. सदरहू तैनात आदा होत नाहीं. दरीबाब खुर्दखत होय. मालूम जाले. बराये मालुमात खातीरेस आणून मगो नरसिह चिटणवीस ठाणें सरकार मजकूर यासी बदल यारेदी दरमहा मुशाहिरा नख्त होन पांच गहदम चालिले आहेत. तेणेंप्रमाणें महसूल कमाविसी हासल साहाणें यासी व महिनेमाल व राय मोडीतले उबरल, पळसविहिरा व साहासोली व हरएक जागापैकीं आदा करीत जाईजे. चिटणीशीचें काम सालाबादप्रमाणें त्यापासून घेईजे. दरसाल खुर्दखताचा उजूर न कीजे. तालीक घेऊन अस्सल फिराऊन दीजे. मोर्तबसुद.

८ संभाजी राजे मोहिते यांची सनद.

अजरष्टखान मसुरल हजरत खडेश्वरी सदा यशवत महामेरू राजमान्य राजश्री संभाजी राजे मोहिते साहेब दयाम दौलत हु बजानेब कारकुनानीं हाल व इस्तकबल व देशमुखानी मौजे उडतरें, परगणे कराड सुरुसन सीत अशर अलफ. कमलनयन गोसावी यासी इनाम जमीन अव्वल चावर ।। दरसवद मौजे मजकूर देविले असे देखील महसूल नख्तयाती व बाजे पटीयांतून व वेटबिगारी फुर्मायसी देविले असे. दुमाले करणें. हर दरसाल खुर्दखताचा उजूर न करणें. तालीक लेहून अस्सल फिराऊन देणें. मोकरर गजशरायणीप्रमाणें माप करून हद्द महसूद घालून देणें व हिदु होऊन मोडील त्यासी गोहत्या व मुसलमान होऊन मोडील त्यास सोराची सौंड असे. सदरहूप्रमाणें चालवणें देखील कुलबाब व गल्ला देखील देणें. मोहसूल भंडारीयास देवास दिल्हे असे हैदर यानी केलें असे. तारीख १५ माहे रमजान.

९ महालदारखान यांची सनद.

(जिल्हा अहमदनगर येथील जमिनीबद्दल भिका वल्लद फत्तू आणि बाळा वल्लद कादरमुल्ला यांणीं तारीख ११ माहे जुलाई सन १८५४ इसवी या रोजी कैफियत लिहून दिल्ही, त्यांत पुराव्याकरिता हजर केलेल्या सनदापत्रांपैकी खालील मजकूर आहे.)

किता १ हुजती सबा अशर अलफ हुजती साल महालदारखान अजरख्तखान खुदायवदखान अजम महालदारखान, खुलीया दयाम दौलत हु बजानेबु कारकुनानी व देशमुखानीं मामले जाफराबाद व हुद्देदारानीं मुतालीक मुकासाई मोकदमानी व रयानीं मौजे धारणगोवीर, परगणे मजकूर बिदानद सुरुसन सबा अशर अलफ. बाबा हाजीबुऱ्हाण साकीन मौजे मजकूर येऊन मालूम केलें जे, आपण मक्केस गेलों होतों. तेथून एक आपला इनाम मौजे मजकूरीं आहे. तेथें हल्ली ये रीती देणें:—

बाजारे राजा बाग हुजती देहाय नराइब कुलबाब, कुलकानू खेरीज देऊ, आपले दुमाला आहे. तेथें जकाती पथक निफाडचे पथकीं येऊन कमाविस करताती.ते जकाती सदरहू बद्दल लगर देवणें

जमीन चावर बद्दल मशीद आहे तो आज वाहतो.निम कीर्दी निम नाकीर्दी असे साहेबीं ते अजेसबावी याची जमीन लाऊन आपलें इनाम चावर देखील कुलबाब बद्दल चावराना दुमाला करणें. आपण कीर्दी करून खाऊ.

पेठ बाजार मजकुरीं पांढरकर कांहीं घरें बाधेान राहिले आहेत, यांस कुळास दरसाल हेान तीन सारा मक्ता घेताती. ते आपणास बाहल दादाजमालगड मन्हामती देवणें. याची लगडी करून साहेबास दुवा देऊं

सदरहूप्रमाणें खुर्दखत होय मालूम जालें. बाबा हाजी बुऱ्हान मुजावर मक्केस गेला होता ह्मणोन यासी अजरामऱ्हामती दिधले असे. दरसवाद मौजे मजकूरः—

जकाती पथक निफाडहून कमावीस करिताती तेबद्दल लगर दिधले असे हुकूम कीजे

पेठ बाजार मजकुरी पांढरीकरापासून पहिले होन ३ तीन दरसाल सारा घेताती,तो दादा जमा दिधला असे हुकूम कीजे.

जमीन चावर एक बद्दल खिजामती मशीद निम कीर्दी व निम नाकीर्दी आहे. ते अजे शिवाई तो अजेसी खालीसाची लाऊन इनामदाराचा चावर इनामदाराचे दुमाला कीजे. कीर्दी करून घेईल. देखील सदरहू बाब बद्दल चावरना दुमाला कीजे अवलाद, अफलाद चालविजे. दर दरसाल खुर्दखताचा उजूर न कीजे. तुह्मीं तालीक घेऊन असली फिराऊन दिजे.तारीख २९ माहे सवाल

---

१० सुलतान फेरोजशहा बाहमनी पादशाहाची सनद.

श्री.

अजरख्तखान खास बज्यानेब व कारकुनानीं हाल व इस्तकबाल देखमुखानीं परगणे पुणें बिदानंद सुरुसन समान अशर अलफ काजी मुनतजीब बिन काजी फतहुला व काजी महंमद बिन काजी हुसेन नवे पादशाई काजी व खतीब परगणे मजकूर, हुजूर मालूम केलें जे, ताहाअमल सुलतानानीं शहर बेदर व हरएक परगणा यास एक एक काजी मोकरर होते. यावरील एक परगण्याच्या काजीपासून गैरशेरा अमल होऊन आला. ह्मणून सुलतान फेराजशहा बाहमनी पादशाहा यांणी थोर थोर परगणेयास दोन दोन काजी, एक काजी व एक नवे काजी असे केले त्या तागाईत आपल्या वडिलास नवे काजीपणा व खतीबी दिल्ही. ते पिढी दरपिढी चालत आली आहे. व काजीपणा काजी महंमूद बिन काजी चिमण यांच्या बडिलास मोकरार जाहला. त्याचे वडील व आपले वडील एक सलुखें कारभार

करीत आले. व आपल्या वडिलांचा नवे काजीपणा व खतीबी याची सुदामती ऐसी आहे कीं, आपला लेंक अगर नातू व माऊ अगर पुतण्या व बहीण अगर भाचा व लेकीचा लेंक अगर जांवई व सोयरे धायरे यांस मिरासी नवे काजीपणा व खतीबी याची पावत नाहीं. ऐसीयास आपण हयात असतां सदरहू कबिल्यात जो कोणी विद्यावत पढिक गुणिक असेल, तो हर लायख पाहून त्यास देऊ. त्यासच लाभेल. दुसऱ्यास मिरासीस निसबती नाहीं. ऐसी सुदामती आहे. ऐसीयास हल्ली आपल्यास लेंक नाहीं, लेकीच आहेत. व आपला चुलतभाऊ काजी महंमद बिन काजी हुसेन हाही बहुत ह्यातारा बुद-(रुख) जाहला आहे. यास एक लेंक आहे, तो बिन काम लुळा, पांगुळा आहे यास बरहुकूमशेरा मनास आणितां, नवे काजीपणा व खतीबी देतां दुरुस्त नाहीं. ह्मणून आपण दोघे भाऊ सवाद करून एक कसीनें होऊन आपले लेंकी सदरबाबी ते काजी इसमाईल बिन दुल्लाबाबन औलाद मुल्ला निजाम बुऱ्हान व अशरफ बुऱ्हान शेहर वस्ताद नवासे हजरतीस पद सादात सैद हिसाब खतम यास देऊन, नवे काजीपणा व खतिबी व घरठाणा इटबदी व किताबखाना व इनामतीचे फरमान वस्तभाव कुल हाकसनद करून महजर करून दिधला असे. ऐसीयास आपल्यामागें कबिल्या. तील कोणी काजी इसमाइल यासी दावा करील, अगर ये खिजामतीचा वाटा मागेल, ह्याचे आपण दामनगीर असो. त्याचा दावा बातल असे. तरी ये बाब साहेबीं मेहेरबान होऊन, काजी इसमाल बिन दुल्लाबाबन याच्या नावें फरमान करून दिल्हा पाहिजे ह्मणून मालूम केलें. बरायमालुमाती खातरेस आणून काजी इसमाइल बिन दुल्लाबाबन यास सदरहू नवे काजीपणा व खतीबी व घरठाणा व किताबखाना व इनामती कुल दिधले असे व नवे काजीपणा व खतीबी याचा इनाम व रोजमुरा व तष्किफा व बाजेहक्क लाजिमा बितपशील:—

\+ + + × × × × ×

सदरहूप्रमाणें कुलबाब दिल्हे असे. दुमाले करणें. पिढी दरपिढी चाललें आहे तसें चालवणें. व काजी मुनतजीब बिन काजी फतूम व काजी महमद बिन काजी हुसेन यांच्या नांवें व यांच्या वडिलाचे नांवें पेशजी फरमान होते, ते फिरगोजीचे फितरातींमधीं गयाळ जाहले आहेत. ऐसीयास ते कोणास दस्त जाहले असेल आणि त्यानें हजीर केलें ते दुरुस्त असेल, तें कागद काजी इसमाइलास देणें. सदरहूप्रमाणें अमल करणें तालीख घेऊन अस्सल फिरून देणें. याची औलाद अफलाद खेरीज कोणी हिल्लाहरकत करील, त्यास ताकीद मुकरर करवणें व पेशजी यांच्या वडिलाची इजत हुरमती चालली आहे, तैसी यांची चालवणें. मोतबसुद मोतबर असे.

---

११ मलीकंबर याची सनद.

अजरटखान खुदायबंद मलीक सर्फ मलीकंबर * * * बजानेबु कारकुनानीं व देशमुखानीं मामले सोलापूर बिदानंद सुहूरसन सीत इशरीन व अलफ:—चांद खतीब, चाकरपणा मामले मजकूर हुजूर मालूम केले जे, आपणासी मुशाहिरा जमीन जिराती चावर ३॥

१॥ साडेतीन चावर दीड बिघा, यासी वजा थळ माहाशेटी कीर्दी कलसा १॥॥ ११ चावर व थळ जिऊ नागू कीर्दीकुणा १॥ २०॥, यासी रक्कम दर चावर एक ३९० एकूण एक १२२९॥ प्रमाणें बितनखा कारकीर्दी अदालत पन्हा गहदम चालिलें आहे. हल्लीं महाल साहेबासी कबजे जाहली. महाली खुर्दखताचा उजूर करितील, तर नजर अनायत फर्माऊन आपणासी खुर्दखत मन्हामती केलीयावर जेम होय. मालूम जाहले. तरी चांद खतीब, तुह्मीं तनखा मोकरर करून दिल्हा असे दरसाली खुर्दखताचा उजूर न कीजे. तालीक लिहून असल फिराऊन दीजे. हाहानी छ २५ माहे जिल्हेज, बदानद अबदुल सतार माहुब मोर्तबु

तारीख २५ जिल्हेज. खर्द जिल्हेज

---

१२ महजर.

श्री.

बेहुजूर नागावा. बेहुजूर राजश्री खडोबल्लाळ.

महजर शके १५४८ क्षयनाम संवत्सरे, फाल्गुन शुद्ध पाडवा, बेहुजूर.

काजी मुल्ला. राजश्री जिवाजी खडेराव. राजश्री रुद्र हवालदार व कारकून तालुके करकंब.

सोना ठाकूर.

तपे भोस———————— तपे करकंब————————

खंडोबा देशमुख तपे मजकूर १

शिदोजी बहिरव देशकुळकर्णी तपे मजकूर १.

बावाजी व विठोजी देशमुख, तर्फ मजकूर.

विरोजी मोकदम मौजे खेडें १.

आबाजी मोकदम मौजे देवढी १.

केरोजी पाटील मोकदम मजकूर.

मोकदम मौजे अहिरगाव १

तुळाजी मोकदम मौजे देहें १

देहाय तपे करकंब————

सोनाजी पाटील मौजे आरण १.

तुबाजी मोकदम तर्फ मजकूर १.

रामजी मोकदम मौजे पाथरी १.

नरस पाटील मोकदम मौजे गुरसालें १.

कोंडजी पाटील मौजे सापटण १.

दारजी पाटील मौजे अव्हें १

हानाजी पाटी मौजे वरवडे १.

गोंदजी पाटील व गोंदजी चौगुले मौजे पेजूर १.

येकोजी मोकदम मौजे मालगांव १.

कानजी मोकदम मौजे बरडी १.

रवळोजी मोकदम विठ पाटील मोकदम
मौजे बेबळें १. मौजे लोढापुरी १.
मोकदम मौजे आ- मलकोजी मोकदम
खुब १. मौजे उज्जनी १.
महालजी मोकदम नरसोजी मोकदम
मौजे पिपळनेर १. मौजे हेदलखुर्द.१

बेशमी बापोजी अनत व गोंदजी राम देशकुळकर्णी, तपे मजकूर सुरसन सब्बा अशरीन अलफ, कारणे महजर लेहून दिल्हा ऐसा जे --मावजी पाटील मोकदम व केरोजी पाटील हे उभयता मोकदमीबद्दल भांडत कसबे मजकुरास आले. त्यासी साहेबी देशमुख व देशपाडे यानी तह करून थळ मौजे गुरसाल येथें तळ दिल्हा. त्यास त्यानी निवाडा केला की, मावजी पाटील यानी मोकदमी करावी. ऐसा निवाडा होताच केरोजी पाटील यानें फद केलें कीं, निवाडा खोटा केला ऐसें म्हणों लागला. त्याजवर नरसोजी पाटील मोकदम यानें समस्त दाहीजणे गोत्रीज व बारा बलुते मेळवून तह केला कीं, श्री म्हसोबापाशीं चिठ्या टाकाव्या, त्यात खरा खोटा जो असेल तो निवडेल, ऐसे बोलले. मग सर्वत्रांच्या ध्याना आले. मग शिराधडाच्या चिठ्या दोनी करून देवापाशी टाकिल्या मग त्या उभयतांस बोलाऊन सागितलें की, चिठ्या उचला. त्यास त्या दोघानी चिठ्या उचलोन आणिल्या तों शिराची चिठ्ठी मावजीनें आणली, धडाची चिठ्ठी केरोजीनें आणिली. त्या चिठ्या वाचोन पाहून निवाडपत्र करून दिल्हें ऐसे जे --मावजी पाटील याने मोकदमी करावी आणि केरोजी पाटील यानें बापरोटी निमे मात्र खावी. थळ विद्यमान पत्रें घेऊन तपे मजकुरास आले. ती निवाडपत्रें अमीनास व देशमुख व देशपांडे यांसी दाखविलीं. त्याजवरून अमीनानी देशमुख व देशपाडे व मोकदम, परगणें मजकूर यांसी बोलावून विचारिलें की, त्यांच्या निवाडा कैसा आहे तो करून देणें त्याजवर देशमुख तपे मजकूर व मोकदम तपे मजकूर व देशपाडे तपे मजकूर बोलिले ऐसे जे, थळ पत्र आलें तें प्रमाण. येणेंप्रमाणें बोलिले. त्याजवरून जाब लिहिला ऐसे जे, मोकदमी मावजी पाटील यानें करावी आणि केरोजी यानें हक्क दक्क निमे मात्र खाऊन असावें. मोकदमे खाले जे उपद्रव होईल, ते दोठायीं पडेल. त्यानें दो जागा खाऊन सुखी असावे. हें जो मोडील त्यास दिवाणचा गुन्हेगार व गोतास खोटा हा महजर लिहून दिल्हा. सही छ ५ माहे साबान.

---

१३ मरारी जगदेव यांनीं दिलेली सनद.

॥ श्री ॥

श्रीनृपविक्रमार्क शालिवाहन शके १५५५.

मुख्यपत्रस्य प्रतीइयम् ॥ श्री मंगलमूर्तये नमः ॥ नमस्तस्मै महेशाय यस्य संध्या-

त्रयछलात् ॥ यातायातं प्रकुर्वंति त्रिजगत्पतयोऽनिशं ॥ १ ॥ स्वस्ति श्रीमुखनामसंवत्सरे ॥ दक्षिणायने ॥ वर्षाता भाद्रपदमासे कृष्णपक्षे अमावास्याया सोमवासरे ॥ घटिका ११ पलानि १ हस्त नक्षत्रे घटिका ६ पलानि १३ ॥ ऐंद्रयोगे घटिका २२ पलानि १८ तत्काल नागकरणे एव पचांगशुद्धौ अस्मिन् पुण्यकाले केतुग्रस्ते दिवाकरे सूर्योपरागे महापर्वणि श्रीमद्वशिष्ठकुलजलधिमहारत्नभूतः परम——प्रताप——प्रहतारातिगेहिनीनयननीरपूरपूरितप्रारोवारः श्रुतिस्मृतिसदाचाराचरणपाविताविनितल महादानानुदानकृतार्थीकृतदीनानाथोऽनेकान्नसत्रजीविताखिलान्नजनसत्कीर्तिचद्रिकाप्यायीतससारतापतप्तविबुधजनः धर्मावतारराजाधिराजः महाराज. राजश्रीः पडित· मुरारिः जगदेकप्रभुः ॥ सार्वभौमप्रतिनिधिः ॥ इद्राणीभीमरथीसगमे सकलपातकनाशकत्वेन पुराणप्रसिद्धे पुण्यक्षेत्रे रविग्रहस्पर्शकाले सब्रह्मसमाजस्नानश्राद्धादि नैमित्यक साग विधाय मुख्यकल्पमनुसृत्य साग साभरणं गजदानमश्वदान गोशतदान च कृत्वा शास्त्रविहितमार्गेण सुवर्णरजतादिचतुर्विंशतिसंख्याकानि तुलामहादानानि सागानि तदैव कृत्वा तद्धनेन दीनानाथान् ब्राह्मणास्ततन्मनोरथैः पूरयित्वा भूमिदानार्थं तत्रैव नागरग्रामसज्ञकमाम्रवृक्षात् सर्वेद्यादिस्वसीमासहितराजरेखया शतत्रयवराहपरिमितभूमिकमग्रहारसज्ञक कृत्वा सगममित्यग्रहारनाम निर्दिश्य शतत्रयवराहपरिमिते भूमिके षोडशाधिकद्विशतवराहपरिमितभूमिक पृथगपास्याष्टादशभागान्समानकृत्वा ॥ तत्र भागद्वय सगमेश्वरस्य दीपदानाभिषेकनैवेद्यार्थमुपकल्प्यावाशिष्ट षोडशभागानेकैकमशमेकैकस्मै विभज्य दत्तवान् ॥ तत्र तावत्षोडशब्राह्मणाना नामानि ॥ सोनभट देवगिरस्त १ नरसिह भट अग्निहोत्री २ त्रिबकभट नांदुरकर ३ त्रिबकभट सुदामे ४ त्रिंबकभट खेडकर ५ भानभट तळेगावकर ६ माहादेवभट पुरदरे ७ त्रिंबकभट पुराणिक ८ पुरुषोत्तमभट वैष्णव ९ भानभट वैष्णव १० गोपतिभट ढेरे ११ अपदेवभट चित्राव १२ बाळ पाठक नाशिककर १३ रगनाथभट ग्रामज्योतिषि १४ सोमनाथभट ग्रामज्योतिषी १५ पुडलिक हरिदास पढरपुरकर १६ एव षोडश ब्राह्मणेभ्यो दत्वाऽवशिष्टचतुरशीतिवराहपरिमिते भूमिके चत्वारिंशद्वराहपरिमितभूमिक स्वपुत्रपौत्रादि सतत्यर्थं वृत्ति प्रकल्प्यावशिष्टचतुश्चत्वारिशद्वराहपरिमित भूमिकं पृथगपास्यैतच्चतुर्धा समाश विभज्यैकमश श्री कालिदासकविश्रेष्ठेभ्यो दत्वैकं वररुचये दत्वैकं त्रिमलभट पुरोहिताय दत्वैक रायारायाय दत्त्वाऽवशिष्टवराहचतुष्टयपरिमित भूमिक हले गौडाय गृहनिर्मित्रे दत्त्वैव राजरेखया शतत्रयवराहपरिमितभूमिक क्षेत्रं चतुर्विंशतिधा पूर्वोक्तप्रकारेण सविभज्य ब्राह्मणेभ्यः अग्निहोत्राध्ययनाध्यापनादिधर्मानुष्ठानार्थ दत्तवान् ॥ अत्र पूर्वोक्त विभागक्रमेणस्वस्वक्षेत्रोत्पन्नान् ॥ चयापचययोदात्रिसंततेः सबंधो नास्ति किंतु ब्राह्मणानामेवेत्युदकधारापूर्वकं दत्तवान् ॥ इद श्रीमत्प्रभुपुत्रपौत्रादिवशजैः सरक्षणीयं तथाच भावि भूपालैरपि सरक्षणीय ॥ अन्यथा आकल्पं पितृभिःसह नरक-वासो भविष्यतीति ॥ यदर्थे धर्मशास्त्रं ॥ स्वदत्तां परदत्तां वा यो हरेच्च वसुधरां ॥ षष्टिर्वर्षसहस्राणि विष्ठायां जायते कृमिः ॥ १ ॥

दान-पालन-योर्मध्ये पालनं तु विशिष्यते ॥ दाता स्वर्गमवाप्नोति स्वर्ग मोक्ष च पालकः ॥२॥ इति मुख्यपत्रपंक्तयः ॥ ७५ ॥

१४ दलेरजी राजे यांनीं दिलेली सनद.

अजरष्टखान राजश्री देलेरजी राजे दाम दौलत हुजबाने हु कारकुनानी व देशमुखानीं तालुके अष्टग्राहा, मामले गोवा बिदानद सुरसन खमस सलासीन अलफः—हिंगळगिर गोसावी सस्थान सदानद निब यासी बद्दल धर्मादाऊ व भडारा धर्मादाय पेशजी सौ॥ बती रयती सा। दळवारी अजरा मन्हामतीस दिधले असे.

गल्ला कैली मण ८१ नक्त टक्का एक १.

सदरहूप्रमाणे साल दरसाल आदा करीत जाइजे. दर दरसाल खुर्दखताचा उजूर न कीजे. दर गावास सदरहू प्रमाणें देत जाईजे. तालीक घेऊन असल फिराऊन दीजे. मोर्तब. तेरीख ३० जमादिलावल

१५ कोबजी राजे साहेब यांनीं दिलेली सनद.

अजरष्टखान मशरुल हजरती राजाधिराज श्री कोबजी राजे साहेब खराडे, दाम दौलत हु तहा कारकुनानी हाल व इस्तकबल व देसाईयानी संमतहाय, मामले बागलकोट मालूम दानद सुरुसन तिसा सलासीन अलफ. तिमणभट बिन विठ्ठलभट पुरोहित, मामले मजकूर, मुक्काम मौजे किरसुर, समत हवेली हुजूर मालुम केले जे, आपण सुखवस्तीनें किरसुरीं असतो. मौजे मजकुरी राहून अध्यायन व पुराण सागतों. आपणास काहीं स्वास्तक नाहीं, नजर इनायत करून स्वास्तक करून दिधलीया, तेथें राहून अध्यायन व पुराण सागून तें श्रेय तुह्मास येईल, ह्मणोन मालूम केलें तरी भट मजकूर यास अजमरहामती केल आहे बितप्रशीलः—

इनाम जमीन दुखम रेगडी दरसवाद मौजे किरसुर, देखाल नख्त व महसूल व ऐन जिनस व कुलबाब व कुलकानू देखील पट्टीयांत * * * वेटबेगार फर्मायेसी व वाक खडणी कुलबाब देखील जम न दुखम कुडो एक ८१.

देहाडी दरसाल जकाती व खळा बेंड नुरु दररोज रुक्के बारा ८।

येणेंप्रमाणें मरहामती केलें आहे. भट मजकुरासी यासी इनाम हद्द महदूद घालून देणें व देहाडी दररोज, सदरहू प्रमाणें आदा करीत जाणें यासी मुसलमान अगर हिंदु इसकील करील त्याची सौंगद आहे. अवलाद, अफलाद व इनाम व देहाडी चालवणें. दर

दरसाल ताजा खुर्दखताचा उजूर न करणें. तालीक लिहून घेऊन अस्सल खुर्दखत भट मजकुरासी फिराऊन देणे. तारीख १० माहे जमादिलाखर.

१६ सुलतान महंमद साहेब यांनीं दिलेली सनद.

स्वस्तिश्रीजयाभ्युदय शालिवाहन शके १५६९ सर्वजीत नाम संवत्सरे, भाद्रपद शुद्ध पचमी, सोमवार पुण्यकालीं, हजरत सुलतान महंमद साहेब याणीं पृथ्वीचे राज्यकारभार करते समयी अनेक बिरुदाकित महामहंत अमीन भावी मठ सिंहासनाधिश्वर चिक शांतदेवरु यांस अमीन भावी पो देसाई होजबदी आदौवा चिकदेव पावडेर व देशपाडे कोन्याचा लेंक कृष्णपा याणीं लिहून दिल्हें इनामपत्र ऐसी जे –सुरुसन समान अर्बैन अलफ. सालगुदस्त व्ययनाम सवत्सरात आमचे प्रात दंडाराजपूर, सिद्दी अबर यास दिल्हे असतां, त्यांजकडून सिद्दीसाद राजे ह्मणणार, मुलखाचे हवालदारीस येऊन, तुमचे गुरुस्वामी राजश्री हिरेसात देवरु, यास शपथ देऊन, कपटानें धरून मठाचे जिदगी जितरुब वगैरे घेऊन, समग्र वतन अमानत करून अय्या यास मारहाण केल्यावर ते मृत्यु पावले. त्यानंतर सिद्दीसाद राजे याणी तुह्मास अहेर वगैरे देऊन मठ तुमचे स्वाधीन केला असता, फेतीअय्या याचे शिष्य वगैरेनी बाहेर पडन तळीं वगैरे करीत असताना, तितक्यांत सदरहू प्रांत राजपुरीयास काढून राजश्री आदम साहेब यास मोकरर जाहला. साल मजकुरीं मुलखाचे लावणी सचणीस हरकत जाहल्यावरून थोर कारकून व आम्ही मोरब तर्फ देसाई गुरबण गौडा यास वडीलपणानें फैसल करावे ह्मणोन सागोन पाठविले. तेव्हां त्यानें मध्यस्त होऊन राजश्री अमळगोल मठ सगपा देवरु व मत्र वडीये बसवालिग देवरू व नवलगुंद मठाचे बसवालिग देवरु व नरेंद मठाचे वरिपाक्ष देवरू व कुसेगल मठाचे गुरुपाद देवरू व धारवाड मठाचे देवरू व सारग मठाचे भडारी चेन्नवर देवरू व हेबळी मठ बसवालिंग देवरू वगैरे मोठे महंत यास नरेद्र परगणे देसाई कारगौडा व गुमगोल भरमणगौडा व सिवणगौडा व मटूर पर्वतगौडा व कावळवाड बसणगौडा व बेटसूर मादणगौडा कुमी कैचणगौडा व येळारामी जेटीगौडा व चन्यगौडा व बेलहाल भरमणगौडा व धारवाड मर्डीरा यमाजी नाईक व जगम गाडचौ व पटणशेटी चेन्नीशेटी व कोमटी सिधलिंगशेटी व मतीगटी मलपा वगैरे सर्वत्र जमीदार लोकास व तुमचे शिष्य लोकास आणवून या स्थळास येऊन, येथील कारकून यास व आमचे गावगन्नातील पाटील व रयत व बारा बलुतीदार व शेटी महानाडचे लोकास आणवून गुरुशिष्याचे वाद तोडून, मठाचें वतन सर्व मनास आणोन पुढें परपरा चालवण्याचे इराद्यानें पुरातनचे वतन सुद्धा ठराव करून दिल्हे.

१७ हुमायून पादशाहा यांनीं दिलेली सनद.

(पारशीचा तर्जुमा मराठीत.)

फर्मान हुमायून मामलेदार वर्तमान व भावी व देशमूख, परगणे सुपें यांजकडे सादर

जाला ऐसाजेः—सुरुसन सलास खमसेन व अलफ, दरिविला मोरया गोसावी वास्तव्य मौजे चिंचवड यांणीं दरबारांत येऊन अर्ज केला कीं, आपल्यास इनाम जमीन खालीं लिहिल्या तपसील प्रमाणें कसबे परगणे मजकूरपैकीं जमीन जिराईत शराई गजानें एक चाहूर बाबाजी खैर याजबद्दलची व रोजीना तगदी जकातीवर सहाची तळ व खानापूर येथील, तेल वजन एक शेर व मौजे कोन्हाळें, परगणे मजकूरपैकीं जमीन शराई गजानें एक चाहूर खनारकर पाटील याजबद्दलची, निजामशहा यांचे फर्मानाप्रमाणें व मलिक अंबर यांचे खुर्दखत व शिवाय दुसरे वजीर लोक यांचे खुर्दखताप्रमाणें कारकीर्द दरकारकीर्दी व त्यापुढें सुजाअत व इजत दस्तगाहा उमदे दौलतख्वाहान व फाकेसफिदवे हावाख्वान खैर आदेश जुबदे तुलकबाइल वलईख्वाहान खुलासे समावीत शरीरसमंधीं दीपप्रकाश सुरतदान महाराज चिरंजीव शहाजी भोंसले याचे खुर्दखताप्रमाणें बहुत दिवसापासून ज्यारी व चालू आहे. व फर्मान निजामशा व मलिकअंबर याचें खुर्दखत व शिवाय दुसरे वजीर लोक याचें खुर्दखत याजवळ होतें. तीं सर्व अफरातफर होऊन गाहाळ जाली व निजामशाहा याचे कारकीर्दीपासन भोगवटा व वहिवाट चालू होती. त्याजप्रमाणें महाराज मशारनिल्हे याणीही सालाबाद चालू ठेवली आहे. याजकरिता आता उमेदवार आहों की, फर्मान आशरफची मेहेरबानी व्हावी, ह्मणजे हमेष हमेषा वहिवाट मजबूद होईल. याजकरिता बादशाही मेहेरबानीनें सदरहू इनाम मशारनिल्हे मोरया गोसावी यास दाखल महसूल व नगदी व पायपोसी व खर्चपट्टी व सरदेशमुखीपट्टी व सराफीपट्टी व दैवतपट्टी व ताजीपट्टी व उरुसपट्टी मुकरर सादिलवार व खुषी व मेजवानी व पेशकसी व बकरपट्टी व तूप व तेल व कडबा व खरेदी व नगदी व सण व सूत व लोखंड व बाबहाय तालुके ठाणें व तालुके देहेहाय व पालवार व वेठबिगार व फर्मायष व सेवसबाजी व सर्व बाबी इसमी व रसमी—ज्या सरकारी दप्तरात लिहिल्या आहेत त्या व पुढें निघतील त्या—सर्व मन्हामत केल्या आहेत. यास्तव पाहिजे कीं, इनाम मजकूर सदरहू लिहिल्याप्रमाणें मोरया मजकूर यास दुमाला जाणून ज्यारी ठेवावें. व सदरहू कागद जे निजामशहा याचे कारकीर्दीचे गाहाळ जाहले आहेत त्याजबद्दल कधींही उजूर न करावा, व त्याचे पुढें अवलाद व अफलादास जारी ठेवावे व दरसाल फर्मानाचा उजूर न करून साल दरसाल या फर्मानास जारी ठेवावे. व जर कोणी मुसलमान लोकापैकीं या इनामास हरकत करील, तर तो निरकार व पैगंबर याचे रागांत धरला जाईल, व कोणी हिंदुलोकापैकीं कोणी हरकत करील, तर त्याणें श्री काशींत मोठें पाप केलें असें होईल. तालीक घेऊन अस्सल फर्मान परत देणें. तारीख ३ माहे जमादिलाखर सन १०६३.

१८ अल्ली आदिलशाहा पादशाहा विजापूरकर यांनीं दिलेली सनद.

(ईश्वर श्रेष्ठ आहे. सर्व मुलूख ईश्वराचा आहे.)

श्री ईश्वर हजरत महमद रसुलिल्लाह पैगंबर यासी म्हणतो कीं, आह्मीं अल्ली पैगंबराचें नांव असे ठेविलें आहे कीं, ज्या नामांतून अनेक चमत्कार निघावे. अशा चमत्कारांचें जें नाम खजीनाच आहे. तुझीं संकटसमयीं तुमचे साह्यार्थी अल्ली पैगंबर याची प्राप्ती करून घ्याल. तरी अल्ली पैगबर याचे सिद्धाईचे सामर्थ्यानीं तुमचें हरएक संकट व चिंता अति त्वरित सुलभपणाने निवारण होईल. या अल्ली ! या अल्ली ! या अल्ली ! यातील तात्पर्य असें आहे कीं, ईश्वराचें वाक्य कुराण शरीफचे ग्रथांत असतें. त्यांस अयत असे व पैगंबराचे वाक्यास हदीस असें म्हणतात. पादशाहाची चाल अशी आहे कीं, तख्तावर बसून राज्य चालविते समयीं आपले नावाचा शिक्का चालवावयाचा. त्या शिक्क्यांत नाव भरावयाचे तें आपले नांवाचीं अक्षरें ज्या आयतेंत किंवा हदीसात निघतील, ते हदीस किंवा आयत, त्या शिक्क्यांत भरावी ह्मणजे तो शिक्का आपले नांवाचा जाहला. या रीतीनें हदीसचें दोन बैतांत अल्ली पैगबर याचे नावाचा विस्तार आहे. यास्तव या दोन बैताचे चार चरण विजापूर येथें अल्ली आदिलशहा पादशहा यानी शिक्क्यात कोरवून तो शिक्का आपले नांवाचा मुकरार करून सनदेवर टाकिला आहे.

सनदेंतील मजकुराचा तरजुमाः—

" कल्याणकारक फर्मान सादर केला जातो जे, योग्यता व श्रेष्ठतेस आहे आधार ज्याचा व शूरत्व व पराक्रमाची आहे जरब ज्याची, व श्रेष्ठ सरकारातील जो प्रसिद्ध व श्रेष्ठ पदवीचा आहे अत्यत अधिकार ज्याचा व पूर्ण विश्वासूक, कल्याणकारक आहेत लक्षणें ज्याचीं, व उत्तम प्रकारचा आहे स्वभाव ज्याचा व शुभदायक आहे राहणी ज्याची, व राजधानींतील सन्निध असे जे राघो पडित यांनीं पादशाहाचे अत्यत कृपेनें व पादशाई आदर व मेहेरबानगीनें योग्यता व श्रेष्ठता पाऊन जाणावें कीं, पादशाही जनानखान्यापर्यंत आहे राबता ह्मणजे प्रवेश ज्याचा व उपमा घ्यावयाजोगें पुरुषांतील व पादशाहाचे संन्निध राहणार कारभारी मडळीतील जे मुख्य असे जे झुंजारराव यानीं साप्रत विनति केली कीं, परगणे माण येथील सरदेशमुखी व कसबे मलवडी येथील देशमुखी पातशाही कारकीर्दीपासून पिढी दरपिढी ह्मणजे वशपरंपरेने मशारनिल्हे याजकडे ह्मणजे आह्मांकडे चालत आली आहे; व हाल पर्यंत मलवडी ज्याकडे चालू होती त्याचे देशमुखीपणाचे वतनास कोणीही हरकत केली नाही, व हल्लींही मलवडी त्या दौलतीचें कल्याण इच्छणारास ह्मणजे राव मशारनिल्हे यांस स्वामींनीं कृपाळू होऊन दिल्ही आहे. त्या राव मशारनिल्हे यांचे देशमुखीपणाचे वतनास उपद्रव होत आहे. देशमुख राव मशारनिल्हे हे खुद्द जातीनें देशमुखीचें काम चालवीत नाहींत. त्यांनीं आपले तर्फेचा मनुष्य देशमुखीपणाचें वतनावर नेमून आपण खुद्द जातीनें पादशाई मसलतीचें काम सिद्धीस नेत आहेत. याकरितां राव मशारनिल्हे ह्मणजे झुंजा-

रराव यांची विनंति, श्रेष्ठ, कल्याणदायक अशी जी सरकारची खातर, त्या खातरेस आणून ह्मणजे विनति मान्य करून, पृथ्वीस जी आज्ञा मान्य अशी आज्ञा केली जाती जेः—हा पादशाई परवाना दाखल होताच, मौजे बोथें व मौजे शिदी खुर्द व मौजे कुळकजाई व खेरीज चाहूरांत कुरणें वैगेरचा हक्क, पट्टी पछोडी व हक्क लवाजिमे व चतुःसीमा व विश्वा व जकात व याखेरीज कितेक मानपान प्रतिवर्षीचे वहिवाटीप्रमाणें देशमुखीकडे चालत आहेत त्याप्रमाणें चालवून, कोणतेही सबबेनें कोणीही सदरहू देशमुखीचे वतनास अडथळा करूं नये व उपद्रव देऊ नये व श्रेष्ठतेसी आधार आहे ज्याचा असे जे झुजारराव हे सरकारचे सेवक आहेत व राव मशारनिल्हे ह्मणजे झुंजारराव हे पिढी दरपिढी सरकारचे नोकर आहेत. याजकरिता त्याचे चालते वहिवाटीत कोणीही अमलदारानी उपद्रव करणें योग्य नाही या प्रकरणीं पुन्हा इकडे बोभाट येऊ देऊ नये. या सनदेची प्रत लेहून घेऊन ही अस्सल सनद झुंजारराव यासी परत देणें. ह्मणजे ते त्याप्रमाणें चालतील. छ २० माहे जमादिलाखर सन १०४९ हिजरी."

परवानगी हुजूर श्रेष्ठ व पवित्र व कल्याणकारक अतिश्रेष्ठ जाहली असे.

---

१९ बादशाहा अल्ली आदिलशाहा यांनीं दिलेली सनद.

(फारशीचा तरजुमा मराठींत.)

बादशाहा अल्ली आदिलशहा यानें दिल्हेले फरमानची नक्कल—मामलेदार वर्तमान, भावी व देशमुख, परगणे पुणें यास थोर पदवीचा फरमान सादर जाहला ऐसा जेः—सुरुसन खमस खमसेन व अलफ यात दरविला शेखअबदुल्ला बिन शेखमिया चाकरी करणार दरगाहा हजरत शेखसला होदिनसाहेब पीर वास्तव्य कसबे परगणे मजकूर यानें हुजूर येऊन विदित केलें कीं, आपणास दरग्याचे चाकरीबद्दल जमीन शेरी नजीक सगम किनाऱ्यालगत दरगाहा पिरा खन एक चाहूर जमीन शराई गजानें कसबे मजकूरपैकी इनाम निजामशहा याचे थोर पदवीचा फरमान व मलिक अबर यांचें खुर्दखत व बादशाही फरमान बरहुकूम ज्यारी आहे. सुभ्यांत दस्तगाहा महाराज चिरजीव शहाजी भोंसले याचे कारकीर्दीत पैमाष करण्याचे वेळेस जमीन मजकूर शराई चाहुरानें ज्यास्ती निघाली, तर मशारनिल्हे महाराज यानी आपले तर्फेनें जास्ती जमिनीस दरग्याचे खाली मुकरर करून दस्तखत दिल्हें ह्मणून आ साहेबांनीं मेहेरबानीची नजर करून फरमान दिल्हा पाहिजे. तर भोगवटा मजबूत होईल. याजकरिता विदित त्याचे मनात आणून, शराई गजानें चाहुरातून कसबे मजकूर पैकी पैमाष करण्याचे वेळेस जी जमीन जास्ती महाराज मशारनिल्हे याचे खुर्दखताबरहुकूम इनाम दरग्यास मन्हामत करून दिल्हें आहे. यास्तव पाहिजे कीं जमीन जास्ती मजकूर दाखल महसूल व नक्की व सर्व लवाजमे, वेटबेगार, व फरमाइष व कुलबाब व दिवाणीबाब वगैरे व सादिलवार वगैरे व बाजी कुलकानू माफ समजून मशारनिल्हे यास दुमाला करावें. व एक चावर जमीन मजकूर ह्मणजे निजामशाहा याचे फरमान व मलिकअंबर यांचें खुर्दखत व

बादशाई फरमान बरहुकूम चालत असेल, तेणेंप्रमाणें कुलबाबसुद्धा शेख मजकूर यास दुमाला करणें व याचे पुढें याचे अवलादास व अफलादास चालू ठेवावें व दरसाल फरमानाचा उजूर न करितां, साल दरसाल याच फरमानावर चालू ठेवावें. नक्कल लेहून घेऊन अस्सल फरमान परतून देणें. जाणिजे. आज्ञाप्रमाण चालीजे. तारीख ३ माहे जिल्कांद सन १०६५ फसली.

---

२० श्रीशंकर भारती जगद्गुरु यांस मिळालेली सनद.

(फारसीचा तर्जुमा मराठींत)

फरमान हुमायून शरीफ सुदरीयात्फ बज्यानि मशाजरत हवालदार व कारकुनान हाल व इस्तकबाल दारुल सलतनत मामले पूरनूर महमदपूर सुरुसन इहिदे सितैन व अलफ. यात हल्ली सरकारात अर्ज पोचविला कीं, मौजे येतनहाळ, समत उकळी मामले मजकूर येथें पहिले फरमानाबरहुकूम श्रृंगेरी व कुडगी या मठाचे खर्चाकरिता बनाम श्रीशंकर भारती ब्राह्मणाचा व हिंदूचा व मुलखाचा जगद्गुरु यास चालत आहे व भोगवटाही होत आहे. मेहेरबानी करून मजबुतीकरिता नवीन सनद द्यावी. याजकरिता त्यांचा अर्ज मनास आणोन मौजे येतनहाळ श्रीशकर भारती जगद्गुरु यांस इनाम खर्च हमेषाप्रमाणें मठाकरिता दिल्हा आहे. तरी सदरी मौजेचा देखील महसूल नगदी व सर्व लवाजिमा, वेटबेगार, फरमाष व पैका पायपोस व मेजवानी व मुसूलबिल व हालकष व पट्टी, शिक्का बादषाई व काम,इमारती,वेट सरकारी वहसील, गल्ला नवापुराणा, तोरण भेट सादिलवार व बाजेपट्टी, कुलबाब व कुलकानू व एकदर कानून येणेंप्रमाणे पुरातन कलमीं व नगदी व जिनसी सरकारचे दप्तरी शाबीत आहे. व पुढें नवीन होतील ते सर्व इनामाशिवाय सालोसाल त्यास त्याचे मागे कोणी गादीवर बसेल त्यांस चालवावें. नवीन फरमानेचा उजूर न करिता सालोसाल हे फरमानावर चालवावें. वर्तनादेसाई, देशकुलकर्णी व नाडगौडा माफ समजणें. यावर जो कोणी मुसलमान हिल्ला, हरकत, मना करील, तर त्यास खुदा रसूलची व कुराणाची व मक्केची शपथ असे. शेवटी त्यास चागलें होणार नाही. व जर कोणी हिंदु हिल्ला, हरकत, मना करील, तर त्यास हरीहर, वेदशास्त्र व मातापिता यांची शपथ आहे व काशींत गोहत्या केल्या सारिखें होईल. नक्कल लिहून घेऊन अस्सल फरमान परतोन देणें व फरमान बरहुकूम चालणें तारीख २१ जिल्हेज सन १०७१ परवानगी हुजूर.

---

२१ राजे शुंजारराव यांनीं दिलेली सनद.

७ अजरष्टखान मशरुल हजरत राजेश्री शुंजारराऊ राजेसाहेब दामदौलतहु बजानेब कारकुनान हाल व इस्तकबाल देशमुखान तर्फ कारवें, प्रांत कराड बिदानंद हर्षी सुरुसन इहिदे सितैन अलफ, दरविला कमलनयन गोसावी मुक्काम मठ सदानंद मौजे निंब, प्रांत

वाई हुजूर येऊन मालूम केलें जे, आपणास इनाम जमीन बिघे तीस ।· दरसवाद मैजे इडमिडें, परगणें मजकूर व जाहती भडारा बरहुकूम खुर्दखत धारोजी राजे मोहिते भोगवटा व तसरूफाती चालत आहे हल्ली मौजे मजकूर साहेबास मोकासा अर्जानीं जाहला, महाली कारकून खुर्दखताचा उजूर करितात नजर इनायत फरमाऊन खुर्दखत सादर होय ह्मणून. तरी बराये मालुमाती खातेरसी आणून सदरहू इनाम देखील महसूल व नक्त-याती व बाजेपटीया वेटबिगारी व फरमायसी कुलबाब, कुलकानू, दुमाले केले असेत दुमाला करणें. दरम्यान भोगवटा तुटला असली त्याचा उजूर न करणें सदरहू इनामास हिदु होऊन इस्कील करील व मुसलमान इस्कील करील, त्यास त्याचे महजबाची सौगद असे. दर हरसाल ताजा खुर्दखताचा उजूर न करणें तालीक लेहून घेऊन अस्सल खुर्दखत इनामदारास परतोन देणे. मोर्तब परवानगी हुजूर राजश्री नागोजी बाबाजी * * * तारीख २९ माहे जिल्हेज, मुकाम पिंपोडें.

२२ काजी महंमद कासीम वगैरे यांस दिलेली सनद.

श्री

तर्जमा सनद राजा जसवतसिग बहादूर याचा हसील फिदवी अवरगजेब पादशहा दिल्लीचा.

देशाधिकारी, वर्तमान भावी, परगणे पुणें येथील यास हुकूम की, हुजूर जाहीर जालें कीं, अदालतपन्हा याचे सनदेप्रमाणें निमे काजीपणा व दरोबस्त खतीबी परगणे मजकूरची काजी सिलेमान याचे नावें मुकरार होती तो वारलीयावर काजी महमद कासीम व काजी महमद अवलाद काजी सिलेमान मजकूर याणें अर्ज केला की, निमे काजीपणा व दरोबस्त खतीबीबद्दल सनद द्यावी. ह्मणोन पेशजीचे सनदाप्रमाणें निमे काजीपणा व दरोबस्त खतीबी परगणे मजकूरची मुकरार करून दिल्ही. त्याप्रमाणें पुस्त दरपुस्त खात जावे व मशारनिल्हे लायक आबस्तार ह्मणजे पेशजीचे वतनाशिवाय मोर्तबीचे वतन व तवलियेतचें वतन परगणे मजकूरचे मशारनिल्हेस दिल्हें आहे तर खात जावें या हुकुमाप्रमाणें वहिवाट चालवावी. तारीख १७ जमादिलाखर सन ७ जुलुस, सन १०७५ हिजरी.

२३ रताजी वल्लद नरसिंगराव माने यांस दिलेली सनद.

(बिसमिल्ला हीर रहिमान निर रहीम. सर्व मुलूख ईश्वराचा आहे)

देशमुख व देशपाडे व मोकदम व रयत लोक कर्यात मान मामले पूरनूर महमदपूर, मुरसन सीत सितैन व अलफ. हल्ली सय्यद इबलास षरजाखान याणी हुजूर येऊन विनति केली (कीं,) रताजी वल्लद नरसिगराव माने देशमुख व सरदेशमुख, कर्यात मजकूर याणीं राजा जयसिग याचे युद्धात जिवादारभ्य पराक्रम करून विनति करीत आहेत की, कर्यात मजकूर हे गांव स्वामींनीं कृपाळू होऊन आह्मास इनाम द्यावें.

चार गावचा तपशील.

१ मौजे हिंगणी, कर्यात ह्मसवड.	१ मौजे गारवाड, कर्यात आकलूज.
१ मौजे कनेर, कर्यात दहिगाव.	१ मौजे निमगांव, कर्यात वेळापूर.
२	२

येणेंप्रमाणें चार गांव दरोबस्त कुलबाब, कुलकानू सहित स्वामींनीं कृपाळू होऊन इनाम दिल्हे पाहिजेत, ह्मणोन विनंति केली त्याजवरून मशारनिल्हेचे विनंतीप्रमाणें मनास आणून पादशाही कृपाळू चालीनें व पादशाही अत्यत दयाळू रीतीनें रताजी वल्लद नरसिंगराव माने देशमुख व सरदेशमुख, कर्यातहाय, परगणे मजकूर हे गाव नवीन वतन जाणून समजून देहाय प्रात मजकूर कृपाळू होऊन इनाम दिले असे. तरी सदरहू गाव माने याचे दुमाला करणें. त्याचे पाठीमागें त्याचे अवलाद व अफलाद वशापरपरेनें चालवावें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा अक्षेप न करणें. या सनदेची प्रत लिहून घेऊन अस्सल सनद भोगवटीयास परतोन देणें. ह्मणजे ते या फरमानांतिल अतिश्रेष्ठ व पवित्र सरकाराचे हुकुमाप्रमाणें वहिवाट करतील. तारीख ७ माहे सवाल ही सनद पूर्ण ऐश्वर्यानें व कल्याणपणानें समाप्त झाली असे, सन १०७०.

अतिश्रेष्ठ व कल्याणदायक व परम पवित्र हुजूरची परवानगी सव्यदपणास व ज्ञातीधर्मास आश्रयभूत मिरजा कामाचे समजूतदार नुरुल्लाहाखान सरखेल मुमालिक यास जाली असे.

२४ रताजी वल्लद नरसिंगराव माने यांस दिलेली सनद

(फरमान हैदरअल्ली इबन महमद पादशाहा यांचे मोहेरनिशी.)

तर्जुमा हिदवी नबर १,

प्रतापी फरमान सादर जाहला. बनाम देशमुखान व देशपाडीयान व मोकदमान व रयत माणसें कर्यात मामले पूरनूर महमदपूर सुरुसन सीत सितैन अलफ. दरबिला सैद इखलास सरजेखान याणी हुजरात विनति केली की, रताजी बिन नरसिंगराव माने देशमुख व सरदेशमुख, कर्यात मजकूर याणी राजा जयासिग याचे लढाईत आपले जिवाची पराकाष्ठा करून लढाई केली. मशारनिल्हेस काही वतनी इनाम गाव करून द्यावें ह्मणोन अर्ज केला. त्यावरून खान मशारनिल्हे याचे विनतीवरून अर्ज खातरेस आणून रताजी बिन नरसिंगराव माने देशमुख व सरदेशमुख यांजवर पादशाहा बहुत मेहेरबान होऊन, नूतन वतनी इनाम गाव दरोबस्त कुलबाब, कुलकानू दिल्हें तपशीलः—

१ मौजे हिंगणी, कर्यात ह्मसवड	१ मौजे कन्हेर, कर्यात दहिगांव.
१ मोजे गारवाड, कर्यात आकलूज.	१ मौजे निंबगांव, कर्यात वेळापूर.
२	२

एकूण चार गांव वतनी इनाम दिल्हे असेत. तरी दरोबस्त दुमाला करावे. यास व याचे अवलाद, अफलाद चालवणें. या सनदेची प्रती लेहून घेऊन अस्सल फरमान मशारनिल्हे-यांस भोगवटीयास परतऊन माघारा देणें. जाणिजे. छ ७ सवाल सन १०७०.

२५ शेख अबदुल मजीद यांस मिळालेली सनद.

फरमान हुमायून शरफ सदुर्याफ्त बजानिब मामलेदारानी हाल व इस्तकबाल देसाई मामले बकापूर यास, सुरसन सबैन व अलफ. हल्ली शेख अबदुल मजीद याणी हुजूरांत येऊन अर्ज केला कीं, हजरत नवाब हमायून यांची स्वारी तर्फ मामले मजकुरात आली होती, त्यावेळी पेठ शहापूर मामले मजकूर येथें देवालय होतें, तें मोडून त्या जागेंत मशीद बांधविली आहे. त्याची खिजमत आपणास पेषनवाजीची व शेख अबदुल समद बिन शेख अबदुल मजीद यास खिजमत मवाजनीची मशीद मजकूरची चालवीत आहों.

२६ अंतंभट बिन नरसिंहभट यांस मिळालेलीं सनद.

अज सरकार साहेब—ताहा देशकानीं, परगणे पादशापूर, मालुमबाद. सुरुसन समान सबैन अलफ. दरविला बेशमी अतभट बिन नरसिंहभट साकीन, परगणे गोकाक यासी इनाम जमीन होनु साहाचे परगणे मजकुरीं देविली असे. अजी सबब भट मजकुरास इजत माबदुने दखमपणीं हवालदार परगणे मजकूर यानें शकून पुसिले कीं, परगणे मजकूर आपणास काबिजाति किती रोजात होईल गनीम किती रोजात दफे होतील ह्मणून पुसलीया, त्यास भट मजकूरानें बोलिले जे, परगणे मजकूर माहे जमादिलाखरी काबीज होऊन येईल. व परगणेच बिग दिवाळीस साहेबाच काबीज होऊन, गनीम दफे होतील ह्मणून बोलिले ते बात सचोटी जाहले ह्मणून तरी बराये मालुमाती खातरीस आणून, अजन्हामन्हामत भट मजकुरास जमीन इनाम होन साहाची करून दिल्ही असे. यास गावगन्ना बितपशील —

मौजे मुसलमोरी होन १॥.	मौजे गुमची मोर्डी १॥
मौजे पंजगनहट्टी १॥.	मौजे रगदहोळी १॥.

येणेंप्रमाणें दिल्हे आहे. अवलाद, अफलाद चालवणें दर हरसाला ताजा खुर्दखताचा उजूर न करणें. यास दरीम्यान जे कोणी हिदु अगर मुसलमान इस्किल केलीया त्यास आपलाले महजदाचे सौंगद असे तालीक लिहून घेऊन अस्सल खुर्दखत भट यास देणें. रसवानगी हुजूर. तारीख १९ माहे रमजान. माहे रमजान सन १०८८. पैवस्ती छ १७ रमजान.

२७ खेत्रोजी बिन ब्रह्माजी पाटील यांस दिलेली सनद.

(बिस्मिल्ला हिरहमांनी रहीम. सर्व मुलूख ईश्वराचा आहे.)

अमलदार, वर्तमानभावी व देसाई, परगणे माण यांस हा फरमान सादर

केला जातो जेः—सुरुसन समानीन व अलफ. सांप्रत हुजूर जाहीर जाले कीं, ब्रह्माजी बिन नागनाः मोकदम पाटील, मौजे उपरी, कर्यात भाळवणी, परगणे मजकूर हे पादशाही मसलतींत शत्रूचे युद्धप्रसंगांत मरण पावले. याजकरितां पादशाहीं कृपाळू चालीनें व पादशाही अत्यत दयाळू रीतीनें एक चाहूर जमीन अव्वल प्रतीची खालसापैकीं मौजे मजकुरीं, ब्रह्माजी मजकूर याचे पुत्र खेत्रोजी याचे नांवें कृपाळू होऊन इनाम दिल्ही असे तरी सदरहू जमीन वसूल व नक्त बाब व एकदर मानपान व वेटबेगार व फडफरमास व दिवाणी बाबीचा ऐवज व शिक्केपट्टी व इमारतपट्टी व पेठ मुबारकचे कित्येक हक्क व कुलबाब व कुलकानू व एकदर कानूकायदे सहित याचे दुमाला करावी, आणि याचे पाठीमागें याचे अवलाद व अफलादीस वंशपरपरेनें चालवावें प्रतिवर्षी नवीन सनदेचा आक्षेप न करितां सालोसाल याच फरमानावरून चालवावें. या सनदेची प्रत लिहून घेऊन ही अस्सल सनद भोंगवटीयास परतोन देणें. ह्मणजे ते यांतील सरकार हुकूम जाणोन वाहिवाट करितील.

---

२८ मसाउदखान वजीर यांनीं दिलेली सनद.

(अतिश्रेष्ठ व परम पवित्र व सूर्यवत् तेजस्वी हुजूर सरकाराची परवानगी जाली असे)

या पारसी सनदेचे पाठीमागें वाजिराचा शेरा आहे त्याचा तरजुमाः—

संपत्ती व वजिरीचे आश्रय व ऐश्वर्य व उत्तमपणाचे आधार व सत्ताधारी व श्रेष्ठ पदाधिकारी व पादशाहत व राजधानीचें बाहुबळ व पादशाही व राजधानींतील विश्वासू व कारभाराचे व अक्कलवानपणाचे ग्रथार्थ मगलाचरण व दूरवर विचार करण्याचे व मित्रतेचे कवितेंतील उत्तम श्लोक व कामाचे समजुतदारातील प्रमुख व श्रेष्ठ योग्यतावान् व कल्याण इच्छकातील वेचक व महा सामर्थ्यवान् व राजधानीचे कामाची तजवीज राखणार व पादशाही कामकाजाचा बंदोबस्त ठेवणार व ऐश्वर्यभाळचें तेज व सभावितपणाचे सभादीप व पूर्ण विश्वासू लक्षणाचे सेवक व दौलतीचे अभिष्ट चितक व कल्याण इच्छक व विश्वास समुद्रातील राजमान्य मुक्ताफल व सेवकपणाचे आगठीचे कोंदणातील जडाव व सपत्ती निरतर राहण्याचे लक्षणोत्पादक व शाश्वत राजधानीतील मुखत्यार व अतिश्रेष्ठ दौलतीचे स्तभ व अति उत्तम ऐश्वर्याचें भुजबल असे जे खान, सभावित राहणीचे व श्रेष्ठ योग्यतावान् व उंच पदाधिकारी मसाउदखान यांचे आश्रयानें ही सनद जाली असे.

---

२९ मालोजीराय घोरपडे यांची सनद.

श्री

अजरष्टखाने मशुरुल अनाम राजश्री मालोजीराय घोरपडे साहेब. दामदौलतहु बजाबु कारकुनानी व देसाईयांनी परगणे केळूर ममदाबाद, सुरुसन इहिदे समानीन अलफ

दरिविला. श्रीनिवासभट बिन वेंकटभट दुनारदार साकीन मुद्गल हुजर येऊन मालूम केलें जे, आपणास इनाम व रोजमरा दरसवाद.

कसबे मजकूर वगैरे.

जमीन रेगडी.	रोजमरा जकाईत पैकी रोजीना रुके बारा ।
८१	कसबे होनगुंदें.
८१	तिमापूर.
८१	कलदेवनहाल.
८१	बेवीन मोठी.
८४	

यासी दुतर्फा दरवाद कसबे मजकूर.

कार्तिकमास.　　माघमास.

वैशाखमास.

दरमाहे शेला १ एकूण.

।=एकूण–प * * * ८=सादिलवार––मि * * * भोगवटा.

दरसवाद मौजे रामवाडिगी जमीन कुडो८=.

येणें प्रमाणें बरहुकूम खुर्दखतानें मा। मुकासा ईखानीं कारकीर्दी दरकारकीर्दी महाल नख्त याती व बाजे उडबती व पायपोसा व मेजवानीपटी व बेलेकटी व कबुलायती व मोहिमखर्च कुलबाब, कुलकानू भोगवटा तसरुफानी तागाईत सालगुदस्त चालत आहे. हल्ली साहेबास मुकासा अर्जानीं जाला आहे. महालीचे कारकन खुर्दखताचा उजूर करितात म्हणून मालूम केलें, तरी भोगवटा व तसरुफाती तागाईत सालगुदस्त चालिलें असेल त्याप्रमाणें चालवावें तालिक घेऊन अस्सल परतोन दीजे. तारीख २८ माहे रमजान.　　रुजू सुरनीस.

३० खंडोजी घोरपडे यांस मिळालेली सनद.

(बिस्मिल्लाह आर रहिमान नीर रहीम सर्व मुलूख ईश्वराचा आहे.)

सामर्थ्य व श्रेष्ठतेस आहे आधार ज्याचा, व शूरत्व व पराक्रमास आहे आश्रय ज्याचा, व अति संभावित वजिरातील जे प्रमुख व यशाचें चिन्हाचे मान्यतेस वाढविणार, व पराक्रमाचे अरण्यातील पचानन व बुद्धिमानपणाचे समुद्रांतील सुसर व श्रेष्ठ आहे राहणी ज्याची, व साप्रतचे काळातील सर्व शिपाई मंडळीचे सरदार व उत्तम मित्रतेचे मित्र व स्वामीकार्यार्थी प्राण अर्पण करणार असे जे नबाब बहलुलखान सर हवालदार व सामर्थ्य व श्रेष्ठतेस आहे आधार ज्याचा, असे जे मखदुमखान मिरानखान हवालदार व कारकुनान मामले मूर्तजाबाद ऊर्फ मिरज यास हा अति कल्याणकारक फरमान सादर केला जातो जे:—सुरसन समानीन व अलफ पासून पादशाही कुपेच्या

मार्गानें व पादशाही अतिकृपेचे रीतीनें मौजे तांदुळवाडी व मौजे कुंडलवाडी व मौजे ढवळी उर्फ टाकळी व मौजे मालेवाडी व मौजे इटकरें व कसबे अष्टें, कर्यात मजकूर व मामले मजकूर मालिक चांदमहंमद याजकडे होते ते, हे सदरहू गांव साम्यतेचे मंडळीचे उपमेहून जे अधिक असे जे खंडोजी घोरपडे यास कुलबाब व कुलकानूसुद्धा व खेरीज तंबाकू व वेट बेगार व जकात सहित स्वामींनी कृपाळू होऊन इनाम दिल्हे असे तर मौजे व कसबे मजकूर हे गांव घोरपडे यांचे दुमाला करावे व मशारनिल्हेचे इलाखेदार ह्मणजे कुटुंबांतील घरमंडळीचे खर्चाकडे द्यावे. ह्मणजे ते जाणोन वहिवाट करितील. तारीख १ सन१०९१.

३१ मसाउदखान वजीर यांनीं दिलेली सनद.

(सूर्यासारखी आहे प्रसिद्धी ज्याची व अतिपवित्र व श्रेष्ठ सरकाराची परवानगी हुजूर.)

वजिरी व ऐश्वर्यास आहे आश्रय ज्याचा व उत्तमपणास व संपत्तीस आहे आधार ज्याचा व आज्ञा चालविणार व श्रेष्ठ आहे पदाधिकार व पादशाही व राजधानीचे जे केवळ बाहुबळच व पादशाही व राजधानींतील जे पूर्ण विश्वासू व कारभार व अक्कलवानपणाच्या लेखनाचें मगलाचरणच व कीर्तीचे कवितेंतील उत्तम श्लोक व एकंदर कारखान्यातील प्रमुख व श्रेष्ठ आहे योग्यता ज्याची व कल्याण इच्छकांतील जे निवडक व सामर्थ्याधीश व राजधानीचे कामाचा बदोबस्त ठेवणार व पादशाही काम चालविणार व सपत्तीची मुखश्री व सपूर्ण श्रेष्ठांतील प्रमुख व विश्वासू लक्षणाचे सेवक व दौलतीचें कल्याण इच्छिणार व विश्वासनिधीतील राजमान्य मुक्ताफळ व सेवकपणाचे आगठीचे कोंदणातील जडाव व राजधानी व दौलतीतील भुखत्यार व श्रेष्ठ राजधानीचे खांब व राजधानीचें केवळ भुजबळच व श्रेष्ठ आहे राहणी ज्याची व थोर आहे सामर्थ्य व अधिकार ज्याचा असे जे मसाउदखान.

३२ पादशाहांनीं देशपांडेपणाची दिलेली सनद.

मुत्सद्दीयान मोहीमोत हाल व इस्तकबाल व देशमुखांनी व देशपांडेयानी व मोकदमानी व रयानी व मुजरांनी तपे बेळूर व कसबे गुजी व घोटगाली ऊर्फ मटकी खानापूर, सुरसन अर्बा तिसैन अलफ. बिदानंद चु दरिविला विठोजीराऊ वलद भिकसेनवी देशकुळकर्णी व नाडगौडा व सर नाडगौडा तपे मजकूर हुजूर येऊन इलतीमास केली जे, अजमनगरीचा कोट कबज करायाबद्दल वरघाट व पायाघाट कबज करायाबद्दल पादशाही फौजा तैन जाहल्या व नबाब बहादूरखान यासी त्या जिल्ह्याचा सुभा दिल्हा होता, ते वख्तीं परगणे मजकूर काफराचे कबजबीच होते. बाजद आपण पादशाही निमकावरी उमेदवार होऊन नवाब बहादूरखान याची मुलाजमती घेतलेवरी परगणे मजकूर कबज करायाबद्दल साहेबासी रवाना केलेवरी आपण बराबरी येऊन मेहेनत केली. बाजद साहबी ते जागा फौज

ठेऊन कोणास कबज करावयासी आले मागा फौजा हमराहा पादशाही कामावर मेहनत केली त्यावरी परगणे मजकूर नवाब दाउदखान यासी जाहगीर होऊन आली. तेही ठाणा महालीं मुस्तकीम केलेवरी त्याहीबरोबर मेहनत केली. बाजद देसाई परगणे मजकूर येही बांडगावा करून ठाणें उठविलें व काफरासीं सामील होऊन फिसाद केली. बाजद बदलामीन पादशाही हलाल निमकी हरामखोरासीं सामील न होतां, ठिकाण सोडून परागंदा होऊन साहेबांचे खिजमतेस हजर जाहलों. ऐसीयास आपले हक्क, वतनपट्टी व पछोडी व सुकासन व नाडगौड व सरनाडगौड व देशपाडेपण व खासनिसी व कर्यातीदेशपांडेपण व यारेदी व गांवगन्ना पटेलगी व हक्क लवाजिमा सायर इनाम देह कारकीर्दी आदलखान बरहुकूम भोगवटा चालिलेप्रमाणें मन्हामत होय ह्मणून अर्ज केला बराये अर्ज खातीरेस आणिता देशपाडा व नाडगौडा व सरनाडगौडा मजकूर पादशाही नमकहलाल पादशाही फौजा अलीयापासून खास बराबरी हरामखोरी केली नाही व हमरा बहुत मेहनत मशागत केली. दिवाण दौलतखायाबद्दल मेहरबानी होऊन देशपाडेपणाचे व नाडगौड व सरनाडगौडी व सुकासन व हक्क, वतनपट्टी, पछोडी व खासनिसी व कर्यातीदेशपाडेपण व यारदी व पटेलभी व गावगन्ना व तरवालकी व सायेर हक्क लवाजिमा व इनाम देहे कारकीर्दी आदलखानी बरहुकूम भोगवटा चालिलेप्रमाणें दुमाला करून दिल्हे असे बितपशील —

* * * * *

येणेंप्रमाणें देशपडे मजकुरासी दुमाला करून दिल्हे आहे. तुह्मी दुमाला करून देणें व देशपाडे मजकुराचे तरीफानें मुलखात लावणी व सचणी व अबादानी कीर्दी महामुरी करून कमाल दस्तासी पोहचावे हरसाला ताजे सनदेचा उजूर न करता अवलीयाद व अफलाद चालो देणें. नक्कल लिहून घेऊन अस्सल परवाना देशपाडे मजकुरास देणें. मोर्तब. तारीख २९ माहे रजब.

---

३३ महजर.

महजर हालीमवाली कसबे करकब, परगणे मजकूर, सन हजार११०७कारणे महजर लिहिला ऐसा जे, शेख बावा पाटील कसबे मजकूर यानें बेहजूर खान वालाशान फिर्याद करून परवाना बनाम देवराय ठाणेदार परगणे मजकूर आणिला जे, कसबे मजकुरीची निमी मोकदमी आपली आहे गबा पाटील यानें जबरदस्तीनें आपणास हे दखल केलें. मुनसफी बरहक्क करणें. बमोजीब बुलकखान वालाशान देवराय ठाणेदार परगणे मजकूर यानीं हरदो मुखई व मुखईल यासी धट लाऊन राजीखुषी केली. यासी शेखबावा यानें तकरीर केली ऐसीजे, शेख दिनदार आपला बाप निमे मोकदमी कसबे मजकुरीची करीत होता. जावयानें व तश्रेफ व हक्क व लवाजिमे खात होता. त्यासी दिवानी आदलशाही यांनीं मोकदमीच्या लाजीमेकरितां शेरणी होन ७०० संपादली. पैकीयाबद्दल कैदेत दिधला. मग दिवाणाचे कामकाजें साबजी आपला चुलता भाऊपणें चालूं लागला. अखेर आपल्या बापास पैके शेरणीचे मिळेनासे जाहले. याकरितां आपला बाप मुसलमान

जाहला. मग दिवाणें शेरणीचे पैके माफ केले. त्याच दिवसामध्यें दुकाळ पडला. याकरितां आपला बाप व आपण परागंदा जाहलों आतां आपली मोकदमी आपल्या दाखल करितों. मोकदमीच्या नावापानाचा व तश्रीफ, हक्क, लाजिमेचा महजूर अमल आदलशाही बमोहर शेखदार व कारकून व हल्ली व मवाली परगणे मजकूर आपणापाशीं आहे व गबजी पाटील यानें तकरीर केली ऐसीजे, आपण या भलुनासी वाकीफ नाही. परगणे मजकुरीं देशमुख व शिवाजी व गोविंद देशपाडीये पिलाजी कचेरीस गेले आहेती ते आलीयावरी आपण त्यासी व २६ गावींच्या मोकदमाची व कसबे मजकुरींच्या पंचायतासी राजी आहों. ते जें सागतील तें ऐको. ऐसीयासी देशमुख व देशपाडीये परगणे मजकूर हे कसबे मजकुरासी आले तेच रोजी गबजी पाटील गैरहजीर जाहला. मग देवराय ठाणेदार परगणे मजकूर यानें देशमुख परगणे मजकूर व पायाजी निमे मोकदम कसबे मजकूर व शिवाजी व गोविंद देशपाड्ये परगणे मजकूर यासी आटकवून ताकीद केली जे, गबजी पाटील यास हजीर करणें. त्यासी त्यानीं जाब दिधला जे, आपण गबजीस कागद पाठवून बोलावितों. देशमुखानीं व पायाजी निमे मोकदम व देशपाड्ये यानी कागद त्यासी पाठविला जे, तुझा भाऊ मोकदमीचा दावा करिताती, आणि तू गैरहजीर जाहलास हे बरे नव्हे. आता ठाणीयासी येऊन आपल्या भावास जाब देणे त्यासी गबजी रुजू न जाहला व शेख बावा यानें महजर नांवपान, तश्रीफ व हक्क, लाजीमे, कसबे मजकूराचा बमोहर शेखदार व कारकून अमल आदलशाही व देशमुख व देशपाडीये व मोकदम परगणे मजकूर याचे गोहीनिशीं दाखविला व गोही दिधली जे, आपला मुदई गबजी पाटील गैरहजीर जाहला. आपणासी महजर करून देणें. यावरून महजर लिहिला ऐसा जे, गबजी पाटील गैरहजीर जाहला. शेख बावापाशीं महजर मोकदमीचा मातबर आहे. यावरून जाहीर होते जे, गबजी पाटील शेखबावा यासी मोकदमी कसबे मजकूरची जबरदस्तीनें करीत आहे. हा महजर लिहिला सही."

---

३४ महजर.

॥ स्वस्तिश्री नृपशालिवाहन शके १६२७ पार्थिवनाम संवत्सरे, वैशाख शुद्ध त्रितीया, तेदिनी

राजश्री काशी रगनाथ वरपे अत्रि गोत्री, आश्वलायनशाखी यासी बाळाजी कृष्ण देशपांडे, परगणे शिराळें याणी लिहून दिले विकृत पत्र ऐसें जे:—या प्रांतीं ताब्राकडून सैद फड अमीन खालसा आले होते. त्याणें मुलखाचे खडणीकारणें कोल्हापूरचे मुक्कामीं तमाम महालोमहालचे देशक नेऊन, अदबखानें ठेऊन खंडणीकारणें पातले. त्याबरोबर गोविंदराम आपले पुतणे, वांस नेऊन कोल्हापुरीं अदबखान्यांत ठेविले. खंडणीचा टक्का जबर करार केला. रयतेस द्यावयासी ताकद नाहीं. थारा होता तेथवर वसूल दिला, पुढें द्यावयासी तकवा नाहीं ह्मणून रयत उठोन परांगदा जाली. परंतु खंडणी

झाडा नव्हे सारिखा जाहला. ते समयीं देशकावरी खुद्द निसबत पट्टी घातली त्यामध्यें किती एकानीं पैके दिले. कित्येकापासून न पावेत, याकारिता सुटका नव्हे. आठ दहा महिने अदबखाना पायीं बेडी घालून बहुत कष्टी केले प्राणसकट पडलें. ते गोविंदराम यार्णी सांगितलें की, आपलें वतनी खेडेपाडे विकून आपण जीव सोडवणे नाही तरी आपण वाचत नाही. त्यावरून आपण तुह्माकडे आलों जाहलें वर्तमान सागितलें. सकट पडले. याकारिता मौजे रेटरें झुजारराऊ, परगणे मजकूर गाव कुळकर्ण व जोतिष आपलें निमें वतन आहे तें विकत आहों. तुह्मास पाहिजे तरी विकत घेणे अमिनाचे पैकीयाचें बहुत सकट पडलें आहे पैके घेऊन गोविंदराम यास सोडवून आणू ह्मणून सागितलें. त्यावरी तुह्मी पुशिले की, तुह्मी निमें रेटरेचे कुळकर्ण व जोतिष विकत देता, तरी त्याचा करीना कैसा आहे तो सागणें त्यावरून पूर्वापर कुळकर्ण बाळाजी व जिवाजी दोघे भाऊ हल्ली निमें कुळकर्ण चालवीत आहेत याचे वडिलास पूर्वी दुष्काळ पडला होता, त्यास पाउणशें ऐशी वर्षे होऊन आली, ते समयी आपले मातेचा पिता नरासिगराऊ यासी निमे कुळकर्ण व ज्योतिष विकत देऊन महजर करून दिला होता त्यावर नरसिगराऊ याणी गावी राहून घर, वाडा बाधोन कुळकर्ण व ज्योतिष चालवीत होते त्याचे पोटीं पुत्र नाही निपुत्रीक होता आपली माता त्याची कन्या, त्याणी आपले पिते कृष्णाजी अनत देशपाडे, नरसिगराव याचे जावई यासी आदण दिलें आणि महजर निमेचा होता तो कृष्णाजीपतास दिला. त्यावर नरसिगराऊ मृत्यु पावला, त्याची स्त्री आपली आजी होती तिचा प्रतिपाळ आपण केलीयावर ते वाराणशीस जाऊ लागली तेव्हा आह्मापाशी वेचास द्यावयासी नाही. ते समयी आपले सासरे नागोजीपत देवजी वाळवेकर यापासून पैके घेऊन देऊन, वाराणसीस पाठविली. तेथून आली त्यावरी तिचें संरक्षण करावें लागलें, तें आपण केलें. पुढे ती मृत्यु पावली तिचे उत्तरकार्य केले निमें कुळकर्ण व ज्योतिष आदण दिलेपासून आपण चालवीत आहों. ऐसीयासी कुळकर्णी नक्कल जाहले. त्यांचें वतन देशकुळकर्णी याची दुसरी गोष्ट आपल्या पित्यास आदण दिलें. तिसरी गोष्ट वतनास खावद अवलादकी अफलाद, त्यास अफलादाचा वश आपण आहों ऐसी परपरा आहे. तरी निमें कुळकर्ण व ज्योतिष आह्मीं आत्मसतोषे तुह्मास विकत देतों. त्यास तुह्मी पुसिलें की, किमत सागणें त्यावरून आपण आत्मसतोषे रुपये तीनशें सांगितलें. ते तुह्मीं मान्य केले, आणि क्रयपत्र गोविंदराम सुटोन आलेवरी द्यावें ऐसें केलें, आणि तुह्मापासून तीनशें रुपये घेतले ते अमिनास देऊन गोविंदराम यास सोडून आणिल्यावरी तुह्मी प्रसग केला की क्रयेपत्र करून देणें त्यावरी परगणे मजकूरचे देशक व नाईकवाडी व पाटील कुळकर्णी हाजीर मजालसी याचे विद्यमानें विचारणा करून हें क्रयपत्र तुह्मांस करून दिलें असे. याउपरी मौजे रेटरेचें निमें कुळकर्ण व ज्योतिष किमत रुपये ३०१ तीनशें एकास दिल्हे असे. तुह्मी आपले पुत्रपौत्र वंशपरपरेनें चालवून सुखरूप असणें. आह्मास व आपले बाप, भावास व दाइज गोत्रीज कोण असतील त्यास समध नाही. कोणी कथला

करितील तरी आपण वारू. कुळकर्ण व ज्योतिषपणास हक्क व लाजीमा व इनाम व ठिकाणात व मुशाहिरा व वानवळा व कागदबाब व पट्टी पासोडी, कुलबाब कुलकानू सालाबाद भोगवटा चालत आला आहे त्याप्रमाणें तुह्मीं खाऊन, कुळकर्ण व ज्योतिष निमें चालवून सुखरूप राहणें घरवाडा, मानपान आहे तो भोगवटा करून सुखें राहणें कुळकर्णास कारभारास वडीलकी व मोहोर तुमची असे. नरसिंगराऊ याणी कुळकर्ण व ज्योतिष विकत घेतलें, तेव्हां महजर करून घेतला होता, तो आपण दिला. ते समयीं आह्मास दिला होता, तो आह्मी तुह्मास दिला असे. याउपर तुह्मी आपलें निमें गावचे कुळकर्ण व ज्योतिष निमें तुह्मास विकत दिलें आहे यास कोणी खळखळ करितील त्यास गाईब्राह्मणाची शपथ असे. हें आपले वडिलाचें सुकृत सही

साक्ष

शकराजी बिन लिलाजी देसाई नाइकवाडी, परगणे मजकूर.
मौजे मजकूर. येलजी नाइक गाइकवाड, फडनाईक.
धर्मोजी बिन राणोजी पाटील. नेताजी शिंदे, नाइकवाडी.
जोती बिन फिरंगोजी पाटील. मौजे येडें, तर्फ वाळवें.
जनकोजी बिन शिदोजी पाटील. रामजी नागनाथ कुलकर्णी १.
वडजोजी बिन येलजी काटकर मखदुम

बिकलम बाळाजी कृष्ण देशकुलकर्णी १.
बिकलम हणमाजी बिन बाबाजी देसाई, तर्फ बोरगाव १.
बिकलम भगवत मल्हार देशकुलकर्णी, तर्फ बोरगाव १.

---

३५ श्री राजा शाहू छत्रपति यांनीं दिलेली सनद.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३७ विकृतीनाम सवत्सरे, मार्गशीर्ष शुद्ध दशमी, रविवासरे क्षत्रियकुलावतस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी याणीं मोकदम कसबा रहिमतपूर, प्रात वाई यासी आज्ञा केली ऐसीजे, रणदुल्लाखानाचे घुमटीची जमीन व कुतरबाग व गोरस्थान जमीन सिद्धी रुस्तुम व सिद्धी हसन याचा व कादीमलाला मुजावर याच्या कथल्या करितां अमानत केली होती त्यास गोतमुखें निवाडीयाकरिता कादीमलाला मुजावर खरे जाहले. याकरिता सदरहूप्रमाणें जमीन याचे दुमाले करणे. सिद्धी रुस्तुम व सिद्धी हसन खोटे जाहले आहेत. त्यास अर्थाअर्थी सबध नाहीं याउपरी यासी कथला करू न देणें. फिरोन बोभाट येऊ न देणें. या पत्राची तालिक लेहून घेऊन मुख्य पत्र भोगवटीयास परतोन देणें. लेखनालंकार."

३६ महजर.

महजरपत्र तारीख छ ९ माहे साबान, सन १११३ अर्बा मया व अलफ, (शके १६२५ सुभानुनाम) सवत्सरे, मार्गश्वर शुद्ध द्वादशी, बुधवार दरजागा चिमलगा सरकार पादशहा अवरगशहा पादशहा सुभे निसबत मोमद फजील नायब फौजदार, काजी, कोतवाल, त्रिवर्ग जमीनदार, साठी किले, सोळा सरकार, बत्तीस महाल, आठरा परगणे, नव ठाणी, देशमुख, देशपाडे, नाडगौडा, पाटील, पटवारी, कुळकर्णी. समस्त मोरगाव दारुल विजापूर, हल्ली मौली गुजारत सनद लिहून दिल्ही ऐसीजे:—सोमापा हेबुलिकेंचनाईक देसाई परगणे चिमलगा पूर्वी उबळी खेडें गोळसगी होतें त्यास मोकासा पिरजादेस दिल्हा. त्याणें देशगतीचे हक्क दक्क दिक्कत केले सबब गावास मारून घालणे केलें ते व नवाब सावनूरकरापासीं पीरजादेनी पिराद जाहले. नबाबाचे फौजेसुद्धा येऊन बिळगीवर उतरले. तेथून मासल करून देसाई सोमापा धरून नेले. गोळसगीस नाश केले ह्मणोन पायात बेडी घातली चाळीस हजार रुपये दडाबद्दल देसगती जाबती केली ते व भिमनगवडा पाटील अगडगेरी अल देसाईची बेडी आपले पायेंत घातली देसाईचे बेडी काढून आपण घेतली. त्यास सोड मोकळा केला. पाटिलानीं आपले बायकू लेंकरु वोल घालून चिमलगास येऊन, दर खेडेस पट्टी करून पसतीस हजार रुपये वसूल करून नबाबास दिले जातीनिशी पाटिलानीं पाच हजार रुपये देऊन, एकूण चाळीस हजार रुपये देऊन आपले बाइली लेंकरास सोडवून आणिलेवर, देसाईस तखत विजापुरास आणून पादशाहासी भेटी करून दिल्ही. नजर भेटीस रुपये ७००० सात हजार पादशहास देऊन भिमनगवडानें पादशाहास तसलीमात ताजीम करून, बहुत प्रकारें विनति करून सुखदुःखें विचारली. सावनूरकर नवाबानीं जुलूम करून दड बाधिले व देशगती हक्क जाबता केला ह्मणोन हुजूर बोलिले. पादशहानें नबाबास जरब करून बोलाऊन पारिपत्य केलें देशगतीचे जाबते बेहुकूम करणेंस तुमचे हाती पादशहासी आले कीं काय ह्मणोन अवघे देशगतीची हक्कदक्क सोडवून दिल्ही. देसाईस भिमनगवडास तसरीफ करून पालखी, आबदागिरी दिल्हा * * * आपले परगणे वगैरे चिमलगिसी देशमुखपण करून सुखरूप राहणें, ह्मणोन डोसकावरी हात ठेवून पादशहानें उंबळीगांव तपे शीलगणी एक १ माडगी एक १ शेणलवडी एक १ ऐसे तीन गाव, याशिवाय गोलसगींबद्दल केवलगागाव एक १ हरसणगी एक १ ऐसे पाच गाव उबळी करून दिल्हे. याशिवाय नाडगौडकी, देशपाडेकी, देसाई वगैरे हक्क इनाम अवघे तुमचे पदरी असावे. कोणी हिल्ला हरकत करणेंस समध नाहीं. दर खेडेंगावगन्नावरी कमतकाठी इनाम जमीन मळे वर्तनी मेठी रादारी फसकी मागावरील बिनग दर गावास चिवटें दहा, वाक १० दहा पेंडे, दसर मालास दर गांवास दोनी बकरी एक कलम, दर गावास रुपये २ कलम एक, दर गावांस तूप घागरी एक १ कलम, दर गावगन्ने धनगराचे मागास घोंगडी एक कलम, कोष्टी मागास रुपये निमे प्रमाणें कलम १, पंचवीस खेड्याचे नाडगवडकी, देशपांडकी, देसाई त्रिवर्ग हक्क

वगैरे करून घेणें कांहीं तोशीस नाहीं. तीन बाबेचे मोहर राबताचे घेणें कुलबाब, कुलकानू पिढी दरपिढी उदी अस्तमानपर्यंत चालून देऊं. तेरीगी जुडीपट्टी माफ देशगतीवरी हिल्ला हरकत केले तरी मक्केची आण असे. जाणिजे. छ मजकूर. शिक्के मोर्तबमुद्दां.

(या खालीं सभोवर गांवचे साक्षीदार आहेतः—)

येणेंप्रमाणें दर खेडेस जें गलत पडेल शिवाय या कडबा दरसेतास लाप एक हजारी रोज गोणी, दर जिन्नस दर नारळ २ मीठ, गोणीस ८०।० कैली, चितव व तांदुळ गोणीस ८०।० कैली, चितव व गूळ वजन ८८१।० किरकोळ खोबरें वैगरे घेणें. नदीच हरी फसकी एक दर खेडेस तोबरा २ बमोजिब हक्क चालून देऊं जाणिजे. छ मजकूर.

३७ मलिक अंबरचे दर्गेवाल्यास दिलेली सनद.

दरगाहा मलिक अंबर यांसी मौजे अंबरापूर, तर्फ हवेली शेवगांव हा गांव पेशजीप्रमाणें करार केला असे. ताकिदपत्र छ १६ मोहरम, सन अशरीन मया. गुदस्ताप्रमाणें करार केला असे.—देहे १.

३८ वतनपत्र.

निमे देशमुखी वडीलपण, परगणे शेवगांव, सरकार अहमदा [बाद] (नगर,) सुभे, खुजस्ते बुनियाद यास दिल्हें वतनपत्र ऐसाजें. मीरवाजुद्दीन वल्लद शहामहंमद यांणीं स्वामिसंनिध किल्ले सातारचे मुक्कामीं येऊन विनंती केली जेः—परगणे मजकूरचे देशमुखीचें वतन कदीमलयाम आपले वडीलवडीलापासून आपलें होतें. ऐसीयास काळदुकाळ पडला यामुळें आपले वडील वतनावरून परगंदा होऊन गेले असतां, दरम्यान काकड व गरुड पैकीयाचे बळें वडील वडील मारून आपण देशमुखीचें वतनास दाखल होऊन वतन खात होते. आपण कुली वतनास बेदाखल जाहलों होतों. वतन साधायासी आपल्यामध्यें ताकत नाहीं म्हणून मीर मशारानिल्हे याच्या गळां पडलों कीं, तुमची आमची बिरादरी दोस्ती एकलासी आहे. तर आपलें गेलें वतन साधोन देणें. खर्च लागेल तो निमें देऊं व निमें देशमुखीचें वतन वडीलपणाचा वाटा तुह्मांस देऊं. ऐसा करार दाद बोली मीर मशारानिल्हेयासी केली. तें मीर यांणीं कबूल करून मशारानिल्हे आवरंगाबादेस पादशाही दरबारास जाऊन वादी काकड व गरुड यास तलब करवून अवरंगाबादेस नेऊन एक साल वादीयासी कजीया सांगितला. खस्त खाऊन वादी काकड व गरुड खोटे केले. दरबारीहून वतनाच्या सनदा आमच्या नांवें घेतल्या, यामुळें दरबारखर्च मुबलग जाहला. मीर मशारानिल्हे कर्जदार जाहले. वतन साधून आपली स्थापना वतनावर केली. आपले मुखई उसा पायेता जपताती. त्याजपासून पुढें वतन जतन करावयास आपणास ताकत नाहीं. याकरितां निमे देशमुखीचें वतन धाकुटपण आपल्याकडे ठेऊन निमें देशमुखीचें वतन वडीलपणाचा वाटा आपण खुष रजावंदीनें मीर मशार-

निल्हे यासी दिल्हा याचा राजीनामा वतनाचा व मिरासनामा परगणे मजकूरचे हालीमवाली व मोकदम व तमाम वतनदाराचे शाहीदीनशी देऊं. नतर महाराजी मीर मशारानिल्हे यास परगणे मजकूरचे निमें देशमुखीचें वडीलपणाचें वतनपत्र करून देऊं. यास व याचे पुत्रपौत्रादि वशपरंपरेनें चालाविलें पाहिजे ह्मणून. त्यावरून मनास आणिता परगणे मजकूरचें देशमुखीचें वतन पुरातन मीरवाजुद्दीन वल्लद शहामहमद याचे वडिलापासून दरोबस्त होतें. दरम्यान काकड व गरुड बळेंच करून वतन अनभवीत होते. ते तुम्ही पादशाही दरबारी वाद सागोन खोटें केलें. देशमुखीच्या वतनाच्या सनदा तुह्मी मीरवाजुद्दीन याच्या नावें घेतल्या. त्याणी खुष रजावदीनें परगणे मजकूरचें निमें देशमुखीचे वतन वडीलपण तुह्मास देऊन कागदपत्र करून दिले. ते पाहून तुह्मावर स्वामी कृपाळू होऊन, परगणे मजकूरचें निमें देशमुखीचें वतन वडीलपण तुह्मास करार करून देऊन, हें वतनपत्र तुह्मास करून दिलें असे. तर तुह्मीं निमें देशमुखीचें वतन वडीलपण आपले स्वाधीन करून घेऊन व तुह्मी व तुमचे पुत्रपौत्रादि वशपरपरेनें अनभवीत जाणें. निमें वतनास हक्क लाजीमा, इनामत, इसाफत व बाजे पूर्वीपासून दरोबस्त देशमुखी असता चालत आले असेल, त्यापैकी निमे वडीलपणाचा वाटा तुह्मी घेऊन, वतनदारीची सेवा करून सुखरूप राहणे. छ ६ सवाल सन सलास आशरीन १.

देशमुख व देशपाडे व मोकदमानी १
बाजे वतनदार, परगणे शेवगाव,
सरकार अमदानगर

---

३९ निवाडपत्र.

पत्र निवाडा समस्त राजकार्य धुरधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री बाजीराव पडित प्रधान ताहा मोकदमानी मौजे टेकवडी, तर्फ करेपठार, प्रात पुणें. सुहूरसन अर्बा अशरीन मया अलफ. दिल्हें निवाडपत्र ऐसें जे, तुह्मी हुजूर किले सातारीयाच्या मुक्कामी येऊन विनति केली की, मौजे मजकूर व मौजे माळशिरस व मौजे पिसरवें या तिही गावची शिवेसी शीव मिळाली आहे. त्यास पूर्वी मालकाचे कारकिर्दीस माळशिरस या गावास व मौजे पिसरवें या तिहीं गांवीचा शिवेचा गर्गशा लागला होता. ते समयी आपले वडील माळशिरसकर व पिसरवेकर हुजूर मालकाकडे गेले होते त्याणी हुजुरून आपला महालदार देऊन, कसबे हरसूल ये जागा दिव्य द्यावया रवाना केलें. ते समयी पिसरवेकर याणी बोली केली की, आपली पुरातन शिव टेकडीखाली ओहोळ आला आहे. तेथें गहदमची शिव आहे. तेणेंप्रमाणे वर्तोन ज्याजती करणार नाहीं ह्मणोन मागें घेतलें त्यावरी माळशिरसकर व पिसरवेकर यास हातरोखा महालास दिल्हा कीं, हरदो गावीचे मोकदम समजोन गावास आले आहेत. तरी तुह्मीं हरदो गावींचे सीमेप्रमाणें वर्तवणें ह्मणोन हातरोखा दिल्हा. त्यावर गावास आल्यावरी पिसरवेकर यांणीं हरकत केली याजकरिता माळशिरसकर हुजूर जात होते. तों पुणें प्रांत इदलशाही-

कडे जाहला. रायाराऊ अमलदार आला. (त्या)कडे माळशिरसकर गेले. ते वेळेस रायाराऊ याणीं कसबे सासवड ये जागा ऐरिणीचें दिव्य नेमून दिल्हे ऐरिणीच्या दिव्यास माळशिरसकर खरे निघाले यावर तिही गावीं हद्द महदूम निवडिली आहेत तेणें प्रमाणें आपण आपल्या वंशपरंपरेने अनभवीत असतां, साप्रत दोन तीन वर्षे ये गावीचे मोकदम आपल्या शिवेसी कजीया करितात. तरी साहेबी बरहक्क मनास आणून पेशजीचे माळशिरसचे व पिसरवेचे कजीयाचे महजर जाहले आहेत, ते मनास आणून कजीया विल्हेस लाविला पाहिजे. ह्मणोन हुजूर विदित केले. त्यावरून मौजे पिसरवें व मौजे माळशिरस येथील मोकदम आणून पेशजींचे महजर मनास आणिले बितपसील:—

महजर बतेरीख २७ रमजान हुजूर हजर मजालसी.

काजी चाद हकीमशरा
शेख उमर व बाबजी दत्तो आजाहत
धर्माजी काटे देशमुख.
गोमाजी महाजन व शेटीये कसबा.
नाइकवाडी प्रात मजकूर ———
इतबरखान. अभगराऊ
रविराऊ. दादाजी मोरे
येशवतराऊ. महादजी जाधव

चाद अबाडजी ठाणेदार व कारकून.
मोकदम कसबे.———————
बाबजी कुतवाल. मल्हारजी चादगुडे.
बाबाजी खैर हिरोजी भोडवे.
मल्हारजी मोकदम, मौजे लोणी.

परगणे सुपें, सुहूरसन सलास अशरीन अलफ. कारणें महजर ऐसाजे, मौजे माळशिरस परगणे मजकूर व पिसरवें, प्रात पुणें या शिवेचा कर्कशा होता. याबद्दल पेशजी हुजूर जाऊन हजरत साहेबाचे बदगीस मालूम केले हजरत साहेबी खातरेस आणून निवाडा करून फर्मान करून दिधला छ ८ रमजान तेथें रजाबिदानद सुहूरसन तिसा अशर अलफ. शरीफ अल्ली हेजीब वजारतमहा याकुबखान हुजूर मालूम केलें जेः—येस पाटील बिन हर पाटील मोकदम मौजे पिसरवें, प्रात पुणे व रामाजी बिन बापोजी मोकदम मौजे माळशिरस, परगणे सुपें हरदू गावास शिवेचे कर्कशाबद्दल भाडत हुजूर आले. हुजरून महाली मदारी मालिक अजम शिवजी चादजी महालदार चपरास इसम बरोबर देऊन, दिव्याबद्दल हरसुलास पाठविले. तेथें हुद्देदार व देशमुख व शेटे व महाजन कसबे मजकूर बैसोन तेल ब तूप आणिलें तों अग्रवादी येस पाटील पिसरवेकर बोलिला जें, दिव्य न करी. वोहल टेकडीहून आली आहे. पिसरव्या खालती गहदम तेथून शिव आपली आहे तेणेंप्रमाणें वर्तोन ह्मणोन हरदू वादीये समजोन आलें. ह्मणोन मालिक अजमास मालूम केले. मालिक अजम हुजूरचे कारकुनास हातरोखा सादर केला जे, हरदू गावीचे मोकदम हुजूरून समजोन आले आहेत. सदरहू प्रमाणें शिवेची हद्द महदूद घालून देणें व फर्मान करून देणें. ऐसा रोखा सादर केला आहे. तरी ये बाब फर्मान होय. मालूम जाहले. बद्दल इशारती दिवाण हक्क हरदू गांवीचे

मोकदम हुजुरून समजोन आले असेत. सदरहूप्रमाणें शिवेची हद्द महदूद घालून देणेबद्दल हातरोखा तिसा अशर अलफ येणेप्रमाणें फर्मान सादर जालीयावरी कटकीहून हरदू वादी गांवास येऊन मागुती पिसरवें, प्रात पुणें तेहीं हरकती केली मागते मौजे माळशिरसकर हुजूर जाऊन हजरत साहेबाचे बदगीस हालहवाल सागोन हातरोखा घेऊन आले. त्यासही पिसरवेकर (यांनी) हरकत केली. मागते माळशिरसकर हुजूर जात होते, तों विलायती इदलशाहास दिधली. रायाराऊ हवालदार महालानिहायचा तो मुक्काम पुणे तेथे माळशिरसकर जाऊन उभे राहिलीयावरी टेकवडीकर व पिसरवेकर बोलावून आणून वाजपुस केली. महालो महालचे कारकून व देशमुख व सरदार व लोक बसले होते नेम केला जे, शिवेस दिव्याचा निवाडा नव्हे शिवेची माती आणून आपण हुजूर दिव्य करणें. ह्मणोन नेम करून, शिवेची माती आणून वाटेश्वर देव कसबे सासवडास आहे तेथः—

कारकून व देशमुख व हरदो महालचे सरदार कारकून व देशमुख, कसबे सासवड.

ऐसे पाठविले दिव्याचा नेम केला जे, माळशिरसकरीं ऐरिणीचें दिव्य करणें. जरी खरें जालें, तरी जेथून माळशिरसकराची हद्द आहे टेकवडी व पिसरवेकर तेथून माळशिरसकरी खरे खोटे जाहले तरी दोही गावींचे शिवेविशी तुटेल. ऐसा नेम करून, माळशिरसकरी (यानी) ऐरिणीचे दिव्य केले. माळशिरसकर दिव्यी उतरले खरें जालें यावरी महजर हजीर मजालसी हुजूर करून दिधला ज्या हद्दी टेकवडीकराच्या व पिसरवेकराच्या तेथून माळशिरसकरांनी आपले हद्दीनें चालावे ऐसा निवाडा केला. माळशिरसकर जमीन वाहों लागले. काही पेरलें होतें त्यावरी ते कारकिर्द गुदरलीयावर साहेबास विलायती अर्जानी जाली. टेकवडीकर बलूद निवाडाप्रमाणें राहिले. पिसरवेकर मागती हरकत करून माळशिरसकराच्या शिवारामध्ये सजगुरे पेरले होते, त्यामध्यें गुर घातली नागर धरिले होते ते फोडून नाडे तोडून आऊतकराची पाघरुणें घेऊन गेले आऊतकरी बोब घेऊन गावाकडे आले. बोंब कशाची ह्मणून गांवातील लोक धावणीयास गेले. पिसरवेकर मारे करून येऊन माळशिरसाच्या शिवारामध्ये येउन उभे राहिले होते माळशिरसकर मारे देखोन पुढेंच आले पिसरवेकर बोलले जे, आपण धार दिव्य करू. यावरी माळशिरसकर बोलिले जे, आपण धार दिव्य न करूं तुमचा आमचा निवाडा जाला आहे, महजर जाला आहे, यावरी पिसरवेकरी माळशिरसकरांचा दुमाला घेऊन माळशिरसकरीं काढावा काढिला, आणि पिसरवेकरीं दुमाला करून माळशिरसकराचे लोक जखमी केले मग जरूर जाले जे, लोक जखमी होतात ह्मणून माळशिरसकर फिरोन उभे राहिले. तेथें झगडा जाला तेथें पिसरवेचे दोघे धोंडे लागून पडले. यावरी हे खबर माळशिरसकरीं ठाणे येऊन मालूम केलें. यावरी ठाणाहून कोणे जागा झगडा जाला, कोठें पडिले, हें खातिरेस आणावयास भले लोक पाठविले. तो माळशिरसकराच्या शिवारामध्यें शेत आहे. त्या शेतामध्यें खून पडिले होते ऐसी गहजोरी पिसरवेकरीं माळशिरसच्या शिवारामध्यें येऊन खिसा केला. लायनी कुसूर न वाढवितां ते माळशिरसकराचा कांहीं गुन्हा नाहीं. महजर सही. तेरीख २७ माहे रमजान.

किल्ला महजर बितेरीख २७ माहे जिल्काद हुजूर हजीर मजालीस.

हजरत रायाराऊ.
लखमाजी बाबुजी
राजजी माधवराऊ डागीये.
सभाजी सिमरा सरदार.
मालोजी नरसिगराऊ व विठोजी देशमुख, प्रांत पुर्णे.
मावजी देशमुख, कर्यात सासवड.
दादुजी मोकदम, मौजे भिवरी, प्रांत पुर्णे.
देवजी बाडा मोकदम, मौजे रिसें
अताजी मोकदम, मौजे मुरडी.
लाजिमदार व बलुते, कर्यात सासवड.
कारकून, परगणे सुपे.
वेंकाजी विठ्ठल हवालदार
नरसो महादेव मजमदार.
विरोजी दिनकरराऊ सरदार.
महादपत राऊ मजमदार, सासवड.
दावजी गावडा सरदार.
सेखउमर व बाबाजी दत्तो आजहती धर्मोजी काटे देशमुख, परगणे सुपें.
तिमाजी देवकर मोकदम, मौजे मावडी.
तानाजी पाटील मोकदम, मौजे कुभारवळण.
बापूजी मोकदम, मौजे खळदखुर्द, परगणे सुपें
म्हावजी पाटील मोकदम, मौजे टेकवडी, प्रात पुर्णे.

सुहूरसन इसने अशरीन अलफ, शके १५४३ दुर्मती (नाम) संवत्सरे, अश्विन वद्य सप्तमी, वार गुरुवार ते दिवशीं रामाजी बिन बापोजी मोकदम व कानोजी बिन धावजी विरतीकर, मौजे माळाशिरस, परगणे सुपें यास महजर करून दिला ऐसा जेः—मौजे मजकुरासी, मौजे टेकवडी व मौजे पिसरवें, प्रात पुर्णे यास शिवेचा कर्कशा होता. याबद्दल सात आठ वर्षे कर्कशा होत होता कारकीर्द निजामशाहा ममलकतमदार महमद अजम याशीं हरदोगांवचे मोकदम हुजूर जाऊन आपलाली हद्द लेहून कसबे हरसूल लेहून दिलें. दोहीं गावचे चौगलीयांनीं रवा काढिला. दोघेही खोटे जाले. दिव्यीं लागलीयावरी माळशिरसकरासी फरमान करून दिल्हा जे, जे जमीन आपलाली हद्द लेहून दिल्ही आहे, ते जमीन दोठायीं दो गावास हद्द वाटून देणें. त्यावरी शाबाजी अली महालदार राव मलीक अजम शिवेच्या निवाड्याबद्दल परगणे मजकुरीं आले. ते ही माळशिरसचे मोकदम व कुणबी हजीर नसता हुकूम मुशारदाज भुन हिदाणें लिहिलीं होती, ते सोडून माळशिरसच्या शिवरामध्यें जमीन दो ठाईं वाटून दिल्हीयाबद्दल निवाडा जाला नाहीं. यावरी साहेबास मुकासा अर्जानीं जाला. या ***राऊसाहेबानीं दोही गावचे मोकदम येऊन आपलाला हवाल अर्ज केला. यावरी राऊसाहेबी शिस्त दिली जे, दोही दिव्य रवा करून निवाडा करणें ऐसा नेम जाला. मौजे माळशिरसकरीं दिव्य करणें. ऐसा नीट निकाल जालीयावरी छ १८ मिनहू ऐरणीचे दिव्य करणें. पेशजीचे हरदू नफराचे कागद आहेत ते दोघाजवळील कागद घेतले, आणि काना

बिन धावजी विरतीकर मौजे माळशिरस त्याणें ऐरणचें दिव्य घेणें ऐसा नेम शिवेस बैसोन हरदू गांवची हद्द महदूद पाहोन, मौजे माळशिरसची हिदाणें लिहिली उत्तरेपासून दक्षणेसः—

उत्तरेस पाहिले हिदाण पाचाले * * * माथा वरील पाली

तिसरें हिदाण वाटेवरील खडक

पाचवें हिदाणे खडकाशी देखील * * * धोंडी नऊ ९.

सातवें हिदाणे पन्हेवाटे खालती वरती वाट तेथून शिव.

नववें हिदाण वाटेवरते, वारूळ जवळ तरडीचे खुसूद.

अकरावे हिदाण माथाचा खिळा थोरला.

तेरावें हिदाण रुतीजवळ तरडी.

पंधरावें हिंदाण धोंडी पडवली याखाले बादीची.

सतरावें हिदाण उभा बाध दगडाचा पुढें गिरनाळी.

एकुणीसावें हिदाण उभा बाध दगडाचा पुढें गिरदाळी पश्चिमेस रुमणवाला आले होते तेथून वायव्यकोनी रुमणवाला पाड १४ चवदा तेथें सेहगिरदाळीपासून

एकविसावें हिदाण सेहनजीक गिरदाळी दिलीयावर असे.

तेविसावें हिदाण सिहेपूर्वे त्यावर उसरी व वेलाळी खुसूद

सविसावें हिदाण वहळाखालती सवदडी खुसूद तेथून दक्षणेस उबलेचा काठापासून तहद

दुसरे हिदाण रुतीची धोंडी.

चवथें हिदाणें वाटेवरील खडक, गच्ची.

साहवें हिदाणे धोंडी वाटेखालती व केळी व गिरदालीपाशी पाढरफळी वाटवरती पाड ३ तीन.

आठवें हिदाण वाटेखालते शिहे

दहावे हिदाण वाटेवरते खडक गच्च धोडी दोन

बारावें हिदाण खिळा माथाचा नजीक गिरदाळीवरती वाभूळ पाड पाच.

चवदावें हिदाण खडक नजीक गिरदाळी तेथील चिरा.

सोळावे हिदाण बाध थोरला दगडाचा असे नद झाडे तरडी व सहस्रमुळी

आठरावे हिदाण उभा बाध वरी आले तेथें दगडाची पडवळ तेथून पडवळ नीट पश्चिमेस रुमणवाला वरते चाललें असे.

विसावें हिदाणें मुतीतरवडी नीट पश्चिमेस रुत धोंडी ४

बाविसावें हिदाण पश्चिमेस धोंडी पाड नऊ रुती

चोविसावें हिदाण टाकळीचे खुसूद

पचविसावें हिदाण टाकळीचे खुसूद नीट पश्चमेस.

सत्ताविसावें हिदाण मोहळाचे खालील काठी. सवदडीची खुसूद तेथें तिवधा असे.

शिवेस दिव्य व्हावें तेथें तट पडिले. त्यावरी महालचे कारकून विनू बाबजी व दोनी महालचे देशमुख व दोही गावचे मोकदम हुजूर आले. हजरून राऊसाहेबीं नेम केला जे, शिवेची माती आणून श्री वटेश्वर मुक्काम कसबे सासवड, तेथें ऐरणीचें दिव्य घेणें. त्यावरी छ माहे मिनहू हजीर मजालसी हुजूर, काना बिन धोंडी वृत्तिकार मौजे माळशिरस याचा हात पाक करून, हाताची निशाणें लेहून सुभ्रात होऊन, ऐरणी विधिपूर्वक घेऊन, सात मडलें ओलाडून ऐरणी कडबीयावर टाकली. कडबीयाचा भडका जाला. ते वख्तीं नफर मजकूराचे हाती खलेती घालून लखोटे करून राखिला तिसरे रोजी लाखोटे तोडून * * * मिनहू हजार मजालसी हात पाहिले. हात पाक निघाले ऐरणीचे दिव्यी उतरला सदरहू मजालस हात पाहून सदरहू हद्दमहदूद लिहिली आहे. तेणेंप्रमाणें मुकरार जाले तेथून हरदू गावींचे लेंकराचे लेंकरी आपलाले हद्दीनें वर्तणे पेस्तर हिल्ला हरकत निवडलीया अमलास न करणें. पेशजीच्या निवाडीयाचे कागद रद्द निवडलीया अमलास हरकत करील, त्याणें दिवाणी होन पाचशें व पाच सिसे देणें हा महजर मजकूर "

येणेंप्रमाणें दोन महजर मनास आणिले. ऐसीयासी सदरहू दोही महजरात पूर्वी मलकाचे कारकिर्दीस मनसुफी होऊन निवाडा जाला, त्या अलीकडे अदलशाही कारकिर्दीस रायराऊ याणी माळशिरसकर यांस कसबे सासवडीं श्री—येथे दिव्य देऊन, मौजे मजकूरचे व मौजे टेकवडी व मौजे पिसरवे या तिही गावची शिवेचीं हिदाणें सत्तावीस निवडून दिल्ही आहेत. तेणें प्रमाणें तुह्मी मौजे मजकूरचा शिवेचा अनुभव करीत जाणे पिसरवे येथील सुभानजी व खडोजी कोलत्या मोकदम व मळोजी कोलत्या मोकदम यास पुशीस केली की, सत्तावीस हिदाणें शिवेची निवडून पेशजी कजीया चुकून गेला आहे. ऐसें असता तुह्मी लायेनी कजीया माडला असे, तरी तुह्माजवळ मागील कागदपत्र काय असेल व भोग भोगवटा काय असेल तो दाखवणें त्यावरी त्याणीं तकरीर केली की, आपणाजवळ कागदपत्र काहीं नाहीत, आपल्या आजीयाचा मारा जाला आहे, इतके ठावकें आहे परतु कोणे सबबेनें मारा जाला आहे, हे काही आपणास ठावके नाही. ह्मणून तकरीर करून उभा राहिला. त्यावरी पचाईत मतें ऐसें जालें की, पेशजी तिही गावचे शिवेचा कजीया जाला होता, ते समयी गाववालीच्या झगड्याबद्दल धोंडा दगड लागोन मारा जाला असिला, तरी शिवेचे झगडीयास लादोन. शिव लादते ऐसें पचाईत मत जालीयावरी, पेशजींचा निवाडा जालीयावरी पेशजीचे महजर जाले, ते मोकरार व अर्थ मनात आणून तुजला हें निवाडपत्र सादर केलें आहे. तरी तुह्मी सदरहू सत्तावीस हिंदाणें दोहीं गावचे शिवेची महर कदीम शिव लागली आहे, तेणेंप्रमाणें आपले गावचा अनुभव करून सुखरूप राहणें. तुजकडे हरकी करार केले रुपये २०० दोनशें करार केले. सदरहूची उगवणी करून सुखरूप राहणें जाणिजे छ ६ रविलाखर आज्ञाप्रमाण.

४० वतनपत्र.

महादजी बिन सभाजी इबिन बावाजी काटे देशमुख, प्रांत सुपें, बारामती यास दिल्हें वतनपत्र ऐसे जे:—तुजवर तुझा भाऊ धर्मोजी वल्लद मानसिंग इबिन शामराज काटे देशमुख परगणे मजकूर हुजूर फिर्याद जाले की, आपलें घर वडील, आपले मूळ पुरुष बावाजी काटे, त्याचे वडील लेंक धर्मोजी काटे, त्या धाकटे संभाजी काटे. त्यास धर्मोजी काटे याचा विस्तार आपण व सभाजी काटे याचा विस्तार महादजी काटे ऐसे आहों. शिक्का कारभार आपण करावा. वनताची वांटणी जाहली नाही. ऐसें असोन महादजी मजकूर निमें वतन खातो आणि आपणासी कजिया करितो. तरी साहेबी आपला इनसाफ केला पाहिजे म्हणोन जाहीर केलें. हे वर्तमान ऐकोन तू हुजूर हजीर जालास. त्यावरी हरदूजणाचा इनसाफ करावयाबद्दल (पुढे दोन ओळी फाटल्या आहेत) आपले बाप संभाजी काटे हे उभयता श्रीरंगपट्टणीं दौलता करून होते. वतनावरी गुमास्ते अतोजी दत्तो व मनसूरखान ऐसे होते. त्यास कसबें सुपें येथील मोकदमानीं विजापुरीं पादशाहाचें दरबारीं फिर्याद केली जे, परगणें सुपें, बारामती येथील देशमुखींचें वतन आपलें आहे, म्हणऊन वतनास मुजाइम जालें. हें वर्तमान हरदू गुमास्ते याणी धर्मोजी काटे यास लिहिलें. त्यास धर्मोजी काटे बोलिले कीं, आपण हातीं काठी घेऊन वाद सांगावा की काय ? तेव्हा आपले बाप सभाजी काटे बोलिले जें, वतन थोर आहे, जाऊ देऊ नये त्यावरी धर्मोजी काटे यांणी उत्तर दिल्हें कीं, तुजला लागतें ऐसें नाही. जर लागेल तरी जाऊन वाद सागणे. त्यावरून आपले बाप संभाजी काटे बोलिले कीं, तुम्ही जात नाहीं तरी आपण जातो मग आपले बाप संभाजी काटे विजापुरास येऊन अडीच वर्षे कसबेकरी यासी वाद सागितला आणि कसबेकरी वादास खोटे करून पादशाही परवाना करून घेतला. त्याची नजर शेरणी होन १००० एक हजार दिल्हे. त्यावरी सभाजी काटे याणी धर्मोजी काटे याकडे जावें, तों धर्मोजी काटे मृत्यु पावले. दौलत लुटोन गेली. त्याउपरी धर्मोजीचे पुत्र शामराज काटे व त्याची माता आऊबाई ऐसें विजापुरास संभाजी काटे याजपाशी आले. तेथून वतनावरी आली. तोपर्यंत वतन टाकिलें नाहीं पुढें राजश्री महाराज शहाजी राजे यास परगणे मजकूर मुकासा जाला. ते समयीं मागती कसबेकरी उभे राहिले. ते वेळेसही कसबेकरी यास सभाजी काटे याणीं काइल करून महाराज साहेबांचे परवाने संभाजी काटे याणी करून घेतले. त्यास शेरणी होन १००० एक हजार पडिले. त्यापैकीं संभाजी काटे यानीं होन पाचशें दिल्हे. आणि गावास येऊन शामराज काटे यास बोलिले कीं, आपण पांचशें होन दिल्हे. तुम्हीं पांचशें होन देणें तेव्हां शामराज काटे याची मावळण सोइरीबाई वतनाचा कारभार करीत होती. ती बोलिली कीं, आपणास पैका मिळत नाहीं. ते समयीं महाराज साहेबीं देशमुखी दोन वर्षे अमानत केली. आणि शामराज काटे व सोइरीबाई व संभाजी काटे यांस आपणांजवळ हुजूर बोलावून फर्मा-

विलें कीं वतन अमानत पडिलें आहे तें सोडवून खाणें. त्यावरी शामराज काटे सोइरीबाई यांणीं जाब दिल्हा कीं, आपणास पैके मिळत नाहीं. ते वेळेस महाराज बोलिले कीं, आपण तह करून देऊं, त्यास राजी आहा कीं काय? त्यावरी शामराज काटे बोलिले कीं, महाराज तह करून देतील त्यास राजी आहों. त्याउपरी महाराज साहेबीं शामराज काटे यास वडीलपणास मौजे शिरसगांव वाकडे, येथील मोकदमी पुरातन होती, ते दरोबस्त देऊन, परगणे मजकूरची देशमुखी दो ठाईं निर्मेनिम वांटणी करून, शेरणी बाबत हजार होन पैकीं पांचशें होन शामराज काटे याचे तक्षिमेचे सभाजी काटे यापासून घेतले आणि देशमुखी वांटून दिल्ही बितपशील:—

हवेली सुपें अजदेहे ४२ बेचाळीस पैकी संभाजी काटे देहे १०॥ बाकी शामराज काटे यास दिल्हे देहे ३१॥

सभाजी काटे यास दिल्हे देहे:—
१०॥ हवेली सुपें देहे ४२ पैकीं शामराज काटे देहे ३१॥.
बाकी देहे.
२१ कर्थात बारामती देहे.

३१॥

येणेंप्रमाणें दों ठायी वाटणी केली दोन तर्फा करून दिल्या. शामराज काटे यांणीं आपले तक्षिमेंत शिक्का कारभार करावा. सभाजी काटे याणी हवेलीपैकीं देहे साडे दहा व कसबा बारामती देहे एकवीस एकूण देहे साडे एकतीस हे तर्फेस शिक्का कारभार करावा. शामराज काटे याचे तर्फेस सभाजी काटे यास बोलावयास संमध नाहीं. सभाजी काटे याचे तर्फेस शामराज काटे यास बोलावयास समध नाही. शामराज काटे याचे तक्षिमेचे पांचशें होन संभाजी यापासून घेतले. याबद्दल त्याचे तर्फेमध्ये त्यास शिक्का दिल्हा. देशमुखीचा इनाम, मौजे माळेवाडी खुर्द, तर्फ हवेली सुपें हा गाव किरकोळी इनाम गावगन्ना परगणे मजकुरीं आहे, तें निर्मेनिमप्रमाणें खावे गैर हक्क, लाजीमा, सेवधार, मानपान आपले तर्फेस द्यावे. ऐसा हरदूजणाचे रजावदीनें तह करून खुर्दखते सभाजी मोहिते हवालदार परगणे मजकूर यास व देशकास दिल्ही त्याणी खुर्दखताप्रमाणें वांटणी करून दिल्ही. त्यापासून आजपावेतों खात आलों. सभाजी काटे आपले बाप याणीं वतनाविशीं सर्वस्वें कस्त करून बिराने वादे कसबेकरी वगैरे यास वाद सागोन वतन राखिलें. वतनाचीं सनदापत्रें करून घेतली. खर्चवेंच पडिला तो खुद्द निसबतीनें दिल्हा बितपशील.—

कित्ता खर्च होन बितपशील.	कित्ता रुपये.
१०००परवाना आदलशहा पादशहा.	२९००सनद महाराज राजाराम साहेब.
१०००परवाना महाराज शहाजीराजे साहेब.	४५००सनद राजश्री स्वामी, मुक्काम वंबन.
१०००परवाना अतशाखान.	१४००शंकराजी नारायण सचीव.

१०००सनद थोरले कैलासवासी स्वामी ५०दरबार खर्च सोहरीबाईस दिल्हे.
३००शंकराजी राम सुभे * * परगणे मजकूर.

४४५०

१८५०सनद नामजादखान
२०००सनद मिर्जाराजा.
१५००सनद राजा भोज
१२००अनसोजी घाटगे, दरबारखर्च अलमगीर पादशहा.
५५०सिगमण किल्लेदार, परगणे सुपें.

१५५००

सदरहूप्रमाणें आपले बाप सभाजी काटे याणी व आपण वतनसमंधें खर्च करून वतन राखिलें, आणि महाराज शहाजी राजेसाहेब याणी वाटणी करून दिल्ही. त्याप्रमाणे अनभविलें. धर्मोजी व त्याचा भाऊ रघोजी काटे कजीयाकरिता स्वामींपाशीं फिर्याद जाले. तरी स्वामींनी मनांस आणून इनसाफ केला पाहिजे. म्हणून अर्ज केला व पूर्वील कागद दाखविले बितपशीलः—

सनद महाराज शहाजीराजे—हरदू जणांनीं निर्मेनिम वतन खावें, आपले तर्फेस शिक्का कारभार करावा १

सनद दामोदर सभाजी मोहिते वाटणी वतन निर्मेनिम १

सभाजी मोहिते याचे नावें खुर्दखत निर्मेनिम गाव वाटून देणे १

सभापत्र बनाम शामराज काटे निवडलीयाप्रमाणें निर्मेनिम वतन खावें १

येणेंप्रमाणें पत्रें दाखविलीं, तीं मनास आणिलीं. वाटणीचा दाखला व भोगवटा तहकीक करावयाबद्दल देशपाडे व मोकदम परगणें मजकूर व गिर्दनवाई गावगन्नाचे मोकदम हुजूर आणून हकिकत पुशिली. गोताने साक्ष दिल्ही जे, शामराज काटे व सभाजी काटे देशमुख या उभयतांची वतनाची वाटणी पूर्वी महाराजसाहेबी करून दिल्ही, ते खरीच आहे. सनदा महादजी काटे याणीं दाखविल्या त्या खऱ्याच आहेत महाराजानीं वतनाचा धडा घालून दिल्हा त्यास अन्यथा नांहीं. ऐसी गोही गुदरली. त्यावरी तुजवरी स्वामी कृपाळू होऊन वांटणीप्रमाणें वतनाचीं पत्रें करून दिल्हीं. शिरपाव देऊन रवाना केलें असता, धर्मोजी व रघोजी वल्द मानसिंग काटे याणी हुजूर येऊन गैरवाका विदित केलें जे, महाराजसाहेबीं वांटणी करून दिल्ही, परंतु शिक्का एकच चालिला आहे, दुसरे शिक्क्याचा भोगवटा नाही. ऐसें विदित करून कागद करून घेतले त्यावरून तुम्हीं हुजूर येऊन अर्ज केला, तो मनास आणून राजश्री पताजी शिवदेव यास आज्ञा केली. त्याणीं प्रात मजकुराचे मोकदमीस हमशाही वतनदार गोतास पुसोन तहकीकांत केली. देशकानीं व गोतानीं शाबीदी दिल्ही जे, महाराज साहेबीं वांटणी केली त्याप्रमाणें चालत आलें. शिक्काही चालिला आहे. दोघे आपलाले तर्फेत

शिक्का कारभार करितात. ह्मणून त्यावरून हे वर्तमान राजश्री पताजीपतीं स्वामींचे सेवेसी निवेदन केले स्वामींनीं मनास आणून तुजवरी स्वामी कृपाळू होऊन पूर्वील निवडीयाप्रमाणें वतनपत्र करून दिल्हे असे. तू आपले तर्फेमध्ये देशमुखीचा शिक्का कारभार करीत जाणे धर्मोजी काटे आपले तर्फेमध्यें शिक्का देशमुखीचा कारभार करीत जाईल. मालेगाव वगैरे इनाम गावगन्ना आहेत ते निमेनिमप्रमाणे खाणे हक्क, लाजीमा, सेवधार, मानपान आपलाले तर्फेनें घेणे. सदरहूप्रमाणे कसबे बारामती देहे २१ व हवेली सुपें देहे १०॥ एकूण साडे एकतीस देहे येथील देशमुखी निमेची सेवा तू करीत जाणे धर्मोजी काटे हवेली सुपें पैकी देहे ३१॥ साडे एकतीस येथील देशमुखीची सेवा करितील येणेप्रमाणे हरदूजण निवडिली-याप्रमाणे पुत्रपौत्रादि वशपरपरेनें अनुभवून सुखरूप राहणें धर्मोजी काटे व रघूजी मजकूर यांणीं व गैरवाका करून हुजूरची पत्रे घेतली आहेत, ती रद्द असेत त्यास तुजशी कथला करावयास सबध नाही. छ १२ जिलकाद, सन सबा अशरीन आषाढ, बहुल त्रयोदशी भृगुवासर, शके ५२ पराभवनाम सवत्सरे, येविशी चिटणीसी पत्रे:—

१ वतनपत्र.

१ देशपाडे व गौड मोकदमानी देहाय, परगणे सुपें व बारामती.

१ सुभेदार, वर्तमान व भावी.

३

परवानगी हुजूर जगनाथ. रसानगी दयाराम चोपदार जमात जगंनाथ

---

४१ महजर.

मल्हार गोविंद उपनाव डगरस, गोत्र गौतम, सूत्र आश्वलायन कुळकर्णी, मौजे च-व्हेाली, तर्फ हवेली, प्रात पुणें याणे हुजूर सातारचे मुक्कामी येऊन विनति केली जे:—मौजे मजकूरचे कुळकर्ण पुरातन वतन गणेश जनार्दन यांचें होते ते आपले मातेचे बाप, आपले आजे, त्याणीं आमचे बाप गोविंद खडेराव व चुलते दामाजी खडेराऊ याजपासून कर्ज शके १६०७ क्रोधननाम सवत्सरे, मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी ते दिवशी घेतले. मुद्दल रुपये ६७६॥ सहाशे साडे शाहात्तर यास व्याज दर सदे पचोत्राप्रमाणे दरमाहे सदरहू रुप-यास व्याज रुपये ३३॥। पावणे चौतीस. यास मुदती तागाईत ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, सहा माहे करून खत लेहून दिल्हें. मुदतीस न देऊ तर मौजे मजकूरचें कुळकर्ण तुह्मीं घेणें. आ-पणास कुळकर्णास समध नाहीं ऐसें खत साक्षीमोइयाने लेहून दिल्हें. मुदतीस रुपये पावले नाहींत. वरचेवर आपले वडील पाच सात वर्षे रुपये मागत गेले. गणेश जनार्दन यास नातवानीमुळे रुपये मिळाले नाहीत. शेवटी गणेश जनार्दन मरोन गेला. त्याचा पुत्र बावाजी गणेश होता. त्यास मोगलांच्या सुभ्याची स्वारी आली, त्याने जिवे मारिलें. गणेश

जनार्दन व त्याचा पुत्र उभयता मृत्यु पावले त्याउपर आपले बाप व चुलते मौजे मजकुरीं पाढरीवरी जाऊन मोकदम व समस्त प्रजा व बलुते यास मुजाहीम जाले की, मौजे मजकूरचा कुळकर्णी गणेश जनार्दन याणे आपलें कर्ज घेऊन कुळकर्ण गहाण ठेविले आहे. त्यास तो व त्याचा पुत्र दोघेही मृत्यु पावले. वश बुडाला. याउपर आपल्या पैकीयाची वाट करून देणें ह्मणोन तगादा केला त्यावरी त्यानी आपले जागा विचार करून उत्तर दिल्हे जे, ज्याचें वतन त्याचे अवलादीनें अनभवावे आणि वडिलाचें कर्ज असेल तें वारावें. त्यास अवलाद बुडाली. अफलाद गणेश जनार्दन याची कन्या बनाम जिऊबाई ही गोविंद खडेराव याची बायको वतनास अधिकारी. ऐशीयास कर्ज तुमचेच देणे व वतनाचे अधिकारीही तुह्मींच. याकरिता मौजे मजकूरचे कुळकर्ण तुह्मी आपले दुमाले करून घेऊन, वशपरपरेने अनभवणे. म्हणोन आपले चुलते दामाजी खडेराव व बाप गोविंद खडेराव यास उत्तर देऊन मौजे मजकूरचे मोकदम व समाकूळ पाढरीने महजर करून दिल्हा. त्याप्रमाणें राजश्री बहिरो पंडित प्रधान व देशमुख व देशपाडे व मोंगलाई तर्फेचे जहागीरदार याची पत्रें घेऊन आपले चुलते व बाप याणी वतन अनभविलें साप्रत राजश्री बाळाजी पडित प्रधान याचेंही पत्र घेतलें आहे आपले चुलते दामाजी खडेराव व बाप गोविंद खडेराव उभयता शात जाले. चुलतेयास पुत्रसतान नाहीं गोविंदपताचें सतान आपण, वतन अनभवीत आहो. आपणांपाशीं महजर व पत्रें आहेत तीं मनास आणून स्वामींनीं वतनपत्रे करून देऊन, वतन वंशपरपरेनें चालविलें पाहिजे ह्मणोन विनति करून राजश्री पतप्रधान देशमुख, देशपांडे व मोंगलाई तर्फेचे जाहागीरदार याची पत्रे दाखविली. ती मनास आणिलीं व मौजे मजकूरचे मोकदमानी कुळकर्णाचा महजर करून दिल्हा आहे तो हुजूर दाखविला. महजर बितपशीलः—

महजरनामा शके १६३८ दुर्मुखनाम सवत्सरे, श्रावण शुद्ध पचमी, बुधवार, सन ११२६ छ २७ साबान, सुरुसन सबा अशर मया व अलफ. हुजूर राजश्री बाजी कदम नायब फौजदार व गुडाजी त्रिबक शेखदार नायब, राजश्री रंभाजी निबाळकर जाहागीदार व जिल्हेदार फौजदार व हलीमवाली व देशमुख, देशपांडे परगणे मोहियाबाद उर्फ पुर्णे, सरकार जुन्नर सुभे खुनस्ते बुनियाद आकी दामाजी खडेराऊ व गोविंद खंडेराऊ लिंगरस यांणीं हुजूर येऊन जाहीर केलें जे, गणेश जनार्दन कुळकर्णी, मौजे चन्होली, तर्फ हवेली, परगणे मजकूर यास समय वृत्तीमुळें पडला. ते वख्तीं आपणास येऊन बाजिद जाला कीं, आपणास कर्ज देणे आणि आपलें कुळकर्णाचें वतन आहे तें गाहाण ठेवितो मुदतीस टक्का न पावे तरी कुळकर्ण डुललें, ह्मणून बहुत बजिदी करून खत लेहून दिल्हे आहे, तें बजिन्नस आहे. तेथें मजकूर श्री शके १६०७ क्रोधननाम सवत्सरे, मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी, ते दिनीं खत लिखिते धनको नाम राजश्री दामाजी खडेराव व गोविंद खडेराव लिगरस यास रिणको नाम गणेश जनार्दन कुळकर्णी, मौजे चन्होली, तर्फ हवेली पुर्णे, आत्मसुखें प्रवर्तसंबंधें तुह्मां-

पासून कर्ज घेतलें. मुद्दल रुपये ६७६।। सहाशें साडेशाहात्तर घेतले यास व्याज दरमाहे दरसदे रुपये ५ प्रमाणें एकूण दरमाहे रुपये ३३।।। पावणे चौतीस इस्तकबील मार्गशीर्ष शुद्ध त्रयोदशी, तागाईत ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी, एकूण मुदत साहा माहे मुद्दल व काळातर मुदतीस देऊ. न मुदतीस न वारू, तरी आपलें कुळकर्ण मौजे चऱ्होलीचें आहे तें तुह्मास दिल्हें. कुळकर्णासी व आपणासी अर्थाअर्थी समध नाहीं. आपलें कुळकर्ण डुलले असें. हें खत लिहिलें. सही. सुरुसन सीत समानीन अलफ, मुक्काम राजमाची, तर्फ नाणेमावळ.

गोही

संभाजी महादेव — त्रिमळ राऊ.
माणको पिलदेव. — रखमाजी शेटीया पेठ राजमाची

सदरहू पैके घेऊन खत लेहून दिल्हें त्यावरी मुदती जाहलीयाउपर पांचसात वर्षे पैके मागितले. नातवानी करिता पैके न पावले तों गणेश जनार्दन मयत जाला त्या मागें त्याचा पुत्र बाबाजी गणेश होता तो मोगलाचा सुभा आला होता. त्याचे स्वारीस सापडला. त्यानें मारिला. गणेश जनार्दन याचा (वश) बुडालीयावरी आपण मौजे मजकूरचे पांढरीवरी जाऊन मोकदम व समस्त प्रजा व बलुते यास मुजाहीम जालों की, मौजे मजकूरचा कुळकर्णी गणेश जनार्दन यानें आपले कर्ज घेऊन, कुळकर्ण गाहाण ठेविलें आहे. त्यास त्याचा वश बुडाला. यावरी आपल्या पैकीयाची वाट करून देणें. ह्मणोन तागादा केला त्यावरी त्यानी आपले जागा विचार करून, आपलें रजावंदीनें कुळकर्णाचा कागद करून दिल्हा आहे. बजिन्नस दाखविला:—

"राजीनामा समापत्र श्री शके १६१८ धातानाम सवत्सरें, भाद्रपद शुद्ध नवमी, बुधवार तें दिवशी समस्त मोकदम व चौगुले व दाहीजण व बलुते, मौजें चऱ्होली, तर्फ हवेली पुणें.

कित्ता	कित्ता.
१ दुलबाजी बिन विठोजी ताकपीर मोकदम.	२ परीट
१ बावाजी बिन लखमोजी पाटील ताकपीर.	१ बापूजी बिन माणकोजी.
१ भिवजी बिन बाळोजी चौगुला.	१ मल्हारजी बिन गोंदजी.
१ सोनजी बिन मोत्याजी ताकपीर थळकरी.	२
१ चांदजी ताकपीर थळकरी.	१ संत कोळी बिन रतन कोळी
१ धावमाळी बिन नागमाळी मेहतऱ्या.	१ भैराळ बिन गोदकरणा गुरव
२ सुतार.	२ चाभार.
१ येसजी बिन राणोजी.	१ अता बिन बाळ मेहतर.
१ ह्माकोजी बिन रायाजी.	१ मोत्याजी बिन हत्याजी.
२	२

१ महादजी बिन सोन महाला नाव्ही.
१ गणोजी बिन दुरगजी कुंभार.
२ मांग
　१ नाइका बिन लखम राऊत
　१ चागा बिन परस राऊत.

२

४ महार.
　१ धारनाक बिन काननाक मेहेतऱ्या.
　१ बाबनाक बिन जावनाक मेहेतऱ्या.
　१ मालनाक बिन कमलनाक
　१ सतनाक बिन करेनाक.

४

समस्त मिळोन दामाजी खडेराव व गोविंद खडेराव लिंगरस यास महजर करून दिल्हा ऐसा जेः—आपला मौजे मजकूरचा मिरासदार कुळकर्णी गणेश जनार्दन यावरी कसाला पडला, त्याबद्दल त्याने तुह्मापासून कर्ज घेतलें बरहुकूम कर्जखत रुपये ६७६॥ सहाशें साडेशाहात्तर पचोतरा व्याजे घेतले. ते मुदतीस न द्यावे, तरी कुळकर्ण तुह्मास दिल्हें म्हणोन लेहून दिल्हें त्यावरी गणेश जनार्दन मयत जाला त्यास एक पुत्र बावाजी गणेश होता. तोही मोगलानी मारिला. गणेश जनार्दन याची अवलाद बुडालीयावरी तुह्मीं येऊन हकिकत सागितली. खत दाखवून सदरहू पैका मुद्दल व व्याज हिशेब करून मागणे लाविलें. हिशेब पाहता पैकाही मुबलक जाला. पैका देविला जात नाही याबद्दल गणेश जनार्दन यानें कर्ज घेऊन, कुळकर्ण गहाण तुह्मापाशी ठेविलें आहे. गणेश जनार्दन याची लेक जिऊबाई गोविंद खडेराव यास दिल्ही आहे, यामुळें सोइरे म्हणून समयास कामास याल ह्मणोन कर्ज दिल्हें आहे. अवलाद बुडाली तरी अफलादेनें वतन खावें हे चालत आलें आहे याकरिता श्री ईश्वर स्मरोन, सदरहू हिशेब मनास आणून, गणेश जनार्दन याचे कुळकर्ण मौजे मजकूरचें तुमचे सांभाळी केलें असे. तुह्मीं लेंकराचे लेंकरी वशपरपरेनें कुळकर्णाची वृत्ती पिढी दरापिढी खाणें. कुळकर्णाचा हक्क लाजीमा सुदामत चालत आला आहे त्याप्रमाणें ठेवणें. घर ठिकाणा कुळकर्णाचा आहे, तेथें तुह्मी घर बाधोन सुखें वृत्ती अनभवीत जाणें. यास कोणी गावकरी व गणेश जनार्दन याचे निसबतीचे वारसदार (जो कोणी) कथला करील, तो दिवाणाचा गुन्हेगार, गोताचा अन्यायी, श्री वाघेश्वराची आण असे. श्री वाराणशी व बेताळीस पूर्वजाची आण असे. येणेंप्रमाणें राजीनामा लिहिला. सही सदरहू गावीच्या वतनदाराचा कागद व गणेश जनार्दन याचें खत मनास आणिता, गणेश जनार्दन यावरी आज तागाईत मुद्दल, व्याज, तीस एकतीस वर्षांचा हिशेब बेमुबलग होतो गणेश जनार्दन याचें पुत्रसंतान बुडालें. त्याची कन्या जिऊबाई, गोविंद खंडेराव याची बायको, अफलाद, तिणें वतन खावें, हें शास्त्रप्रमाण आहे व चराचरही चालत आहे. दामाजी खंडेराव व गोविंद खंडेराव याचा पैका देणें आहे व गणेश जनार्दन याचा जावई गोविंद खडेराऊ वतनास अधिकारी. यास कुळकर्णाचा कागद लेहून दिल्हा आहे. तो मनास आणून मौजे मजकुरचें कुळकर्ण यास मोकरर करून दिल्हें आहे. कुळकर्णाचा घरवाडा व हक्क लाजीमा

सुदामत शिरिस्ताप्रमाणें तुह्मीं आपले वंशपरपरेनें अनभविणें. ह्मणोन दामाजी खंडेराऊ व गोविंद खंडेराऊ यांस महजर करून दिल्हा.

गोही.

किता

१ मालजी नरसिंगराऊ व अडबोजी नाईक शितोळे देशमुख, प्रांत पुर्णे
१ होनप देशपाडे, प्रात पुर्णे.
१ शामजी बनाजी चिटणीस, सरकार जुन्नर.
१ वेंकाजी पाटील झांबरे मोकदम, कसबे पुर्णे व जिवाजी केवश कुळकर्णी निसबत मोहतर्फा, कसबे मजकूर.
१ माळी मेहतर, कसबे पुर्णे.
१ तान्हाजी बिन सिदोजी तुपे पाटील मोकदम, मौजे हडपसर.
१ गणशेटी वल्द गोमाजी शेटे, पेठ शाहापूर, कसबे पुर्णे
१ सोमाजी बिन खडोजी पाटील व फिरगोजी बिन वाल्होजी हरपळे, मौजे फुरसुगी, तर्फ हवेली पुर्णे.
१ सोनजी बिन गोदाजी पाटील ताकपीर मौजे धनकवडी, तर्फ हवेली पुर्णे
१ गणोजी बिन परसोजी पाटील खुरकुटे, मौजे बाणेरें, तर्फ हवेली पुर्णे.
१ बापोजी बिन पदाजी गधे पाटील, मौजे निरगुडी.
१ जानोजी बिन संभाजी पाटील पोकळे, मौजे धायरी
१ तुकोजी बिन फुलाजी व मल्हारजी बिन भिकाजी सितोळे पाटील, मौजे लवळें.
१ राणोजी बिन दत्ताजी तनपुरे पाटील, मौजे बिबवी, तर्फ खेड.

किता.

१ संताजी बिन देवजी पाटील मोडक, मौजे वोडकी.
१ खंडोजी बिन लखमोजी बोल्हाडे पाटील, मौजे हिगणें.
१ बापूजी बिन देवजी पाटील साटे, मौजे पिपळें निलद
१ फिरगोजी बिन महादजी पाटील बावरेट, मौजे बोपोडी.
१ माणकोजी बिन परसोजी पाटील जगथाप, मौजे पिपळें गुरव
१ भुगोजी बिन कानोजी व बावाजी पाटील राकसे, मौजे सागवड
१ हरबाजी बिन जाऊजी पाडळे मोकदम, मौजे रावेत.
१ खडोजी बिन कावजी पाटील जगदळे, मौजे गराडें, तर्फ कन्हेपठार.
१ माणकोजी बिन जाऊजी व हरबाजी पाटील, मौजे चिचवड.
१ सुभानजी बिन रामाजी ढवळे, मौजे नवळें.
१ माणकोजी बिन संताजी पाटील वाळके, मौजे दिघी.
१ बाबाजी बिन नैतजी पाटील कंद, मौजे सुकलोणी, तर्फ सांडस.
१ शिवजी बिन जानोजी जगथाप मोकदम, मौजे वानवडी.
१ नैतजी वल्द सावजी कवडे मोकदम, मौजे घोरपडी, तर्फ हवेली.

१ नैताजी बिन धनाजी तलकात, मौजे बोपोडी, तर्फ हवेली

१ रामजी वल्लद यमाजी पाटील गलडे, मौजे वडगावसेरी.

१ सधानजी बिन देवजी पाटील मोरे, मौजे चिखली, तर्फ हवेली

१ मल्हारजी वल्लद मोत्याजी पाटील ठिगरे, मौजे धामोरी, तर्फ हवेली.

१ सोनजी मोझे चौगुले, मौजे यरवडें.

१ नवलोजी बिन संताजी पाटील तावरे, मौजे परवती, तर्फ हवेली.

१ नारोजी वल्लद बापोजी पाटील खिराड मौजे—

१ बुवाजी बिन भिवजी राकसे मोकदम, मौजे उबरे, तर्फ हवेली.

१ हाउजी बिन जाउजी राकसे मोकदम, मौजे साळउबरें.

१ दुलबाजी बिन बापूजी पाटील, मौजे चऱ्होली

१ जिवई कुच स्नताजी पाटील राजगुर, मौजे यरवडें.

येणेंप्रमाणे महजर आणून दाखविला व मौजे मजकूरचें कुळकर्ण आपले दुमाले जालीयावरी, मोकदमास कुळकर्णाच्या मुशाहिऱ्याची मोईन पुशिली त्याणीं देशमुख व देशपाडे याचे विद्यमानें कुळकर्णाचा मुशाहिरा जमीन रक्कम साहा रुक्के, यास मुशाहिरा मोईन खुर्दा टक्के १।। बारा सळ्या, व गल्ला ऐन जिन्नस बारुळें १।। दीड मण, येणेंप्रमाणें कदीम मोईन होती. त्याप्रमाणें आपणास पत्र लेहून दिल्हें आहे त्याप्रमाणे आपण मुशाहिराही घेत आहों. महाराज स्वामीनी कृपाळू होऊन वतनाचे पत्र करून देऊन वशपरपरेने चालविलें पाहिजे ह्मणून विनति कली त्यावरून मनास आणून, यावरी स्वामी कृपाळू होऊन, मौजे मजकूरच्या कुळकर्णाचा महजर, याचा बाप व चुलते याणी करून घेतला आहे. त्याप्रमाणें मौजे मजकूरचें कुळकर्ण यास अजरामऱ्हामत वतन करून दिल्हें असे तरी हें मौजे मजकूरचे कुळकर्ण देखील घरवाडा व कुळकर्णाचा मुशाहिरा जमीन [illegible] खुर्दा टके १।। बारा सळ्या व गल्ला बारुळे दीड मण प्रमाणे, मुशाहिरा व त[illegible] कोणी [illegible]नपान, कानुकायदे सुदामत शिरस्ता चालत आला असेल, त्याप्रमाणें हे व याचे पुत्रपौत्रां[illegible] श्री [illegible] वशपरपरेनें अनभवितील. येविशी पत्रेः—

१ वतनपत्र शेरणी रुपये २०० दोनशें की वसूल हुजूर जाला असे.

१ मोकदम व रयानीं, मौजे मजकूर, बहुल षष्टी भृगुवासारे

१ देशमुख व देशपांडे, परगणे मजकर, बहुल दशमी भौमवार.

१ देशाधिकारी, बहुल दशमी भौमवार.

१ राजश्री पंतप्रधान, बहुल दशमी भौमवार.

पत्रें पौष बहुल षष्टी, भृगुवासर, आनंद संवत्सरें, बार कीर्द छ २८ साबान, सुरसन खमस सलासीन.

४२ कौलनामा.

बहिरजी व सयाजी बिन सुभानजी बिन बहिरजी बरगे पाटील मोकदम, मौजे हुसेनपूर, परगणे खटाव, याणी शाहूनगर नजीक किल्ले सातारा येथील मुक्कामीं स्वामी सनिध येऊन रौद्रनाम संवत्सरी विनति केली कीं, मौजे मजकूर पूर्वी कसबे खटावची वाडी, याचा मौजा अलाहिदा करून, तेथील पाटिलकी पेशजी अबरखान हुसेनी याणीं आपला बंदा ताजमहमद यासी मिरास करून दिल्ही. त्याणी एक दोन वर्षं पाटिलकी केली, परंतु गावची लावणी करून, दिवाणचा पैका फारिख केला नाही, आणि आपण उठोन चदीप्रातें गेला. मौजे मजकूर खराब पडला याजबद्दल अबरखान हुसेनी याणी परगणे मजकूरची देशमुखीण बाइजी आवा कोम कसोजी फडतरे यासी तलब करून हुजूर नेलें, आणि मौजे मजकूरची बेरीज रकमेचा दुसाला तगादा करून, पेस्तर गावची लावणी करावयाचा हुकूम करून पत्र लेहून घेतलें त्यास निरोप दिल्हा त्याउपरी बाइजी आवा परगणे मजकुरास येऊन विचार पाहिला. परतु मौजे मजकूरचा पेशजी दुसाला तगादा करून पेस्तर लावणी न होय, याकरिता आमचे पणजे तुकोजी व वेंकोजी बिन रवळोजी बरगे यासी मौजे मजकूरचे पाटिलकीचें वतन देशमुखानी आत्मसतोष विकत देऊन, त्याची किमत होन ९५० साडे पाचशें घेऊन दिवाणाचा तगादा वारला, आणि खरेदी खत लिहून दिल्हें त्याप्रमाणे आमचे पणजे मौजे मजकूरची पाटीलकी मोकदमीचें वतन अनभवू लागले. त्या मागें त्याचे पुत्र बहिरजी बरगे, हे आमचे आजे, त्याणीही मौजे मजकूरची पाटिलकी अनभविली. त्याउपरी मुलखामध्यें काळदुकाळ पडला. या निमित्य गाव सोडून पोट भरावयासी देशावरी गेले. मागें गावावरी आमचें कोणी नव्हतें. याजकरिता देशमुख फडतरे, परगणे मजकूर याणें गावची लावणी उगवणी करून मोकदमी अनभवीत आहेत. पूर्वील पत्रें आह्मापाशी आहेत, तीं मनास आणून देशमुखास हुजूर आणून, त्याचा आमचा करीना मनास आणून, मौजे मजकूरचे मोकदमीचें वतन आमचे दुमाला करून वशपरपरेनें चालविले पाहिजे ह्मणून विदित केले; व खरेदीपत्र व होन पावलीयाचें पत्र आणून दाखविले. वितपशीलः—

"वृत्तिपत्र राजश्री बाइजी आवा व चाफाजी देसाई, परगणे खटाव ताहा तुकोजी वेंकोजी बरगे पाटील मोकदम, मौजे हुसेनपूर, परगणे मजकूर, सुरुसन इहिदे सलासीन अलफ, लेहून दिल्हे वृत्तिपत्र ऐसें जेः—मौजे मजकूर ठाणीयाचा गाव हजरत खानसाहेबी आपले बदेयासी गाव मिरास करून दिल्हा त्यास त्याच्यानें मौजे मजकूरची कीर्द जाहली नाहीं. मौजे मजकूर मजरा पडिला. याबद्दल आपणास दस्त करून हुजूर नेऊन, मौजे मजकूरची दुसाला रकम बेरजेचा तगादा करून, पेस्तर कीर्द करा-

वयासी रजा फर्माविली त्यास आपण महालास येऊन विचार पाहिला. परंतु दिवाणाचा तगादा वारून कीर्द होइनासी जाली. मग आपले आत्मसंतोषें तुह्मांस मौजे मजकूरची पाटिलकी कुलबाब कुलकानू, हक्क, इनाम, सेवधार व गावडमोट, महार, नांगर व होळीची पोळी देखील तुह्मास वतन करून दिल्हे असे. तुह्मापासून दुसाला बेरीज गावची रक्कम भरून घेऊन दिवाणचा तगादा वारला. तुह्मीं मौजे मजकूरचे मोकदमीचें वतन लेंकराचे लेंकरीं खाऊन, मौजे मजकूरची कीर्दमहामुरी करून सुखरूप असणे. तुह्मांस कोणे गोष्टीचा दिवाणाचा तगादा लागों देणार नाही. आपले वशीचा होऊन तुमचे वतनास जो कोणी कसूर करील, त्यास श्री देवाची आण असे जाणिजे. रवाना छ ५ रमजान. हे आपलें वडिलाचें इमान सही. हे वृत्तिपत्र सही."

"कौलनामा राजश्री बाइजी आवा व चाफाजी देसाई, परगणे खटाव ताहा तुकोजी व वेंकोजी बरगे पाटील मोकदम, मौजे हुसेनपूर, परगणे मजकूर, सुरुसन इहिदे सलासीन अलफ. दादे कौलनामा ऐसाजेः—मौजे मजकूरचे दिवाणें आपले माथा रक्कम दुसाला बेरीज होन ५५० साडेपाचशें ठेविले. त्यास तुह्मापासून सदरहू साडेपाचशें होन घेऊन तुह्मास आत्मसतोषें, मौजे मजकूरचें मोकदमीचें वतन अजराम-हामत करून दिल्हें असे. आपले लेंकराचे लेंकरीं खाऊन, मौजे मजकूरची लावणी करून सुखरूप असणें. मौजे मजकुरास कौल परगणे मजकुरी हजरतखान साहेबीं कटबण भाग स्थळाचा कौल दिल्हा आहे. त्याप्रमाणें चालून तुम्हास कोणे गोष्टीचा तगादा लागो देणार नाही जाणिजे छ १० माहे रमजान दरीबाब कौल असे."

येणेंप्रमाणें पत्रें आणून दाखविली ती मनास आणून राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यासी स्वामीनी आज्ञा केलीजे, फडतरे देशमुख परगणे मजकूर यासी हुजूर आणून बरगे याचा करीना मनास आणून, वतन याच्या दुमाले करणें त्यावरून पडित मशारानिल्हे याणी मानाजी व बहिरजी फडतरे देशमुख, परगणे मजकूर, यासी हुजूर आणून तहकिकात करिता देशमुख मजकूर बोलिले जे, मौजे मजकूर रकमाळा जमीन चावर १८-४२१ आठरा चावर एकवीस बिघे जमीन येथील पाटिलकी आमची पणजी बाईजी आवा व चाफाजी देशमुख याणी तुकोजी व वेकोजी बिन रवळोजी बरगे यासी विकत दिल्ही तेणेप्रमाणे बरगे पाटिलकी मोकदमी अनभवीत होते. तेव्हा ताजमहमद याचा लेक येऊन, पाटिलकीबद्दल बरगे यासी कजीया केला. ते समयी बाइजी आवा व हरजी देसाई याणीं अबरखान याजकडे जाऊन, ताजमहमद याच्या लेकासी वाद सागोन, खोटा करून, पाटिलकीचें वतन बरगे याच्या दुमाला केलें आणि आपले इनामपत्र लेहून दिल्हें. त्याप्रमाणे बरगे याणीं मौजे मजकूरची पाटिलकी अनभविली. त्याउपरी कित्येक दिवशीं काळादुकाळामुळें गांव सोडून पोट भरावयासी देशावरी गेले मागे गांवची लावणी करून दिवाणाचा टक्का द्यावयासी पाटील नाहीं. याबद्दल मौजे मजकूरची पाटिलकी आह्मीं चालऊन दिवाणाचा टंक्का वसूल देत आहों. हल्लीं बरगे आपले वतनावरी आले आहेत. यानीं आपले वतन दुमाले

करून घेऊन वंशपरपरेनें वतन अनभवावे. याचा आमचा कजीया नाहीं. आमचे वडील यासी मौजे मजकूरची मोकदमी विकत दिल्ही आहे. तेणेप्रमाणें करार आहे म्हणून बोलिले. त्यावरून राजश्री पंत प्रतिनिधी याणीं देशमुख मजकूर यासी सागितलें जे, तुह्मीं आपलें पत्र व महजर करून देणें त्यावरून देशमुख, परगणे मजकूर याणी आपले पत्र व महजर करून देऊन, मौजे मजकूरची पाटिलकी, मोकदमी, बहिरजी व सयाजी बिन सुभानजी इबिन बहिरजी बरगे याच्या दुमाला केली त्याप्रमाणे राजश्री श्रीनिवास पडित प्रतिनिधी यांणीं आपले पत्र करून दिल्हें. तीं पत्रें बरगे मजकूर याणी हुजूर आणून दाखविलीं व देशमुखाचें पत्र दाखविले बितपशील:—

"कौलनामा राजश्री बहिरजी फडतरे देशमुख, परगणे खटाव ताहा बहिरजी बरगे पाटील मोकदम, मोजे हुसेनपूर, परगणे मजकूर सुरुसन हजार ११९० इहेदे अर्बैन मया अलफ. कारणे दादे कौलनामा ऐसा जे:—तुम्ही येऊन विदित केलें कीं, साहेबाच्या वडिलानी मौजे मजकुरची पाटिलकी आपल्या वडिलास दिली आहे. याचे कागदपत्र आहेत ते पाहून, मनास आणून, मौजे मजकूरचे पाटिलकीचें वतन दुमाले केलें पाहिजे म्हणून कागदपत्र पुढे ठेविले. वाचून पाहिले ते आमचे वडील तीर्थस्वरूप मातुश्री बाइजी आवा व चाफाजी देसाई यांचे कागदपत्र शिक्क्यानिशी आहेत. तेथें लिहिलें की, मौजे मजकूर कसबेचे वाडीचा गाव अलाहिदा खानसाहेबी करून आपला ताजमहमद यासी पाटिलकी दिल्ही होती. ते त्याणें गावची लावणी न करिता निघोन गेला. गाव पडला होता. त्याजबद्दल आपणास दिवाणें तगादा करून तकीं फर्माविली. आपणांपाशीं पैके पडसरीचे द्यावयास अवसर नाहीत. मग तुमचे वडील तुकोजी व वेकोजी बरगे यासी बोलावून आणून, पाटिलकी विकत देऊन, होन ९९० साडे पाचशें घेऊन दिवाणास दिल्हे आणि पाटिलकी तुमचे वाडिलाचे दुमाले केली. ऐसीं पत्रें लिहिलीं तीं मनास आणून वाडिलाचें लिहिणें मान्य करून, मौजे मजकूरची पाटिलकी व महार, नागर, होळाची पोळी, पानतश्रीफ, हक्क लाजीमा, इनाम जमीन शिरस्तेप्रमाणें दुमाले असे. तरी दिवाण नफराई करून, गावची लावणी संचणी करून, पाटिलकी अनभवून सुखरूप खाणें. तुमचे लेंकराचे लेंकरी चालवू आम्हाकडून अंतर पडणार नाहीं. दरीबाब कौल असे. छ २७ माहे सफर. येणेंप्रमाणें पत्र मनास आणून मौजे मजकुरची पाटिलकी, मोकदमी बहिरजी व सयाजी बिन सुभानजी बरगे याचे पणजे तुकोजी व वेंकोजी बिन रवळोजी बरगे यांनी बाइजी आवा व चाफाजी देशमुख, परगणे मजकूर याजकडून खरेदी केली आहे त्याप्रमाणें हल्लीं बाहिरजी फडतरे देशमुख परगणे मजकूर याणें बरगे यासी आपलें पत्र व महजर करून दिल्हा आहे. त्याप्रमाणें यासी मौजे मजकूरची पाटीलकी, मोकदमी, दरोबस्त देखील पानमान तश्रीफ, होळीची पोळी व हक्क, इनाम, नांगर, रावता, महार व बाजे कानूकायदे शिरिस्तेप्रमाणें यासी वंशपरंपरेनें करार केले असे. तरी तुम्हीं मौजे मजकूरची मोकदमी, दरोबस्त याचे दुमाले करून दडकपमाणें

वतनाची सेवा याचे हातून घेऊन, सदरहू वतनास हक्क, इनाम व मानपान, तश्रीफ, नांगर, होळीची पोळी वगैरे कानूकायदे खरेदीखत व महजराप्रमाणें यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें वतन चालवणें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणें या पत्राची प्रती लेहून घेऊन, अस्सल पत्र भोगवटीयास याजवळ परतोन देणें या वतनसमधें याचे माथां शेरणी, स्वराज्य व मोगलाई अमल एकूण दुतर्फा रुपये ९०० पांचशें करार करून, निमे हुजूर व निमे जिल्हेकडे वसूल घेतला असे. येविशीं पत्रें. छ ७ जमादिलावल, सन खमस अर्बैन मया व अलफ. राज्याभिषेक शके ७१ रक्ताक्षीनाम संवत्सरे, अधिक आषाढ शुद्ध नवमी, गुरुवासरे येविशीं पत्रें.—

२ फडणिशी

१ मुख्य पत्र.

१ कुळकर्णी व चौगुले व रयान व बलुते.

२

२ चिटणिशी.

१ देशमुख, देशपाडे

१ देशाधिकारी व लेखक, वर्तमानभावी.

२

४

४३ निवाडपत्र.

यादी बापूजी रामचद्र प्रभू देशकुळकर्णी व गावकुळकर्णी तर्फ रोहिडखोरें व वेळवंडखोरें, प्रांत मावळ. सुरुसन सीत सालासीन मयातैन व अलफ. राजश्री पतसचीव याणी देशकुळकर्ण तर्फ मजकूरचे व गुमस्ते याणी गावकुळकर्ण वगैरे वतन जबरीनें घेतलें. त्याविषयीं तटा पडून पेशजी हुजूर निवाडा होऊन वहिवाट केली व तटे होत आले. व सचिव वगैरे यांणीं जबरी करून वतन घेतलें. त्याविषयीचे कागदपत्र अस्सल व नकलेच्या नकला तपशीलवार.—

" १ हवालदार व कारकून किल्ले रोहिडे याचें पत्र दादाजी नरस प्रभू देशकुळकर्णी व गांवकुळकर्णी, तर्फ रोहीडखोरें व तर्फ वेळवंडखोरें, प्रांत मावळ यांचे नावें पत्र त्यांत हांसीलः—तुह्मीं लोक जमाव करून अजरष्टखान वजारतमहा शिवाजी राजे यासी पुंडावेसी सामील जाहला व इनाम माफ जाहल्याची खबर बद्दल देशमुख व खापडे व जेधे देशमुख याणीं ठाणें शिरवळीं जाहीर केलें. त्याजवरून परागंदा जाहलास, आणि विलायत

वैराण जाहली. त्याजवरून हल्लीं शाहा गाजी हुकमतपन्हा याचे हुकूमावरून वजिराचा हुकूम आला. त्यांत पेठकरी व रयत वगैरे दोनी तपीयात आपले मकाणीं येऊन विलायत संचणी करणें. हुजूरचे हुकुमावरून सर्व गुन्हे माफ होऊन हा कौलनामा फर्माविला असे म्हणोन. छ २९ रबिलावल, सुरुसन सीत अर्बैन अलफ. शके १५६७. पत्र अस्सल.

१ राजाराम महाराज यांचीं राजपत्रें देशाधिकारी व लेखक वर्तमानभावी यांचे नांवें त्यांत मजकूर:—दादाजी नरस प्रभू देशकुळकर्णी व गावकुळकर्णी तर्फ मजकूर यांचें वतन जबरीनें शकराजी नारायण याणी घेतलें. त्यास परत प्रभूकडे पेशजीप्रमाणें देवविणें. जे ज्याणी वतन सतोषानीं खरिदी दिल्हें, त्याचा बोलण्याचा समध नाही. व ज्याजवर बलात्कार कोणी करून वतन घेतले, खरिदी नसता मतलबी सबब लाविली, ते खोटे. त्यास वृत्तिशी संमध नाहीं. याप्रमाणे कैलासवासी थोरले राजश्री—स्वामीचे वेळेपासून ठरून चालत असता अलीकडे नवीन जबरीनें दादाजीस गरीब पाहून वतन घेतलें. तें परत देविणें. दादा कोंडदेऊअलीकडे बलात्कारें अशी ज्याची वृत्ति कोणी घेतली असेल ती परत देविणें. राजकारणात ज्याणी इकडे जसें लिहिलें, त्याप्रमाणे होत गेलें. तें गैर समजून जालें. गाडेकरास पत्रें करून पाठविलीं, ती रद्द करून त्यासही लिहिलें आहे म्हणोन. माघ शुद्ध १ भृगुवासरे राजशक १९. शके १६१४ नक्कल.

१ राजाराम महाराज यांचें पत्र शकराजी नारायण यास, त्यातील हाशील—नरस प्रभू व भास्करजी प्रभू हे घरभाऊ, दोघेही वृत्तीस अधिकारी दत्तक पुत्र घेणें नलगे. तत्रापि दत्तक घेऊन मोगलाईपासून आजपावेतो वहिवाट करितात. दादा कोंडदेव याचे कारकिर्दीअलीकडे स्वामीनीही कोणी कोणावर जुलमे व बलात्कारे वतने घेतली, तीं परत देविलीं. असा नेम चालत आला. त्यात तुम्ही राजक्रातीत, इकडे गैरवाका मजकूर लिहून राजपत्रें नेली. त्यास तुमचें लिहिणे हुजूर खरें वाटून ती पत्रे वतनी पाठविली परतु हे श्रीस व स्वामीस कधीच मानणार नाही चिरजीवापाशी बादशाही लष्करात चाकरीवर याचा पुत्र कृष्णाजी आहे. ही माहिती तुम्हास असता याचे वतन घेतलें ! तें परत घेण्यास तुम्हाकडे प्रभू रवाना केला असे. तरी याचें वतन परत देणें माघ शुद्ध १ भृगुवासरे, राजशक १९. शालिवान शके १६१४ नक्कल.

१ शाहाजहान बादशहा याचा परवाना शाहू महाराज याचे नावें त्यांत हशील:—कृष्णाजी दादप्रभू देशपाडे याचें वतन शकराजी नारायण याणें घेतलें व अशा तसनसी बहुत केल्या, सबब तुम्हां आणविलें, न आले. हिरकणी खाऊन मेलें. त्यास नारोपंत यांस ताकीद करून यांचें वतन यांस देवविणें व अशीं ज्याची कदीम वतनें असून घेतलीं असतील, तीं परत देवविणें, व अवलाद अफलाद वतनें चालवणें म्हणोन. छ ११ रबिलावल सन ११३१. शके १६३७ नक्कल.

४४ कर्जरोखा.

हजरत नबाब खोजे मोमीनखा बहादर.

कर्जरोखा धनकोनाम राजश्री राघो गोजदेव, कसबे खेड यासी. रिणकोनाम जगनाथ बाबनाजी नाईक देशमुख, परगणे अरधापूर, सन ११९९ सन हिजरी आत्मकार्यपरत्व संमधें तुमचें कर्ज घेतलें. मुद्दल रुपये १००० हजार. यासी व्याज दर शेकडा चोहोत्राप्रमाणें दरमहा देत जाऊ. न देऊ तर आपले वतन यासी समध नाही सबब आपलें वतन सोडविलें व आपणास धरून नेऊन मुसलमान करीत होते त्याबद्दल सोडविलें. हजार रुपये देऊन बंद खलास केला. आपणासी दुसरी गोष्ट सागणार नाही. हा रोखा लेहून दिल्हा सही बितपशीलः—

गोही

सुभानजी चौधरी, कसबे मजकूर. लक्ष्मण महाजन, कसबे मजकूर.
लखमापा शेटे, कसबे मजकूर
तारिख छ १६ माहे सफर, माघ वद्य दशमी १०

४५ निवाडपत्र.

कृष्णाजी रघुनाथ उपनाम दिवाकर, गोत्र गौतम, शाखा माध्यादिनी, सूत्र वाजसनी जोतिषी व कुळकर्णी, मौजे चिमणगाव, समत कोरेगाव, परगणे वाई यासी दिल्हे वतनपत्र ऐसीजेः—तुम्ही शाहूनगर नजीक किले सातारा येथील मुक्कामीं स्वामीसनिध येऊन विनति केली कीं, मौजे मजकूरच्या जोतिष कुळकर्णाचें वतन पुरातन आपले वशपरपरेनें अनभवीत आहों. पूर्वी आमचे वडील देवो लक्ष्मण व चितो लक्ष्मण हे उभयता बधू, मौजे मजकूरचें जोतिष कुळकर्ण अनभवीत असता, रामाजी नागनाथ व गोदो नागनाथ सोनवडे उमराणीकर, ऋग्वेदी हे दिवाणबळें वतनास मुजाहीम जाहले. त्यासमागमे वादवेवाद सागोन गोतानें परथळ, कसबे कल्हे, कर्यात मजकूर, प्रात पन्हाळा येथे रवा नेमिला. तो आपले वडील देवो लक्ष्मण यार्णी काढून खरें जाहले. रामाजी व गोदो नागनाथ बाद सागत होते. त्याणी मौजे मजकूरचे पाढरीवरी रवा काढिला. ते खोटे जाहले. त्याचा आमचा करिना, अबरखान दिवाण या प्रातास पूर्वी दिवाण होते, त्याणी मनास आणून, रामाजी व गोदो नागनाथ यांसी खोटे करून, मौजे मजकूर दरोबस्त जोतिष कुळकर्णाचे वतन पूर्ववतूप्रमाणें आमचें करार करून, आमच्या वडिलास दुमाले मिसल महादो त्रिंमल हवालदार व महमद अली हुद्देदार, मौजे मजकूर यांसी छ १९ जमादिलावल, सन इसने अशरीन अलफचें पत्र करून दिल्हें, व महजरही करून दिल्हा. यावरी आपले वडील देवो लक्ष्मण व चिंतो लक्ष्मण पूर्ववतप्रमाणें, मौजे मजकूरचें जोतिष कुळकर्णाचें वतन अनभवू लागले त्याउपरी कित्येका दिवशीं राजश्री बानतराव विजापुरच्या पादशाहाची दिवाणगिरी करीत होते. त्यांजकडे

रामाजी नागनाथ सोनवडे उमराणीकर यांचा पुत्र नागो राम जाऊन, मौजे मजकूरचें निर्मे वतन त्यास देऊ करून, त्याचे बळें दिवाण हुकूम घेऊन गावास आला. तें समयीं आपले वडील चितो लक्ष्मण यांचा पुत्र विसाजी चितामण गावीं वतन चालवीत होता. त्यासी धरिणीं आणून दारीं बैसाविली. तेव्हा विसाजी चितामण याणे सर्व बिशाद घर सोडोन जीव घेऊन पळाला, आणि रुईस गोत्रज कुळकर्ण करीत होते, त्यास वर्तमान सांगितलें जे, आपल्या वतनावरी द्यानतराव याच्या बळें नागो राम उमराणीकर उभा राहिला आहे. पूर्वी अबरखान याचे कारकिर्दीस वादास उभे राहिले. ते समयीं आमचे चुलते देवो लक्ष्मण व बाप चितो लक्ष्मण या दोघा भावानीं वाद सागोन दिव्य करून, रामाजी नागनाथ यासी खोटा केला. हल्ली आपल्या चुलत्याचे पुत्र रोजगारानिमित्त दूर गेले आहेत. आपण एकटा पडलों. तुम्ही गोत्रज आहा. आपली कुमक करणें ह्मणोन बोलिले. त्यास रुईकरानीं उत्तर दिल्हे जे. आपण वाद सागावयासी तुह्मास सामील होत नाहीं. चिमणगाव साधले हरपले तुमचे, आपणास समध नाही, ह्मणोन कोनेर बाबाजी रुईकर याने येजीतखत लिहून दिल्हें. तें घेऊन, आपलें वडील विसाजी चितामण विजापुरास जाऊन, द्यानतराव याची भेट घेऊन, पूर्वील करिना सागोन, अबरखानाचे कारकिर्दीचा महजर व दुमाले मिसल त्यास दाखविली ती त्याणी मनास आणून, नागो राम यासी आपलें पत्र दिल्हें जे, तू खोटा आहेस. त्याच्या वतनास मुजाहीम न होणें. ते पत्र घेऊन गावास आले तव मुलूख महाराज राजश्री— थोरले कैलासवासी स्वामीस अर्जानी जाहला ते समयी विसाजी चितामण व आपले बाप राघोस्वानद बिन बापुजीराम या दोघानी जाऊन वर्तमान निवेदन केलें तेव्हां राजश्री स्वामीनीं राजश्री पताजीपत वाकनिविस यास आज्ञा केली जे, याचा करिना पूर्वील महजर मनास आणून, विदित करणें. त्यावरून त्यांणी करिना मनास आणून, महाराज स्वामींस विदित करून, हुजूरचें पत्र करून दिल्हें, व परगणे मजकूरचा सुभा येसाजी मल्हार करीत होते, त्यास आपलें पत्र दिल्हें. त्याणी पत्राप्रमाणें भगवंत मुद्गल हवालदार, संमत कोरेगांव यासी पत्र दिल्हें जे, याचा करिना पूर्वील पत्रें मनास आणून, मौजे मजकूरचे जोतिष कुळकर्णाचें वतन याचे दुमाला करणें. त्यावरून भगवत मुद्गल हवालदार याणीं आमच्या वडिलाजवळील पूर्वील पत्रें व महजर व मौजे मजकूरचे मोकदम व बलुते व गीर्दनवायेच्या गावचा रुजू मोझा पाहून आमचे वडील विसाजी चितामण यासी, राज्याभिषेक शके ४ पिंगलनाम संवत्सरे, सन समान आर्बैन (सबैन) अलफ. छ २४ जमादिलाखरीं दुमाले मिसल दिल्ही. ते घेऊन विसाजी चिंतामण, मौजे मजकूरचे ज्योतिष कुळकर्ण अनभवीत होते. ते मृत्यु पावले. त्यामागें त्याचा पुत्र चितो विश्वनाथ गावावरी येऊन, वतनाचे कागद व महजर व रुईकराकडून येजीतखत घेतलें होतें तें, व गावचा जमीनझाडा व रकमाळा व कित्येक कागद वर्धनगडीं अचळोजी काटे याचें घरीं ठेऊन, मौजे मजकूरच्या ज्योतिष कुळकर्णाचें वतन अनभवीत असता, त्यास व्यथा प्राप्त जाहली. याजकरितां तुळाजी पाटील व मोकदम

व जखनाख महार क्षेत्रस्था, मौजे मजकूर यानीं चितो विश्वनाथ व त्याची माय सईबाई यासी खटावकर भट मावळे याचे घरीं पावती केली. तेथें पावताच एका दिवसात मातापुत्र दोघेही मृत्यु पावले. आपला बाप राघो स्वानंद बिन बापुजीराम हे उद्योगानिमित्त परमुलखीं होते. गावीं वतन चालवावयासी आमचें कोणी नव्हतें. वर्धनगडी अचळोजी काटे याच्या घरीं वतनाचे कागद होते. ते त्यांणीं यादवभट खटावकर याचे स्वाधीन केले. गोपाळ मेरु रुईकर यांणें वर्धनगडची फडणिशी हुजूरून घेतली ते समयीं आमचें कोणी वतनावरी नाहींसें पाहून, मौजे मजकूर किल्ल्याकडे तनखेयासी सर्व सत्ता किल्ल्याची या बळें ज्योतिष कुळकर्ण गोपाळ मेरू करू लागला. आपले बाप पूर्वी केलासवासी थोरले महाराजांचे व महाराज राजश्री—महाराजाचे कारकिर्दीस रायगडीं दफ्तरदारी करीत होते. ते सोडून वैराग्य घेऊन फलटणीं कित्येक दिवस राहिले आपण प्रबुद्ध जाहल्यावरी आपणास घेऊन गावावरी आले. तों रुईकर कुळकर्ण करितात. वतनाचे कागदपत्र चितो विश्वनाथ याजवळ होते ते त्याणें वर्धनगडी अंचळोजी काट्या याजजवळ ठेविले होते त्याचा शोध करिता त्याणें खटावकर भटाजवळ दिल्हे. त्यासी रुईकरानी शरीरसमध करून, स्नेह सपादून, त्याचें येजीतखत होतें ते व गावाचा स्थळझाडा व रकमाळा व कित्येक कार्याचे कागद होते ते, गोपाळ मेरु याचे भाऊ राघो मेरु व पतो मेरू याणी घेतले, ऐसा शोध लागला. आपणापाशी कागदाचा आश्रय काहीच नाहींसा जाहला त्यामुळें ज्योतिष कुळकर्ण एक वर्ष रुईकर व एक वर्ष आपण याप्रमाणें दहा पाच वर्षें चाललीयावर जगनाथ गोपाळ रुईकर निमे वतन आपलें म्हणों लागला. त्यावरी आमचे कागद आचलोजी काटे याचे घरीं ठेविले होते, त्याचा लेंक सूर्याजी काट्या यासी आपण तगादा केला त्याणें यादोभट खटावकर याजवळ दिल्हे होते. त्याचा रुजू मोझा करून दिल्हा. त्यावरून यादवभट खटावकर याच्या गळा पडलों. त्याणें राघो मेरू व पतो मेरू, जगनाथ गोपाळ याचे चुलते, याजकडे दिल्हे होते. त्याचा मुकाबला करून दिल्हा. त्याजवर जगनाथ गोपाळ रुईकर याणीं कित्येक कार्याचे कागद व येजीतखत होतें तें ठेऊन घेऊन, दोन चार पत्रें आपणास दिल्हीं आणि आपल्यापाशीं आणीक कागद नाहीं म्हणोन पत्र लिहून दिल्हें. त्याचा शोध करिता येजीतखत व कित्येक कागद पाणीयामध्यें भिजवून गोळा करून टाकिले. व साक्ष मोझा, मौजे मजकूरच्या पाटिलानीं सागितला. कागद रुईकरानी दिल्हे त्यामध्यें अबरखानाचे कारकिर्दीचा वतनाचा महजर व खुर्दखत व थोरले कैलासवासी स्वामी याचे कारकिर्दीस भगवत मुद्गल हवालदार, समत कोरेगाव, याची दुमाली मिसल आहे ती पाहून मौजे मजकूरचे पाटील व समाकुल पादर व बलुते यासी आपण पुसिलें जे, मौजे मजकूरचे ज्योतिष कुळकर्णीचें वतन दरोबस्त आमचें. आमच्या वडिलानीं पूर्वी वाद सागणें तो सागितला व दिवाणांतील पत्रें आहेत तीं आमच्या वडिलाचे नांवें आहेत. रुईकरानीं येजीतखत दिल्हे तें तुह्मां समस्ता पांढरीस ठाऊक असतां, आमच्या वतनास रुईकर काय निमित्त जोडिले आहेतः

त्यास त्यांणीं उत्तर दिल्हें जे, तुमचें कोणी गांवीं नव्हतें, यानिमित्त रुईकर वतन चालवीत होते. आता तुह्मी गांवास आला आहा. आह्मीं समस्त श्री कालेश्वराच्या देवळांत बैसोन निवाडा करूं. ह्मणोन पाटील व बलुते यांणीं उत्तर दिल्हें. त्यासी आपण मान्य जाहलों, आणि आपण व जगनाथ गोपाळ श्रीकालेश्वराचे देवळात जाऊन राहिलों. मौजे मजकूरचे पाटील समस्त भाव व मिरासी कुणबी व बलुते मिळोन विचार करून निवाडा करावा. तो न करता रामजी पाटील यांणीं रुईकराची ममता धरून, एकटाच आपण देवळात येऊन उजवे हातीं आपणास धरिले जे, वतनाचा व रुमालाचा खावद हा, आणि डावे हातीं जगन्नाथ गोपाळ यासी धरिलें जे, केसोबा कुळकर्ण करीत होता, त्याचा हा जगंनाथ ह्मणोन आह्मा हरदूजणास बाहेर आणिलें. त्याबळें जगनाथ आपल्यासी वाद सागू लागला. आह्मीं गावीं नव्हतों. तेव्हा केसोबा व जगनाथ व जगनाथाचा बाप व हरकोणी कुळकर्ण चालवीत होते. त्यास आमच्या वतनास समध नाही. ऐसे असता रामजी पाटलानें रुईकराची ममता धरोन आपणासी व्यवहार लाविला. त्याबद्दल आपण राजश्री श्रीनिवास पडित प्रतिनिधी होते त्याजकडेस येऊन, आपलें वर्तमान निवेदन केलें. त्यानीं आपाजी बिन विठोजी मान्ये पाटील मोकदम, कसबे रहिमतपूर, समत कोरेगाव, परगणे मजकूर याजकडे इनसाफ दिल्हा. त्याणी आपले भाऊ व कुळकर्णी व मौजे रुई संमत मजकूर व मौजे नेर व मौजे विसापूर, परगणे खटाव येथील पाटील समागमे घेऊन, मौजे मजकूरास येऊन पाटील व बलुते यासी श्री देवी चिमणाई, मौजे मजकूर इच्या देवालयात घालून त्यासी पुशिलें जे, तुम्हीं कृष्णाजी रघुनाथ व जगनाथ गोपाळ या दोघास देवळात घालून निवाडा काय केला आहे तो सागणें. त्यावरून त्याणीं हकीकत असामीवार लिहून दिल्ही आहे. त्यामध्यें पाटील व बलुते कोणी नव्हते. एकटा रामजी पाटील याणी काढिले, ऐसा निश्चय जाहला. त्यांचें पत्र साक्ष मोइयानिशी आपाजी पाटील याणी करून दिल्हें. तें घेऊन मौजे मजकुरची समाकुळ पाढरी व आपाजी पाटील यांणीं आह्मास घेऊन, पडित मशारनिल्हे किन्हईस आले होते, त्याजकडेस जाऊन वर्तमान निवेदन केलें आणि आपाजी पाटील यांणीं श्रीनिवास देव, मौजे किन्हई याच्या देवळात बैसोन, मौजे मजकूरचे पाटील व बलुते यासी पुशिलें जे, तुम्ही आपलें सत्य स्मरोन सागणें त्यावर मौजे मजकूरचे पाटील व बलुते यांणीं सांगितलें जे, मौजे मजकूरच्या ज्योतिष कुळकर्णास जगनाथ गोपाळ व त्याचे भाऊबंद समस्त रुईकर व केसोबा यासी समध नाहीं. कुली दरोबस्त ज्योतिष कुळकर्ण कृष्णाजी रघुनाथ यांचें असे. रामजी पाटील यांणें रुईकराची ममता धरून लटकी साक्ष दिल्ही. त्यामुळें रामजी पाटील मृत्यु पावला. त्यांचें वतन दुसरीयाच्या हातास गेलें. ऐसी साक्ष देऊन मौजे मजकूरच्या ज्योतिष कुळकर्णाचें वतन आमचें पूर्ववतप्रमाणें करार ऐसें करून, आपगास निवाडपत्र करून दिल्हें. आणि जगनाथ गोपाळ रुईकर मौजे मजकुरीं बळेंच येऊन राहिला होता. त्यास बाहेर घातला. रुईकरास, मौजे मजकूरच्या ज्योतिष कुळकर्णास

समध नाहीं. दरोबस्त वतन आपलें आहे. आपले मूळपुरुष देवजी लक्ष्मण वडील, धाकटा बंधु चितो लक्ष्मण हे दोघे भाऊ. त्यास धाकटा बधु चितो लक्ष्मण, याचा पुत्र विसाजी चितामण. त्याचा पुत्र चितो विश्वनाथ. त्याचे नक्कल जाहलें वडील बधु देवजी लक्ष्मण, त्याचा पुत्र लुमाजी, त्याचा पुत्र रामाजी, त्याचा पुत्र बापोजी, त्याचा पुत्र राघोस्वानद, त्याचा पुत्र आपण कृष्णाजी रघुनाथ येणेंप्रमाणें आपली वशावळ आहे. आपणाजवळ पूर्वील महजर व दुमाले मिसली आहेत. त्या महाराजानी मनास आणून, भोगवटीयासी वतनपत्रें करून देऊन वशपरपरेने चालविलें पाहिजे, ह्मणोन विनति करून, पूर्वील पत्रें आणून दाखविली. बितपशील:—

"हे आजरख्तखान खुदावत खान अल्लीशान अबरखान खुलीद दाम दौलत हू. ताहा महादो त्रिमल हवालदार व महमद अल्लीखान हुद्देदार, मौजे चिमणगाव मालूम दानत कीहाय, सुरुसन इसन्ने अशरीन व अलफ देवजी लक्ष्मण व चितो लक्ष्मण कुळकर्णी व ज्योतिष, मौजे मजकूर, हुजूर दर मुक्काम दौलताबादेस येऊन मालूम केलें जे·—मौजे मजकूरचें कुळकर्ण व ज्योतिष मिरास आपली. आपण चालवीत असता, रामाजी नागनाथ उमराणीकर सोनवडे, ऋग्वेदी लायणी गर्गशा करू लागले जे, सदरहू मिरास आपली आहे. ह्मणून व्यवहार लाविला आहे त्यावर हरदूजण हुजूर हजरत बडे खानसाहेब मायणीस असता त्याचे बदगीस जात होते. वाटेस ह्मणों लागले जे, दिवाण फिर्याद न होणें. मिरासदार बारा बलुते सागतील त्याप्रमाणें वर्तणूक करू. ह्मणून आपले दस्तुरें कागद गोही साक्षीनिशी लिहून दिल्हा. त्यावर कठीणोत्तर लिहून जमा न दिल्हे त्यावर बारा बलुत्यानी रामाजीची मिरास नव्हे, देवजी व चितोजीची मिरास होय, ऐसा महजर लिहून दिल्हा. त्यावर रामाजी मजकूर येथील मनसुबीस आपण कबूल नाहीं. परस्थळास पाठवावे ह्मणून त्यावर स्थळनाइकी कसबे केल्हेस पाठविलें वरथळचे लोकी रवा नेमिला. आपण कलमलदेव यासी सन्मुख रवा काढून जितलों. जयपत्र घेऊन आलों. हजरत साहेब इदापुरी होते. तेथें हुद्देदार व मुकदम व कमीना जाऊन जयपत्र हुजूर केलें. त्यावर साहेबीं खातर मुबारकेस आणून सदरहू आपली मिरास आपले दुमाला करून लिखा मजहामत केला. तश्रीफ देऊन बहुडाविले. वरी आपण सदरहू आपली मिरास खात असता, मागती रामाजी नागनाथ मजकूर वकिलात करून खुर्दखत घेऊन आला जे, मिरास आपले दुमाला करणें म्हणोन त्यावर आपण साहेब खडकीस मुक्काम असता, सन—— मध्यें येऊन अहवाल मालूम केलीयावर आपण रवा काढून पाक निघालों म्हणोन खातरेस आणून कुळकर्ण ज्योतिष आपले दुमाला करून लिखा मजहामत केला. रामाजी मजकूरासही फरमाविलें त्यावरी तो गावाहून गेला सन समानामध्यें मागती नवी जिकीर करून हुजूर लायणी मालूम करून लिखा घेऊन आला व मलिक फरीद हवालदारी घेऊन आला होता. त्यास लिखा घेऊन आला जे, मनसुबी करणें म्हणोन. त्यावर मलीक फरीद मियानें परगणे खटावीं राहून, गावचे हुद्देदार व मुकदम अवघीयासी

हुजूर बोलावून बरहक्क मनसुबी केली. रामाजीस मौजे मजकूरचें कुळकर्ण ज्योतिष निसबत नाहीं ऐसें जाहलें. महजर करून द्यावा, तों मौजे मजकूर मरजास मुकासा जाहला म्हणून खबर आली हवालदार यानी सदरहू आल्या लोकास रजा दिल्ही मरजा मजकूर पुसेगावास आला. रामाजी नागनाथ मागती हरकत पैदा करून त्यापाशीं जाऊन वकिलात करून त्यास आपला लिखा दाखविला. त्यावर कमीनास बोलावू पाठविले. कमीनास तफावत केल्यावर आपणही आपले कागदपत्र दाखविल्यावरी मरजा रामाजी नागनाथास बोलिला जे, याणी रवा काढून जिकिले आहे. तू कायसा खलेल करितोस? त्यावर रामाजी नागनाथ बोलिला जे, त्याणें कुडें करून रवा काढिला आहे. आता आपणासही रवा देणे म्हणोन, शेरणी कबूल करून मागती परथळास पाठवणे, मनसुबी करून देतील म्हणोन त्याचा कागद आणिला. त्यावर आपण थळास कबूल जाहलों. त्यावरी मागती मरजापाशी जाऊन पाढरीवर रवा देणे म्हणोन कागद आणिला त्यावर समस्त समानाईक म्हणों लागले जे, तुमची मिरास नव्हे, देवजीची व चितोजीची ही मिरास आहे, ऐसे आपल्या वडिलानी सागितले आहे म्हणोन बोलत असता ना ऐकत. मग हरदूजणाच्या तकरिरा घेऊन रामाजी नागनाथाचे बिरादर गोदो नागनाथ याचा रोज अलफतास हात धुतला, नखे काढली खलिती घालून स्वस्तिश्री शके १५४० काळयुक्तनाम सवत्सरे, कार्तिक वद्य दशमी, रविवार, घटिका पाच, स्थळ काळेश्वर सन्मुख देवद्वारीं घटिका ९ मधे तेल व लोणी, मौजे नेर, परगणे खटावीहून लोणी ८८१। व तेल ४॥९ आणून देवद्वारीं तावितें आपण सावली केली त्याणे रवा काढिला खलकास दाखविला. हातास खलिती घालून ठेविलेवरी छ २४ जिल्कादीं हात पाहिला. मधील बोटास फोड आला होता. रवा लागला व मरजा मायणीस असता, तेथें जाऊन हात दाखविला. तो खोटा जाहला. त्यावरून मरजा याणे तफारी फरमाऊन अदबखाना घालून कमीन रवा जितलों म्हणोन तश्रीफ देऊन बहुडाविलें. कुळकर्ण व ज्योतिष दुमाला केलें. दरी व खत सालगुदस्ता सन इहिदेमध्ये रामाजी नागनाथ हुजूर येऊन व गवसिलत करून त्याकडून साहेबास लायणी मालुमात करून, लिखा महालास घेऊन आला जे, कुळकर्ण ज्योतिष रामाजीचे दुमाला करू म्हणोन. त्यावर आपण साहेबाचे बदगीस येऊन सदरहू अहवाल मालूम केला. त्यावर साहेबा महंमदअल्ली यासी हुद्दा देऊन, मौजे मजकुरास पाठविता साहेबीं रजा दिल्ही जे, मौजे मजकूरचें कुळकर्ण ज्योतिष कोणाची मिरास आहे, ते खुद्द पुरशीस करून लिहून पाठविणें म्हणोन. त्यावरून त्याणे जाऊन पुरशीस घेता कमीनाची मिरास सही ऐश्या गोह्या दिल्याप्रमाणें साहेबाच्या बंदगीस अर्जी हुद्देदार व मोकदमी लिहून दिल्ही आहे. ऐसें असता लायणी खलेल करितात. साहेबी नजर अर्जायत फर्मावून आपली मिरास आपले दुमाला करावी. रजा देणें म्हणून. तरी बराये मालुमात व कागदपत्र व महजर सदरहू निवाडा जाहलीयाचे खातर मुबारिकेस आणून याची मिरास कुळकर्ण ज्योतिष दुमा-

ला केलें असे. दुमाला करणें. रामाजी नागनाथ मजकूर दरीबाब हिल्ला हरकत करील, तरी हल्ली खुद्द असे, ऐसा जामीन घेऊन सोडणें. याचा हक्क लाजीमा सालाबाद महत् कदीम जें काहीं चाललें असेल, तें याचे दुमाला करणें तालिक लिहोन अस्सल परतोन देणें. छ १५ जमादिलावल मुक्काम नजीक दौलताबाद. सदरहू पत्रावरी मोर्तब चौकोनी व शिक्का चौफुली अक्षर आरबी असे.—पत्र. १ "

"आज दिवाण ठाणें समत कोरेगाव, परगणे वाई ताहा मोकदमानीं व शेटे महाजन व समस्त रयानीं, मौजे चिमणगाव, संमत मजकूर सुरुसन समान सबैन अलफ, राज्याभिषेक शके ४ श्री राजा शिव छत्रपती, पिंगलनाम सवत्सरे, ते समयी विसाजी चितामण ज्योतिषी व कुळकर्णी, मौजे मजकूर, हुजूर येऊन मालूम केलें जे, मौजे मजकूरचें ज्योतिष व कुळकर्ण आपलें. ऐसीयास मध्यें दयानतराव फितरत करीत होते. याकरिता आपण परागदा होऊन, परमुलखास दाहा पधरा वर्षे गेलो होतों. ऐसीयास आतां कुल मुलूख राजश्री—छत्रपतीस अर्जानी जाहला याकरिता आपण राजश्री पतोपत वाकनिवीस यापाशी जाऊन उभे राहिलों तेहीं राजश्री येसाजी मल्हार सुभेदार यांसी कागद दिल्हा की, विसाजी चितामण याचें ज्योतिष कुळकर्ण चिमणगावीचें खरें. मध्यें दयानतराव लायणी जिकीर करीत होता याउपरी याचें ज्योतिष कुळकर्ण याचे दुमाला करणें ह्मणून कागद दिल्हा. त्याप्रमाणे येसाजी मल्हार सुभेदार याणी साहेबास कागद दिल्हा आहे, तो मनास आणून आपणास मिसल दिल्ही पाहिजे ह्मणून मालूम केलें. बराये मालुमांत मनास आणून तुह्मांस मिसल दिल्ही असे. वृत्तीचा कथला मनास आणिता कारकीर्द दर कारकीर्द, परंपरा पिढी दरपिढी, विसाजी चितामण याचें ज्योतिष कुळकर्ण खरें. मधें लायणीचे रामाजी नागनाथ व गोदो नागनाथ नवी जिकीर करून मिरासी आपली ह्मणोन उभे राहिले होते. ऐसीयासी याचे पेशजी निवाडे मनास आणिता दोन रवे जाहले. त्यास आधी एक रवा देवो लक्ष्मण व चितो लक्ष्मण यजुर्वेदी यासी गोतें रवा दिल्हा. स्थळ कसबे केल्हें, प्रात पन्हाळा तेथें रवा दिल्हा. तेव्हा देवो लक्ष्मण, विसाजी चिंतामणचा चुलता, याणें रवा काढिला. रामाजी नागनाथ सावली केली. रवा खरा उतरला. जयपत्र घेऊन गावास आला. याजउपरी मागुती रामाजी नागनाथ मालिक मर्जा मुकासी कारकीर्द अबरखान यापाशी उभा राहून हकिकत सांगितली कीं, चिमणगाव येथील कुळकर्ण ज्योतिष आपलें. देवो लक्ष्मण व चिंतो लक्ष्मण याणे कुडें करून रवा काढिला, आणि मिरास खातात. तरी आपणास पांढरीवर रवा दिल्हा पाहिजे. ह्मणोन अर्ज करून हुकमी खुर्दखत आणिलें की, पाढरीवरी रवा करणें. ह्मणोन खुर्दखत आणून रवा नेमिला. तेव्हां हुद्देदार व मोकदम व समस्त रयत, बारा बलुते ऐसे बैसोन रामाजीस बोलिले की, तू रवा काढू नको तुझी मिरास नव्हे. ते

१ टीप.—मूळ अस्सल कागदात सबैनचे जागी आबैन चुकलेले आहे.

दिवशींचा रवा मोडिला. तेव्हां मागती रामाजी नागनाथ, मोकाशी यापाशीं उभा राहून ताजी मिसली आणिली कीं, पांढरीवर रवा देणें. तेव्हा हुद्देदार व निसिंदे समस्त गोत श्री काळेश्वर देव तेथें बैसोन रवा नेमिला रामाजी नागनाथें रवा काढिला. देवो लक्ष्मण याणें सावली धरिली. तीन दिवस जाहले खलती काढिता रामाजी नागनाथ सोनवडे, उमराणीकर ऋग्वेदी खोटा जाहला. रवा काढिला तो गोदो नागनाथ, रामाजीचा भाऊ यानें काढिला. तो खोटा जाहला. ऐसे दोन रवे जाहले त्यासी दोन रवीयास खोटे जाहले. यावरून मिरासी देवो लक्ष्मण व चितो लक्ष्मण याची खरी जाहली. याजउपरी ते आपली मिरास खात असतां, विसाजी चितामण, चितो लक्ष्मणाचे लेंक, ज्योतिष कुळकर्ण करीत असता नागो राम, रामाजी नागनाथाचा लेंक याणें द्यानतराव देशपाडे परगणे वाई यासी, निमे तक्षीम देऊं करून, हुकमी फरमान दिवाणाचा आणून, बळेंच ज्योतिष कुळकर्ण खाऊ लागला आणि विसाजीवर दिवाणाचा हक्क फर्माविला त्यावरून विसाजी चितामण परागदा जाहला. यावरी कुल मुलूख राजश्री यासी अर्जानी जाहलायावरी विसाजी चितामण हुजूर येऊन कुल हकिकत सांगितली याचे निवाडे मनास आणता मिरास विसाजी चितामणाची खरी. हें राजश्री पतोपंत वाकनिवीस याही मनास आणून, येसाजी मल्हार सुभेदार यासी सनद दिल्ही. तीहीं महालास सनद पाठविली महालीं याचे मिरासीचा कथला मनास आणिता, मिरासदार विसाजी चिंतामण होय ऐसें समजोन मौजे मजकुरास पाठविला असे. बरहुकूम सनदसुद्धा पाठविला असे. याच्या हातें कुळकर्णाचें व ज्योतिषाचें काम घेत जाणें व लावणी सचणी याच्या हातें घेत जाणें व ज्योतिष कुळकर्ण याचे हातें घेणे. कोणी उगीच नवी जिकीर करील त्यास हुजूर पाठवून देणें. याची मिरास खरी आहे. पेशजी अबरखानाचे कारकिर्दीचे महजर व खुर्दखत व गावगन्नाचे मोकदमाच्या गोह्या व गोतमुखे निवाडे मनास आणून याची मिरास खरी ऐसें जाहले. यावरी याचे दुमाले केली असे. हमशाई गोतास विचारिलें. त्यास गोत बोलिले जे, मिरास विसाजी चितामणाची खरी, परतु द्यानतरायानें दिवाणबळें यासी परागंदा केलें. ऐसें मनास आणिलें यावरी याचे दुमाले कुळकर्ण ज्योतिष केलें असे. एकदर लेंकराचे लेंकरी, दुसरीयासी समध नाही याउपरी जो कोणी नवी जिकीर करील, तो दिवाणाचा गुन्हेगार व गोताचा खोटा ऐसें आहे. तरी हिल्ला कसूर याची मिरास याचे दुमाले करणें. आणि जो कोणी मध्यें उगाच उभा राहील त्यास हुजूर पाठवून देणें. ऊजूर न करणें. रवाना छ २४ जमादिलाखर निशाण मोर्तबसुद. मोर्तब व शिक्कयामध्यें नाव बाळबोध अक्षरें भगवंत मुद्गल नाव असे.—पत्र १.

कारिना निवाडपत्र मौजे चिमणगाव, समत कोरेगाव, परगणे वाई, मुक्काम मोजे किन्हई स्थळ देवालय श्रीनिवासेश्वर हजीर मजालस बितपशीलः—

पाटील, चौगुले.	बलुते.
१ बहिरजी बिन तुळाजी, पाटील.	१ मानाजी बिन खंडोजी, सुतार व लोहार

१ यमाजी शिवदेव चावरे अजाहात भगवत कोनेर.
१ आपाजी बिन चिलोजी
१ संताजी बिन खानाजी.
१ मानाजी बिन महादजी.
१ सटवाजी बिन सोनजी.

६

किता.

१ अवजी बिन रघोजी सोनार
१ शेटी बिन हणगोजी क्षेत्रा माळी.

२

१ जोगोजी बिन बनाजी परीट.
१ राणोजी बिन सोनजी न्हावी.
१ शकराजी बिन काळोजी कुंभार.
२ गुरव.
१ आपाजी बिन काळोजी.
१ सुकदेव बिन विरापा.

२

१ भाट धोंडजी बिन केरोजी.
१ भवानी बिन खडोजी चाभार.
५ महार
१ निबनाक बिन जखनाक म्हेत्र्या.
१ महादनाक बिन लखनाक.
१ फकीरनाक बिन तुकनाक.
१ यमनाक बिन मलनाक.
१ नागनाक बिन संतनाक.

५

१३

एकूण असाम्या एकवीस सुरुसन सीत आर्बेन मया अलफ, शके १६६८ क्षयनाम सवत्सरे, वैशाख वद्य त्रयोदशी सौम्यवासर तद्दिनी लिहून दिल्हें पत्र ऐसें जेः—श्रीमंत राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधी याणी आपाजी बिन विठोजी पाटील, कसबे रहिमतपूर व त्याचे भाऊ सताजी बिन तुळाजी पाटील व जयतोजी बिन राणोजी पाटील व शहाजी बिन मलजी पाटील यासी हुजूर किन्हईच्या मुक्कामीं बोलावून आणून आज्ञा केली जे. मौजे चिमणगाव येथील कुळकर्ण व ज्योतिषाचा कजीया राजश्री कृष्णाजी रघुनाथ व जगंनाथ गोपाळ याचा आहे. त्यास चिमणगावास जाऊन पांढरीच्या मोइयानें मनास आणून निवाडा करणें, म्हणोन आज्ञा केली. त्याजवरून मौजे मजकुरी येऊन भोवर (शेजारचे) गावचे पाटील मेळवून श्री चिमणाईच्या देवळात बैसोन, उभयता वादीयाचा कारिना मनास आणून, हरदो वादे व आह्मांस, मौजे किन्हई येथें आणोन, श्रीनिवासेश्वर याचे देवळांत चिमणगावकरी पाटील व बलुते घेऊन इमानपूर्वक उभयताचा कारिना पुसिला. तरी कृष्णाजी रघुनाथ याचे वडील विसो चिंतामण, मौजे मजकूरचें कुळकर्ण व ज्योतिष करीत होते. ते समयीं रामाजी नागनाथ सोनवडे, उमराणीकर याचा पुत्र नागोजीराम राजश्री यानत-

राव याची साक्ष करून कुळकर्णास मुजाहीम जाहला. ते समयीं विसो चिंतामण रुईस जाऊन जगंनाथ गोपाळ याच्या वडिलास बोलिला जे, राजश्री बानतराव याचे बळें नागो राम वतनास मुजाहीम जाहला आहे. त्यास वाद सागावा लागतो. तुम्हीं भाऊ आहांत. तरी तुम्हीं व आम्हीं विजापुरास जाऊ ह्मणून बोलिला त्यास रुईकरानीं उत्तर दिल्हें जें, आपणांस वादास यावयासी अनकूळ पडत नाहीं. तुम्हीं वाद सांगणें. चिमणगांवाचें वतन साधलें तुमचें, गेलें तुमचें, आम्हास समध नाहीं. ऐसें उत्तर दिल्हें, आणि रुईकरांनीं येजीतखत विसो चिंतामण यासी लिहून दिल्हें. तें घेऊन विसो चिंतामण वादास जाऊन, वाद सागून, वतन साधून, गांवावरी येऊन वतन अनभवून होता तो पुढें मृत्यु पावला त्याचा लेक चिंतो विश्वनाथ, राजश्री रामचद्र निळकठ अमात्य याजपाशीं पन्हाळीयावरी होता. तो गावावर येऊन कुळकर्ण व ज्योतिष करीत होता, त्याच्या शरिरास व्यथा जाहली, ह्मणोन तुळाजी पाटील मोकदम व जखनाक महार ह्मेत्रा यानीं रेडीयावरी घालून, त्याची आई सईबाई ऐसीं दोघें खटावकर भट मावळे याचें घरीं पावती केली तेथें गेलीयावरी एका दिवसांत दोघेही मृत्यु पावले. त्याचे भाऊ कृष्णाजीपताचे बाप राघोस्वानद व त्याचे भाऊ कोणीच गांवावर नव्हते. चिंतोबा याकडे वनताचे महजर व दुमाले मिसल व रुईकराचे येजीतखत व पांढरीचे कागद ऐसे सारे रुमाल अचळोजी काट्या व सूर्याजी काट्या बापलेंक वर्धनगडीं होते त्याचे घरीं ठेविले होते. ते चितोबा मेलीयावरी अंचळोजी व सूर्याजी काटे यांणीं आह्मांस एक दोन वेळा सागितलें जे, कागद आपले घरी आहेत. ते घेऊन जाणें, ह्मणोन सागितलें होतें. परंतु धामधुमीच्या प्रसंगीं जतन होणार नाहीं, यामुळें आपण ते कागद आणिले नाही. त्यावरी त्याणे कागदाची पेटारीं विसो चिंतामणाचे मेहुणे खटावकर भट याजपाशीं ठेवावयासी दिल्हीं. त्याउपरी गोपाळ मेरु रुईकर यानीं वर्धनगडाची फडणिशी करून घेतली तेथें फडणिशी करीत असता, विसो चितामणाचे गावांत कोणी नाहीं ऐसें जाणून ते कुळकर्ण करू लागले. त्याउपरी विसाजी चितामणीकडील कागदाचा शोध करू लागले. त्यास खटावकर भटाचे घरी कागद होते, ते उमगू लागले. उमगल्यावरी रुईकरानीं खटावकर भटाशी शरीरसमध केले. मेरुपताची लेक महादेव भटास दिल्ही. व पतोपताची लेक त्याच्याच घरात देऊन, सोयरिकीची ममता लाऊन, कागद खटावकर यादोभट याजपासून घेऊन, कुळकर्ण करू लागले पचवीस तीस वर्षे कुळकर्ण केलें. त्यावरी राघोस्वानद यांणीं आपले दोघे पुत्र व भाऊ घेऊन, मौजे मजकुरास येऊन, कुळकर्ण करू लागले. तेव्हा एकसाल रुईकर व एकसाल हे, ऐसें केलें. कागद खटावकराचे घरींहून रुईकरांनीं आणिले त्यासाठीं व घरासाठीं उभयता वतनासाठीं कजीया करूं लागले. तेव्हा हरदूजण आह्माजवळ येऊन सागितलें जे, तुह्मी व पांढर श्रीकाळोबाच्या देवळांत शिरोन सत्यपूर्वक जें सांगाल, त्याप्रमाणें हरदूजण वर्तों. ऐसे राजीनामे लिहून दिल्हे. यावरी आह्मीं चौघेजण भाऊ देवळास जाऊन हरदूजणास देवळांत घालून रामजी

पाटील यासी चौघांनी सांगितलें जे, तू वडील आहेस देवळांत जाऊन कुळकर्णी व ज्योतिषी रूमालाचा धनी जो असेल तो हाती धरोन बाहेर आणणे ह्मणोन सांगितलें यावरी रामजी पाटील देवळात जाऊन कृष्णाजी रघुनाथ वतनाचा रुमालाचा धनी ह्मणोन उजवे हातीं धरिला व जगंनाथ केशवाच्या घरातील ह्मणोन डावे हातीं धरिला. ऐसें दोघेजण बाहेर काढिले. त्यावरी कृष्णाजी रघुनाथ याच्या वडिलाचे वतनाचे कागद थोडेसे कृष्णाजी रघुनाथ यासीं दिल्हे. बरकड कागद पत्र आपणापाशीं नाहीत ह्मणोन रुईकर जगनाथ गोपाळ यानें कागद लिहून दिल्हा जे, पुरातन कागदापैकीं आपणाकडे कागद निघाला तर आपण खोटे, वतनास समंध नाहीं.ऐसा कागद लिहून देऊन रुमाल देवळातच तेच प्रसगीं कृष्णाजी रघुनाथ याचे स्वाधीन केला. त्याजवरी रामजी पाटील यांणीं केशवाचा इलाखा मौजे मजकूरच्या वतनास काहींच नसता, त्यास कुळकर्णाचा दाखला देऊन, जगनाथ याच्या घरातील ह्मणोन हाती धरोन बाहेर काढिला. खोट्यास खरें केले. याजकरिता रामजी पाटीलास क्रिया लागून वतनास तुटला. कृष्णाजी रघुनाथ यासी जगनाथ गोपाळ व त्याचे भाऊ घराचा कजीया करूं लागले. याजकरिता हरदूजण श्रीमत राजश्री पत प्रतिनिधीसाहेबाजवळ आले त्यासी यांचें वर्तमान आह्मास वडिली सागितलें आहे जे, विसो चिंतामण याचे वडील देवो लक्ष्मण व चितो लक्ष्मण ज्योतिष कुळकर्ण, मौजे मजकूर यांचें घर मौजे मजकुरी आहे ती जागा आह्मी गोतास दाखविली आहे. रुईकराचे घर व केशवाचें घर मौजे मजकुरीं नाहीं ऐसें आमचे वडिल सांगत आले. नागो राम राजश्री ब्यानतराव याचे कारकिर्दीस वादास उभा राहिला होता. यापूर्वी रुईकर मौजे मजकुरी येऊन वसूल करीत होते. ऐसे वर्तमान व येजीतखत रुईकरांनीं दिल्हें. त्यापासून रुईकर मौजे मजकूरच्या वतनास तुटले आहेत ऐसे आमचे वडील आह्मांस सांगत आले आहेत. रुईकरानी येजीतखत दिल्हें होतें, तें कागदाचे रुमाल खटावकर भटाचे घरीं होते त्यात होते ते रुईकरांनीं चोरून ठेविलें आहेत ह्मणोन वडिलीं सांगितलें आहे. सत्य स्मरोन सांगितलें असे. चिमणगावकर याणी मौजे मजकूरचें ज्योतिष कुळकर्णाची वृत्ति अनभवावी. येणेंप्रमाणें आपणास करिना दाखल आहे. याखेरीज आपणास काही वडिलानी सागितलें नाहीं. लिहून दिल्हा करिना सही. तेरीख २७ माहे रबिलाखर. ओळी सुमार अस्सल पत्रामध्यें एकशें शहात्तर १७६ ओळी असेत बदस्तुर भगवंत शामराज कुळकर्णी कसबे रहिमतपूर १.

येणेंप्रमाणें तीन पत्रें आणून दाखविलीं. ती मनास आणून मौजे मजकूरच्या ज्योतिष कुळकर्णाचें पुरातन वतन तुमचें, पूर्वी तुमचे वडील देवो लक्ष्मण व चिंतो लक्ष्मण वतन अनभवीत असतां, रामाजी नागनाथ व गोदो नागनाथ सोनवडे, उमराणीकर ऋग्वेदी हे तुमच्या वतनास मुजाहीम जाहले होते. ते समयीं तुमचे वडील देवो लक्ष्मण यांणी दिव्य करोन खरे जाहले. गोदो नागनाथ याणें दिव्य केलें. तो खोटा जाहला तो करिना अंबरखान यांणीं मनास आणून तुमच्या वडिलांस वतनाचें दुमालेपत्र करून दिल्हें आहे. त्याउपरी रामाजी

नागनाथ याचा पुत्र नागो राम मागती तुमच्या वतनास मुजाहीम जाहला होता. तो करिना पूर्वी महाराज राजश्री थोरले कैलासवासी याचे कारकिर्दीस राजश्री पंताजीपंत वाकनिवीस यांणीं मनास आणून, तुमचे वडील चिंतो लक्ष्मण याचा पुत्र विसाजी चिंतामण यास वतनाचें दुमालेपत्र करून दिल्हें. त्यांतून भगवंत मुद्गल हवालदार, कोरेगाव संमतेस होते, त्याचें पत्र राज्याभिषेक शके ४ पिंगलनाम सवत्सरे, सन समान सबैन मया अलफ छ २४ जमादिलाखरचें तुह्मांपाशीं आहे. तेंही मनास आणून वतन मौजे मजकूरचें कुळकर्ण ज्योतिषाचें पुरातन वतन तुमचें रामजी नागनाथ व गोदो नागनाथ पूर्वीचे खोटे जाहले आहेत. त्याचा वंशपरपरेस अर्थाअर्थीं तुमचे वतनास समध नाहीं साप्रत तुह्माशीं रुईकर जगनाथ गोपाळ व त्याचे भाऊ भाडत होते जें, निमें वतन आपलें त्यास आपाजी बिन विठोजी पाटील माने, पाटील कसबे रहिमतपूर समत कोरेगाव, परगणे मजकूर व त्याचा भाऊ व कुळकर्णी याजवरी राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधी होते. त्यानीं मनसुबी टाकिली त्यावरून त्यांनीं मौजे मजकूरचे पाटील व बलुते यासी श्रीच्या देवालयात घालून करिना पुसता, रामाजी नागनाथाचा पुत्र, नागो राम, द्यानतराव दिवाण, विजापूर याची साक्ष करून तुमच्या वतनास मुजाहीम जाहला होता. ते समयी विसो चितामण रुईकरास वाद सागावयासी बोलावीत होता. त्यानें अमान्य करून चिमणगावच्या वतनास आपणास तालुका नाहीं, साधलें,हरपलें तुमचें ह्मणोन तुमचे वडील विसो चिंतामण यासी येजीतखत लिहून दिलें. तें तुमच्या कागदांतून रुईकरानीं फाडिलें. त्यास मौजे मजकूरच्या ज्योतिष कुळकर्णास समध नाहीं. ऐसीं साक्ष देऊन तुह्मांस साक्षपत्र लिहून दिल्हें आहे. तेंही मनास आणून मौजे मजकूरचे ज्योतिष कुळकर्ण दरोबस्त वतन पुरातन तुमचें, दुसरीयासी समध नाहीं ऐसें जाणोन स्वामी तुह्मांवर कृपाळु होऊन वतनपत्र तुह्मास करून दिल्हें असे. तरी तुह्मीं मौजे मजकूरचें ज्योतिष कुळकर्ण पूर्ववत्प्रमाणें व सदरहू वतनास हक्क व इनाम, कानूकायदे व कुळकर्णाचा मुशाहिरा पुरातन शिरस्ता असेल त्याप्रमाणें घेऊन दडक प्रमाणें वतनाची सेवा करून, तुह्मी व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरपरेनें मौजे मजकूरचें ज्योतिष कुळकर्ण दरोबस्त वतन अनभवून सुखरूप राहणें. या वतनसबधे तुमचे माथा शेरणी, स्वराज्य व मोगलाई एकूण दुतर्फा देखील सरदेशमुख व साहोत्रा बेरीज रुपये २०० दोनशें करार करून हुजूर वसूल घेतला असे. पत्रातील मिती राज्याभिषेक शके ७४ प्रभवनाम संवत्सरे, आषाढ बहुल पचमी, सौम्यवासर, सुरुसन समान आर्बैन मया अलफ. पत्रें चिटाणिशी.

१ कृष्णाजी रघुनाथ याचे नावें पत्र.

१ मोकदम, मौजे चिमणगाव.

१ देशमुख व देशपांडे, परगणे वाई.

१ देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी (यांस) पत्र, परगणे वाई.

४६ कैफियत.

हकिकत हाडे देशमुख पहिली कदीम देशमुखी शिंदे उर्फ नाइकसे, मौजे कढर्धे ह्मीची होती. ते समयीं कढर्धे गांव इसाफत देशमुखीचा होता. त्यावरी हांडे याची देशमुखी तरवारीच्या बळाची जाहली देवराव हांडा यानें मौजे नलवणें, परगणे बेल्हें, येथें कोट बांधोन मवासगिरी करूं लागला. त्याचे कारकिर्दी देशमुखीही तेथूनच करूं लागला. शहर जुन्नरामध्यें हांडे याचीं घरें नव्हतीं. अलीकडे घरें जाहली. पिपळापाशीं हाडे यांच्या घरानजीक विहीर आहे, ते शिदे देशमुखी करीत होते त्याचे आमदानीची. त्याच्या वडिलांनीं बाधली आहे. किल्ले शिवनेरीस मलिकअबर किल्लेदार होता. ते समयीं शहाजहा योगी होऊन जुन्नरास आले. तेव्हा मलिकअंबर यांणीं बहुत मुदारद केली. शहाजहानीं शहराबाहेर राहून महाल बाधला त्यावरी फिरोन जुन्नरहून समजून चालिले. तेव्हां देवराऊ हांडे यानीं शहाजहाची लष्करची पछाडी मारली. ह्मणोन हाडे मजकुरावरी इतराजी करून मलिकअंबरास लिहून पाठविलें कीं, हाडे याचें पारपत्य जला वतन करणें. त्यावरून चौदाशें इरसाल पाठवून राडापोरें कापून काढून, हाडें बाहेर काढिली. पुरुषाचा जिन्नस नाव तितके कापिले. देशमुखीचें वतन जप्त केलें सिद्धी याकुत हपशी मलकाचा बंदा होता. त्याणें देशमुखीचा अमल पसतीस वर्षें केला. दोघी बायका हाडे याच्या गरोदर होत्या त्या पळोन गेल्या होत्या. त्या प्रसूत होऊन पुत्र जाहले. तेव्हा मोत्याजी सोनार, हुनरबंद दौलताबादेस निजामशहा पातशहापाशीं कारागीर होता त्याजवर पातशहाची बहुत कृपा होती. त्याचे मार्फतीनें पातशहाची मुलाजकत केली. दोन घोडे नजर केले. त्याजवरी जडावाचें जीन करून दिल्हें. त्याजवरी खुश न जाहले. मग शर्त्रेज केली. त्याजवरी मेहेरबान होऊन प्रसन्न जाहले कीं माग, तेव्हा सोनार मजकूरें अर्ज केला. देशमुखीचें वतन मोकळें करावें. मेहेरबान होऊन बहालीची सनद करून दिल्ही. सनदेमध्यें येशवतराव जाखोजी आहे. त्याचे पूर्वील नांव हरजी जाखोजी होतें त्यांणीं पादशहास भेटोन वतन सोडविलें यशवत जाहले ह्मणोन यशवंतराव जाखोजी नाव ठेविलें शिंदे देशमुखी करीत होते त्यावरी हाडे जाहले. त्यास शियापैकीं एक देशमुखीसाठीं मुसलमानही झाला आहे त्याचा वश हल्ली आहे हांडेयाची देशमुखी बहाल मोत्याजी सोनारानें अर्ज करून व आपले पदरचा खर्चवेच करून सोडविली. ह्मणोन देशमुख उपकारी होऊन पधरा गांव मातबर आपले देशमुखीपैकीं सोनार मजकुरास दिल्हें. सदरहू हकिकत जबानी मोत्याजी मजकूराचा पणतू त्रिबकजी सोनार. शके १६८० बहुधान्यनाम संवत्सरे, सन ११६८.

---

४७ श्री

यादी बाबुराव सखोजी, उपनाम पानसी, गोत्र मुद्गल, सूत्र अश्वलायन, ज्योतिषी, कुळकर्णी, मौजे तोंडल व मौजे मोली व मौजे वाठार बुद्रुक व मोजे गुळंब, परग

शिरवळ, प्रांत मावळे व मौजे लोणी व मौजे तोंडल, तर्फ निरथडी, प्रांत पुणें यांणीं हुजूर शाहूनगर नजीक किले सातारा येथील मुक्कामीं स्वामीसनिध येऊन विनंति केली कीं, आपले आजे गोविंदभट बहुत थोर विद्वान जाणून विजापुरच्या पातशाहांनीं मेहेरबान होऊन मौजे केळवडे, तर्फ खेडेबारें, परगणे मजकूर येथे जमीन चावर १ एक वंशपरंपरेनें वरोबस्त कुलबाब, कुलकानू इनाम देऊन, पातशाई परवाने भोगवटीयास करून दिल्हे. त्याप्रमाणें कैलासवासी थोरले महाराज याणीं मनास आणून पत्रें करून दिल्हीं. तेणेंप्रमाणें जमीन दुमाला करून घेऊन, मौजे मजकुरी घरवाडा बाधोन राहून जमिनीचा अनुभव केला. त्यावरी राज्यक्रांत जाहलीयामुळें मौजे मजकूर उध्वस्त जाला.तेव्हा तेथून निघोन आपले आजे आपले वृत्तीचे गाव देहाय मजकूर ज्योतिष कुळकर्णी परगणे शिरवळ पैकीं आहेत, तेथें काहीं दिवस राहिले. त्याउपरी धामधूम बहुत जाली तेथेंही टिकाव न होय तेव्हा विदेशास जाऊन पांच सात वर्षें कालक्षेप केला. तो त्याचा वृद्धापकाळ. पासष्ट वर्षें उमरीस जालीं. आजारी पडोन त्याचा काळ जाला. तेव्हा त्याचे पुत्र आपले बाप सखोपत याची उमर दहा वर्षांची होती. तेही विदेशी राहून आपली पिशाच्य लिपेची विद्या संपादून पोट भरून होते. त्याउपरी वृत्तीचे गाव होते त्याची वसाहत जाली. वतनावरी येऊन वनत अनभवूं लागले. त्याउपरी पांच सात वर्षांनी आपले बाप सखोपत यांचेंही देहावसान जालें. त्यांचें पोटीं आपण अडीच वर्षांचे होतों. तेव्हां आपली मातुश्री होती. आपण नेणते अज्ञान वृत्तीवर राहिलीयास माऊबदास असाह्य. हरकोणी दगा करील, ऐसें मातुश्रीच्या चित्तांत येऊन दादभट मगळवेडेकर आप्त होते. त्यांचा आश्रय करून त्याच्या गांवास आपल्यास नेऊन, दहा वर्षे राहून लेखनविद्या करविली. आपण प्रबुद्ध जालों. मग आपल्यास घेऊन वतनावर आली. ते समयीं आपला काळ बहुत अनुत्पन्न. वतनांत माहित नाहीं. इनाम घरबाडा कोठें काय हें न कळे? आपले आजे गोविदभट याणी मौजे केळवडें येथें इनाम एक चावर घेऊन पातशहाचे परवाने व कैलासवासी थोरले महाराज यांचीं पत्रें घेतलीं होतीं, तींही, आपले बाप सखोपंत याचे वेळेस राज्यक्रातीमध्यें घरवाडा दग्ध जाला, तेथें दग्ध जालीं होतीं. आपल्यास आपअवसान कोठे कांहीं लागेना. त्या दिवसांत आपलें वय थोडें व काळही कठीण होता. त्याउपरी प्रौढ जालीयावरी शोध करून देशमुख, देशपांडे तर्फ मजकूर व पाटील, कुळकर्णी व समाकुळ पांढर याचे मायेंत शिरोन तहकिकांत करितां ते बोलिले कीं, तुमचे आजे गोविंदभट याणीं मौजे मजकुरीं एक चावर जमीन इनाम साधन करून विजापूरच्या पातशहाचीं व कैलासवासी थोरले महाराज यांचीं सदरहू जमिनीचीं इनामपत्रें भोगवटीयास घेऊन चतुःसिमापूर्वक जमीन दुमाला करून घेऊन व घरवाडा बांधोन जमिनीचा अनुभव घेतला. त्याउपरी कांहीं दिवसांनीं राजबिराजीमुळें गोविदभट तुमजे आजे येथून वतनाच्या गावावरी गेलें. कांहीं दिवस राजबिराजीमुळें गांव पडिला. वसाहत नाहीं. त्याउपरी वसाहत जाली. तों तुमचे वडील

परागंदा होऊन फिरोन वतनावरी येऊन मृत्यु पावले. व तुमचे बापही काही दिवसांनीं मृत्यु पावले तेव्हां तुह्मी आज्ञान होता. कागदपत्रही तुमच्या वडिलांपाशीं होते. ते घर दग्ध जालें, तेथें दग्ध जाले यापूर्वी तुह्मीं मौजे मजकुरास येऊन जमिनीची तहकीकात करून आपली आपणांकडे करून घ्यावी ते घेतली नाही. परंतु तुमची एक चावर जमीन इनाम खरी. आह्मी वडिलापासून ऐकत आलों. त्यापैकीं कांहीं जमीन दुसरे इनामदाराखालीं गुंतली व कांहीं गांवकीखालीं पडिली आहे. तरी तुह्मीं याउपर हुजूर जाहीर करून सदरहू जमिनीच्या ताज्या सनदा जाल्या, तरी तुमच्या इनामापैकी दुसरे इनामदाराखाली व गावकीखालीं जमीन गुंतली आहे तिचा मुबदला मौजे मजकूरपैकी देऊ ह्मणून बोलिले आहेत. ऐसीयास महाराजांनीं कृपाळु होऊन आपले आजे गोविंदभट यास मौजे मजकुरी एक चावर जमीन इनाम आहे, त्याप्रमाणें दाखला भोगवटा मनास आणून पत्रें करून देऊन, वंशपरपरेनें इनाम चालविला पाहिजे ह्मणून विदित केले. त्यावरून मनास आणिता याचें आजे गोविंदभट यास विजापूरच्या पातशहांनीं मौजे मजकुरीं सदरहू एक चावर जमीन इनाम देऊन परवाने करून दिल्हे, व कैलासवासी थोरले महाराज यांणींही पत्रें करून देऊन जमीन दुमाला करून दिली. त्याप्रमाणें यांणीं मौजे मजकूरी घरवाडा बाधून जमिनीचा अनुभव केला. त्याउपर राज्यक्रांतीमुळें हे परागदा होऊन, कागदपत्र होते ते घर दग्ध जालें त्यामध्यें दग्ध झाले. त्याचा दाखला तर्फ मजकूरचे देशमुख व देशपाडे, मौजे मजकूरचे मोकदम व समाकूळ पांढर यांणीं मौजे मजकुरीं यास इनाम पुरातन आहे ऐसी साक्ष पुरविली. याचा दाखला मनास आणिता, याची एक चावर जमीन मौजे मजकुरची पुरातन खरी ऐसें जाणून, त्याजवरी कृपाळु होऊन, यासी व याचे पुत्रपौत्रादि वशपरंपरनें मौजे मजकूरपैकी एक चावर एकूण बिघे एकशेंवीस जमीन इनाम करार करून दिल्ही. व हल्लीं नूतन सदरहू जमिनीस स्वराज्य व मोगलाई येकूण दुतर्फा देखील इनाम तिजाई व हक्क चौथाई व सावोत्रा व नाडगौडी कुलबाब, कुलकानू, हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी, जल, तरु, तृण, काष्ट, पाषाण निधीनिक्षेपसहित खेरीज हक्कदार, पाच हात, पाच मुठीचे काठीच्या पाडानें इनाम करून दिल्हा असे. तरी तुह्मीं मौजे मजकूरपैकीं सदरहूप्रमाणें एक चावर जमीन चतुःसिमापूर्वक यांचे दुमाला करून यासी व याचे वशपरंपरसीं इनाम चालवणे. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रती लेहून घेऊन हें पत्र भोगवटीयास याजपाशी परतोन देणें. येविशीं पत्रें.

१ देशमुख व देशपाडे, तर्फ खेडेबारें.

१ राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी तर्फ मजकूर.

१ राजश्री सदाशिव पंडित सचीव.

१ राजश्री माधवराव पंडित प्रधान.

एकूण चार पत्रें लेहून देणें.

पत्रें राज्याभिषेक शके ९० सुभानुनाम संवत्सरे, कार्तिक वद्य सप्तमी, रविवासर, सुरुसन अर्बा सितैन मया अलफ.

---

४८ मुरार जगदेवराव यांनीं दिलेली सनद.

वेदमूर्ती समस्त ब्राह्मण वास्तव्य मौजे नागरगांव उर्फ तुळापूर, तर्फ सांडस, प्रांत पुणें यांसी दिल्हें अग्रहारपत्र ऐसेजें:—वेदमूर्ती खंडभट बिन बापदेवभट तुळापूरकर व देवभट बिन कचेश्वरभट ब्रह्मे यांणीं शाहुनगर नजीक किल्हे सातारा, येथील मुक्कामीं स्वामिसंनिध येऊन विनंति केली जे, समस्त ब्राह्मण वास्तव्य क्षेत्र मजकूर, यांस पूर्वी राजश्री मुरार जगदेवराव यांणीं मौजे मजकूर चतुःसीमा पूर्वमर्यादेप्रमाणें कुलबाब, कालकानू, हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी देखील.जल, तरु, तृण, काष्ट, पाषाण, निधी निक्षेप सहित धारादत्त अग्रहार इनाम करून देऊन, विजापूरकर पादशाहाचीं पत्रें करून दिल्हीं. त्याप्रमाणें मौजे मजकूर इनाम अनभवीत आहो. त्याप्रमाणें महाराज राजश्री शाहाजी राजे व थोरले कैलासवासी महाराज यांनीं पत्रें करून देऊन, मौजे मजकूर पूर्ववतप्रमाणें समस्त ब्राह्मणास इनाम अग्रहार चालविला. त्याउपरी अलमगीर बादशाहाचा मुक्काम तुळापूर मजकुरीं होता. ते समयीं समस्त ब्राह्मणांनीं पूर्वील पत्रे पादशाहाचीं दाखवून अर्ज केला. त्यावरून अलमगीर पादशाहांनीं दिवाणी परवाना करून देऊन, मौजे मजकूर समस्त ब्राह्मणांस इनाम चालविला. व महाराज राजश्री काका साहेब यांणीं इनाम चालविला. कुलबाब, कुलकानू देखील सरदेशमुखी व इनामतिजाई हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी खेरीज हकदार करून, इनाम करून दिल्हा. यानतर महाराज राजश्री स्वामींनींही आपलें पत्र राज्याभिषेक शके ४९ विलंबीनाम संवत्सरे, आश्विन बहुल दशमी, मंदवारीं पत्र करून दिल्हें आहे जे, मौजे मजकूर सर्वमान्य पूर्वीपासून अग्रहार इनाम आहे, त्याप्रमाणें करार असें. म्हणोन महाराज स्वामींनीं पत्र दिल्हें आहे. त्याप्रमाणें मौजे मजकूर समस्त ब्राह्मण वास्तव्य क्षेत्र मजकूर सर्वमान्य इनाम चालत आहे. पूर्वील पत्रें आहेत तीं जीर्ण जाहलीं आहेत. भोगवटीयास महाराज स्वामींनीं पत्रें करून देऊन, मौजे मजकूर समस्त ब्राह्मण क्षेत्र मजकूर यांस वंशपरंपरेनें अग्रहार इनाम चालविला पाहिजे. ह्मणून विनंति केली व पूर्वील पत्रें आणून दाखविलीं. तीं मनास आणून, स्वामी कृपाळु होऊन, मौजे मजकूर तुह्मां समस्तांस अग्रहार इनाम आहे, त्याप्रमाणें स्वराज्य व मोगलाई अंमल एकूण दुतर्फा देखील इनामतिजाई, कुलबाब, कुलकानू, हल्लीपट्टी व व पेस्तरपट्टी देखील सरदेशमुखी व सरपाटिलकी जल, तरु, तृण, काष्ट, पाषाण, निधी निक्षेप सहित खेरीज हकदार करून, तुह्मां समस्त ब्राह्मणांस क्षेत्र मजकूर पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम करार करून दिला असे. तरी तुह्मीं आपले वंशपरंपरेनें मौजे मजकूर चतुःसीमा पूर्व मर्यादेप्रमाणें, समस्त ब्राह्मण अग्रहार इनाम अनुभवून सुखरूप

राहणें. येविशीं पत्रें. चैत्र वद्य नवमी, इंदुवासर, रक्ताक्षीनाम संवत्सरे. छ २४ रबिलावल, चिटणिशी पत्रें:—

१ समस्त ब्राह्मणांचे नांवें
१ मोकदम मौजे मजकूर.
१ देशमुख व देशपांडे.
१ देशाधिकारी.
१ राजश्री पंतप्रधान.

५

४९ पाटिलकीचें वतनाची सनद.

विजापुरास मुलुकचे पाटील खंडणीस बराबर देशमुख व देशपांडे घेऊन जाऊं लागले. ते समयीं हरजी पाटील यांचें मणगट, शिरेढोणच्या शिवेच्या कजीयाचें झुंज जाहलें, तेथें तुटोन पडलें. हरजी पाटील यासी निमे तर्फेचे दामाजी पाटिलाचे वडील यास विजापुरास जावें लागतें. तरी तुम्हीं आह्मीं जाऊ ह्मणून बोलिले. त्याजवरी हरजी बोलिला जे, माझें मणगट तुटलें, मी येत नाहीं. माझा एक लेंक घेऊन जाणें. ह्मणून बोलिले. त्यावरी हरजी पाटिलानीं पांचांजणा लेंकास जावयाची मसलत विचारिली. त्यासी कोणी जावयाचें मान्य करिनात. मग आमचे वडील मेंगोजी पाटील यांनीं विजापुरास जावयाचें मान्य केलें. ह्मणून निमे तर्फेच्या भावाचे विद्यमानें, मोमिनाचे घरचा एक शेला आणून, मेंगोजी पाटलास हरजी पाटलांनीं शेला देऊन, निमेच्या भावासमागमें विजापुरास रवाना केलें. तेथेंही दिवाणांनीं वस्त्रें दिल्हीं.

५० काजीपणाचें वतनाची सनद.

गुमास्ते मुत्सदी यांचें काम करणार वर्तमान भावी, परगणे मोहियाबाद उर्फ पुर्णे, सरकार जुन्नर, तावे सुभे खुनस्ते बुनियाद औरंगाबाद यास कळावें ऐसाजे:—परगणे मजकूरचें काजीपण व खतिबीचे चाकरीबद्दल, सहा टक्के रोजीना व तीन चाहूर व नव्वद बिघे जमीन, वैकुंठवासी औरंगजेब बादशाहा याचे थोर पदवीचे फरमान व पूर्वीचे दिवाण व शूर लोक यांचे सनदांप्रमाणें कीं, खाज्या अबदुला सदर सुभे याचे परवान्यात जे उधार लिहिले आहेत. त्याबरहुकूम काजी महंमद इब्राइम हा मृत्य पावलेपासून, याचा चिरंजीव शरीयत पन्हा महंमद हैदर काजी मिरासदार याचे नावें या परवान्याचे पाठीवरील शेरा लिहिलेप्रमाणें मुकरर व कायम केले असे कीं, सदरहू कामाचें सर्व प्रकारें पाहिजे तसें करीत जाऊन, खर्‍या व तंटे फैसल करणें व फडके मारणें व शिक्षा देणें व शुक्रवारचे दिवशीं निमाज व

जमात करणें व लोकांस निमाजवगैरे करिता बोलावणें करणें व ज्या स्त्रीचा वारस नसेल तिचा मोहतर लावणें व मेलेले माणसाची कांहीं जिनगी असल्यास त्याची धर्माप्रमाणें वांटणी करणें, व गुप्त माल असल्यास त्याचे व आईबाप मेलेले मुली व मुलाचे मालास संरक्षण करणें, व ज्या माणसानीं मृत्यकाळ होण्यासमयीं कांहीं सांगितलें असेल त्याप्रमाणें करणें व सर्व जातीचा बंदोबस्त ठेवणें, येणेंप्रमाणें सर्व काम करीत जाणें. यास्तव पाहिजे कीं, मशारनिल्हे यास तेथीलचा काजी व खतीब मजबूद समजून, सदरहू चाकरीचें काम व हुकुमांत मोठा समजावा. व दुसरे कोणास त्याचा हिस्सेदार व शराकतदार न जाणावा, व चकनामे व दफ्तर याचे दस्तखतानें मोहोरेनिशीं मातबर जाणावा. सदरहूबद्दल रोजीना व जमीन मशारनिल्हे यास खर्चास सोडून देणें. ह्मणजे तेथील उत्पन्न आपले निर्वाहास खर्च करून, चाकरी करण्यात हजर राहतील. या प्रकरणीं ताकीद सर्वांनीं मजबूद जाणून लिहिलेप्रमाणें अमलात आणावें. तारीख १ माहे सफर, सन ११९६ हिजरी.

मुकरर शेरा पाठीवरील दस्तखत जालेले सवालाचे यादीचा कीं, शेरा त्याचा आडवा लिहिण्यात आला आहे त्याप्रमाणें परगणे मोहियाबाद ऊर्फ पुणें, सरकार जुन्नर, सुभे खुनस्ते बुनियाद औरंगाबाद येथील काजीपण व खतिबीचे हुद्याबद्दल वैकुंठवासी औरंगजेब बादशाहा याचे थोर पदवीचे फरमान व पूर्वीचे दिवाण व शूर लोक याच्या सनदांप्रमाणें कीं त्याचा उधार, खाज्या अबदुला सदर सुभे याचे परवान्यात असें लिहिलें आहे कीं, काजी महंमद ईब्राईम हा मयत जालेपासून याचा चिरंजीव शरीयतपन्हा महंमद हैदर काजी मिरासदार याचे नावें होऊन चालत आहे. शेरा दस्तखतानें शराफत व सदारतपन्हा मौलवी महंमद मोइनोद्दिनखान सदर सुभे खुनस्तेबुनियाद औरंगाबाद याचा ऐसाजे. जाबतेप्रमाणें सनद देणें.

शेरा दस्तखत जालेले सवाल याचे यादीचा लिहिला. छ १ माहे सफर सन ११९६ हिजरीचा ऐसाजे:—वैकुंठवासी औरंगजेब बादशाहा यांचा तारीख ९ माहे रबिलावल सन ३३ जुलूसचे थोर पदवीचे फरमान व आसदखान याचे मोहोरेनिशीं तारीख ४ माहे जमादिलावल, सन मजकूरचे परवान्याप्रमाणें परगणे मोहियाबाद उर्फ पुणें, सरकार जुन्नर, सुभे खुनस्ते बुनियाद औरंगाबाद येथील बशरत खिजमत ह्मणजे काजीपण, व खतिबीचे चाकरीबद्दल नक्की सहा टक्के रोजीना व तीन चाहूर व नव्वद बिघे जमीन, काजी महंमद बल्लद काजी इब्राइम यास मुकरर होती. तो मयत जाले नतर रोजीना व जमीन चाकरी मजकूर बद्दल रशाफतखान सदर याचे मोहोरेनिशीं सनदेप्रमाणें, मयत याचा भाऊ महमद इस्माइल याचे नांवें मुकरर जाला असून तोही मयत जाला. नतर चाकरी मजकूर सदरहू उत्पन्नसुद्धां सदारतखान सदर याचे मोहोरेनिशीं तारीख ५ माहे रमजान सन २४ जुलूसचे सनदेप्रमाणें काजी महंमद हैदर याचे नावें मुकरर जाहली असून, कांहीं मुदत त्याणें चाकरी करून, तोही मयत जाला. नंतर खाज्या अबदुला सदर सुभे खुनस्ते बुनियाद तारीख ७ माहे

सफर, सन २३ जुलूस. महंमदशाही याचे परवान्याप्रमाणें कीं त्यांत सदरहू प्रकर्णाचे कैफियतीचें हसील लिहिलें आहे कीं, चाकरी मजकूर सदरहू उत्पन्न सुद्धा काजी महंमद हैदर मजकूर याचा चिरंजीव महंमद इब्राइम याचे नांवें करार जालें असून तोही मयत जाला. नंतर महंमद इब्राइम याचा चिरंजीव मयत काजी महंमद हैदर याचा नातू महमद हैदर चाकरी मजकूर व उत्पन्न मजकूर सुद्धा, बाप मृत्यु पावलेपासून बहाल होण्याविशीं उमेदवार आहे:—

तपशील.

परगणे मजकूरचे काजीपण व खतिबीचे हुद्दा महाल. चाकरी मजकूर बद्दल रोजीना सहा टक्के.

जमीन तीन चाहूर व नव्वद बिघे.

शराचे चाकरी करणारे याचे दफ्तरांत दाखल केला असे. तारीख १ माहे सफर सन ११९६ हिजरी. नक्कल सदर सुभ्याचे दफ्तरांत पावली.

---

५१ काजीपणाचें वतनाची सनद.

गुमास्ते, फौजदार व ठाणेदार व जागीरदार लोक याचे वर्तमान व भावी, परगणे पुणें, सरकार जुन्नर, ताबे सुभे खुनस्ते बुनियाद यांनीं जाणावें ऐसाजे:—कसबे मजकूरपैकीं तीन चाहूर व नव्वद बिघे जमीन व मुरादी सहा टक्के रोजीना सायर चौत्रे कोतवाली वगैरेचें उत्पन्नापैकीं शरीयत व फजीलतपन्हा काजी महंमद यास निर्वाहाकारितां औरंगजेब बादशाहा यांचे थोर पदवीचे फरमान बरहुकूम मुकरर आहे म्हणोन, सदर बरहुकूम मशारनिल्हे व इस्माइल याचा भाऊ याजकडे चालवणें. दुसरे कोणांस जमीन व रोजीन्यात बशरत खिजमत म्हणजे काजीपण व खतिबीचे खिजमतीबद्दल दखल होऊ न देणे, व शरीयत व फजीलतपन्हा मौसूफ यास समक्ष अदालतींत इजत व हुरमतीनें बसवून, मोकदमे व दावे तेथील शराअन्वयें फैसले करीत जाणें व पुण्याचे वाकनवीस याणें यासी बोलणें न करणें. व काजी मजकूर याचे उजवे हातास आपले जाग्यावर बसणें व कांहीं प्यादे आपले तर्फेनें मुकरर करणें व चौकशी बहुत फार तजाविजीनें करीत जाणें. म्हणजे कैफाचे न करण्यासारखे बाबी बिलकूल बद करणें, व जमाबंदी व निरखाचे कागद मशारनिल्हे याचे समक्ष दुरस्त करून, मोहोर करून घेऊन, या बाबतींत ताकीद मजबूद जाणून लिहिलेप्रमाणें अमलांत आणावें. तारीख १४ माहे जिल्हेज सन ३८ जुलूस.

---

५२ काजीपणाचे चाकरीबद्दल सनद.

नक्कल. ह्या दिवसांत दरबारी लोक यांचे वशिल्यानें शरीयत मा आब काजी अबदुल नबी व काजी आताउल्ला याचे चिरंजीव याचे बाबतींत हुजूरास अर्ज पावला कीं, पूर्वील जुलूसचे फरमानप्रमाणें सुमारी ४ च्यार चाहूर जमीन गजइलाहीनें त्याचे ५१४ बिघे होतात.

त्यापैकीं ३४० बिघे व १६ विसवे जिराईत व शिव दरोबस्त व बाकी राहिलेले बिघे मौजे काटे खामगांव आमले परगणे शेवगांवपैकीं काजी आताउला यास मुलांलेकरांसुद्धां निर्वाहाकरितां व परगणे मजकूर येथील काजीपणाचे चाकरीसुद्धां मुकरर होती, ते मयत जाल्यानंतर शहाबेगखान याचे मोहोरेनिशीं सनदेप्रमाणें तेथील काजीपणाची चाकरी व जमीन मजकूर काजी मलिक बडे याचे नावें भाऊबदासुद्धा मुकरर जाली, व तेही मयत जाल्यानंतर दुसऱ्या वेळेस थोर पदवीचे निशाणप्रमाणें सदरहू चाकरीबद्दल मयताचा चिरंजीव महंमद ताहीर यांचे नावें जमीन मजकूर मुकरर जाली. पुढें तेही मयत जाले. म्हणोन अबदुल नबी मजकूर हा उमेदवार आहे कीं, परगणे मजकूर येथील काजीपणाची चाकरी व जमीन मजकूर मरहूम काजी आताउला याचे अवलाद याचे नांवें पूर्वील दस्तुरप्रमाणें मिळावी. व त्याशिवाय सुमारी १ चाहूर जमीन गजइलाहीनें कीष्टतुल वाखून, शेख रमजान माही स्वार याचे दर्गाचे तवालीयतीचे चाकरीबद्दल शेख मवसुफ याचे उरसाचे दिवसांत बाजारचें हशील वगैरे फकीर लोक याचे खर्चाकरिता थोर पदवीचे निशाणाप्रमाणें मुकरर आहे, त्याप्रमाणें आह्मांस मिळावें म्हणोन, त्याजवरून हुकूम सादर जाला कीं, जमीन मजकूर काजी आताउला याचे अवलाद याचे नावे व काजीपणाची चाकरी, काजी महंमद ताहीर याचा भाऊ अबदुल नबी याचे नावें, पूर्वील दस्तूरप्रमाणें दिल्ही असे. व त्याशिवाय सुमारी १ एक चाहूर जमीन गजइलाहीनें थोर पदवीचें निशाणप्रमाणें व बाजारचें हशील वगैरे यास मुकरर आहे. व शेख मवसुफ याचे दर्गाचे तवालीयतेचे चाकरीबद्दल पाठीवर लिहिल्याप्रमाणें बहाल व कायम केली असे. व सर्व लवाजिमा व रुसूम त्याचा करीत जाऊन कजे तोडणें, व मामले फैसला करणें, व दावे व तंटे व मोहतूर लावणें, व वारसदाराचा वाटा करणें, व कोणी गुन्हा केल्यास धर्माप्रमाणें शिक्षा करणें, व शुक्रवारजे दिवशीं सर्व मिळोन निमाज करणें, व कोणी मनुष्य मर्तवेळेस कांहीं बोललें त्याची तजवीज ठेविणें, व धर्माप्रमाणें सर्व लोकांस वागविणें, व पुरलेला व बेवारीसदाराचे मालाचा शोध करणें, व मराठी देवळातील मूर्ती वगैरे मोडणें व धर्मातील नवी चाल बंद करणें व माप व वजन व गज नवीन करणें अशीं सर्व कामें धर्माप्रमाणें चांगल्या रीतीनें व चांगल्या चालीनें व केसभर तफावत न करितां करीत जाणें. यास्तव पाहिजे कीं, मुत्सदी लोक काम करणार व जहागीरदार व फौजदार व करोडी व मामलेदार हल्लींचे व पुढें होतील ते यांणीं मशारनिल्हे यास त्या परगण्याचा काजी व दर्गा मजकूरची तवालीयत करणार जाणून, सर्व कामात याची वहिवाट मोठी व मजबूत जाणणें, व जमीन मजकूर वगैरेयास कदीम महालांतील पूर्वील दस्तूरप्रमाणें देत जाणें. म्हणजे उत्पन्न तेथीलचें साल दरसाल हंगाम दर हंगाम आपल्या निर्वाहास खर्च करून, आशीर्वाद हमेषा दौलतीस देत जातील व मुकरर व चालू करण्याविशीं हा हुकूम बादशाहा याचा मान्य करून, कधीं कधीं तगीर व बदल न करणें व सर्व प्रकारें हरकती दिवाणी व बादशाही कामाबद्दल वहींहंडी व नजराणा व जरीबना व जाबताना व मइसीकना व मोहोराणा व

दारोगाना व बिगार व शिकार व मोकदमी व कानून व गोई व तक्रार जिराइती व हरसाल जप्त करणें. याजबद्दल मुजाहीम न होणें. व नवीन सनद व परवान्याचा आक्षेप न करणें. व जर याशिवाय दुसरे महालीं काहीं असल्यास त्याचा इतबार न करणें, व जर ते लोक जमीन मजकुरांत बाग करतील अगर विहीर खणतील, तर त्यास आटकाव न करणें. व मुजाहीम न होणें. व मोठे सैद लोक व मोठे पीरजादे लोक व राहणारे तेथील सर्व रयत लोक यांणीं सर्वांनीं मामले व दावे व तटे सदरहू काजी याजला रुजू करावे व शराचे कागद व सर्व खतपत्र व कबाले व चकनामे व कबुलायतनामे जमाबंदीचे वेळेस रयत लोक याचे, याचे मोहोरेनिशीं व दस्तखतानें मातबर जाणावे व मंजूर जाणावे. तारीख २७ माहे रजब, सन— मुकरर. शेरा पाठीवरील अर्जाचे यादीप्रमाणें ऐसाजे:—तारीख १८ रोज बुधवार, माहे जमादिलाखर, सन १२ जुलूस, मुताबक सन १०८० हिजरी. शाइस्तेळी तर्फ वळ मरहामत हाजी यासीन सदर व नौबत वाक्या विसन बेदाहा हरदेराम याचे कलमी होतात कीं, तारीख १६ माहे सन मजकूर. अताउला याबद्दल अर्ज पावला कीं, सुमारी ४ चाहूर जमीन गजइलाहीनें त्याचे ५१४ बिघे होतात. त्याजपैकीं सुमारी ३४० व शिव दरोबस्त व बाकी जमीन मौजे काटे खामगाव आमले परगणे शेवगाव पैकीं पूर्वी जुलूसचे तारीख १ माहे रबिलाखर सन फर्मानप्रमाणें काजी आताउला यास मुलालेंकरासुद्धा निर्वाहाकरिता व परगणें मजकूर येथील काजीपणाची चाकरीसुद्धां मुकरर होती. ते मैत जाल्यानंतर शाहा बेगखान याचे मोहोरेनिशीं तारीख २८ माहे रमजान सन २७ चे सनदेप्रमाणें काजी मलिक बडे याचे नांवें, भाऊबंदासुद्धां व काजीपणाची चाकरी मुकरर जाली, व तेही मयत जाल्यानंतर करार जालेला तारीख २ माहे रजब सन १० चे थोर पदवीचे निशाणप्रमाणें सदारतपन्हा ख्वाजा अबदुल रहिमान याचे रिसाल्यात दुरस्त होऊन, मयताचा चिरजीव महंमद ताहीर याचे नांवें काजीपणाचे चाकरीबद्दल बहाल जाली; व तेही मयत जाल्यानंतर त्याचा भाऊ अबदुल नबी हा उमेदवार आहे की, काजीपणाची चाकरी माझे नावें व जमीन मजकूर काजी आताउला याचे अवलाद याचे नांवें, पूर्वील दस्तूरप्रमाणें मिळावी व त्याशिवाय सुमारी १ चाहूर जमीन गजइलाहीने गुफराजपन्हा शेख रमजान माहीस्वार याचे दर्गाचे तवालीयातीचे चाकरीबद्दल व दर्गा मजकूरचे उरसाचे दिवसात बाजारचे हशील वगैरे फकीर लोक यांचे खर्चाकरितां करार जालेला—तारीख १५ माहे मोहोरम सन १ जुलूस-थोर पदवीचे निशाणप्रमाणें मुकरर आहे. या बाबदींत जो हुकूम होईल तो त्याजवरून हुकूम सादर जाला कीं, जमीन मजकूर काजी अताउला याचे अवलाद याचे नावें व काजीपणाची चाकरी काजी महंमद ताहीर मैत याचे भाऊ अबदुल नबी याचे नांवें पूर्वील दस्तूरप्रमाणें दिल्ही असे, व त्याशियाय सुमारी १ चाहूर जमीन गजइलाहीनें व बाजारचे हशील वगैरे थोर पदवीचे निशाणप्रमाणें शेख मवसूफ याचे दर्गाचे तवालीयतीचे चाकरीबद्दल मुकरर आहे. ह्मणोन बहाल व्हावी, यास्तव पाहिजे कीं, मुत्सदी लीक काम करणार हल्लीचे व पुढें

होतील ते यांणीं महाल मजकूरपैकीं, जमीन मजकूर वगैरे पूर्वील दस्तूरप्रमाणें वहिवाटीस यास द्यावी व जर ते आपल्या जमिनींत नवीन बाग व विहीर बांधतील, तर कोणी मुजाहीम न होणें, म्हणजे उत्पन्न तेथीलचे हंगाम दर हगाम व साल दरसाल निर्वाहास खर्च करून, आशीर्वाद हमेषा दौलतीस देत जातील. व जर याशिवाय दुसऱ्या महालीं कांहीं असल्यास त्याचा इतबार न करणें. जालेले यादीप्रमाणें कलमीं जाला शेरा खतानें साहेब रिसाला याचा ऐसाजे, दाखल वाक्यांत करावा. शेरा खतानें वाकेप्रमाणें आहे. शेरा खतानें मदारुल मोहामी याचा ऐसाजे, दुबार अर्ज पोंचवावा. शेरा खतानें दुबार अर्जीचा ऐसाजे. तारीख २८ माहे जमादिलाखर, सन १०८० हिजरी, मुतावक सन १२ जुलूस यांत दुबार अर्ज पोचला. शेरा खतानें मदारुल मोहामी याचा ऐसाजे, थोर पदवीचें निशाण कलमीं करावा.

पाच चाहूर जमीन व बाजारचें हशील वगैरे.

शेख रमजान पीर याचे दर्ग्याबद्दल त्याची सनद अलाहिदा आहे. ४ चाहूर जमीन मुकरर ५४२ बिघे.

---

५३ काजीपणाचे चाकरीबद्दल सनद.

हुजुरास अर्ज पावला कीं, शहाजहा बादशहा यांचे थोर पदवीचे फरमानप्रमाणें परगणें गुलछनाबाद येथील काजीपणा व मोहतसीबीचे चाकरीबद्दल काजी सैद महंमद अशरफ वल्लद सैद सुलतान याच्या नांवें, या फरमानाच्या पाठीवरील शेरा लिहिल्या बरहुकूम, चार टक्के मुरादी रोजीना, व दोन इदीचे शिरपावाबद्दल रुपये ३०, व २५० दोनशें पन्नास बिघे जमीन, गजइलाहीनें मुकरर व्हावी; म्हणजे ते सदरहू चाकरीचे सर्व प्रकार, पाहिजे तसे करीत जाऊन, कज्जे व मामले फैसल करणें व दावे तटे तोडणें, व ज्या बायकोस आईबाप वगैरे कोणी नसेल तर तिचा मोहतूर लावणे, व मेलेले मनुष्याचे मालाचा धर्माप्रमाणें हिस्सा करणें, व चकबंदी व शराचे कागद वगैरे लिहिणें, व लोकांस निमाज करणेंकरिता बोलावणें करणें, व शुक्रवारचे दिवशीं निमाज व जमात करणे, व पुरलेला व आईबाप मेलेले मुलाचा माल, शोध करून संरक्षण करणें, व मेलेले मनुष्यानें जें काही सांगितलें असेल तें धर्माप्रमाणें करणें, व इमाम लोक व मोआजीन लोक यांची चौकशी करणें, व वाईट लोक व कैफ करणारे लोक यांजला मनाई व बद करणें, व जिनसाचे निरख व वजन व गज व माप हे सर्व बरोबर ठेवीत जाणें. यास्तव पाहिजे कीं, हकीम व अमलदार व जाहागीरदार व करोडी, वर्तमान व भावी, यांणीं सदरहू महालाचा काजी व मोहातसिब याजला समजोन, रोजीना व दोन इदीचे शिरपाव व जमीन मजकूर याच्या वहिवाटीस देणें, व कधींही तगीर व बदल यासी न करणें व सरकारचा सारा व सायरखर्चाबद्दल वहींहंडी व नजराणा व जडीवना व महसीलना व मोहोराणा व दारोगाना व बिमार व शिकार व मोकदमी व कानुनगोई व दरसाल [illegible]

व तक्कार जिराइती व सर्व प्रकारें हरकती दिवाणी व बादशाही कामाबद्दल यासी अटकाव न करणें. या बाबदींत दरसाल नवीन सनदेची तलब न करणें. तारीख २ माहे साबान, सन १४ जुलूस, मुताबक सन १०५० हिजरी.

मुकरर शेरा पाठीवरील तारीख ५ माहे रजब, सन १४ जुलूस, माफीक सन १०५० हिजरी, मुताबक माहे २८ मेहेर इलाही, रोज सोमवार. करार जालेले यादीप्रमाणें रिसाल्यांत सियादत व जकातपन्हा मीरमहंमद हषम सदर याचे व नौबत वाकयानवीस कमतरान बंदगान अबदुल रहिम यांचा ऐसाजेः—हुकूम सादर जाला की, शाहजाहा बादशहा याचे थोर पदवीचे फरमानप्रमाणें, परगणे गुलछनाबाद येथील काजीपणा व मोहतसिबीचे चाकरीबद्दल काजी सैद महंमद अशरफ काजी कसबे, परगणे मजकूर यास निर्वाहाकरितां, चार टक्के रोजीना व व दोन इदीचे शिरपावाबद्दल रुपये ३० व २५० दोनशें पन्नास बिघे जमीन, गजइलाहीनें मुकरर असे ह्मणोन, दाखल्याचे यादीप्रमाणें कलमीं जालाः—

तपशील.

काजीपणाचे खिजमतीबद्दल निर्वाहाकरिता.		मोहतसिबीचे चाकरीबद्दल निर्वाहाकरितां.
जमीन.	रोजीना.	जमीन.
२०० दोनशें बिघे गजइलाहीनें.	चार टक्के.	पन्नास ५० बिघे गजइलाहीनें.
दोन इदीचे शिरपावाबद्दल रुपये ३०.		

५४ काजीपणाचे चाकरीबद्दल सनद.

गुमास्ते, मुत्सदी लोक, वर्तमानभावी, परगणे असअदनगर, सरकार सुभा दारुलजफर विजापूर, यासी आज्ञा केली जाती जेः—हजरत खुलदमकान अलीषान यांचे फरमानापमाणें व पूर्वीचे सत्ताधारी सदरुसदूर वैगेर याचे सनदाअन्वयें व दक्षिणचे अधिकारीयाचे सनदांप्रमाणें परगणे मजकूर येथील काजीपणाची चाकरी कसबात व कर्यातीसुद्धां, त्याबद्दल एक चाहूर पडजमीन लागण व्हावयाजोगी, परगणे मजकूरचे शिवारांत, सैयद मखदूम याचे नांवें मुकरर होती. तो इश्वरी सत्तेनें मरण पावला. तो मृत्यू पावल्यापासून सैयद सालार वल्लद सैयद वली मयत मजकूर याचा नातू हा परगणे मजकूर येथील काजीपणाचे शेवेवर मालक होता. तोही मरण पावला. त्यानंतर मयत सैयद मखदूम याचे नातू सैयद अबदुल गफूर व दुसरे त्याचे बंधु हरएक महालीं आपआपले वारसदारीचे विभागाप्रमाणें वहिवाट करीत आहेत. सैयद सालार याचा पुत्र व सैयद वली, काजी मौरुसी याचा नातू सैयद करीमुद्दीन यानीं विनंति केली कीं, परगणे अकलूज येथील काजीपणाचे चाकरीची सनद आमचा बाप मरण पावला, यास्तव सदरचे दप्तरातून माझें नांवें मुकरार होऊन मिळावी, असा अर्ज केला. यास्तव एक चाहूर जमीन पडरानापैकीं लागण व्हावयाजोगी व दरगावीं [illegible] व मानपान रोजीनाचे वैगेरे पूर्वीचे वहिवाटीअन्वयें सैयद करीमुद्दीन वल्लद

काजी सैयद साकरकाजी मदरुसी मशारनिल्हे याचें नावें या सनदेंत लिहिलेप्रमाणें मुकरार व बहाल करून दिल्हे असे. तरी मानपान व हक्क हक्कदारीची जशी वहिवाट चालत आली आहे, तशी उपभोग घेऊन व काजीपणाचे हक्क:—

१ धर्मशास्त्राच्या शिक्षा चालू करणे.
१ ईश्वराची सेवा करणारे मनुष्यास, यात तुमचें कल्याण आहे व अशीच सेवा कराल, तर तुह्मास ईश्वर सुख देईल, अशी प्रीति उत्पन्न करणें.
१ कोणीही अंतःकाळीं बोध केल्याप्रमाणें इनाम देणें किंवा स्वाधीन करणें असेल, तसें करावें.
१ शास्त्रानीं जे वर्ज्य केलें आहे, तें न मानाता पापाचरण करणारास शिक्षा देणें येणेंप्रमाणे काजीचे अधिकार आहेत.
१ शुक्रवारच्या जमातीचा बंदोबस्त ठेवणें.
१ कुलीन श्रेष्ठाशी लग्नविवाह करवणें.
१ मयताचे पाठीमागें उरले द्रव्याचा यथाविभाग खर्च करणें.
१ कोणी द्रव्य अगर हरएक पदार्थ ठेऊन गेला आहे, त्याचें सरक्षणाचा बंदोबस्त ठेवणें.
१ मद्यप्राशन करणारे लोकांचे पारपत्य राखावें.
१ चागले मार्गाने चालणेंविशी सल्ला देणें.

---

५५ मुल्ला महंमद शरीफ यांस मिळालेली सनद.

" या चागले समयात दरबारी लोकाचे वशिल्याने मुल्ला महमद शरीफ मीर आदल (ह्मणजे न्यायाधीश) व मोहेतसीब (ह्मणजे निरख वगैरे पाहणारा) परगणे जाफराबाद उर्फ चादवड, इलाखा सरकार सगमनेर, अमले सुभे औरगाबाद याचे बाबतींत हुजूरास अर्ज पावला की, मशारनिल्हे हे सदरहू चाकरी करितात व रोजमुरा काहीं त्यास मुकरर नाही व कुटुबवत्सल असून रोजमुरा मिळणेंविशी उमेदवार आहेत याजकरिता हुजूरचा हुकूम सादर जाला की, नख्त ॥· अर्धा रुपाया रोजीना, खाडा न करिता वसुली सदरहू चाकरीबद्दल कसबे परगणे मजकूरचे हसीलपैकीं, व सुमारे दोनशें बिघे जमीन बंज्यर पडीत जमा खेरीज लायक जिराईत व गजइलाही परवाने मदतमाष ह्मणजे निर्वाहाकरितां बफरजदान ह्मणजे वंशपरंपरें, परगणे मजकूरपैकीं हल्लींपासून या सनदेचे पाठीवरील शेरा लिहिल्या बरहुकूम मशारनिल्हे यांस दिल्हे आहेत. तरी त्याणें सदरहू कामाचे प्रकार, पाहिजे तसे करीत जाऊन, कज्जे फैसल करणें व मामले तोडणें व दावे व तटे दूर करणें व माल व मेलेले मनुष्याचे जिदंगीची वाउणी करणें व जिनसाचे निरखाची व वजनाची व गज व मापाची चौकशी करणें व इमाम व मोअजन ह्मणजे मशिदीतील चाकरी करणार याचे हवाल व मशिदी व शाळा यांची मन्हामत करणें व शिक्षा देणे व फटके मारणें व मोठे रस्त्याची दुरुस्ती करणें व लोकास निराकाराचे भजण्यारितां बोलावणें व दारू पिणारे लोक व दुसरे कफ करणारे लोक व शिवाय वाईट काम करणारे लोक, यास मर्यादा देणें व देवाच्या

मूर्ती दगडाच्या वगैरे आकारी बिनआकारी मोडून टाकणें व शरामध्यें नवीन उत्पन्न झालेलें काम व जुलूम, जबरदस्ती वगैरे चालीचे लोक व याप्रमाणें जीं कामें असतील तीं सर्वाविशीं बंदोबस्त करीत जाणें, ह्मणजे कोणी शेराशरीफ जे धर्माची मजबूद वाट आहे, तीं न मोडावी. व कोणी फिर्यादी आला, त्याचे बाबदीत शराप्रमाणें खरी चौकशी करीत जाणें यास्तव पाहिजे कीं, मुत्सदी लोक काम करणार व फौजदार व जागीरदार व कामगार व मामलेदार वर्तमान व भावी तेथीलचे याणी मशारनिल्हे यास (मीर अदल व मोहोतसीब) सदरहू महालाचा मजबूद जाणून, रोजीना मजकूर रोज दररोज यास तनखा देऊन, जमीन मजकूर चांगले जागा पैकीं मोजून व चक बा न, मदतमाष ह्मणजे निर्वाहाकरिता याचे वहिवाटीस सोडून देणें; व सर्व हरकती दिवाणी व बादशाही कामाचे ह्मणजे दहीहंडी व नजराणा व जरीबना व मोहेराना व मोहसिलाना व जाबताना व दारोगाना व बेगार व शिकार व दही निमे म्हणजे दर दशकास निमे भाग व सदेदुई ह्मणजे दर शेंकडा दोन प्रमाणें व कानुनगोई व मोकदमी व तकरार जिराईत व दरसाल जप्त करणेबद्दल असे सदरहू बाबी यास माफ जाणावें. कीं उत्पन्न तेथील व रोजीना आपले जरुरीस खर्च करून बादशाहा याचे दौलतीस अभीष्ट चिंतन करीत जाऊन, सदरहू चाकरी चागले रीतीने करीत जाणें व जर याचे शिवाय दुसरे महालीं काहीं उत्पन्न वगैरे असल्यास त्याचा या सनदेवर भरवसा न करणे, व बादशाही हुकूम मजबूद निरंतर चालविणेविशा तजवीज करून नवीन सनद व परवाना तलफ न करणें व बादशाही हुकुमाचा आक्षेप न करणें सदरहू महालाचे सादात ह्मणजे सैद लोक व मशायक ह्मणजे गुरु व सर्व राहणारे वतनदार लोक याणी मशारनिल्हे यास मीर अदल व मोहोतसीब सदरहू परगण्याचा जाणून सदरहू चाकरीत यास मजबूद अखत्यारवाला जाणावें व दुसरे कोणास वाटणीदार व शराकदार याचा कोणी न जाणावा, व सर्व मामलेचे कागदपत्र याचे मोहर व दस्तखतानें मातबर जाणावी या बाबदींत ताकीद जाणावी ता १७ माहे मोहरम सन १४ जुलूस. मुताबक १०८२ हिजरी (ह्मणजे सन १६७० इसवी.)

मुकरर शेरा पाठीवरील बादशाही याद तारीख ९ माहे जिल्हेज सन १४ जुलूस मुताबक १०८१ हिजरी रोज रविवार जालेले बरहुकूम सदारत पन्हाः मीर बुा सदर याचे रिसाल्यांत व वाकनवीस गुलाम महंमद याचे वाक्यांत कलमी होत आहे की, ता २४ माहे जिल्काद सन १४ जुलूस रोजीं मुल्ला महमद शरीफ मीर अदल व मोहोतसीब, परगणे जाफराबाद उर्फ चांदवड, सरकार सगमनेर, सुभे शाहा औरंगाबाद याचे बाबदींत हुजूरास अर्ज पावला कीं, मशारनिल्हे हे सदरहू चाकरी करीत जाऊन यास निर्वाहाकरितां कांहीं मुकरर नाहीं व कुटुंबवत्सल असून बादशाहीचे मेहेरबानगीचे उमेदवार आहेत. त्याजवरून हुजूरचा हुकूम सादर जाला की नगदी -॥- आठ आणे रोजीना खाडा न करितां वसुली रोजीना चाकरीबद्दल कसबे परगणे मजकूरचे हशीलपैकीं व सुमारी दोनशें बिघे पडित जमा खैरीज लायक जिराईत बागजइलाही मदतमाष म्हणजे निर्वाहाकरिता ब

बफरजदान ह्मणजे वशपरपरा परगणे मजकूरपैकी आजपासून दिल्हे आहेत. तरी मुत्सदी लोक काम करणार व करोडी वर्तमान व भावी तेथीलचे याणी चाकरीबद्दल रोजीना निर्वाहाकरिता जमीन चागले महालपैकीं मोजून व चक बाधोन मशारनिल्हे यांचे वहिवाटीस सोडून देणें. ह्मणजे ते आपले निर्वाहास खर्च करून सदरहू चाकरींत हजर राहतील. यादीप्रमाणें कलमीं जाले.

५६ सैद अल्लाउद्दीन याचे दरग्यास जहागीर.

खानदेश कलेक्टर याचे इंग्रजी पत्र नंबर ६४७२ तारीख ७ जुलई १९०७ आभिप्रायास आले त्यातील एका कागदाचा उतारा

हुकुमनामा निाा दिवाणी अदालत जिाा खानदेश विाा मोरोबा कान्होबा प्रिन्सिपॉल सदर अमीन, कोर्ट धुळें, सन १२६६ फसली तारीख २० माहे एप्रिल सन१८५७ इसवी.

वादी.

नादारी नंबर ५८० सन १८५३ पोा फैसल दुतर्फा.

दगुमिया वाा बडेसाहेब मुतवली निाा सैद सादात सैद अलावदीन, संस्थान परगणे नदुरबार इनामी जहागीरदार, मौजे खामगाव परगणे नदुरबारकर कोा मजकूर याचा वकील दामोदर माधव.

प्रतिवादी.

लाडू व लालबी मर्द आतीउल्ला मुसलमान वस्ती कोा नदुरबार याचा वकील यशवत सदाशिव, फिर्याद रुपये ५४२२८१३ मुतवलपणाची व जहागीर गांवची वहिवाट घेण्याबद्दल.

फैसल तारीख १३ आगष्ट, सन १८५३ इसवी.

२ मुकदम्यांत दाखल जालेले कागदावरून असें दिसत आहे कीं, नदुरबारास नदा या नांवचा गवळी सरदार होता, त्याणे मुसलमान लोकाची छलना केल्यावरून खान मोयेनुद्दीन चिस्ती म्हणून कोणी मुसलमान लोकात पीरजादा अजमिराकडेस होता. त्याणें सैद अल्लाउद्दीन याजला लष्कर देऊन सन ६११ हिजरी, इंग्रजी सन १२१४ इसवीचें सालीं, नंदा गवळ्याचें पारिपत्यास पाठविला तो नंदुरबारेस येऊन नंदा गवळ्याशी युद्ध केलें. त्यात सैद अल्लाउद्दीन कत्तल जाला. परंतु त्याणें मरतां मरतां नदा गवळ्यास मारून त्याचे फौजेस पळविलें पुढें सन ९६६ हिजरी, इग्रजी सन १५९८ इसवी या सालांत अमदाबादचा शहाजादा मलदनाशकर याणें सैद अल्लाउद्दीन याचे कबरीवर दरग्या बांधविला व त्याच सालीं गुजराथ प्रांतांतील मलकनमत शाजादे याणें दर्ग्याजवळ मशीद

बाधविली, आणि तेथील उरसाचे व मन्हामतीचे लगर वगैरेचे खर्चाकरिता खमगाव जाहगीर मिळाला.

५७ शेखमीरा वल्लद शेखबावा बिजलीखान यांस सनद.

अमलदार वर्तमान व भावी व देशमुख व देशपाडे व मोकदम व रयत लोक, मौजे पसरणी, तर्फ हवेली, प्रात वाईदेश, सरकार नबीषाहदुर्ग ऊर्फ पन्हाळा, सुभा दारुलजफर विजापूर यास आज्ञा केली जाते जे, धर्मशास्त्र आधार शेखमिरा वल्लद शेखबावा बिजलीखान यांणीं पादशाही मोहीमीचे कामात उत्तम पराक्रम केला याजकरिता, सरकारचे मस्तकावरून ओवाळून टाकिल्या रीतीनें, मौजे मजकूर हा गाव दरोबस्त इनाम करून दिल्हा असे. तरी तें उत्पन्न हंगामशिर सेख मजकूर याचे खर्चाकडे द्यावें आणि दिवाणी प्रकर्णी एकदर उपद्रव माफ जाणावे. सदरहू इनामावर यांणीं वशपरपरेने स्वामित्व ठेवावे, आणि इनामदारास हें विहित कीं, सरकारचे दौलतीचें निरतर अभीष्ट चिंतन करीत जावें. प्रतिवर्षी नूतन सनदेचा आक्षेप न करणें. प्रत लिहून घेऊन अस्सल इनामदाराचे हवाली करणें. तारीख २७ रमजान सन जुलूस २.

५८ मुसमातच्मा वकिलास जमिनीची सनद.

तारीख १२ माहे रविलावल, सन १२ चा परवाना, विजारत व अमारतपन्हा मदारुल मोहामीयाचा आमच्या नावें पोंचला ऐसा जे:—शाहजहा बादशाहा व जहागीर बादशाहा याच्या थोर पदवीच्या फर्मानप्रमाणें, कसबे येरडोल येथील सुमारी ९ आउतें जमीन मुसमात राजीजी व हलीमजी याचे बाप व आजाची खरेदी केलेली असून, पूर्वील जुलूसचा थोर पदवीचा फर्मानही याजवळ आहे. यास्तव पाहिजे की, जमीन मजकूर मुसमात मजकूर याजला द्यावी व मजला ही हकीकत जाहीर जाल्यावरून विजारत व अमारत मर्तबत अमानत खान मजकूर यास अर्जे पाठविला कीं, पूर्वील जुलूस मुसमात मजकूर ह्या मक्कयास गेल्या होत्या व तेथेंच फार दिवस राहिल्या. याजकरिता पूर्वीचे जहागीरदार लोक याणीं जमीन मजकूर बेवारस समजून सरकारात जमा केली, व जमा वसुलाप्रमाणे मोठे दिवाण लोक याणी ती जमीन सारा देणारे लोक याजला देत आले. दरीविला रीफाभातपन्हा सिद्दी हैदर वल्लद कासम याच्या जहागिरीत तनखा आहे. या बाबदीत जें लिहिण्यात येई तें ल्याहावें, त्याप्रमाणें अमलात आण त्याजवरून विजारत व अमानातपन्हाखान मजकूर याणीं मजला लिहिलें कीं, सदरहू नऊ आउतें जमीन, पैकी शभर बिघे जमीन मोकर ह्याबद्दल मीर अहमद खान मरहूम याजला थोर पदवीचे फर्मानप्रमाणें मिळाली आहे. ती मीर अहमदखान यांच्या लोकांस बहाल करून बाकी मुसमात मजकूर याच्या वकिलास द्यावी. कारण कीं, मशारानिल्हे याची विकत घेतलेली मिळक(त) आहे. त्याजवरून दुसऱ्या परवान्याप्रमाणें जमि-

नींस मी तारीख २४ माहे रबिलाखर सन २२ यात वकील मजकूर याजला दिल्ही असे. सुरत मजालस अशी होती ती लिहिण्यात आली.

५९ सुरज वल्लद बापु जोशी यास सनद

महंमद फरोकसियर बादशहा गाजीचा वजीर आबदुल आजीजखान यांचे मोहरेनिशी फारसी परवाना आहे त्याचा तरजमा हिंदवी भाषेंत केला असेः—

महमद फरोकसियर आबदुल
अजीजखान फिदवी बादशाहा गाजी.

मुत्सदीयांना वर्तमान भावी, परगणे हवेली, जुन्नर सरकार मजकूर, सुभा औरंगाबाद हा महाल सेवकास जहागीर आहे. त्यास हल्ली जाहीर होण्यात आलें असे कीं, सुरज वल्लद बापू जोशी, ज्योतिषी, वतनदार, जुन्नर हा ज्योतिषी विद्येंत फार निपुण आहे आणि मुलेंलेंकरान फार कटुंब वत्सल आहे, आणि त्यास कोणीकडून स्वास्थ्य सरक्षणास नाही याजकरिता बादशहाची ओवाळणी सनदेच्या पाठीवरील मजकूराप्रमाणे चार आणे माल महसूल जहागिरीचे उत्पन्नापैकी त्यास वशापरपरेनें लेंकराचे लेंकरी मुकरर करून दिल्ही असे तरी हा रोजीना वसुलापैकी मशारनिल्हेस देत जाणें. कारण की, आपले मुले लेकराचें कुटुंबसरक्षणार्थ खर्च करून बादशहाचे दवलतीस आशीर्वाद, अभीष्ट चिंतन करीत जावें. या बाबें ताकीद मजबूत जाणून दरसाल नवीन सनदेचा आक्षेप न करणें जाणिजे. तारीख २ माहे जिल्हेज, सन दोन कलमी केली सनदेच्या पाठीवरील मजकुराचा शेरा बादशहाचे ओवाळणी रोजीना चार आणे सुरज वल्लद बापू जोशी वतनदार, जुन्नर यास, जुन्नरचे महाल मजकूरचे वसुलाचे मालापैकी लेंकराचे लेकरी वशापरपरेने करून दिल्हा असे.

६० नागोजी माने यांचे नांवचा कौलनामा.

कौलनामा रुतफुल्लाखान अलमगीर पादशाहा याचे कारभारी यांचे नकसपंज्यासुद्धा नागोजी माने याचे नावचा, समजलें की, तुह्मीं निश्चयेकरून आमचे दौलतीचा आश्रय करून येऊन हुजूर रुजू जाहला व दुस्मानासही दूर केला, व संता याचा रस्ता पळावयाचा तो तुम्ही बद केला. त्यास पळून जाऊ दिल्हें नाही. तुह्मी सरकारची नौकरी एकनिष्ठेने बहुत चागली केली. तुह्मी पेशजी विनति केली ती व हल्लीं विनति केली ती कबूल झाली आहे. तुमचे नावें फर्मान यावयाकरिता व तुमचे अपराध क्षमा व्हावयाकरिता व आणखी तुमची विनति असेल ती करून द्यावयाकरिता सरकारांत लिहिलें आहे. तुह्मीं स्वस्थ असावे व आमचे खतार्चा वाट पहावी कीं, आमचें खत सरकारात पोंचल्यावर तुमचे नावचें फर्मान व तुमचे अपराध क्षमा व्हावयाकरिता व तुमचे मतलब व तुमचे इनामची सनद

लिहून येईल. र(ण)दुल्लाखान याचे समागमें तुह्मी लष्करांत यावें. तुमचा मोठेपणा व इतबार तुमचे उत्तम होणेबद्दल हल्ली व पुढें जरूर आहे तें होऊन येईल तुह्मी चाकरी केली याबद्दल पादशहाची मेहेरबानी व इनायत होऊन येईल. तारीख छ २९ जिल्हेज सन ४१ जुलूस.

६१ शाहाआलम बादशाहा यांनीं दिलेला परवाना.

रिशादतखा फिदवी शाहाअलम बादशाहा गाजी यांणीं आपले मोहरेनिशीं तारीख २७ जिलकाद, सन ४ जुलूस रोजी परवाना करून दिल्हा त्याचा तरजुमा मराठींतः—

गुमास्ते हाय मुत्सदीयान मोहीमात व जिल्हेदारान व फौजदारान व जहागीरदारान हल्लीचे व पुढें होतील ते परगणे णें, सरकार जुन्नर, सुभे खुजिस्तेबुनियाद यास कळावें कीं, दाउदखा याचा परवाना लिहिलेला तारीख २५ सवाल सन ४ जलूस रोजीचा, त्याबरहुकूम मौजे चिखली व मौजे मोरगाव आमले परगणे मजकूर जमा मुबलग चार लाख पंचेताळीस हजार दाम, दौलतमनखा हे मृत्यु पावल्यापासून व भगवतराव वल्लद विनयाराव याजकडून दूर जाहल्यापासून मोरो गोसावी याचे गुजाऱ्यास इनाम मैफरजदा मुक्रर असे. त्या परवान्यावर अल्लीशान दियानतखान दिवाण याचा परवाना तारीख १४ जिलकाद, सन ४ जुलूसचा हसल केला कीं, गोसावी मजकर कुटुंब फार ठेवीत आहेत व फकीर व फुकरा वगैरे आले गेले मनुष्याचा समाचार घेत आहेत. यास्तव दोन मौजे मजकूर पातशहाचे डोकीचा उतारा पाठीवर लिहिलेप्रमाणे बनाम गोसावी मजकूर मैफरजंदा मुक्रर जाणून मशारनिल्हेचे खर्चास चालवावे, म्हणजे तेथील उत्पन्न घेऊन आपले गुजाऱ्यास खर्च करून फकीर फुकरा व गरीब लोकाचा समाचार घेऊन दौलतीस कायम राहण्याचें चिंतून आशीर्वाद देतील. कोणतेही सबबेने मुजाहीम न होणें. या बाबी ताकीद फार जाणून लिहिलेप्रमाणें अमलात आणाव.

(सनदेचे पाठीवरील शेरा.)

अकी याददास्त अर्ज तारीख २९ सवाल सन ४ जुलूस. बरहुकूम परवाना दाउदखा याचा मौजे चिखली व मोरगाव, अमल परगणे हवेली पुणे, सरकार जुन्नर, सुभे खुजिस्तेबुनियाद जमा मुबलग चार लाख पचेताळीस हजार दाम मुकरर आहेत. दौलतमनखा याचे मृत्य पावले पासून व भगवतराव वल्लद विनयाजी याजकडून दूर जाहल्यापासून मोरोगोसावी यांस इनाम मैफरजदा मुक्रर आहे. त्या परवान्यावर अल्लीशान दियानतखा दिवाण तारीख १४ जिलकादचा हसील करून घेण्याविशी उमेदवार आहे कीं परवाना दफ्तर सदारतींतून मिळाला पाहिजे.

शेरा दसखत खैरखा रिशादतखा याचे हकीकतीचे यादीवर जाहला कीं.

नवाब दाउदखा यास कीं गोसावी मजकूर कुटुंब फार ठेवीत आहे व आले गेले मुशाफर फकीरं वगैर लोकांची खबर घेत आहेत. यास्तव दोन मौजे त्यास बफरजंदा मुकरर केले आहेत.

त्याजवर परवाना विजारतपन्हा दियानतखा याचा हसल केला. यास्तव पातशाहाचे डोकीचा उतारा सनद त्याचे नावें बफरजंदा द्यावी.

मौजे चिखली दौलतमनखा हे मृत्य भगवतराव याजकडून दूर जाल्यापासून. पावल्यापासून.

शेरा दियानतखा दिवाण याचा तारीख १४ जिलकाद सन ४ अंकी.

गुमास्ते हाय जिल्हेदारान व फौजदारान व जाहगिरदारान व करोडीयान व देशमुखान देशपांडीयान व मोकदमान व रयत व शेत करणार परगणे पुणें, सरकार जुन्नर, सुभे खुजिस्तेबुनियाद जाणावें की, मौजे चिखली, दौलतमनखा हे मृत्य पावल्यापासून व मौजे मोरगांव अमल परगणे मजकूर भगवतराव याजकडून दूर जाहल्यापासून जाहगीर दादउखा यास तनखा होऊन देहात मजकुरास चार लाख पचेताळीस हजार दाम जमा ३६९५ रुपये आहेत. ते पातशहाचे डोकी उतारा मोरो गोसावी यास इनाम मैफरजदा मुक्रर करून सनद आपले मोहेरनिशीं दिल्ही. यास्तव त्याजला पाठीवर लिहिल्याप्रमाणे मौजे मजकुरास बरहुकूम सनद अमारत मरतबत मशारनिल्हेचे खर्चास चालवावें ह्मणजे फकीर फुकरा गरीब गुरीबास आल्या गेल्या मनुष्यास खर्चाचे गुजाऱ्याचा करून दौलतीस दुवा आशीर्वाद देऊन राहतील व कोणते बाबीची तसदी फौजदारी वगैरेची मुजाहीम न होणें

(मुक्रर शेरा.)

मौजे चिखली व मोरगांव, परगणे पुणे, सरकार जुन्नर, सुभे खुजिस्तेबुनियाद जमा चार लाख पंचेचाळीस हजार दाम त्याचे ३६९५ रुपये आहेत, ते दौलतमनखा मृत्य पावलेपासून व भगवतराव वल्लद विनयाजी याजकडून दूर जाहल्यापासून जहागीर अमारतपन्हा दाउदखा यास तनखा जाहली. दरिविला अमारतपन्हा देहात मजकूर मोरो गोसावी यांस इनाम मैफरजदा पातशहाचे डोईचा उतारा आपले जहागीरींतून मुकरर करून सनद ता. २९ सवाल, सन ४ जुलूसची दिल्ही की, फकीर व गरीबगुरीब वगैरे आल्या गेल्याचे खर्चाचा गुजारा करावा येविशीं अर्ज सनद दिवाणीची मिळण्याचा ठेवीत आहे या बाबीं कांहीं मुकरर व्हावें.

(शेरा दसखत.)

नायब शाहादत व विजारत मरतबत अकी बरहुकूम सनद अमारत मरतबाचे कीं सनद द्यावी

तारीख २७ जिलकाद, सन ४ जुलूस

रोजीं नक्कल सदारतीचे दफ्तरात

पोहोंचली.

---

६२ शहाअलम बादशाहा यांनीं दिलेली सनद.

गुमास्ते जहागीरदारान व जकातदारान वर्तमान भावी परगणे बुधगांवचेगांव व मलवडी

व कलेढोण, तांबे सुभा दारुलजफर विजापूर यासी आज्ञा केली जाती जे:–श्रेष्ठ आहे डौल ज्याचा व सुदैववान व सेवकाचे धनी व पृथ्वीपती व एकदर घरातील राहणार मनुष्याचे व घराचे मालक व विश्राति व सुखाचे आश्रय व पृथ्वीतील सर्व मनुष्याचे सुखविश्रातीचें कारण, सर्वांवरी ईश्वराचे कृपेचे छायेचें पात्र व निरिच्छपणानें स्वामित्वाचा अधिकार वागविणार ईश्वराचे कृपेचें प्रसिद्धिस्थान व परमेश्वराची केवळ सकळ कृपाचें व पृथ्वी हस्तगत करण्याचे कार्यद्याचें स्थान व पृथ्वीपालन करण्याचा विचार करणार असे जे शहाअलम पादशहा याचे तारीख २७ माहे सफर सन तख्तावर बसल्याचा ३ चे फरमानाप्रमाणें, परगणे मजकूरची फौजदारी व ठाणेदारी, उच्छिष्ट पात्राचा परित्याग केल्याचे पुन्हा ग्रहण करीत नाहीत त्याप्रमाणें, पदाजी वल्लद झुजारराव यास मुकरर करून दिल्ही असे तरी अधिकारी व अमलदार व सरदेशमुख व देशमुख व मोकदम व रयत लोक व शेतकरी व सदरहू महालातील राहणारे एकदर लोक याणी त्याजला ह्मणजे पदाजीराव यास फौजदार व ठाणेदार पक्के समजून,ते सागतील तसें त्याचे आर्जेत वागून फौजदारी व ठाणेदारीची सर्व कामें त्याचे हवाली करावी, व फौजदार मजकूर याणीं अशा मार्गानें काम चालवावें की, एकएक मनुष्यास बहुत सख्यत्वानें राजी ठेवून,ज्या योगें सरकारची किफायत होईल तें करीत जावें, आणि ठाण्याचा बदोबस्त पक्का ठेवून शत्रूचें पारपत्य करीत जावें. व आपली हद्द कायम करून त्या तर्फेत पादशाहाचे जे सेवक सरकारी कामास मदत मागतील ती करावी. या प्रकर्णी ही पूर्ण ताकीद समजून यात लिहिलेप्रमाणें वहिवाट करावी. ता. १९ माहे रविलाखर. अति कल्याणदायक तख्तावर बसल्याचा राजशक ३ रोजीं ही सनद लेखन जाली पादशाहाचे वजिराचे स्वदस्तुरची खास निशाणी ९

फारशी सनदेचे पाठीमागील फारसीचा तरजुमा निम्न लिहावा.

निम्नातील तात्पर्य असें आहे कीं, पदाजी झुजारराव याचें नावें फौजदारी व ठाणेदारी काम उछिष्ट पात्राचा त्याग केला तें पात्र जसें पुन्हा स्वीकार करीत नाहींत त्याप्रमाणें परगणे बुध पाचेगाव व मलवडी व कलेढोण, सुभा दारुलजफर विजापुर येथील फौजदारी व ठाणेदारी दिल्ही असे.

१ दफ्तरचे दाखल्याप्रमाणें आहे कलम. तीन महाल मुकरार.

१ दफ्तरचे दाखल्याप्रमाणें आहे कलम

फौजदारी व ठाणेदारीचें दफ्तरीं या सनदेची प्रत घेतली असे.

तारीख २९ माहे रबिलाखर, सन जुलूस ३.

---

६३ बुलालंग देसाई यास मिळालेली सनद.

फरमान हुमायून शर्फ सुदुयात्फ बजानीब कारकुनानें बेशमी बुलालंग देसाई तोरगळ व देशपाडे याणीं तन्हेतन्हेचे हजार बैल वगैरे आपल्याबरोबर घेऊन व नाईक कितीएक बैलाचे बरोबर होते ते आले. इसम नेहन नाईक बैलाचे बरोबर पाणराचे जागेत गवत व कचरा

दुरस्त केला आणि नाव नरेंद्र काइम केलें. याजकरिता बैलाची व सोळा खेडीं नवीं वसविलीं आणि शिकदर पाछाचे नजीक जाऊन त्याची भेट घेतली, आणि बैलाचा मजकूर व नदीची हवाल व जंगलची हवाल व सोळा खेडीं वसविलीं आणि कसबें नरेंद्रमध्यें राहणेंचा बयादवार हुजूर अर्ज केला आणि पाछाची मर्जी फार नाजक होती याजकरितां हत्ती मस्त होऊन वेडा जाहला होता, त्याजबरोबर बुलालग देसाई यार्णी लढाई केली. तेव्हा पाछाचे सर्व लोकांनीं आश्चर्य केलें. हत्ती मजकुरानें देसाई यास सोंडेमध्यें धरलेमुळें त्यास ताकत कांहीं राहिली नाहीं. त्या वेळेस त्याचा खिदमतगार त्याचे जवळ होता. त्याणें आपले साहेबाची हवाल पाहून त्यास आठवण दिल्ही कीं, साहेब आपले कंबरेस काय ठेविलें आहे? हें ऐकून त्यास आठवण जाहली. तेव्हा पेशकबज त्याचे कबरेस होतें, तें ओढून हत्तीचे सोंडेस मारिलें. तेव्हां हत्तीनें त्यास सोडून दिल्हें. तेव्हां पाछानें त्याची ज्याहामर्दी व बाहादरी पाहून आपलेजवळ बोलावून बहुत पोषाख रेशमी चागले इनाम दिल्हें. व खर्चास सोळा खेडे पाछाचे मोहोरेनिशीं व इनाम हमेशा देसाई बुलालंग यास यादवाड व मुळमुतल इनाम काइम केलें, व तोरगळ देशपाडे या कसबेमध्यें राहावयास (सांगितलें) हसील साल दरसाल आपले जरूरीस खर्च करून राहाणें. "

६४ रणदुल्लाखानाचे दायऱ्यास इनाम.

" दायरा रणदुल्लाखान मुक्काम कसबे रहिमतपूर, संमत कोरेगाव, प्रात वाई येथें आहे. ते जागा कदोरी, दिवाबत्ती, ऊदफूल चालिलें पाहिजे. हरबद्दल कसबे रहिमतपूरपैकीं इनाम जमीन खालसा पडपैकी दायऱ्यानजीक स्वराज्य व मोगलाई आमल देखील एक दुतर्फा, छ ३ रबिलाखर इनाम करून दिल्ही जमीन बिघे ८५०. "

६५ पातशाहा याचे मशिदीस इनाम

" यादी बहादुरशा पातशहा याची मसीद औरंगाबाद येथें किल्ला आरळा येथें आहे. तेथील दिवाबत्ती ऊदफूलें वगैरे खर्चाबद्दल कसबे हरसूल, परगणे मजकूर सरकार दौलताबाद येथें इनाम जमीन बिघे. "

६६ आनंद जानवे घालणार यांस दिलेली सनद.

मुत्सदी लोक काम करणार हल्लीचे व पुढें होतील ते, परगणे सुलतानपूर, तावे सुभे खानदेश यार्णी जाणावें की, जाहीर जाले ऐसीजे:-आनद जानवें घालणार राहणार कसबे व्यास हे वैद्यपणात फार निपुण आहेत आणि फकीर वगैरे आजारी लोक यांचा इलाज करितात. व त्यास आपल्या पदरचीं औषधें देतात व कोणापासून कांहीं एक घेत नाहींत व सियादत व विजारत व एकबलपन्हा सैद हुसेन दिवाण व वगैरे जाहागीरदार लोक याच्या सनदाप्रमाणें कसबे आमले परगणे मजकूरपैकीं सुमारी ४० बिघे जमीन गजइलाहीनें पडित जमा खेरीज

लायक जिराईत याजला निर्वाहावरिता लेंकराचे लेंकरीं इनाम मुकरर आहे, व ती याच्या कबजांत व वहिवाटींत आहे. ह्मणोन दरिविला तशीच याच्या चागल्या चाकरीवर नजर करून जमीनमजकूर सर्व कदीम महालातील पूर्वील दस्तूरप्रमाणें बहाल व कायम केली असे. यास्तव पाहिजे की, जमीन मजकूर कबजात व वहिवाटीत जानवें घालणार मजकूर याजला लेंकराचें लेंकरीं पाठीवर लिहिल्याप्रमाणें देणें. ह्मणजे उत्पन्न तेथीलचें आपल्या निर्वाहास व आजारी लोक याच्या औषधास खर्च करून, आशीर्वाद हमेषा दौलतीस देत जातील. या बाबदीत ताकीद मजबूद जाणोन हुकूमाचा आक्षेप न करणें. तारीख १ माहे जमादिलावल सन ३५ जुलूस.

मुकरर शेरा पाठीवरील खास दस्तखताने पोंचलेले यादीप्रमाणे हकिकत ऐसी जे, बेशमी आनद जानवें घालणार राहणार कसबे व्यास आमले, परगणे सुलतानपूर, हे वैद्यपणांत फार निपुण आहेत व फकीर वैगेरे आजारी लोक याचा इलाज करितात, व आपल्या पदरचीं औषधे खर्च करितात. व कोणापासुन काही एक घेत नाहीत आणि दिवाण वैगेरे जहागीरदार लोक यांच्या सनदाप्रमाणे कसबे मजकूरपैकी सुमारी ४० बिघे जमीन गजइलाहीनें जमा खेरीज याजला निर्वाहाकरिता इनाम मुकरर आहे. या बाबदींत जो हुकूम होईल तो. शेरा खास दस्तखतानें यादीवरील हकिकत ऐसीजे परवाना लिहावा.

---

६७ मोरया गोसावी चिंचवडकर यांस मिळालेली सनद.

(तरजुमा फारसीचा मराठीत)

कोणी दिल्हें त्यांचें नांव बरोबर समजत नाही. तारीख २६ रबिसानी सन ४ जुलूस रोजीं आपले मोहरेनिशीं करून दिल्हें त्याचा तरजुमा.

मोहरेतील अक्षरें

(बरोबर समजत नाहीत.)

दस्तक बनाम गुमास्ते हाय व फौजदार व शेत करणार अकी मौजे चिंचवड, परगणे पुणें, मोरो गोसावी चिंचवडचे राहणार आहेत, व गोसावी मजकूर आल्या गेल्या फकीरफुकरा वैगेरे जे कोणी येतील जातील, त्यास अन्न व पाणी वैगेरेची खबर ठेवीत आहेत व खुद्द आपणही फकीर आहेत. यास्तव कोणतेही सबबेनें त्याजला तसदी न होणें. दरीबाब ताकीद तमाम जाणावी.

---

६८ सैद जमालीक वलद सैद शुकरूल्ल यास मिळालेली सनद.

"ह्या चागल्या दिवसांत थोर पदवीचा फरमान सादर जाला की, कसबे व देहे परगणे दिंडोरी, सरकार संगमनेर सुभे खुजस्ते बुनियाद पैकी पचेताळीस ४५ बिघे जमीन गजइलाहीनें त्याजपैकीं पधरा १५ बिघे जमीन जिराईत केलेली, आब्याचे झाडी सुद्धां, व

तीस बिघे जमीन पडीत जमाखेराज लायक जिराईत * * * व एक मण गल्ला जम खेरीज साल दरसाल मशिदीचे दुरुस्तीकरिता रामेश्वराचें देऊळ मोडून मशीद बांधली आहे * * * सैद जमालीक वल्लद सैद शुकरुम याजला वंशपरपरा व शिष्यपरंपरा या परवा न्याचे पाठीवरील शेरा लिहिल्या बरहकुम मुकरर केली असे. यास्तव पाहिजे कीं, हकीम अमलदार व जाहगिरदार व करोडी वर्तमान व भावी यांनीं जमीन मजकूर मोजून व च बांधोन व एक रुपया व एक मण गल्ला मजकूर खर्चाकरितां याजला देत जाणें व कधींह यासी तगीर व बाद न करणें * * * सरकारचे सारे व सायर खर्चाबदल दहीहंडी नजराणा व जरीबना व जाबता व महसीमना व मोहाराणा व दारोगाना व बिगार शिकार व मोकदमी व कानुनगोई व चकनामा पाहिल्यानतर दरसाल जप्त करणें. तक्रार जिराइती व सर्व प्रकारें हरकती दिवाणी व बादशाही कामाबद्दल यासी अटकाव करणें. व या बाबतींत दरसाल नवीन सनदेची तलब न करणें, व जर दुसरे महालीं कांहीं असल्यास * * * इतवार न करणे तारीख १२ माहे रजब, सन ३७ जुलूस यांत लिहिला असे.

वाक्याचे यादीचा शेरा तारीख २१ माहे रविलेावल, सन ३७ जुलूस * * * मुताबक सन आजूर माहे इलाही रोज गुरुवार प्रमाणें रिसाल्यांत सियादत विन्याबत पन्ह सद्र रफी उलकद्र सियादतखान याचे व नौबत वाक्यानवीस कम तरीन बदगान * * * याचे कलमी होतात कीं, हुजूरास अर्ज पावला ऐसाजे:—सैद जमाळीक वल्लद सैद शुकरु याणी कसबे दिडोरी सरकार सगमनेर, सुभे खुजस्तेबुनियाद येथील रामेश्वरा (चें) देऊव होतें तें महमदनुर लसगी याणी मोडिलें आणि तेथें मसीद बांधली आहे. त्यास परगणे व सरकार व सुभें मजकूरचे देहेपैकी साल दरसाल एक रुपया व एक मण गल्ला वसूल करून मशिदीचे खर्चाकरिता व निवाहास काही मुकरर नाही म्हणोन बादशाही मेहेरबानीचे * * * आहे की काही जमीन जिराईत केलेली जी मशिदीच्या भोंवताली आहे ती मिळावी. या बाबदींत जो हुकूम होईल तो त्याजवरून बादशाही हुकूम सादर जाला की पंचेताळीस ४५ बिघे जमीन गजइलाहीनें मशिदीच्या भोंवतालची व १५ बिघे जमीन जिराईत * * * पडीत जमा खेरीज लायक जिराईत व एक रुपया व एक मण गल्ला, जमा खेरीज साल दरसाल परगणे व सरकार व सुभे मजकूरचे हरएक देहेपैकीं मशिदीचे मन्हामतीकरितां मशारनिल्हे याजला वंशपरंपरा व शिष्यपरंपरा पाहून व समजून दिल्ही असे. व जर दुसरे महालीं कांहीं असल्यास त्याचा इतबार न करणें. ताराख २७ माहे सफर, सन ३७ लस दाखल्याप्रमाणें कलमीं जाला. शेरा खतानें सियादत व नकाबतपन्हा जुमदेतुलमुलुक मदारुल मोहाम असतखान याचा ऐसाजे, दाखल वाक्यांत करावा. शेराखतानें सियादत व नकाबतपन्हा सद्रफीउलकद्र सियादतखान याचा ऐसाजे. दाखल वाक्यांत करावा शेराखतानें * * * याचा ऐसाजे. वाकेप्रमाणें आहे

शेराखतानें उमदे उजराय रफीउशान जुमदेतुलमुलुक मदारुल मोहाम याचा ऐसाजे. दुबार अर्ज पोचवावा. शेराखतानें सियादत व नज्याबतपन्हा शरीफखान याचा ऐसाजे. तारीख २ माहे जमादिलोवल, सन ३७ जुलूस यांत दुबार अर्ज हुजूरास पावला. शेराखतानें खान सुजाअत निशान जुमदेतुलमुलुक मदारुलमोहाम याचा ऐसाजे. थोर पदवीचा फरमान कलमीं करावा.

मशिदीच्या भोंवतालची जिराइत केलेली जमीन जंगली आंब्याचें झाडासुद्धा बिघ ४५. दर मोजे पैकीं साल दरसाल. एक रुपया व एक मण गल्ला.

रबी हगामपासून कसबे मजकूरपैकीं जमीन जमा खेरीज लायक जिराईत.

६९ गोसाजी जाधव पाटील यांस महजर.

सदर माहाजर अल्ली ही * * * बशतद्रक्ष हाजर बिज्यापूर जमर उबराव नदी आठरा, परगणे तिनशें, साठ किले, बत्तीस महाल, सत्तावीस घाट, साहा सुभे दक्षण, बारा वजीर, अष्ट प्रधान, बावीस उमराव, सब नाईक ल्हान थोर क * * * री नांवनिशी बितपशीलवार * * * * * * ता सदरलोक

१ खवासखान सरदेसाई.
१ भगवंतराव वाकनीस सर * *
१ रसुलबेग रवळे सर * *
१ नबीसाहेब वळे सर * *
१ घनःशामराव नाडगौड सर * *
१ आबदुल नबी कोतवाल सर * *
१ रायणा नाटकर सर * *
१ सयदखान कोतबाल सर * *
१ भानजी आणाजी देशपांडे.
१ रेणोराव कानगो सर * *
१ मुसरपा नाइकवाडी सर * *
१ चादबाई मुलाणा सरदे * *

हा मजकूर सुरुसन ९५० रविवार इणमरगाण नक्षत्र ते दिवशीं सब नाइक बहुर गांव परगणे याचे वियमानें लेहून दिल्हा ऐसाजे, सदर * * साने मौजे बडलें नजीक * * घुमर किनार ताडल आमोल परगणे मालसरा * * * कचेरी करड तख्त मजकूर येथील फकनान पर या गौसाजी वला**जी जाधव पाटील मोकदम मौजे मजकूरची पाटीलकी करीत हो * * तो गांव नातावाणिकीस आला. दुष्काळ पडला. बाकी द्यावयास कांहीं आवकाश नाहीं. करार व्हाण १२५ सवाशें राहिलें. सरकारांत हुजूर विदित जाहलें ह्मणोन ब * * * आलपना यांणीं हारकरहार वजा केले. मग बेशमी गोसाजी जाधव यास * * * करून तख्त मजकूरास आणून तळवें मार देऊं लागले व राखेचे तोबरे. बाकीकरितां वो(ओ)लिस ठेविला. राजश्री देशमुख व देशपांडे यांणी बादशाहापाशीं अर्जी केली. मग गोसाजी कबूल

जाहला कीं, मी आपली बाकी वारितों ह्मणोन राजी जाहला. मग त्याणें * * * वस्तभाव इकरा घालून करार व्हाण सवाशें वारलेस ह्मणोन बादशहा आलपन्हा यांणीं * * * दर माहाजर करून दिलाजे, मौजे मजकरंची पाटीलकी तुझी तुला माफ असे. मोकदमीच्या मानपानाची नांवनिशी बितपशीलवार:—तपशील.

होळीस पोळी.
फरे मुडीं.
दसऱ्याचें बकरें.
सरकारची पट्टीपासोडी.

घटवात.

१ कुंभारास खण.
१ घेण.
१ इनाम जमीन बिघे ३०.
१ जिराइत जमीन चाहूर २.
१ घुगरी चाउरी -।-
१ शेतास पाळभारा १
१ हुरडा कबड १.
१ मोकदमीचा गरइच्हाम.
कलमी सुध असे.
१ चांभारास जोडा.

ज्वडाळ खर्डा जमीन चाउ * * ७७ च
१ सवासीन गवर.
१ शेव. भाजी.
१ तेलधार
१ वटवल

फसकीं विड्याचीं पानें.

१ पोळ्याचा बैलाचा मान.
१ जुलाइ मागास घडी.
१ पाय तादूळ.
१ राबतां माहार.
१ मांगास नाडा.
१ हक्क घेणें.

येणेंप्रमाणें आपली मोकदमी खाऊन सुखरूप राहाणें. राजश्री देशमुख व देशपाडे यांचे आज्ञेप्रमाणें चालणें कोणी तकीशात कुफरान करून आपली मोकदमी म्हणेल, तो दिवाणाचा गुन्हेगार असे. वशपरपरा आपली मोकदमी खाऊन पांढरीची नफरत करून राहणें. हा माहाजर कोणी बतील करील तो बापाचा पुत्र नव्हे. आपला कुळक्षय करील. मुसलमान होऊन मोडतील त्यास सोराची सोगद असे. हिंदु होऊन मोडील त्यास गोहत्या घडेल. काशीस मात्रागमन घडेल. त्यास मागामाहराचे वस्त्राची शपथ असे. देशमुख व व देशपाडे व पाटील कुळकर्णी यासी सदर ताकीद असे. हा सदर माहाजर लेहून दिल्हा असे. तारीख छ १२ माहे सफर ओळी सुमार ९६.

पत्राप्रमाणें साक्ष असे.

१ नरसिंगराव माने देशख परगणे मोजे वावीगांव.
१ धनाजी ताटे देशख परगणे काशेगांव.
१ बनाजी निंबाळकर.
१ बाजी देशख परगणे कन्हाड.
१ संताजी मागठाल देशख्त पाटील.

१ रावजी बाजी देशमुख परगणे आघळी स्वेकरड देशख कसबे नाशर. देशख परगणे आटपडी.
१ गंगाजी नाइक देशख तर्फ वदेश * * * पादेश * * *.
१ रायापा देशख परगणे चीकुरडी.
१ बसापा देशख परगणे हुकेरी
१ सिरजेराव घाटगे देशख कसबे कागल.
१ रंगराव देशख परगणे रासन.
१ सताजी देशख लोणी काळभोरकर.
१ विठोजी काटे देशख कसबे बारामती.
१ माणकोजी देशख तपावगी.
१ बसापा देशख कसब बन्नूर.
१ मुरारराव देशख कसबे मुदाल.
१ नरसिंगराव देशख कसबे आक्कलकोट.

साक्ष सरकार लोक.

१ कुशापा शबरा किल्ला परांडा निसबत पेशकबज.
१ रमदुल्लाखान किल्ला रहिमतपूर निसबत पेशकबज
हरोनी नयमेश किल्ला नगर निसबत पेशकबज.
१ नफर दिवाणसाहेब निसबत पेशकबज
१ निबी रसुलसाहेब निसबत पेशकबज.
१ रमदूल सायब किल्ला धरूर निसबत पेशकबज.
१ सदय महमूद साहेब बागलकोट निसबत पेशकबज.
१ हुसेन बेग साहेब निसबत पेशकबज.
१ दगुरराव दिवाणसाहेब निसबत पेशकबज.
१ मनुरखान साहेब निसबत पेशकबज.

शिक्का फारसी अक्षराचा अर्धा फाटका

साक्ष मौजे मजकूर

१ * * लघाळा याण देशख मजकूर.
१ कान्होजी पाटील व गयाड निसबत.
१ धुलगौडा पाटील मौजे परेड सरस निसबत.
१ दरगौडा पाटील मोजे खुटबावी निसबत.
१ शेकाजी ठाणु पाटील मौजे खुडस निसबत.
१ सुभानजी जगताप चौगुले निसबत .
१ शकोजी माने पाटील मौजे गिरजणी, निसबत
१ माणकोजी खरात पाटील मौजे निसबत
१ शेटचाजी पाटील मौजे मालगबी निसबत.
शेटी न्हावी निसबत.
१ नागनाक महार निसबत.

(कागद फाटला आहे.)

---

७० मोरो गोसावी चिंचवडकर याची सनद.

(तरजुमा फारसीचा मराठींत.)

सैद बागन फिदवी महंमद फरोखसियर पातशहा गाजी यांणीं आपले मोहरेनिशीं सनद तारीख १ जिल्हेज सन ७ जुलूस रोजीं करून दिल्ही त्याचा तरजुमा मराठींतः—

सैद बागन फिदवी महमद फरोखसियर
पातशाहा गाजी ११२७.

देशमुखान व देशपाडीयान व मोकदमान व रयेत व शेत करणार मौजे चिंचवड, परगणे पुर्णे, सरकार जुन्नर सुभे खुजिस्ते बुनियाद व मुत्सदीयान इजानिब यांस जाणावें कीं, मौजे मजकूर बरहुकूम सनद हुजूरची जाहागीर सरकार तनखा आहे. सन ११३० हिजरीपासून हक्क एक दस्तगा मोरेश्वर गोसावी यांस अखत्यार देऊन बाहाल ठेविलें असे. यास्तव कोणेचेही सबबेनें मशारनिल्हेस मुजाहीम न होऊन बाहाल ठेवावें की, उत्पन्न त्याचे हांगामशीर साल दरसाल आपले खर्चांत आणीत जातील. या बाबी ताकीद फार जाणून लिहिलेप्रमाणें अमलात आणावें.

७१ अमृतराव देशपांडे यांस दिलेलें निवाडपत्र.

यादी अमृतराव भगवत देशपाडे, सरकार जुन्नर याचे नावें निवाडपत्र कीं, हरी कृष्ण, पचवीस तीस वर्षांचे उमरीत वतनाचा कारभार करू लागले. कृष्णाजी नानो याची स्त्री वारली होती. ते माहायात्रेस गेले. मागें हरी कृष्ण कागदाचा शिरस्ता वारावयाकरितां औरंगाबादेस गेले. तेथे शरीरीं व्यथा बहुत जाली. त्याच सधीत निराजी रावजी, शिवाजी महाराज याजकडून वकिलीस आवरगाबादेस गेले. तेथें वतनाविशी सनद घ्यावयाचा उद्योग करून, मकरमतखान दिवाण याजपाशीं गैरवाका समजाऊन, आमचे वडील त्रिंबक हरी यांजकडील गुमास्ते हिशेब वारावयास गेले होते त्यास आठक करविली. हें वर्तमान त्रिंबक हरी यांनीं आपले नावें आवरंगजेब पातशहाचा फर्मान करून आणावयाकरितां आणाजी विठ्ठल गुमास्तें दिल्लीस पाठविले होते, त्यास लिहिलें. त्यानी फर्मान करून घेतला व हाही अर्ज पातशहास केला त्याजवरून जाफरखान वजीर यास हुकूम जाला. त्यानीं मकरमतखान दिवाण यास गुमास्त सोडून देणें, निराजीस सनद दिली असेल ती माघारी घेणें, याउपरी दक्षणप्रांतीचे देशमुख व देशपाडे याची तागिरी बगर हुकूम न करणें म्हणून पत्र दिल्हें. त्या पत्रावरून निराजी रावजी याची खटपट चालली नाहीं. त्रिंबक हरी यांचें वतन याजकडे सुरळीत चाललें. फिरोन शंकराजी विठ्ठल नगरकर वतनावर उठला. तेव्हा त्रिंबक हरीची स्त्री, द्वारकाई, कृष्णाजी व त्रिंबक हरी यांस घेऊन आवरगजेब पातशहा यांचे लष्करात गेली. त्यावर हाडे देशमुख व चहू परगण्याची रयत यानीं पारनेरी जमा होऊन, हे देशपाडे कदीम आहेत. शंकराजीस वतनासी तालुका नाहीं, म्हणोन आपलाल्या दस्कत व शिक्क्यानसीं सुरतहाल करून लष्करांत पाठविला शंकराजी खोटा पडला. द्वारकाई व कृष्णाजी व त्रिंबक हरी जुन्नरास आलीं. उपरांत चंद्रसेन जाधवराव याणी जन्नर लुटून जाळलें. ते समई असदखानाची सनद वगैरे कित्येक वतनसमधीं कागद पत्र होते ते गेले. त्या दग्यामुळें लोक परागंदा जाले.

चंद्रसेन जाधवराव यांचे दग्यांत आमचे वडील परागंदा होते. ते जुन्नरास आल्यावर त्यानीं आडथळा करावा तर मोंगलाई आमल होता. तोंपर्यंत स्वराज्यात येणें जालें नाहीं. देशमुख व देशपाडे यांणीं कबिलेसुद्धा किल्ले शिवनेर येथें अगर गढींत राहावें. तेथें कबिले ओलीस ठेऊन दिवसा बाहेर कारभारास यावें. रात्रीं किल्ल्यावर अगर गढींत जावें, ऐसा बंदोबस्त होता. मोंगलानें देशमुख व देशपाडे याजपासून जमाबदीचे तोटे भरून घ्यावे. तो ऐवज कर्जे मिळालीं तोंपर्यंत आमचे वडिलीं कर्जे घेऊन दिल्हा. कर्ज न मिळे, तेव्हां वतनें विकून पैका दिल्हा. कृष्णाजी हरी वारल्यावर त्रिंबक हरी यास महारोग झाला. त्यांनीं मोंगलापाशीं बजिदी करून आमचे तीर्थरूप भगवतराव यासी किल्लयावर ओलीस ठेऊन आपण आमदानगरास वैद्य उपाय करावयास गेले. तेथून खेडास येऊन मृत्य पावले. त्याचे क्रियेस आमचे तीर्थरूप भगवतराव यास एक महिना परवानगी न होय, तेव्हा जामीन देऊन शहरास येऊन क्रिया केली. त्यांजबराबर ढालाईत होते. त्यानीं नदीस न्यावें. तेथून घरास येऊन जेऊं घालून फिरोन गढींत नेऊन बसवावें असी संकटे. प्राण जगवावयाचे कठीण तीर्थरूपही लहान सोळा सतरा वर्षांचे होते. याजमुळें वतनाच्या बदोबस्ताचे घडलें नाहीं. पुढें सन ११४८ चें सालीं श्रीमत कैलासवासी आपासाहेब याची स्वारी वसईस जाता मौजे मढ, तर्फ मजकूर येथें मुक्काम जाला. तेव्हा मोंगलाकडील दखणीमिया व नरसो कुकाजी भेटीस आले. त्यास जुन्नरचे जमीदार भेटीस आणावयाची आज्ञा जाली. त्यानी मोंगलाची परवानगी जमीदारास शहराबाहेर निघावयाची नाहीं ह्मणोन विनति केली. तेव्हा तुह्मी बाहेदारी देऊन घेऊन येणें, आणाल तसे माघारे घेऊन जाणें, ह्मणोन आज्ञा जाली त्याजवरून नरसो कुकाजी यांनीं मोगलापाशीं बाहेदारी कबूल करून, देशमुख, देशपाडे, शेटे, माहाजन वैगरे भेटीस आणिले ते समई देशमुख व देशपाडे याजकडे नजर साहा हजार रुपये करार केले. मोगलाई अमलातील कसाला न सोसे, याकरिता आमचे तीर्थरूप भगवंतराव आमचे मातुश्रीस किल्लयावर ओलीस ठेऊन, बाहेर निघोन मल्हारजी होळकर वाफगावचे पाटील ह्मणोन त्यांजकडे गेले. त्याचे विद्यमानें महमुद अलमखान किलेदार यास अडीच हजार रुपये खंड देऊन आमचे मातुश्रीस दोन तीन वर्षांनीं सोडऊन आणून कसबे खेड येथें येऊन राहिले. "

---

७२ श्रीदेव रामेश्वरास नैवेद्य नंदादिपाबद्दल इनाम जमीन.

श्रीदेव रामेश्वर मुकाम मौजे कुमठें, तर्फ सातारा येविशीं राजश्री नारोराम मंत्री यांणीं विनंति केलीजे. श्रींचें देवालय ताबरानीं मोडून विध्वंस केला. तें आपण बांधोन श्रीचा जीर्णोद्धार केला आहे. ऐसीयास श्रीस नैवेद्य नदादिपाबद्दल काहीं इनाम जमीन देऊन चालविलें पाहिजे. त्यावरून मनास आणून मोजे कुमठें तर्फ मजकूर येथें नूतन पड जमीन स्वराज व मोगलाई एकूण दुतर्फ. छ २३ जिल्काद.

इनाम जमीन बिघे८१०.

---

७३ सुभानजी बिन सोनजी इबिन रावजी मोरे यास मिळालेलें वतनपत्र.

सुभानजी बिन सोनजी इबिन रावजी मोरे मोकदम, मौजे देवराष्ट्रें, कर्यात वांगी, प्रांत पन्हाळा यासी दिल्हें वतनपत्र ऐसेजेः—तुझी आई दुलबाई मोरीण कसबा मिरज, प्रांत मजकूर येथील मुक्कामीं हुजूर येऊन स्वामीसन्निध विनति केली कीं, आपणामध्यें व हणगोजी बिन देवजी मैंद यामध्यें मौजे मजकूरचे पाटिलकीचें भाडण लांगलें होतें. त्यास पेशजी उन्नजेच्या मुक्कामी हुजूर येऊन विदित केलें जे, आपला बरहक्क इनसाफ करून निवाडा केला पाहिजे म्हणून. त्यावरून महाराजांनीं इनसाफ करावयाची आज्ञा राजश्री श्रीनिवास पडित प्रतिनिधी व राजश्री येसाजी भोंसले यांस केली. यावरून उभयतानीं मौजे वाघेरी, परगणे कऱ्हाड येथील स्थळ इनसाफास नेमून दिल्हें. आह्मीं हरदूजण वादे मौजे मजकूरच्या स्थळास गेलों. त्यांस आपलें सविस्तर वर्तमान निवेदन केले. त्यावरून मौजे मजकूरचे पाटील व कुळकर्णी याचा गुमास्ता व खोतवाडी मौजे मजकूर व माहानाड व बलुते मौजे मजकूरचे व भोंवरगांवचे पाटील आपलाले इनसाफास स्थळी मौजे मजकूरच्या आले होते. ते देखील समस्त बैसोन आह्मा हरदूजण वादीयास पुरशीस केली कीं, तुह्मांस दिवाणानीं मौजे मजकूरचें स्थळ इनसाफास नेमून देऊन पाठविलें आहे. त्यास तुह्मी, स्थळी इनसाफ होईल त्यास, राजी असाल तरी राजीनामें लिहून देणें. त्यावरून आह्मी हरदूजण वादे इनसाफास राजी होऊन आपले रजावंदीने राजीनामे लेहून दिल्हे राजीनामे वितपशीलः—

राजीनामा बेशमी हणगोजी बिन देवजी मैंद मौजे देवराष्ट्रें, कर्यात वागी, प्रात पन्हाळा, सुरूसन समान सलासन मया आलफ कारणें लेहून दिल्हा राजीनामा ऐसाजेः—आपणांमध्यें व दुलबाई मोरीण इजमध्यें मौजे मजकूरचे पाटिलकीचें भाडण लागोन हरदूजण वादीये हुजूर गेलों त्यावरून हुजूरची पत्रें घेऊन तुमच्या स्थळास आलो. त्यावरून तुह्मीं बोलिला कीं, हरदूजण मौजे मजकूरच्या स्थळास राजी असाल तरी राजीनामा लेहून देणें म्हणऊन. त्यावरून आपण आपले आत्मसतोषें रजावद होऊन राजीनामा लेहून दिल्हा असे. समाकुळ पाढरीच्या व भोंवरगावीच्या मुखातरें निवाडा होईल. त्यास आपण नवदिगर करूं तरी गोताचे अन्याई व दिवाणाचे गुन्हेगार हा लेहून दिल्हा राजीनामा सही. तेरीख छ २ माहे रबिलाखर १.

राजीनामा बेशमी तुळसाई मोरीण कोम सोनजी मोरे पाटील, मौजे देवराष्ट्रें, कर्यात वागी, प्रांत पन्हाळा, सुरूसन समान सलासैन मया आलफ कारणें लेहून दिल्हा राजीनामा ऐसाजेः—आपणामध्यें व हणगोजी बिन देवजी मैंद यांमध्यें मौजे मजकूरचे पाटिलकीचें भांडण लागोन हरदूजण वादीये मौजे मजकूरचे स्थळास आलों. त्यास तुह्मीं बोलिला जें, स्थळास रजाबंद असला तरी राजीनामा लेहून देणें म्हणून. त्यावरून आपण आपले आत्मसंतोषें राजीनामा लेहून दिल्हा ऐसाजेः—भोंवरगांव व समस्त पांढरीच्य

मुखांतरें निवाडा होईल तेणेंप्रमाणें वर्तों. त्यास नवदिगर करू तरी गोताचे अन्याई व दिवाणाचे गुन्हेगार. हा राजीनामा लेहून दिल्हा सही. तेरीख छ २ माहे रविलाखर १.

येणेंप्रमाणें राजीनामे लेहून घेतले आणि आम्हा हरदूजणांपाशीं वर्तावयाच जामीन मागितले. त्यावरून हणगोजी बिन देवजी मैद याणी जामीन मोकदम, मौजे शेणोली, कसबे कासेगांव, प्रांत पन्हाळा यासी दिल्हे आपण मोकदम मौजे करवें, परगणे कऱ्हाड यासी जामीन दिल्हे त्याउपरी बोलिले जें. तुम्हीं हरदूजण आपलाले करीने कैसे आहेत आणि पाढरीवरी भोगवटे कोण्हाचे कसे आहेत आणि तुमच्या वंशावळी कैशा आहेत त्या तपशीलवार लेहून देणें. त्यावरून आम्ही हरदूजण वादीयानी तकरीरा लेहून दिल्या बितपशील:—

तकरीर कर्दे बेशमी हणगोजी बिन देवजी मैंद, मौजे देवराष्टें, कर्यात वांगी, प्रांत पन्हाळा, सुरुसन समान सलासैन मया आलफ कारणे लेहून दिल्ही तकरीर ऐसीजे:—आपणामध्यें व दुलबाई मोरीण इजमधें मौजे मजकूरच्या पाटिलकीचा कजिया लागला, याज करिता हरदूजण राजश्री पत प्रतिनिधी याजकडे जाऊन आपले करीने सांगितले. ते त्याणीं मनास आणून निवाडीयाकरिता स्थळास पाठविले त्याजवरून तुम्ही हरदूजणापासोन राजीनामे व जामीन घेऊन आपलाले करीने कैसे आहेत सागणें म्हणून बोलिला. तरी आपण आपले आईस विचारिलें कीं, पाढरीचें वर्तमान कैसे आहे तें सागणें म्हणून. त्यावरून तिने सागितलें कीं, आपले वडील सभाजी भोंसले याणीं पाटिलकी केली.तो पाटिलकी करीत असता त्यांस देवाज्ञा जाली. त्याचे पोटी लेंक चौघेजण वडील तुकोजी, त्याचे पाठीचा काळोजी, त्याचे पाठीचा बाळोजी, ऐसे चौघेजण भाऊ त्यांमध्यें तुकोजी वडील तो पाटिलकी करू लागला. ऐसे असता पाढरीचा विनाशकाळ आला मूळ कऱ्हाडीहून रसद विजापुरास जात होती. त्यास रसद मौजे मजकूरच्या रानातून जात असता वाट पडिली चोरांनी रसद नेली. तें वर्तमान विजापुरास गेले. मग तेथून नामजाद आली. ते नामजादीनें काळोजी, बाळोजी या उभयतास जिवे मारिलें. तुकोजी पळोन गेला हमरोजीस धरून विजापुरास नेलें. महंमद सावकार याचे हवाला केलें आणि हुकूम केला की, याजपासून रसदेचा निकाल करून घेणें ह्मणोन तगादा केला. त्यास तो निपुत्रिक होता तो बाटला. ऐस जाहलीयाउपरी गाव वैराण पडिला.त्यावरी कबूलखान दिवाण गावास आले त्याजबराबर हमरोजी आला. गांवास आलीयाउपरी तुकोजी बोलिला की, तू मुसलमानासी मिळोन पाटिलकी करितोस. पाटिलकी मुसलमानाच्या घरास गेली. ऐसें जाणोन तुकाजीनें हमरोजीस जिवें मारिलें. याउपरी दिवाणानें बाहीर निघोन तुकोजीही जिवें मारिला. मग तुकोजीचा लेंक आपाजी भोंसला मौजे शेणोलीमध्यें होता. त्यानें गांवास मुतालीक पाठविला. त्याचें नांव डुबाजी. तो सुरळीत पाटिलकीची मुतालकी करून पाटिलकीचा हक्क, लाजिमा आपाजी भोंसला यास पावता करीत होता. ऐसें सुरळीतपणें मुतालकी करीत असता, डुबाजीस

देवाज्ञा जाली. तों त्याचे पोटी लेंक तिघेजण. सभाजी व सोनजी व नरसोजी ऐसे तिघेजण. त्याजवरी सोनजी शहाणा निघाला तो पाटिलकीची मुतालकी करू लागला. हक्क, दक्क थोडा बहुत भोंसल्यास द्यावा ऐसें बोलिला. मग सभाजी व नरसोजी या उभयतानीं विचार करून बोलिले जें, हा भोंसलीयाचा मिळताऊ आहे. म्हणन सभाजीनें व नरसोजी यां उभयता भावानीं सोनजीस जिवें मारिलें. मग दोघेजण पाटिलकी करू लागले. * * * *

७४ खंडोजी बिन येसाजी दाभाडे यास मिळालेलें वतन.

राजश्री खडोजी बिन येसाजी दाभाडे मोकदम, मौजे गार नजीक दौड, तर्फ रांजणगाव, प्रांत जुन्नर यासी दिल्हें वतनपत्र ऐसीजेः—तुह्मी स्वामीसन्निध किल्ले साताऱ्याचे मुक्कामीं येऊन विनति केली जे, पूर्वी निजामशहाचे कारकीर्दीस दुकाळ पडला होता. महर्ग (ता) जाहाली, दर होनास एक पाइली धान्य जाले. ते सालीं मौजे मजकूरचा मोकदम होता तो समेत कबिला मयत जाला रयतही बारा वाटा निघोन गेली. मौजे मजकूर अगदीं दुकाळाच्या वर्षापासून खराब पडला. वसाहत व्हावी, तरी मोंगलाई व स्वराज्याची धामधूम साल दरसाल होती. त्यामुळें मौजे मजकूरची वसाहत न जाहली. गाव वैराण पडला आहे. हल्लीं मोगलाईकडील व स्वराज्याकडील तह रह जाहला याकरिता रायाजी हाडे देशमुख, प्रांत जुन्नर हे आपणाजवळी बोलिले की, मौजे मजकूर बहुत वरुषें खराब आहे. पूर्वील मोकदम वतनदार कोणी नाहीं. ऐशास मौजे मजकूरचे मोकदमीचें वतन तुम्हांस आपण व देशपाडे मिळोन करून देतों तुम्हीं मौजे मजकरची वसाहत करून कीर्दी माहामुरी आबादानी करणें ह्मणोन. देशमुख बोलिल्यावरी आपण ती गोष्ट मान्य करून, मौजे मजकूरचे वसाहत माहामुरी करावयाची उमेद धरिली आहे. देशमुखानीं मौजे मजकूरचे मुकदमीचे वतनाचीं पत्रें आपणास शके १६४१ विकारी (नाम) सवत्सर, मार्गशीर्ष शुद्ध प्रतिपदा, सन ११२९ ये सालीं करून दिल्ही आहेत. मौजे मजकुरा जमीनजुमला कदीम करार केला. दोरी १८ दर दोरीस चावर १॥ प्रमाणे चावर २७ दर चावरी बिघे १२० प्रमाणें मोकरार तनखा शाही टक्के १३५० साडे तेराशें निजामशाही व मोकदमास हक्क लाजिमा बितपशीलः—

इनाम जमीन दोरी १ एकूण चावर १॥.
तांबोळ्याच्या खुमास दररोज पानें १००.
तेल्याच्या घाण्यास तेल दररोज वजन ४४४९.
चांभाराच्या खुमास सालीना जोडा १.

किल्ला कलम.
१ नांव नागर.
१ घर ठाव.
१ लमास खोंबरेंची वाटी व शेला.
१ शिराळशेट.
१ शिरपाव.
१ टिळा विडा.
१ वाजत्री, दसरा दिपवाळी.

साळ्याच्या खुमास सालीना सरूद १.
धनगराच्या खुमास सालीना चवाळे १.
कोष्ट्याच्या खुमास पासोडी. आडपाळें सालीना १.
शिंप्याच्या खुमास दिपवाळीस चोळखण सालीना ९.
बकरीं कसाई यास दररोज वजन ८८।.
बकालाच्या दुकानास बाजाराचे दिवशीं सुपारी १.

१ मोहरपेस पोळ्याचे बैल.
१ गौर, गणेश.
१ होळीस पोळी.
१ गुढेचा पाडवा.
१ भावईचा दिवट.
१ कोळ्यांचें पाणी.
१ सेल पाटी.
१ वेठ, बिगार माफ.
१ पालभारी
१ फाट्याची मोळी.
१ सेव सबजी
१ बाजाराचे रोजीं गल्ल्याच्या दुकानास फसकी

सदरहूप्रमाणें इनाम दीड चावर व हक्क लाजिमा कलमें येणेंप्रमाणें देशकाचे पत्रीं लिहून दिल्हें आहे परंतु स्वामीचे वतनपत्र आपणास असल्या विरहीत मौजे मजकूरची वसाहत माहामुरी करायास आपणास उमेद धीर होत नाही. तरी स्वामींनीं मौजे मजकूरचे मुकदमीचें वतन आपणास पुत्रपौत्रादि वशपरपरेनें मन्हामत करून देऊन चालविलें पाहिजे म्हणोन. त्यावरून मनास आणन स्वामी तुह्मावरी कृपाळू हाऊन मौजे मजकरचे मोकदमीचें वतन तुह्मास व तुमचे वशपरपरेनें करून देऊन हें वतनपत्र सादर केलें असे तरी मौजे मजकूरचें वतन चतुःसीमापूर्वक आपल्या दमाला करून घेऊन वशपरपरेने अनुभऊन सुखरूप राहणें. छ १९ रजमान, जेष्ठ वद्य द्वितीया, देशमुख व देशपाडे व वतनपत्र ४ वगैरे. '

प्रकरण ३ रें.

शिवाजी महाराजांचे पूर्वज्यांचा ज्यांत संबंध आहे अशीं सनदापत्रें,

१ कानपाठक बिन रामपाठक यास मिळालेली इनाम जमीन.

अजरष्टखान राजमान्य राजश्री येकोजी राजेसाहेब दामदौलत हू तहा कारकुनानी व मोकदमानी कसबे जिती, परगणे पाडिया पेडगाव बिदानद सुरूसन इसने अशरीन अलफ. कानभट बिन राम पाठक कसबे मजकूर हुजूर येऊन मालूम केलें जें, आपणास इनाम चावर १ गज शरायेणी डजे तुको माल पाटील काकडा, मुजेरी कसबे मजकूर देखील नख्तयाती व तालुके देहाय व तालुक ठाणें, वेठी, बेगारी व फर्मासी कलबाब, कुलकानूबद्दल धर्मादाउ अजरामहामती केला असे.बा खुर्दखत राजश्री-आहे.मालूम जाहले. तरी कानभट बिन राम पाठक मुळीया कसबे मजकूर बा खुर्दखत राजश्री प्रमाणें चावर एक व डज तुको माल पाटील तालुके ठाणें व तर्फ देहाये व वेठी, बेगारी कुलबाब, कुलकानूबद्दल धर्मादाऊ मन्हामती केला असे. दर दरसाल खुर्दखताचा उजूर न कीजे तालिक घेऊन अस्सल इनामदार मजकुरापाशी दीजे. औलादी व आफलाद चालवीजे. चावर मजकुरी जैसे बाजे इनामदार जसे ठेवीत असतील तैसें भट मजकूर ठेवितील. इस्कील न कीजे. मोर्तब.
तेरीख १ माहे जिलकाद.

---

२ कानपाठक बिन रामपाठक मुळे यास मिळालेली इनाम जमीन.

अजरष्टखान राजश्री शहाजी राजे दाइमदौलत हू बजानेब कारकुनानी हाल व इस्तकबाल व मोकदमानीं कसबे जिती, परगणे पाडिया पेडगाव बिदानंद सुरूसन सलासीन अलफ. बेशमी कानपाठक बिन रामपाठक मुळया कसबे मजकूर हुजूर येऊन मालूम केलें जें, आपणास इनाम जमीन चावर १ एक गज शरायेनी दरसवाद कसबे मजकूर डज तुकोजी माल पाटील काकडा, मुजेरी, कसबे मजकूर देखील नख्तयाती. तर्फ ठाणें व तर्फ देहाये वेठी, बेगार फर्मासी कुलबाब, लकानू राजश्री—थोरले राजे दिधला. तेणेंप्रमाणें तागाईत सन तिसा अशरीन अलफ, चालत आलीयावरी, साल मजकुरीं कसबे मजकूर साहेबास मोकासा अर्जानी जाला. महालीं कारकून खुर्दखताचा उजूर करितात. दरीबाब खुर्दखत होय. मालूम जालें. तरी यासी इनाम जमीन चावर एक गज शरायेनी दर सवाद कसबे मजकूर बाजे देखील सदरहू बाब हायबद्दल भोगवटे राजश्री थोरले राजे तागाईत सन तिसा अशरीन अलफ चालत आलें असेल, तेणेंचप्रमाणें हल्लीं तुह्मींही चालवणें. औलाद व अफलाद चालवणें. दर दरसाल ताजा खुर्दखताचा उजूर न

कीजे. तुझी तालीक लेहून घेऊन, अस्सल खुर्दखत परतोन यापाशी दीजे. मोर्तबसुद. तेरीख २५ माहे जमादिलोवल.

---

३ सौभाग्यवती भानाबाईस चोळीकांकणाबद्दल इनाम जमीन.

आज्ञापत्र सौभाग्यवती मातश्री जिजाबाई भोसली मोकदम, कसबे जिंती, परगणे श्रीगोंदें, कडेवलीत यानी दानपत्र वतनावर वतनभाऊ आणि पुरातन चाकर एकनिष्ठ याजवर कृपाळू होऊन इनाम जमीन सवा चावर बिघे १५० दीडशें राजश्री विसाजी रंगनाथ सोनट्टके कळकर्णी, कसबे मजकूर याची स्त्री सौभाग्यवती भानाबाई याजवर कृपाळू होऊन चोळीकांकणास म्हणून जमीन नेहर शेरी नजीक शीव बाभूळगाव जमीन बिघे १२०एकशें वीस एकूण चावर १८० एक व मळा कुरण व उराभुडकी जमीन बिघे ८३०तीस एकूण पाव चावर, वोलवा व मोटस्थळ बिघे८४ चार कोरडवाव जमीन बिघे०२६ सव्वीस, एकण सवा चावर जमीन वशापरपरेनें अनुभऊन सुखरूप राहणें एकूण येणेप्रमाणे दानपत्रें अजरामऱ्हामत निधि जल,तरु,पाषाण,चद्र.सूर्यपावेतो अनभवीत जाणे राजश्री रगो गणेश सोनट्टके कुळकर्णी, कसबे मजकूर हे हिशेब मोहसब द्यावयास किल्ले कोडाणा, राजश्री दादो कोडदेऊ याचे घरी भोजनास बोलाविलें. भोजन करून खोलीमध्यें बिछाना करून निद्रा केली पाच सहा घटका जाहलीयावर अंगाची आगी जाहाली. पाणी पाणी करून खोलीत प्राण गेला. खोलीस बाहेरून कुलूप होतें दुसरे दिवशी खोलीचें कुलूप काढून पाहिले तो मृत पावले. प्राण निघोन गेला. असें वर्तमान जाहलें याजकरिता साहेब कपाळू होऊन, दानपत्रे इनाम करून दिल्हीं असे कदीम सेवा केली आहे भोंसले याचे वंशी कुटुंब दाखल याचें चालवोन जे कोणी अतर करील त्यास श्रीवाराणसीची शपथ असे शके १५२६ [क्रोधी] सिध्यर्थीनाम संवत्सरे, माघ शुद्ध सप्तमी, रविवार, लेखनसीमा

---

४ महादभट बिन मुद्गलभट रंदरे यास मिळालेली इनाम जमीन.

अजरष्टखाने राजश्री शहाजी राजे दामदौलत हू बजानेब कारकुनानीं हाल व इस्तकबल व देशमुखानीं प्रात पुणे, बिदानद सुरुसन तिसा अशरीन अलफ. महादभट बिन मुद्गलभट पुरदरे सेकीन कसबे म र हुजूर येऊन मालूम केलें जे तारीख २९ जिल्हेज

---

५ मिरा सैद सादी यास मिळालेली इनाम जमीन.

अजरष्टखाने राजश्री शहाजी राजे दाइमद बिरादर बज्यानेब कारकनानीं हाल व इस्तकबल व देशमुखानीं मामले गुलसनाबाद व हुद्देदारानीं हाल व इस्तकबल व मोकदमानीं कसबे नाशिक, मामले मजकूर बिदानद सुरूसन सन सलास सलासीन अलफ. मुताल्लि.

कांनीं मिरा सैद सादी * * मुक्काम कसबे मजकूर हुजूर येऊन मालूम केले * * * * इनाम बितपशीलः—

दरसवाद कसबे नाशिक. ....

जमीन जरायत चावर गज शरायेनी * * * चावर १ व बाग चावर निमे -॥ देखील नख्त याती व महसूल तर्फ देहाय व तर्फ ठाणे कुलबाब, कुलकानू हाल व महसुलसी जिराती चावर १. बाग चावर निमे -॥-

बद्दल मशीद बद्दल रोषणाई तेल दरोज ४४॥ अच्छेर दरसाल महसूल वनीम चावरा * * * मजकूर * * *

रोजमरा दादे बरद दरोज दर महाल. जकाती मामले मजकूर दरोज टक्के १॥.

येणेप्रमाणें बरहुकूम फर्मान रवाना खास व खुर्दखत मोलीकल उमराई मलिकअंबर सालाबाद तागाईत सालगुदस्ता चालत आलीयावरी सालमजकुरी कारकून रजेचा उजूर करितात. दरीबाब खुर्दखत देये मालूम जाले तरी यासी इनाम सदर हुजराती व बाग व मशिदीचे रोषणाई(स) तेल दरसवाद कसबे मजकूर सदरहू चावर व तेल व दरोबस्त रोजमरा टक्के १॥ दरसवाद मामले मजकूर दरसाल जकाती बरहुकूम फर्मान * * * मलिकअंबर तागाईत सालगुदस्त चालत आलें असेल तेणेंप्रमाणें हल्ली तुह्मीं चालवणे दर हरसाल ताजे खुर्दखताचा उजूर न करणें तुह्मीं तालीक लेहोन घेऊन अस्सल खुर्दखत परतून यासी दीजे. मोर्तबसुद.

तेरीख १६ माहे रबिलावली रबिलावल

---

६ तुकाजी पंडित बिन कोंडो राजदेऊ पंडित यास मिळालेली इनाम जमीन.

आजरष्टखाने राजेश्री शहाजी राजे दामदौलत हू बजानेब कारकुनानी हाल व इस्तकबल व देशमुखांनी मामले गुलसनाबाद व हुदेदारानी व मोकदमानीं देहाय मामले मजकूर बिदानद सुरुसन अर्बा सलासीन अलफ बेशमी तुकाजी पडित बिन कोंडो-राजदेऊ पडित साकीन, कसबे नाशिक, हुजूर मालूम केलें जे, आपणास इनाम जमीन व बाग व दररोज तेल आदशेर ४४॥- इदीयाना दरसवाद कसबे नाशिक बितपशीलः—

जिरायत जमीन देखील नक्त—याती व पायपोसी व * * * चावराणा व बाजे-पटीया हाल व इस्तकबाल हुजराती व गैबती व वेठी व बेगार, फर्मासी, कुलबाब, —

बाग गजशरायेणी बिघे ३० तीस पैकीं हरबाबे बिघे १५ व बाजे सावजी भडका बिघे १५ देखील आमराई व झाडझाडोरा कुलबाब, कुलकानू तर्फ ठाणें व तर्फ देहाय

कुलकानू तालुकच्या व तालुक देहाय गजशरायेणी चावर एक १.

तेल दररोज वजन अर्धशेर ८८॥-

दरमहाल जकाती चौत्रा.

पायपोसी व बाजे पटीया हाल व पेस्तर होतील त्याणें व वेठी, बेगारी व फरमासी पुरवणी बागास बिघे ३ तीन शेत विसाजी हरकुळा बागपैकी देखील आंबराई देणें.

दरसवाद मौजे गोवर्धन देखील नक्तयाती पायपोसी वे * * * चावराणा व बाजेपटीया हाल व इस्तकबल हुजूराती व गैबत व वेठी, बेगारी, फर्मासी, लबाब, कुलकानू तर्फ ठाणे व तर्फ देहाय गजशरायेणी जमीन चावर निम -॥-

येणेंप्रमाणें बरहुकूम फर्मान रवाना खास व खुर्दखत मलिकंबर व चौगावचे मोकासाई यांणीं माजी सालाबाद चालत आहे. हल्ली मामले मजकूर साहेबास मोकासा अर्जानीं जाहला. साहेबीं नजर इनायत फर्माऊन मन्हामती करण्यावजा होय मालूम जाहले तरी यासी इनाम जमीन जिरायत व बाग देखील आंबराई व झाडझडोरा देखील सदरहू बाब हाय दरसवाद सदरहू कसबे व मौजे मजकूर व तेल सदरहू अर्ध शेर बरहुकूम फरमान रवाना खास व खुर्दखत मलिकंबर व चौगावचे सालाबाद चालत आलें आसेल तेणेंप्रमाण हल्लीं तुम्हींही चालवणें. दरहरसाल ताजा खुर्दखताचा उजूर न करणें. तुह्मी तालीक लिहून घेऊन अस्सल खुर्दखत परतोन याजपाशीं दीजे. मोर्तबसुद.

७ मुल्ला हुसेनी मशिदीस मिळालेली इनाम जमीन.

अजरष्टखाने महाराज राजश्री शहाजी राजे द्रामदौलत हू बजानेबु व कारकुनाना हाल व इस्तकबल व देशमुखानी परगणे राणेबेन्नूर बिंदानद सुरुसन खमसैन अलफ बेशमी मुल्ला हुसेनी मशीद कसबे मजकूर येऊन मालूम केले जे, आपणास कसबे मजकुरीं इनाम जमीन चावर एक १ व बाजे लाजिमा दरसवाद कसबे मजकूर बरहुकूम भोगवटे व जिराजी गदे देखील सालाबाद कारकीर्दी दरकारकीर्दी तागाईत सालगुदस्त चालत आले. हल्ली परगणे मजकूर महाराज साहेबांस मुकासा अर्जानी जाहला आहे. महाली कारकून साहेबाच्या खताचा उजूर करतात. तरी साहेबी मेहरबान होऊन खत मन्हामत केलें पाहिजे. दरीबाब मालूम जाहले. तरी मुल्ला हुसेनी मशीद कसबे मजकूर यास इनाम दरसवाद कसबे मजकूर जमीन चावर १ एक बाजे लाजिमा दरसवाद कसबे मजकूर देखील भोगवटे व जिराजी गदे देखील सालाबाद कारकीर्दी दरकारकीर्दी, तागाईत सालगुदस्त भोगवटा व तसरुफेती बरे रीतीं मनास आणून, तागाईत सालगुदस्त चालीलें असेल, तेणेंप्रमाणें दुबली तुह्मीं औलाद व अफलाद चालविणें. नवी जिकर न करणें हर दरसाल ताजा खुर्दखताचा उजूर न करणें. तुह्मीं तालीक लेहोन घेऊन अस्सल खत परतोन इनामदार मजकर यासी दीजे. मोर्तबसुद परवानगी राजेखान मोर्तबसुद.

तारीख १० सवाल माहे सवाल.

८ मोरेश्वर गोसावी यांस मिळालेली सनद.

" आजरष्टखाने राजश्री शिवाजी राजे दामदौलत हू बजानेब कारकुनानी हाल व इस्तकबाल व देशमुखानी परगणे सुपें, बिदानद सुरुसन खमसैन अलफ बेशमी राजश्री मोरेश्वर गोसावी क्षेत्र मोरेश्वरी हुजूर येऊन मालूम केलें जे, आपणास इनामबद्दल धर्मादाउ दरसबाद मौजे पणदेरें, परगणेमजकूर, जमीन गजशरायनी च ावर, १ एक एकूण कास रुक्का ८१ एक कीर्द काळी पोलीजाप्रेज गोपाजी धनगर मुजेरी, मौजे मजकूर स्थळ शेतपैकीं देणेंबद्दल फर्मान हुमायून व खडोजी राजे व बाजी राजे घोरपडे बेशमी खुर्द सन खमस आर्बैन अलफ देव महसूल व नख्तयाती व सैलबैल व सरदेशमुखपट्टी व मोइनी साद्दिलवार व पाडेवरी व हक्कदार व खर्चपट्टी व पायपोसी व बाबेजम व शेटी व तेजीपट्टी व मोहीमपट्टी व हेलेकट्टी, वाजत्रीपट्टी व कुलकानू नकदी व जिनसी व कलमीं व कदमी व इस्मी व रस्मी व तूप व कडबा व गल्ला व खरीफ व रबी व वेटी व बेगारी व फर्मायसी व आवजेवा कुलबाब व कुलकानू तर्फ ठाणें व तर्फ देहाय दिधले आहे, तेणेंप्रमाणे ता [गाइत सा] ल गुदस्त चालिले आहे. हल्ली मौजे मजकूर महाराजासी मुकासा अर्जानी जाला आहे. महालीं ***खुर्दखताचा उजूर करितातीं तरी सदरहू इनाम मन्हमती करून खुर्दखत देविलें पाहिजे. ह्मणोन मालूम जालें तरी राजश्री मोरेश्वर गोसावी, क्षेत्र मोरेश्वर यासी इनामबद्दल धर्मादाउ दरसवाद मौजे मजकूर जमीन कीर्दकाळी पोलीज चावर गजशरायेनी १ एकूण कास रुक्के८१ प्रेज गोपाजी धनगर मुजेरी, मौजे मजकूर स्थळ शेतपैकी देखील महसूल व नकदीयाती व सैलबैल व सदर देशमुखपट्टी व मोइनी सादिलवार व हक्कदार व पाडेवरी खर्चपट्टी व पायपोसी व तेजीपट्टी व शेटी व मोहीमपटी व हेलेकटी व जेगीपटी व नकदी व जिनसी व कलमी व कदमी व इस्मी व रस्मी व साइरे कानुजाती व ऐनाजिन्नस गल्ला खरीफ व रबीतगारा जे हिस्सा व तूप व कडबा व वेटी व बेगारी व फर्मासी व आवाजेवा व तर्फ ठाणें व तर्फ देहाय कुलबाब, कुलकानू दिधले असे तेणेंप्रमाणें तागाईत सालगुदस्ता चालिलें आहे. तेणेंप्रमाणें मन्हमती केलें असे तुम्ही दुमाले करणें. कारकिर्द माजी फितरतीं करितो, भोगवटा सारा जाला नसला, तरी त्याचा उजूर न करणें हल्ली मौजे मजकूर आलेती, यास सालाबाद कीर्दी लागवण जसें होत जाईल, तेणेंप्रमाणे याची कासाकिर्द रुक्का ८१ एक त्यावरी मौजे मजकुरी जे खडणी होत जाईल व सदरहू पट्टीयाची तक्षीम व हाल व पेस्तर[साल] हिस्सा नक्त ठाणें व नक्त देहाय होत जाती याची तक्षीम पाडिलें पान जे येईल, ते हुजूरून दुमालें केलें असे. तुह्मीं कुलदुमाले करणे व तूप व कडबा व गल्ला खरीफ व रबी तगटराजे हिस्सा जो येईल तो सालाबाद दुमाले करणे. वेटी, बेगारी, फुर्मासी, आवाजेवा, बाजे, पडीझडी, कुल हुजूरून रोज श्रीचे दुमाले केले असे. तुमची दुमाले करणें. मौजे मजकूरीं आजे आहे. बाबवरग गुरावरी पाळ करून उगवणी करितों त्याचे, तक्षीमीयाचे प्रजेच्या गुरावरी

जें येईल ते हुजूरून याचे दुमाले केलें असे. तुम्हीं दुमाले करणें. दर दरसाल ताज्या खुर्दखताचा उजूर न कीजे. औलाद व आफलाद चालवीजे. तालिक घेऊन आसली फिराऊन देणें. सदरहू इनामास हिंदु होऊन इस्कील करील, त्यास गाय मारिल्याची शपथ असे व मुसलमान होऊन जो इस्कील करील, त्यास आपल्या मसजेबाची बुरी सौगंद असे. सदरहूप्रमाणें होणें हरएक तजवीज लागो न दीजे पेस्तर खुर्दखताचा उजूर न कीजे. याची प्रजेसी मुकासा काहीं निसबती नाही. मोर्तबसुद "

---

९ श्री देव आनंदसिद्ध ज्योतिर्लिंग देवतेस दिलेलें इनाम.

" श्रीदेव आनदसिद्ध ज्योतिर्लिंग कसबे येरूळ प्रात मजकूर येथे आहेत त्यास पूर्वी कैलासवासी राजश्री मालोजी राजे व विठोजी राजे भोंसले यानी श्रीचें देवालय बाधलें ते समयीं देवालयाभोंवती जमीन बिघे

४२९ बागायत

·१२० जिरायत

·॥१९

एकूण पाउणशें बिघे पादशाहापासोन मागोन घेऊन श्रीचे पुष्पवाटिकेस व अतीत अभ्यागतास राहावयास व श्रीची पूजा नदादीपास इनाम करून दिल्ही, त्याप्रमाणे चालत आलें. साप्रतकाळी धामधूमीचे प्रसगाकरिता चालत नव्हतें. ऐसियासी हल्लीं श्रीची पूजऊर्जा चालवणें स्वामीस अगत्य जाणोन स्वामीनी नबाब अमीरल् उमराव यासी लिहून व राजश्री शकराजा मल्हार यासी सागोन त्याचे तर्फेनें इनाम बहाल करून घेतला, आणि दुतर्फे इनाम श्रीकडे करार करून देऊन, श्रीपाद ब्रह्मेंद्र सन्यासी याचे स्वाधीन केला आहे तेथें मठ बाधोन बागेचें सरक्षण करितील. बागेमध्यें पुष्पे, फळें उत्पन्न होतील, तीं श्रीचे पुजेस पावतील व बागाईत जिरायतामुळें जें उत्पन्न होईल, त्याचे अन्नछत्र घालतील. व श्रीचे पुजेस व नंदादीपासही ऐवज देतील. सदरहू पाउणशें बिघे जमीन श्रीपादाचे दुमाले करून श्रीकडे अविछिन्न इनाम चालवणें म्हणून पत्रें. १२ सफर, सन अशरीन मया. येविशीं पत्रें --

देशमुख, देशपाडे, परगणे येरुळ १. कमाविसदार वर्तमान व भावी परगणे येरुळ १.

मोकदम, कसबे येरुळ १. गुमास्ते सर देशमुख १."

---

१० श्री राजा शाहू छत्रपती यांणीं दिलेलें वतन पत्र

" स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४९ शुभकृतनाम संवत्सरे, भाद्रपद वहुल त्रयोदशी, सौम्यवासरे, क्षत्रियकुलावतस श्री राजा शाहू छत्रपती स्वामी यार्णी नारो केशव व बाबुराव-

रामाजी देशपांडे, परगणे सुपें बारामती, सरकार जुन्नर, सुभे खुजिस्तेबुनियाद यासी वतनपत्र दिल्हें ऐसेजें:—

आमल आदिलशाइ. ते वेळच्या सनदा.

परवाना बमोहर राजश्री मंबाजी राजे भोंसले उमराव बनाम माहादो लखमदेव व हरी विष्णु बतारीख दुमालपत्र, वतन, देशकुळकर्ण वाद बहिरो नारायण खोटा केला सनद १.

खुर्दखत बमोहर थोरले महाराज शहाजी राजे भोंसले बनाम विठ्ठल माहादेव बतारीख छ १४ रबिलावल सुरुसन अर्बा खमसेन अलफ १.

---

११ शहाजी महाराजांचें वृंदावनाचे जेअर्चेकरितां इनाम.

" मौजे यरगटनहाळी, संमत बेदीगिरा, मामले बसवापटण येथें महाराज राजश्री शहाजी महाराज कैलासवासी यांचें वृंदावन आहे. तेथील पूजाऊर्जा, नैवेद्य, नंदादीपास मौजेमजकूर पेशजीपासून कुलबाब, कुलकानू दरोबस्त इनाम आहे. यास चौकडून उपसर्ग लागतो. येविशीं ताकीदपत्रें जे, तपोनिधी ध्यानभारती गोसावी यांचे शिष्य बनखंडी भारती वृंदावनासंन्निध राहतात, यांजकडे मौजे मजकूरचा वसूल देणें. हे वृंदावनाची पूजाऊर्जा चालवितील म्हणोन पत्रें:—

१ मौजे यरगटणहाळा.
१ देशमुख, देशपांडे.
१ देशाधिकारी.
१ हिंदुराव घोरपडे.

४

छ १ सावान, सन सलास सलासीन.

---

१२ देशकळकर्णाबद्दल शिवाजी महाराज यांनीं दिलेला निवाडा.

"आजरख्तखान राजेश्री शिवाजी राजे साहेब दामदौलत हू ताहा पायगुडे व कर्जवणें देशमुख व मोकदम व कुळकर्णी व रयान कर्यात मावळ, प्रांत पुणें सुहूरसन तिसा सबैन अलफ. मालूम दानद कीं मोरो विठ्ठल होनप देशकुळकर्णी, कर्यात मजकूर हुजूर येऊन आपली हकिकत जाहीर केली कीं, आपले वडिलांची मिरासी देशकुळकर्णी, तर्फे पुण ७ वितपशील:—

तर्फ हवेली देहे ८२. तर्फ कर्यात मावळ देहे ३६. तर्फ सांडसवुद्रुक देहे २९.
तर्फ कडेपठार देहे ४३. तर्फ पाटस देहे ४३. तर्फ निरथडी देहे ३७.
तर्फ सांडस खुर्द देहे २०.

येणेंप्रमाणें पिढी दरपिढी कारकीर्द दरकारकीर्द देशकुळकर्ण चालत आले आहे. ऐसीयासी राजश्री महाराज साहेबास निजामशाहा यानीं परगणे मजकूर मुकासा दिल्हा. ते वक्ती तर्फा तर्फानी महाराजसाहेबीं ठाणी येऊन हावलदार व कारकून तर्फा तर्फास सतत्र (स्वतत्र) कमावीस करीत असेती. ते वक्तीं आपल्या वडिलीं गुमास्ते तर्फतर्फास कारभारास दिल्हे असता, कर्यात मावळास गपचूप पुण्याहून पाठविले त्यानीं कित्येक दिवस मुतालिकी करीत असता, कागदपत्राचा शिरस्ता आपणाजवळी आणून देत असेती. व हक्क लाजिमा आणून देत असेती चाकरीचे रवेशीनें आपल्या वडिलासीं वर्तत असता, रयतेसीं बदसुलूक केला, म्हणून त्यास दूर करून नामाजी लाडा पुर्णेहून गुमास्तगिरी देऊन कर्यात मावळास पाठविला नामाजी हयात असता आपला हक्क लाजिमा व कागदशिरस्ता आपणास देत गेला असे महाराजसाहेबाचे कारकिर्द चालत असता निजामशाही गुदरोन गेली. इदरशाहीतर्फेने विजापुरीहून मुऱ्हारी जगदेराव सुभा येऊन पुर्णे जाळून लुटून तलफ केलें. ते वक्ती दौलतमगल ऊर्फ भुलेश्वर येथें मुऱ्हारीनें किला बांधोन शहर वसविले तेथें आपले वडील नादावयासी गेले. कितेक मुदती भुलेश्वरी कारभार पडिला. त्याकरिता कर्यात मावळीं नामाजी लाडा कारभार करित असे तो आपला हक्कलाजिमा व कागदशिरस्ता देत असे इदलशाहीतून महाराजसाहेबास पुर्णे मुकासा जाहलें. ते वक्ती साहेबास कर्यात मावळ व राजश्री मबाजी राजे भोंसले यासी साडस खुर्द महाराजसाहेबी आपणापासून मोकासा दिल्हा. साहेबाचे तर्फेनें कर्यात मावळास हवालदार व कारकून अलाहिदा गेले. त्यासी नागजोडी करून नामाजीनें आपणासी बेइमान होऊन नजर बदलली. ऐसीयास आपण येऊन साहेबापाशी हकिकत जाहीर केली तों निळो सोनदेव साहेबाचे मजुमदार यानीं आप्पाजीची पाठी राखिली. आप्पाजीस आपणासी रुजू होऊ देत नाहीत तरी साहेबीं मेहेरबान होऊन देशमुख व मोकदम व कुळकर्णी व रयतीस ताकीद करून खुर्दखत दिल्हें पाहिजे. म्हणून तुम्ही मालूम केलें. त्यावरून तुम्हास बोलावून हकिकत पुसिली. तुम्हींही सदरहूप्रमाणें सागितली. तरी हली मोरो विठ्ठल देशकुळकर्णी याचे कर्यात मावळाचे देशकळकर्णीचा अमल त्याचे दुमाला करणें. आप्पाजीस दखल न करणें याचा हक्कलाजिमा यासी देण तकरार फिर्याद येऊ न देणे. तालीक घेऊन अस्सल फिरोन देणें. मोर्तबसुद. मोर्तब अस "

---

१३ खेळोजी मालोजी राजे भोंसले यांचे दौलतीचा तपशील.

यादी वतनें राजश्री खेळोजी मालोजी राजे भोंसले यांची पुरातन दौलताबादेस चाकर असता भोगवटा चालत होता:—

प्रांत खानदेश.
१ परगणे बहाळ.
१ परगणे भडगांव.

प्रांत वराड.
१ परगणे जळगांउ येथील देशमुखी.

२

येथील देशमुखी
परगणे कनडप्रांत—१ देशमुखी
सदरहूच्या सनदा जाहल्या नाहींत.

कसबे येरुळ, परगणे मजकूर, प्रांत दौलताबाद येथील मुकादमी १.

१४. श्री शंकर भारतीस्वामीस शिष्य परंपरेनें दिलेली नेमणूक.

" यादी शकर भारती गोदड वास्तव्य शिगणापूर, समीप श्री— याणीं किल्ले सातारी-याचे मुक्कामी स्वामी सन्निध येऊन निवेदन केलें जें, पूर्वी राजेश्री मालोजीराजे भोंसले याणीं शिगणापुरी तळें बाधलें, ते समई तळ्याचे पाळीसमीप आपल्या वडिलांस मठास जागा नेमून देऊन मठ बाधोन दिला. आणि प्रति दिवशी पाच अतीताचा उलफा व सालीना होन पातशाई ५ पांच मोईन करून दिली त्याप्रमाणें त्याचे कारकिर्दीपासून तागायत महाराज राजश्री सभाजी महाराज पावेतों चालले यानतर धामधुमीच्या प्रसगामध्य चालत नव्हतें. याकरिता आपले वडील गुरु याणी महाराज राजेश्री राजारामसाहेब यांजकडे जाऊन निवेदन केलें. त्याणीं मनास आणून, राजश्री परशराम पडित प्रतिनिधी होते त्यांस आपलें पत्र दिल्हें. त्याणी आपल्या वडिलास पावावयाची मोईन करून दिली.

मौजे शिगणापूर, कर्यात मलवडीपैकी दरमाहा मोईन रुपये

६। तादुळ व कणीक दरमहा दसशेरी सोळुलें मापें ८।१॥ दर ८।= प्रमाणें.
०॥= डाळ वजन ८॥।७॥ दर ०१॥ प्रमाणें.—
४॥= तूप वजन ०॥।७॥ दर रुपयेस ८८ प्रमाणें.
१। तबाकू ८।८॥। दर ८।५.
०।० मीठ ८।८॥।.
१ गूळ ८।८॥।.

मौजे पिपरी, कर्यात दहिगांव, प्रांत माण-पैकीं सालीना पातशाई होन पाच ५.

१४

येणेंप्रमाणें उलफियाबाबत दरमहा रुपये चवदा व सालीना होन पांच नेमून दिल्हे. त पत्र महाराज तीर्थरूप--स्वामींस दाखविलें. तें मनास आणून महाराज स्वामींनीं आपले गुरु संतोष भारती गोदड यांसी राज्याभिषेक शके २७ विक्रमनाम सवत्सर, कार्तिक शुद्ध अष्टमी,

गुरुवासरीं, आपलें पत्र करून दिल्हें. तें पत्र आपणांपाशीं आहे. तें महाराज स्वामींनीं मनास आणून भोगवटीयासी पत्र करून देऊन, मोईन साल दरसाल वंशपरंपरेनें चालविली पाहिजे. म्हणून निवेदन करून पत्र आणून दाखविलें. तें मनास आणून पूर्वी महाराज स्वामींनीं यांच्या वडिलास प्रतिदिवशीच्या उलफा व सालीना होन पाच नेमणूक करून दिली आहे. त्याप्रमाणें साल दरसाल वंशपरपरेनें चालवणे अवश्यक जाणोन हें आज्ञापत्र सादर केलें असे. तर तुम्हीं गोसावीमजकूर यांसी सदरहू उलफीयाची मोईन मौजे शिंगणापूर, कर्यात मलवडी पैकीं दरमहा रुपये चवदा व मौजे पिपरी, कर्यात दहिगांव पैकीं सालीना पातशाई होन पाच, पूर्वी नेमणूक करून दिली आहे. त्याप्रमाणें साल दरसाल गोसावी मजकर यासीं व याचे शिष्य वंशपरपरेने पावीत करणें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणें. पत्राची प्रती लेहोन घेऊन हे पत्र भोगवटीयासी गोसावी याजकडे परतोन देणें. येविशीं देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी, प्रात माण यासी पत्र १.

मोकदम मौजे शिगणापूर, कर्यात मलवडी १.

मोकदमानी मौजे पिंपरी, कर्यात दहिगाव १.

यासी

एकूण पत्रें तीन देणें.

प्रकरण ४ थें.

शिवाजी महाराज यांचा ज्यांत संबंध आहे असे कागद.

१ महादभट बिन मुद्गलभट पुरदरे यांस दिलेलें इनाम.

श्री



"अजरष्टखाने राजश्री शिवाजी राजे दामदौलत हू बजानीब कारकुनानी हाल व इस्तकबल व देशमुखानी परगणें पुणे बिदानदके सुहूरसन समान आर्बैन अलफ. बनाम महादभट बिन मुद्गलभट पुरदरे सेकीन कसबे मजकूर हुजूर येउन मालूम केले जे, आपणांस बहाल इनामदार महाल जमीन देहाय गावगन्ना चावर गज शरायेनी ३

मौजे पर्वती देखील नख्तयाती व बाजेबाब व पायपोसी व पटया हाल व पेस्तर देखील महसूल कुलबाब, कुलकानू चावर १

मौजे पिपरी नजीक राहटणी बाबी महसूलेसी चावर १.

मौजे पिपळें सौदागर देखील महसूल व नख्तयाती तर्फ ठाणें व तर्फ देहाय व पायपोसी कुलबाब, कुलकानू चावर १

नख्त बाबी दिवाबत्ती बर महाल जकायती दररोज रुके ०३.

येणेप्रमाणे बरहुकूम फर्मान हुमायून खास व खुर्दखत ममलकतमदार मलिकअंबर वे भोगवटे वजिरानी व खुद्द महाराजसाहेब बरहुकूम सनद शुबा(सुभा) तागाईत सालगुदस्ता सन सबा चालिले आहे. हल्ली सालमजकूरकारणें मशारनिल्हे दादोजी कोंडदेऊ सुभेदार त्यासी देवाज्ञा जाली म्हणोन महालीं कारकून ताजीया खुर्दखताचा उजूर करिताती * * * "

तेरीख २६ जमादिलाखर.

२ नारायण त्रिमल दीक्षित यास इनामाबद्दल दिलेली सनद.

" आजरख्तखाने राजेश्री शिवाजी राजे दायम दौलत हू बजानेबु कारकुनांनी हाल व इस्तकबल व देशमुखानी, परगणे पुणे बिदानद सुरुसन खमसैन आलफ दर वजेबहल इनाम बेशभी नारायण त्रिमल दीक्षित यास इनाम मौजे बाणेरें, तर्फ हवेली, परगणे मजकूर देह १ देखील नख्ययाती व महसूल व बाजे उजबत्ती देखील तालुका ठाणें व तर्फ देहाय व ठाणेंबाब व सैलबैल व मोईन सादिलवार व खर्चपट्टी व पायपोसी व दसरा-पट्टी व ठाणेभेटी व हुजूरभेटी व मोहीमपट्टी बेलकटी व तमाखू व बागाईत आबीस्थान व तावीस्थान व मोहतर्फ व थळजकाती निकाळू व पैसाळू आश्वजकाती व ठाणबंदी व गाडा व घोडा व बदी व बरदा व मेंढीस्थळ व वेसीपेडी व पानभारा व बेगारी व राबता व आडपाली व कानू वगैरे कानू व कमावीस व हाल व पेस्तर व वेटी, बेगारी व फर्मासी व बरदरसत व बरनगजग आबराई कुलबाब, कुलकानू बाब महसुलेसी मौजे मजकूर देह १ एक आजराम्हामत करून इनाम दिधला असे दुमाले करणें. आवलाद, आफलाद चालवणें. यासी मुसलमान होऊन जो कोणी इस्कील करील त्यास मक्केमध्ये सोर मारिल्याची सौगद असे. व हिंदु होऊन जो कोणी इस्कील करील, त्यास काशीमध्यें गाय मारिल्याचें पाप असे. हर दरसाल ताजे खुर्दखताचा उजूर न करणे तालिक लेहून घेऊन अस्सल दीक्षित मजकुरापाशीं परतोन देणें. सदरहूप्रमाणें महाराजसाहेब याचें खुर्दखत छ १० जिल्हेज सुरुसन खमसैन सादर आहे. तेणेंप्रमाणें दुमाले करणें मोर्तबसुद. "

---

३ गोपाळभट बिन श्रीधरभट यांस दिलेली सनद.

श्री

" वेदमूर्ती गोपाळभट बिन श्रीधरभट वास्तव्य श्रीमहाबळेश्वर.

(शिक्का महाराज.)

स्वस्तिश्री शके १५७४ नदननाम सवत्सर, फाल्गुन शुद्ध प्रतिपदा, रविवासरे तद्दिनीं गोसावी याप्रती विद्यार्थी शिवाजी राजे दडवत

शिक्का प्रधान

विनति उपरी स्वामी भले, थोर आनुष्ठाते, सूर्यउपासनी, पद्महस्ती ऐसे जाणोन, आपण मातोश्री जिजाबाई आऊसाहेब वेदमूर्ती प्रभाकरभट उपाध्ये याच्या विद्यमानें स्वामीपासून मत्र उपदेश सपादिला स्वामी आपले गुरु स्वामीस आपण आपले अभ्योदयार्थ सूर्यप्रीत्यर्थ अनुष्ठान सागितलें. प्रतिवर्षी वर्षासन द्यावयाची मोईन केली असे वितपशीलः—

वर्षासन.	पैकीं गल्ला नवशेरी	सूर्यप्रीत्यर्थ अनुष्ठान प्रतिवर्षी करावें त्यास	
नक्त होन १००.	बारुळें	सामुग्री व पूजा.	
वजन टकबंदी.	मापें खंडी.	आरक्त वस्त्रें २	
.।४ तूप.	४ तांवूळ.	अनुष्ठान समयीं	
.।४ तेल.	४ नागली.	नेसावयास व आसन.	वजन चंदन.
——	——	१ पितांबर.	८८९ शुभ्र.
.॥।३.	८	१ शाल.	८८५ आरक्त.
		१ आसन.	——
		——	८।०

३

येणेंप्रमाणें होन पाछाई एकशें व गल्ला नवशेरी, बारुळें मापें खंडी आठ, वजन टकबंदी सवा आठरा मण व आरक्त वस्त्रें दोनी व पितांबर एक, शाल एक व आसन एक याप्रमाणें वर्षासन व पूजासामुग्री मोईन दानपत्रें करून दिल्ही असे. स्वामींनीं आमचे आभ्योदयार्थ सूर्यप्रीत्यर्थ प्रतिवर्षी अनुष्ठान उत्तरोत्तर करावें व मंत्र उपदेशही स्वामींचे वंशपरंपरेनें आमचे वंशपरंपरेस करावा. आपण संकल्पपूर्वक प्रतिवर्षी वर्षासन, दानपत्र करून स्वामींस दिल्हें. हें आपले वंशपरंपरेनें उत्तरोत्तर चालवावयास अन्यथा करूं तरी श्री महादेव साक्ष. स्वामींनीं निरंतर देवापाशीं आमचें कल्याण इच्छावें. लेखनालंकार मोर्तब. "

---

४ सिद्धेश्वरभट बिन मेघनाथभट यांस मिळालेली सनद.

श्रीभवानीशंकर.

" श्रीसकल तीर्थस्वरूप वेदमूर्ति राजश्री सिद्धेश्वरभट बिन मेघनाथभट ब्रह्मे उपाध्ये, परगणे चाकण स्वामी गोसावी यांसीः—

अज्ञाधारक राजेश्री शिवाजी राजे बिन शहाजी राजे भोंसले साष्टांग दंडवत, सुरु- [शिक्का] सन अर्बा खमसैन अलफ. पत्र लेहून दिधलें ऐसी जें, स्वामींच्या अनुष्ठानबळें आपण राज्यास अधिकारी जालों व सकळ मनोरथ चिंतिले पावलों, ऐसा अनुभव आला ह्मणून व संकटकाळीं साहाकारी जाणोन, पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें स्वामींस वर्षासन होन पातशाई १०० शंभरी केले असेत. सदरहू वर्षासन यावत्काळ पर्यंत आपलें राज्य तावत्काळपर्यंत चालऊन यासी अन्यथा करूं अथवा पुढें कोणी आपले वंशपरंपरेचा होऊन अन्यथा करील, त्यास श्री जीची व कुलस्वामीची व आपल्या पूर्वजांची व गोब्राह्मणाची आण असे. यावेयळें स्वर्ग देवतेच्या पूजनास श्रीनवचंडीमध्यें जपतपहवनास व ब्राह्मणभोजनास जें लागेल, त्याची

आज्ञा करीत जाणें. आज्ञेप्रमाणें प्राप्त करीत जाऊन. राज्यस्वामींच्या प्रसादाचें आहे. आपण आज्ञाधारक असों. जाणिजे. रसानगी छ १ माहे रमजान मोर्तब केलें असे."

रूजू
सुरूनिवीस.

५ शिवाजी महाराजांनीं काजीस दिलेली सनद.

शिक्का.

"अजरष्टखाने राजश्री शिवाजी राजे दामदौलत हू बजोनब कारकुनानी हाल व इस्तकबाल देशमुखानी तर्फ हवेली, प्रात पुणें सुरुसन सबा खमसैन अलफ. बेशमी काजी इमराइम व काजी शरीफ बिन काजी आबदुल्ला बिन काजी महमद बिन काजी चिमन हकीम शरा प्रांत मजकूर हुजूर येऊन मालूम केलें जे, प्रात मजकूर कजा व नेबकजा खतीब आपली मिरासी आपले वडिलाचे नावें बरहुकूम फर्मान निजामशहा व खुर्दखत मालिक अबर व खुर्दखत वजिरानीं कारकीर्दी दरकारकीर्द चालत आलें आहे येणेंप्रमाणें होतें. यावरी खतीबाचे टक्के तीनशें तीस याचा भोगवटा मुरारपताचे कारकीर्दीपासून तुटला आहे. . . . . मेहेरबान होऊन खुर्दखत देविलें पाहिजे म्हणून मालूम केलें, बराये मालुमाती खातरेस आणून यावर मेहेरबान होऊन, याचा रोजमुरा कजा व नेबकजा व प्यादगी टक्के तीनशें साडेसात यास जागा जकात कसबे मजकूर देविले असेत. याचा भोगवटा व तसरुफाती जैसा काहीं तागाईत सालगुदस्ता चालिला असेल, ते बरवे रीती मनास आणून तुह्मीही चालवणें. परवानगी हुजूर राजश्री पताजी गोपीनाथ चिटणीस तालिक घेऊन अस्सल इनामदार मजकूरापाशी फिराऊन देणें. मोर्तब असे."

६ खेडेबारें येथील इनामदारास सनद.

"अजरख्तखाने राजश्री शिवाजी राजे साहेब दाम दौलत हू बजानेब कारकुनानी हाल व इस्तकबाल व देशमुखानी तपे खेडेबारें सुरुसन समान खमसैन अलफ इनामदार तपे मजकूर हुजूर येऊन मालूम केलें जेः— आपणांस तपे मजकुरी इनाम हिंदु व मुसलमान जमीन चावर व रोजमुरे व रोषनाई आहे. यास साहेबाचे कारकून महालास आले आहेत ते साहेबाचे खुर्दखताचा उजूर करितात. साहेबीं मेहेरबान होऊन खुर्दखत देविलें पाहिजे म्हणून मालूम केले. बराये मालुमात खातरेस आणून साहेब मेहेरबान होऊन, तपे मजकुरीं इनामदार हिंदु व मुसलमान यासी तपे मजकुरीं जमीन चावर व रोजमुरे व रोषनाई जे असेल ते, जैसे कांहीं सालगुदस्ता चालिले असेल तेणेंचप्रमाणे सालमजकुरींहि चालवणें. उजूर न करणें. राजश्री बनाजीपंत तुम्हीं तालीक लेहून घेऊन अस्सल खुर्दखत इनामदारापाशीं फिराऊन देणें. तारीख १२ जिलकाद."

७ सातारचे तिसरे राजे यांची जन्म मिती.

राजाराम साहेब, सोईराबाईसाहेब यांचें पोटीं शके १५८३ चैत्र शुद्ध नवमीस ९ उपजले ह्मणोन राजाराम नांव ठेविलें. उपजता पालथे उपजले हें महाराज यास कळल्यावर हा दिल्लीचें राज्य पालथें घालील असें बोलले कलम १.

८ फिरंगोजी देसाई यांस कौलाची सनद.

कौलनामा महाराज छत्रसालजी किल्लेदार, किल्ले शहादुर्ग उर्फ पन्हाळा ताहा मोकदमान व शेटे महाजनान व रयत लोक प्रात मजकूर सुभा दारुलजफर विजापूर सुरूसन ११०१ इसन्ने सितैन व अलफ. कारणें दिल्हा कौलनामा ऐसा जे:—तुह्मा प्रकरणीं फिरंगोजी देसाई व देशपांडे किल्ले मजकूर याणी अर्ज केला कीं, गानिमाचे धामधुमीकरितां मुलूक खराब होऊन रयत परागदा होऊन गेली होती ऐसीयास आपण हुजूर जाऊन रयतेबद्दल अर्ज केले, त्याजवरून दिवाण साहेबीं रयतेवर कृपाळू होऊन कौल दिल्हा असे. व साहेबीं कौल दिल्ह्यास गावगन्ना रयत येऊन कीर्द मामूर करितील ह्मणून विनति केली. ती खातरेस आणून तुह्मास हा कौल दिल्हा असे. तरी फिरगोजी देसाई काहीं कौल देतील. त्याप्रमाणें चालऊन व फौजेचा अमल पेशजीचे वहिवाटी अन्वयें चालऊन असणें. या प्रकर्णी हा कौल दिल्हा असे. तेरीख २४ माहे जमादिलाखर."

९ नेताजी पालकर यांस पाटीलकीची सनद.

सिह. महाबळेश्वर महादेव.

स्वस्तिश्री नृपशालिवाहन शके १५८५ शोभननाम सवत्सरे, दक्षिणायन, आश्विन शुद्ध द्वितीया, बुधे तस्मिन दिने लिखित निर्वाहपत्र.

महजर बतारीख छ १ माहे रबिलोवल हजीर मजालसी ब्राह्मणसभा व राजसभा बितपशील:—

ब्राह्मणसभा.

नारायण भट मीमासक * * *
मामले दाभोळ पत्राप्रमाणें साक्ष
* * आकभट सो क्षेत्र.
* * आकभट श्री महाबळेश्वरकर.

कालभट पुराणीक सो * * क्षेत्र
दूर * * * पत्राप्रमाणें साक्ष.
यादव जोशी सो शिरवळ * * *
पत्र प्रमाणें साक्ष.

राजसभा.

राजश्री नेताजी राजे
पालकर सरनौबत सुभेदार.
राजेश्री मक्काजी आनंद राऊ.

राजश्री परसोजी राजे महाडीक
राजश्री गोसाजी राजे पालकर.
राजश्री नारो बापुजी देशकुळकर्णी

राजेश्री धारराउ देशमुख तर्फ खेडेबारें लिहिले प्रमाणें साक्ष.
परगणे मोरगीर पाटण. राजश्री गोपाळ महादेऊ. राजश्री विठ्ठल तुकदेऊ मजमुदार.
राजश्री त्रिंबकराउ सुभानजी पालकर
लिहिल्याप्रमाणें साक्ष. लिहिलेप्रमाणें साक्ष.
राजश्री कान्होजी देऊ कृष्णाजी राम कुळकर्णी
लिहिलेप्रमाणें साक्ष. मौजे निब साखर परगणे
राजश्री शंकराजी मोरदेउ इदापूर लिहिलेप्रमाणें साक्ष असे. विरोराम सुभेदार
लिहिलेप्रमाणें साक्ष. सुभा जावली
राजश्री कृष्णाश्री ***
* * कदम माल * * *

लखमोजी देशमुख राजश्री शिवाजी राजश्री * * * देशमुख,
तर्फ सातारें वरगण मोकदम मौजे अलसद तर्फ तारळें.
आडनांव गाढवे परगणे सौंगल.

राजश्री वीरशेटी शेटीया विठ्ठलशेटी शेटीया
बजार लश्कर मनसूर बजार पेठ * * * राघोजी महादेव
सुभेदार नौबत. जाउली. मजालसी लिहिले
राजश्री बाजी पाटील रायाजी देशमुख तर्फ प्रमाणें साक्ष.
मौजे खेडेबारें, तर्फ खेडेबारें. मरळी मोरगीर. गणशेटी शेटीया सां
जाउली.

राउजी घोरपडे * * मोकदम अमदादखान सैरखान रहीम * *
मौजे भाडळें, परगणे वाई. मिरुस्वार. लष्करी. लष्करी.
महंमदखान लष्करी. रामजी मिरा खारे भिकाजी सोडकर मोकदम
हे सही. मौजे पार.

सदरह हुजीर मजालसी या हुजूर अनुवादी सावजी बिन सूर्याजी मोकदम, कसबे तलवीड पश्चम वादी नेताजी बिन धारोजी मोकदम, कसबे मजकूर हे आपले पाटिलकीच्या गरगशाबद्दल मांडत होते. याउपरी हरदो वादीयेस बोलले जे, हल्लीं राजश्री नेताजी पालकर यांच्या सुभ्यामध्यें बहुत बोभाट खटला आहे व राजश्री नेताजी पालकर वृत्तीचे निवाडे दूर दृष्टीनें विचारून करितात. तेथें जाऊन त्यांपाशीं गोत मेळऊन त्या गोता हुजूर जे निवडेल तेणेंप्रमाणें पेस्तर लेंकराचे लेंकरी चालेल ह्मणोन आले. यावरी राजश्री नेताजी पालकर येहीं गोत समस्त मेळऊन सभा करून हरदो वादीयासी पुसिलें जे, या पूर्वी तुह्मीं मांडत असतां कोण्ही राजमुद्रेनें अगर गोतानें निवडलें आहे * * * नाहीं. यावरी तुम्हांस मोकदमी म्हटले जे, राजश्री गंगाराम नामजाद * * * येहीं निवाडा केला होता. त्यावरी

सभासद नाइकीं म्हटलें जे, कैसे निवडिले तो लिहिले महजर आणले. त्यावरी महज पाहिला. मनास आणितां राजमुद्रेनें गरजेवर नजर ठेऊन निवाडिले व आग्रवादी बोलिला जे, सभेस चव अवचव जाली. याकरिता हजर मजालसी तेच वेळेस गैर जालें, म्हणोन आपण बोलिलों. परतु राजमुद्रा तीही हाटोहाट केले. त्यास आपण राजी नाहीं असें बोलिलों. हल्लीं तुम्हीं गोत मायबाप आहां. आमचे वृत्तीचा निवाडा बरहक्क केला पाहिजे. त्यावरून लेंकराचे लेंकरी बिला कुसुर चाले तें केलें पाहिजे. यावरी महजर पाहतां कवळ * * * * जाली होती. याकरितां खलेल होऊन पुढें सुरळीत चालेल नाहींतरी तो महजर रद्द करून हल्लीं दोघाजणांची बोलणीं मनास आणोन निवाडा करून महजर करून दिधला असे. सदरहू ब्रह्मसभा व राजसभा मुक्काम पार नजीक जाउली सुरुसन आर्बा सितैन आलफ. आग्रवादी साउजी बिन सूर्याजी मोहिते मोकदम, कसबे तलबीड व पश्चम वादी नेताजी बिन * * * राणोजी मोहिते मोकदम, कसबे मजकूर हरदोजण कसबे मजकुरीच्या मोकदमीच्या गर्गशाकरितां मुनसिफीबद्दल गोतापाशीं आले यावरी हरदोजणास पुसून जमानती घडली. जमान कतबे विल्हे लाविले. मग दोघाच्या तकरिरा पुशिल्या बितपशीलः—

* * * * * *

सदरहू प्रमाणें हरदोजण वादी यांच्या तकरीरा लेहून घेतल्या आणि दोघाजणांस निराळे निराळेच पुशिलें जें, तुम्हा दोघाजणांच्या तकरीरा लेहून घेतल्या. याउपरी आह्मीं ब्रह्मसभा व राजसभा गोत मुख्य करून समस्तांच्या विचारें आपले पूर्वज स्मरोन, धर्मानित्य बरहक्क निवाडा करूं; त्यास तुह्मीं राजी आहा कीं काय ? हें पुसतां. राजी जाले ऐसे दोघांसही स्वतंत्रवादे पुसोन राजी केलें. मग त्या उभयतांपासून राजीनामे लेहून घेतले जे, तुह्मीं समस्त गोत मायबाप आहां, धर्मता स्मरोन निवाडा कराल त्यास आपण राजी असो. यासी आपले बापभाऊ हिला हरकत करतील तरी श्री देवाचे खोटे व गोताचे खोटे. येणेंप्रमाणें उभयतां आग्रवादी व पश्चमवादी यांचे राजीनामे लेहून घेतले आणि उभयतांस बहूडा दिधला. आणि मजलासीस लोक ज्यास वृत्ति आहेत ते व वृतीचे व्यवहार जीही निवडिले आहेत, देखिलें ऐकिलें ऐसे लोक, मजालसी सभेस बैसविले होते. त्यास स्वतंत्र वादें एक एकास पुशिलें. ज्या ज्याची बुद्धि जैसी चालली, तैसी अवधीयानीं सांगितली. ते राजश्री नेताजी राजे पालकर येही मनींच ठेऊन मग महाबळेश्वरास मनुष्य पाठऊन विज्ञानेश्वर आणविला, आणि पंडित विद्वंस यांच्या मुखांतरें विज्ञानेश्वरामध्यें वृत्तीच्या विशेष विवंचना ज्या होत्या, त्या संपूर्ण मनास आणून धर्मशास्त्राचा मथितार्थ काढून व सकल गोत व समानायक मिळोन धर्मता आपले पूर्वज स्मरोन बरहक्क निवाडा केला बितपशीलः—

यावरी सभासदी विज्ञानेश्वरीचा शास्त्रार्थ पाहिला. तेथें आज्ञेनें धाकटा होऊन वृत्तीस

कस्त करून रक्षील तरी त्यासही भाग द्यावा आणि समजावीस करावी. या विचारें धर्मता बरहक्क हरदो वादीयांचा निवाडा केला. कसबे मजकुरींचा दोन तर्फे बराबरी केलीया व इनाम व कुलहक्क व मान मानतुक कुल देखील काळी व पांढरी दो ठायीं वाटून खावी. देखील नांगर कुल पडिलें पान देखील बराबरी दो ठायीं. त्याचे तर्फेची होळी त्यांणीं करावी व त्याणींही पोळी लावावी. व याचे तर्फेची होळी याणीं करावी, तीस पोळी याणीं लावावी. तैसीच पानें दिवाणाची दो ठायीं व नांगर याचे तर्फेचा यांणी करावा. व त्याचे तर्फेचा तीहीं करावा. व बाजे कुल मान दोन्ही जागा करून वाटून खावे. येणेंप्रमाणें बिलाकुसूर आवलाद व आफलाद लेंकराचें लेंकरीं खाऊन सुखें नादावें. यास हिल्ला हरकती करील, तोच श्रीचा खोटा व समस्त गोताचा खोटा. हा महजर. सही दोघाचे इमान व पालक मनास आणितां अधिक उणा असेल ते बराबरी वाटण्या करणें. पुशिलें तपशीलः—

साउजीकडे हल्ली नवे कारकीर्दीस बाजी घोरपडे यानीं दिधलें इनाम जमीन.

८१० डोंगरोजी. ८२० आबाजी मोकदम.

८२० आपाजी मोहिते. ८५ साबाजी मोकदम.

८५ बाळोजी मोकदम यांचे बाईलीनें जेवण केलें ह्मणोन दिवाणे दिधलें

——

.॥.

नेताजीकडे इनाम

८१५ ऐन कदीमपैकीं वाटिल्याखेरीज जाजती आहे.

८१० शिवाजी मोहिते यास समाइक वडिली दिधलें.

——

८२५

पालक.

८२० आपला आजा मेला तेवेळेस बापास दूध प्यावयास दिधले.

८२० राजजी घोरपडे मिरासीपैकी जाजती.

——

.।१०

सदरहू इनाम व पालक वाट जाल्या व गल्ले जाजती आहे ती याखेरीज उरले इनाम व पालक वाटून खात आहेत. याउपरी गोत प्रश्नीं ह्मटिले जे, शिवाजी मोहिते हा दोघांच्या तकरीरामध्यें देखिला नाहीं अगर ऐकिला नाहीं त्यास इनाम देणें निसबती नाहीं व साउजीकडे इनाम हल्ली कारकीर्दीस जरी जाला तरी वृत्तीवत पाटील ह्मणोन जाला इनाम तो पाटिलकीचाच आहे व नेतोजीकडे दूध प्यावयाकारणें ह्मणोन दिधला, तरी मिरासीदार ह्मणोनच दिधला. मिरासी कारणें जें साधिलें ते बराबरी वाटून द्यावें बितपशीलः—

इनाम.		पालक
साउजीकडे आहे चावर .॥.	नेताजीकडे	नेताजीकडे जाजती आहे बिघे ०।१०
त्यापैकीं नेताजीकडे द्यावे बिघे ८१७॥	८१५ ऐनकदीमपैकी जाजती.	त्यापैकीं साउजी द्यावे ८२० वीस बाकी नेताजीनें खावे.

बाकी आपण खावे बिघे।१२॥.	४१०	कदीम इनाम पैकीं शिवजी मोहिते आहे ते.	४२० बिघे खावे एकूण ४२० नेताजी ४२० साउजी
	४१७॥	हल्ली साउजी पासील चावर .॥. पैकीं द्यावे	.१०
	.।१२॥		

येणेंप्रमाणें इनाम व पालक जाजती राहिले होते तेही वाटून दिधले. येणेंप्रमाणें खाऊन गंगाजाल होऊन सुखें नादावें. एकूण बद सुमार ३० तीस रास मोर्तबसुद.

१० भैरवनाथ व गोकुळनाथ बिन बालकराम यांस तीर्थपुरोहितपणाची सनद.

"वेदमूर्ति भैरवनाथ व गोकुळनाथ बिन बालकराम तिवारी गगापुत्र. वास्तव्य क्षेत्र श्री वाराणसी, याच्या वडिलास तीर्थपुरोहितपण महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामी याणी शके १५८७ विश्वावसूनाम सवत्सरीं लेहून दिल्हें आहे तें पत्र मनास आणून हल्ली महाराजानी भोगवटियास पत्र करून दिल्हें पाहिजे, ह्मणवून विनति केली. यावरून पाहिलें पत्र सदरहू सवत्सरीचें होतें तें मनास आणून, त्याप्रमाणें हल्लीं तीर्थपुरोहितपण दिल्हें असे स्वामीचे वशीचे जे कोण्ही येतील, क्षेत्री राहतील, ते तुह्मांस तीर्थपुरोहितपण देतील. तुह्मी आपले पुत्रपौत्रादि वशपरपरेनें तीर्थपुरोहितपण अनुभवून सुखरूप राहणें. येविशीं त्याचे नांवें पत्र १."

११ पिराजीराव राजे घाटगे सर्जेराव यांस दिलेलें राजपत्र.

"राजश्री पिराजीरावराजे घाटगे सर्जेराव वजीर गोसावी यांसः—

मश्रुअनामहुरुल हजरत सातमी दौलत राजमान्य प्रत महाराज राउ शिव छत्रपती शके १५९० [कीलकनाम सवत्सर] माघ शुद्ध सप्तमी, तुह्माकडील पत्र, सर्व सविस्तर मजकूर राजश्री मल्हारपत नाडगौडे याणी श्रुत केला, तो दिलात आणोन तुह्मांस हजरत पादशहा यांणीं मेहेरबानी होऊन वजिरी, मोर्चल, चवघडा, वतनदारी, जहागीर कागल परगणा, कर्याती ६ गाव सुमार ६७॥, तुह्मास इनाम करून दिले बरहुकूम अनुभव केला, वतनदारीचे कागदपत्र ध्यानात आणोन तुह्मांस राजपत्रें करून दिल्हीं आहेत.

शिवाय कलम.

तुह्मीं समक्ष भेटीस याल [ते] समई मानमरातब कलम.

१ चादर.

१ खडा.
१ कंठीं व १ शिरपेच.
१ पोषाख ५ सनगे कलाबुती निरोप समयीं.
१ ताजीम समक्ष बसका बरोबर.
१ घोडे २

६

१ सदरहू वतनदारी व जहागिरी पूर्ववतप्रमाणें झुटीसानक तुमचे वंशपरंपरा भोगवटा करून सुखरूप असावें.

२

एकूण कलमें दोन सदरहूप्रमाणें तुमचे परगणेंत खून, खराबी वगैरे पूर्वीपासून तुम्हीं मुखत्यार. आह्मांकडून कांहीं दरोगा पाहणेंचें कारण नाहीं. बहुत काय लिहिणें जाणिजे मोर्तबसुद असे. "

---

१२ पिराजीराव राजे घाटगे सर्जेराव यांस दिलेलें राजपत्र.

"स्वस्ति श्रीमंत् महाराज राजश्री शिव छत्रपती यांनीं, राजश्री पिराजी राव राजे घाटगे, सर्जाराव वजीर, देशमुख, जहागीरदार व फौजदार, परगणे कागल यांसी, इलाखा प्रकर्णास्तव राजपत्र सादर जालेवरून सर्जेराव यांनीं शके १५९० [कीलकनाम संवत्सरे,] माघ शुद्ध ७ सप्तमीस, मुक्काम पुरंधरास भेट जाली, ते समयीं सर्जेराव याजनिजबत वकील राजश्री मल्हार नागनाथ नाडगौडा माणगांवकर यांनीं हुजूर सर्जेराव यांचें वतनदारीचा मजकूर शाडेनिशीं, कागदपत्रीं समजूत करून दिल्हा. ते वेळेस मजकूर समजोन घेऊन, तुम्हीं वतनदार वजीर, मोर्चेल, चवघडा, तेव्हां स्वामी प्रसन्न होऊन तुमची वतनदारी तुह्मांस चालवणें जाणोन, हें राजपत्र करून दिल्हे. बितपशील खालीं गांवें आहेत. * * *

एकूण कसबे साहा व गांव सुमारें साडे सदुसष्ट पादशाई इनाम तालुका व देशमुखीच वतन वगैरे शाडेनिसी पूर्वीपासून चालत आलें आहे, त्याप्रमाणें तुमचे तुम्हीं पुत्रपौत्रादि व वंशपरंपरा अनभऊन सुखरूप राहाणें. तुह्मांस महाराज सरकारांतून तुमचें वतनदारीस वगैरे इलाखास्तव विचारणेंस कारण नाहीं. जाणिजे. रवाना छ. १५ माहे जिल्हेज मोर्तबसूद मोर्तब असे. "

---

१३ पंताजी गोपिनाथ बोकील यांस इनाम जमिनीबद्दल सनद.

"अखडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री हवालदार व कारकून हाल व इस्तकबाल व देशमुखानी व देशपांडीयानी, परगणे शिरवळ. प्रति मोरो त्रिमल पेशवे, सुरुसन तिसा सितैन अलफ. राजश्री साहेबाचें आज्ञापत्र छ ४ साबान सादर जालें तेथें आज्ञा जे, बनाम पंतांजी गोपिनाथ बोकील भले ब्राह्मणाचे भक्त आहेत यानिमित्य यावरी साहेब मेहरबान होऊन इनाम जमीन अव्वल चावर २ दोन वितपशील:—

मौजे माडिकी, जमीन चावर १ एक. मौजे भवाळी, जमीन चावर १ एक.

येकूण दोनी चावर जमीन, मेहरबान होऊन दिधली असे. यासी दुमाले बाब अजरामहामती करून दिधले असेत. देखील नख्तयाती व महसूल व सैलबैल तर्फ ठाणें, तर्फ देहाय व पायपोसी व खर्चपट्टी व मोहन सादिलवार चौबीना व वेठी, बेगार व हल्लीपट्टीया व पेस्तरपट्टीया व खरेदी व फरोख्त व घासकाडी व दुधपट्टी व तूप, कुलबाब, कुलकानू व फर्माश कलमी व कदिमी व नकदी व इस्मी व रस्मी दिल्हे असे. दुमाले करणें. सदरहू प्रमाणें भोगवटा अवलाद व अफलाद चालवणें यास सदरहू प्रमाणें ठाण्याचें खुर्दखत देऊन जमीन इनामबाब महदूद घालून मशारनिल्हेचे दुमाले करणें. हर दरसाल ताजे खुर्दखताचा उजूर न करणें. तालीक लेहून घेऊन अस्सल इनामदार मशारनिल्हेस फिरोन देणें. यास इस्कील न करणें. यासी मशारनिल्हे घरीच कीर्दी करतील तरी करूत अगर कुणबी यास लावितील तरी लाउत. ये बाबे इस्कील न करणें. सदरहू प्रमाणें दोनी चावर इनाम पिढी, दरपिढी लेंकराचें लेंकरीं चालवणे. कोणे बाबे इस्कील न करणें म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रमाणें तुम्हीं वर्तणूक करणें. एक जरा इस्कील न करणे. रवाना छ ३ सवाल."

---

१४ सैद सादत हजरत पीर सैद हिसाम खतल वगैरेस दिलेली सनद.

"मसुरुल हजरती राजश्री राघो बल्लाळ सुभेदार व कारकून महालानिहाय तर्फ पुणें यांसी. राजश्री शिवाजी राजे दडवत, सुरुसन आर्बा सबैन अलफ. सैद सादत हजरत पीर सैद हिसाम खताल व काजी कासिम पीरजादे व नायब काजी व खतिबा परगणे मजकूर यासी इनामती शेत व रोजमुरा व बाजे हक्क परगणे मजकूर महाराज साहेबाचे वेळेस भोगवटा चालिला असेल व अफजल(खान) मारिला त्याचे आधीं साहेब पुण्यास असता, ते वेळेस भोगवटा चालिला असेल. तेणेंप्रमाणें तहकीक करून मनास आणून, इनाम व रोजमुरा व बाजेहक्क जे असेल ते भोगवटा प्रमाणें दुमाले करणें व मशीद गांवगन्ना तेल रोषनाई चालत आलें आहे तेणेंप्रमाणें देणें. व काजी इभराइमाचे लेंक, काजी कासिमासी खुतबा पढावयाबद्दल इस्कील करितातीं, नरी या हरदोजणाचा निवाडा महाराज साहेबाचे वेळेस जाहला आहे. निवाडपत्र काजी कासिमापाशीं आहे. तें मनास आणून हरदोघांस सदरहू निवाडीयाप्रमाणें वर्तवणें व मौजे फुरसिंगीचे मशिदीचे खिजमतेबद्दल हसन ताबोळी व चांदजी मोकदम

कसबे खेडेबारें हे हरदोघेजण गैर मिरासी असोन दखल करितात. तरी सनदपत्र मनास आणून गैरमिरासी असेल तो दूर करणें. सालाबाद चालत आले असेल तेणेंप्रमाणें चालवणें. रवाना छ १५ जिल्काद मोर्तबसुद."

१५ महजर.

महजर तेरीख छ १५ माहे रजब, समत कागीनेला मामले बंकापूर, सुरुसन अर्बा सबैन अलफ. ब हुजूर हाजीर मजालिसीयानी.

कारकुनानी.

भिमराव हवालदार, संमत मजकूर.
कमलो पडित हुद्देदार, कसबे कागीनेला.
तिमाजी नारायण मजमदार, संमत मजकूर.

देशकार्नी.

आणाजी पडित मुतालीक देसाई, संमत मजकूर.
मेळगिरी वाहुजी मुतालीक नाडगौडा.
भिकाजी कृष्ण मुतालीक देसाई, मामले मजकूर.
सिनपा खोत जकायती, संमत कागीनेला.
आरळपा व रायपा कुळकर्णी कसबे मजकूर.
नागोजी मोहजी मुतालीक देशकुळकर्णी, संमत मजकूर.
नारोबा बावारस मुतालीक नाडकर्णी.
रायाजी बिरो मुतालीक देशकुळकर्णी मामले.
लखदया व लिंगणगौडा पटेल कसबे मजकूर.
रोटीमली नाइक तलवार, कसबे मजकूर

या हुजूर जाहला महाजर ऐसाजे, कसबे कागनेलामध्यें शिवाजीचें लष्कर हावसबावीसी जाता वेळे कसबे मजकुरासी आग लाऊन तमाम घरें जाळून गेलीं. ते वख्तीं गुरुनाथ भट जोशी, कसबे मजकूर याचें घर माळवदेशीं आग लाऊन जळून गेले. आजी सबब मिरासीचे कागदपत्र तमाम जळून गेले

ऐसे सदरहू जमीन इनामतीचे व बाजे कागदपत्र व बाजे सनदवार कागदपत्र होते ते तमाम जळून गेले. हा महाजर सही. बितपशीलः—* * *

१६ प्रधान व इतर मुलकी व लष्करी अमलदार यांचे कामाबद्दल कानुजाबते.

(ही नकल महाराज सातारकर याचें दफ्तरातील कानुजाबते वगैरेबद्दल म्हणून बुक प्रतापसिंह महाराज यांणीं इसवी सन १८१८ नतर तयार केलें. त्यात शिवाजी महाराजाचे कारकीर्दीचे जाबते दिले आहेत त्यावरून घेतली आहे.)

शिवाजी महाराज यांची कारकीर्द.

कानूजाबता राज्याभिषेक शके १ आनंदनाम संवत्सरे, जेष्ठ वद्य त्रयोदशी, सोमवासर.

मुख्य प्रधान यार्णी सर्व राजकार्य करावें. राजपत्रावरी शिक्का करावा. सेना घेऊन युद्धप्रसंग स्वारी करावी. तालुका ताबिनात स्वाधीन होईल त्याचा रक्षून बंदोबस्त करून, आज्ञेनें वर्तावें, व सर्व सरदार सेना त्याजबरोबर जावें. त्यांनीं सवीसमेत चालावें, येणेंप्रमाणें. कलम १.

मोर्तब.

आमात्य यांणीं सर्व राज्यांतील जमाखर्च चौकशी करून दफ्तरदार फडणीस त्यांचे स्वाधीन असावें. लिहिणें चौकशीनें आकारावें. फडनिशी, चिटनिशी, पत्रावर निशाण करावें. युद्धप्रसंग करावे. तालुका जतन करून आज्ञेंत चालावे. कलम १.

मोर्तब.

सचिव यांणीं राजपत्रें शोध करून अधिकउणें अक्षर मजकूर शुद्ध करावी. युद्धप्रसंग करून तालुका स्वाधीन होईल तो रक्षून आज्ञेंत वर्तावें. राजपत्रावर चिन्ह संमत करावें. कलम १.

मोर्तब.

मंत्री यांणीं सर्व मत्र विचार राजकारण यांतील सावधतेनें विचार करावे. आमंत्रण निमंत्रण, वाकनिशी त्याचे स्वाधीन. तालुका जतन करून युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रावर संमत चिन्ह करावें. कलम १.

मोर्तब.

सेनापती यांणीं सर्व सैन्य रक्षण करून युद्धप्रसंग स्वारी करावी. तालुका स्वाधीन होईल तो रक्षून हिशेब रुजू करून आज्ञेनें वर्तावें व फौजेचे लोकांचें बोलणें बोलावें. सर्व फौजेचे सरदार यांणीं त्याजबरोबर चालावें. कलम १.

मोर्तब.

पंडितराव यांणीं सर्व धर्माधिकार, धर्म, अधर्म पाहून विचिक्षा करावी. शिष्टांचे सत्कार करावे. आचार, व्यवहार, प्रायश्चित्त पत्रें होतील त्याजवर समत चिन्ह करावें. दानप्रसंग, शांति, अनुष्ठान तत्काळीं करवावे. कलम १.

मोर्तब.

न्यायाधीश यांणीं सर्व राज्यांतील न्याय, अन्याय मनास आणून बहुत धर्मकरून न्याय करावे. न्यायाचीं निवाडपत्रें याजवर संमत चिन्ह करावें. कलम १.

मोर्तब.

सुमंत यांणीं परराज्यांतील विचार करावा. त्यांचे वकील येतील त्यांचे सत्कार करावे. युद्धादि प्रसंग करावे. राजपत्रावर संमत चिन्ह करावें. कलम १.

मोर्तब.

चिटणीस यांणीं सर्व राज्यांतील राजपत्रें ल्याहावीं. राजकारणपत्रें उतरें ल्याहावीं.

सनदी दानपत्रें वगैरे महालीं हुकमी याचा जाबता, फडनिशी, चिटनिशी अलाहिदा त्याप्रमाणें ल्याहावें. हातरोखा, नाजूक पत्रें याजवर मोर्तब अथवा खासदस्तक मात्र वरकडाचा दाखला चिन्ह नाहीं. चिटणिसानींच करावें. कलम १.

मोर्तब.

फौजेचे सबनीस, बक्षी यांणीं सर्व फौजेची हजेरी चौकशी करावी. यादी करून समजावावें. रोजमरा वाटणें. सत्कार करावा. युद्धादि प्रसग करावा. कलम १.

मोर्तब.

सेनाधुरंधर याणीं बिनी करावी. आघाडीस जावें उतरावें. फडफर्मास जमा करावी. लूट करणें, मना करणें, चौकशी, ताकीद याजकडे पुढें असो. सेना रक्षण करावी.

कलम १.

मोर्तब.

किल्ले, कोट, ठाणीं, जजीरें येथील कायदे करून दिल्हे त्याप्रमाणें हवालदार, सुभेदार, कारखानीस, सबनीस, सरनोबत, तटसरनोबत लोक याचे जाबते करून दिल्हे. त्याप्रमाणें चालोन सावधतेनें स्थळें रक्षावीं. तगीरी, बहाली हुजरून व्हावी. हाजमी नेमणूक तालुकदार याकडे परवाना, किल्ल्या. हवलदार याचा हुकूम, शिक्के त्याचे नावचे कारखानिशी सबनिशी जाबता अलाहिदा असे. कलम १.

मोर्तब.

अष्टप्रधानचे अधिकारी यांणीं खासगींचे अधिकारी यांचे इतल्यात चालून दफ्तरी हिशेब गुजरावें. कमल १.

मोर्तब.

सुभे, मामले, तालुकदार यास ज्याजकडे जें नेमलें, तें त्यांणीं जाबतेप्रमाणें चालावें. हुजूरचे दरखदार, चिटनीस, फडनीस, मुजमदार यांचे इतल्यानें चालून हिशेब गुजरावे.

कलम १.

मोर्तब.

बारा महालीचे अधिकारी यांणीं आपलालें काम दुरुस्त राखून हिशेब आकारून दफ्तरांत गुजरावे. कलम १.

मोर्तब.

दरुणी महालचें कामकाज दिवाण नेमून दिल्हें त्यांणीं सर्व पाहून करावें. चिटनीस, फडनीस याणीं आपलालें दरखाचें कागदपत्र ल्याहावे. याजवर निशाणचिन्ह दिवाणांनीं करून व त्यास समजाऊन हुजर मोर्तब समक्ष करावें. कलम १.

मोर्तब.

पोतनीस यांणीं पोते जमाखर्च लिहिणें करावें. नजर पेशकशी जमा करावी. पोतदार यांणीं पारख करावी. कलम १.

मोर्तब.

अष्टप्रधान यांजकडे देहे व तालुके व स्वारीस जावयास दरखदार सर्व हुजूरचे जावे. त्याचे दाखल्यानीं व्यवहार करावा. स्वारीस जाणें त्यास, मुतालीक करून दिल्हे त्यांणीं सेवा, व्यापार चालवावा. हुजूर रहावें. कलम १.

मोर्तब.

आबदारखाना चिटनीस यांजकडे सराफखानासुद्धां अधिकार सांगितला. मज्यालसी विडे, अत्तर गुलाब व हारतुरे (फळ) फळावळ, खुशबोई खरेदी जमाखर्च यांणीं करून हिशेब दफ्तरीं गुजरावा. कलम १.

मोर्तब.

पागा, जुमलेदार, सरदार यांणीं कैद करून दिल्ही त्याप्रमाणें चालून, सेनापती व प्रधान यांचे समागमें कामेंकाजें करावीं.

कलम १

मोर्तब.

येकूण कलमें वीस मोर्तब.

जाबता लष्कर, सरनोबत, सेनापती व सरलष्कर, सरदार, जुमलेदार, पागा यांजबरोबर दरखदार हुजूरचे मुजुमदार, कारभारी, दिवाण व जमेनीस, सबनीस, फडनीस, चिटनीस यांणीं सर्वांनीं वर्तणें. राज्याभिषेक १ आनदनाम संवत्सरे, जेष्ठ वद्य प्रतिपदा, भानुवासरे, क्षत्रिय कुलावतंस राजा शिव छत्रपती.

सरदार यांणीं सर्वाध्यक्षपणें सर्वांचें अनुमतें स्वारी, काम काज हुजुरचे आज्ञेप्रमाणें करावें. कलम १.

कारभारी, दिवाण यांणीं सरदार व मुजुमदार एकमतें कारभार करावा. पोते, जामदारखाना, कोठी, बाजार येथें देखरेख कारभारी यांची असावी. चिठीवांचून कारखानीयाचा खर्च करूं नये. रोखा मजमूकडील व्हावा. मजमदाराचें निशाण जाल्यावर कारभारी यांणीं रुजू करावें. सरदारांनीं नंतर शिक्का मोर्तब करावें. कलम १.

मुजुमदार यांणीं एक विचारें कामकाज, कारभार करावा. मुजुमदारावांचून सरदारांनीं कारभार करू नये. मुजुमदाराचें निशाण, सरदारांचा शिक्का उभयतांनीं मिळोन कारभार मुलूक, परमुलूक, कारखाने, पोते, जामदारखाना, कोठी, पागा व बाजार वगैरे येथील जमाखर्च हिशेब होणें तें उभयतांनीं पहावे. खरेदी करणें उभयतांचे विचारें करावी.

लष्करची जमा, सुदती, तैनात हजिरी गणती करणें. व समजाविशी करणें उभयतानीं करावी. मोकाशी याची व पैदास्ती, परमुलुखी खंडणी जमा होईल ती, उभयतांनीं मिळोन करावी. अखेर सालीं एकंदर हिशेब एक बेरजा करून हुजूर आणावी. कारखाने व बाजार येथें खर्च करणें तो परवानगीनें करू नये. चिठ्ठ्या रोखानीं निशाण, शिक्का मोर्तबनिशी करावा.

कलम. १.

सबनिसानीं लष्करची जमा, सुदती, तैनात, हजीर, गणती करणें, ते सरदार, मुजमदार, कारभारी यास बसवून त्याचे विचारें करावी. तैनात जाबता सबनिसांनीं करून मुजमदाराचें निशाण घ्यावें. मग शिक्का मोर्तब करावें. पोते, जामदारखाना, कोठी, बाजार वगैरे खर्च देणें येईल, ते शिपाई लोकास चिठ्ठीरोखा मुजुमूकडील सरदाराचें शिक्क्यानिशी होईल त्याप्रमाणें खर्च करावा. लोकाचे हिशेब अखेरसालीं करावे. ते मुजूमदारास रुजू करून मग लोकाची समजाविशी उभयतानीं करावी. देणें फाजील उतरून मुजुमदाराकडे द्यावें. कलम १.

जिमेनीस याणीं पोते, जामदारखाना, कोठी, बाजार वगैरे पैदास्ती, कमावीस जमा याजवर दखलगिरी करावी पैदास्ती जाबते जमिनिसानीं करावे. तेथें मुजुमदाराचें निशाण, सरदारांचा शिक्का कारखान्यावर राखणें. ते मजुमदारांकडील लिहिणारे लिहितील. निशाण मग शिक्का होईल. मग रोखियावर बाहेर चिन्ह करावें पोते, जामदारखाना येथील लाखोटे, शिलकवारी करणें तो कारभारी समक्ष जिमेनिसानीं करावे. कलम १.

फडनीस, चिटनीस याणीं आपलाले दरखाचे जाबतेप्रमाणें लिहिणें करून, मजमदाराचें निशाण होऊन याचे इतल्यानें करावें. फडनिसानें अवघा दिवस मुजुमदारपांशीं कारभार करावा. रोजकीर्द घडून रात्री मजूम दप्तरीं द्यावी. बोटखत घालणें तें लिहिणार व फडनिसानीं मिळोन घालावे. अखेर सालीं हिशेब दप्तरदार व फडनिसानीं मिळोन करावें. फडनिसानीं एकबेरजी हिशेब आकारून हुजूर घेऊन यावे. चिटनिसानीं जे कागद येतील त्याचे लाखोटे फोडून सरदार, मजमदार यांस वांचून दाखवावे. पैवस्ती घालावी. जाब लेहून रवसुदती मजमदारानीं घालावी. कलम १.

पोतनीस व जामदारखाना, कोठी याचे निसींदे यांणी जमा येईल त्याचे जमा व खच करून मजमदाराचें निशाण घ्यावें. खर्च करणें तों रोखीया प्रमाणें करावा. पोतीयाचा रोजनामा वरकड कारखानीयाचा बदेरा करून मजुमदाराचें निशाण, मग सरदारांचा शिक्का घ्यावा. महिने झडतीया कराव्या. अखेर साल बारामाही झडती करावी. मजूम दफ्तरीं द्यावी. कलम १.

कारखानीयाचे लिहिणार व बाजारचे लिहिणार यांणीं जमेचा हिशेब, जमाबंदी करणें ते सरदार, मजमदार याचे मतें करावी. खर्च रोखीयाप्रमाणें करावा. रोजखर्च करून नि-

शाण व शिक्का घेऊन अखेर सालीं हिशेब घेऊन मुजुमदारापाशीं द्यावा. मुजुमदार सरदार यासी समजावितील. कलम १.

एकूण जाबत्याचीं कलमें आठ मोर्तब.

जाबता चिटनिसी लिहिण्याचा राज्याभिषेक शके १ आनंदनाम संवत्सरे, जेष्ट वद्य प्रतिपदा, भानुवासरे, क्षत्रिय कुलावतस श्री राजा शिवछत्रपति.

नूतन इनामगाव कोणास दिल्हा त्यांचीं पत्रें व वतन पत्रें.

२ फडनिसी.

१ नावाचें.

१ मोकदमास.

२

३ चिटनिसी.

१ तालुकदार.

१ सुभे, मामले, वर्तमान भावी.

१ देशमुख, देशपाड्ये, जमेदार.

३

५

कलम १.

मोकासेगांव, तैनातेस जमीन वगैरे दिल्हे यास पत्रें.

१ फडनिशी मोकदमास.

३ चिटनिसी.

१ तालुकदार.

१ कमाविसदार.

१ जमीदार.

३

४

सदरहू खेरीज साहित्यपत्रें चिटनिशी कलम १.
जाबसाली हुकूमी कागद राजकारणीं चिटनिशी कलम १.
ताकीद, रोखे चिटनिशी.
१ सरंजामाचे.
१ शेत सनदेचे.
१ वृत्तीचे.
१ इनामाचे.
१ वरातेचे.

५

कलम १.

तहनामा चिटनिशी
कानुजाबते एकदर जकातीसुद्धां चिटनिशी कलम १.
मुलखास, गावास, जमिनीस, कौल इस्ताव देणें तो चिटनिशी कलम १.
खंडणी करून पैका ठरेल. करार याचा कौल फडनिशी कलम १.
नवा अंमलदार, कमावीस त्याच्या सनदा.
१ नांवची फडनिशी.
१ जमीदार वैगेर चिटनिशी.

२

कलम १.

घासदाणीयाचे रोखे होणें ते चिटनिशी फडफर्मास रोखसुद्धां कलम १.

रसद व इरसाल लग्नकार्य सामान आणावयाचीं पत्रें चिटनिशी यांजमध्यें रसद महाल पैकीं उगवून घेणें. त्याची सनद सादर होईल म्हणून लिहिणें पडलें. तरी चिटनिशी सनद मजरा असें म्हणोन फडनिसानें त्याहातीं. बुडती रसद करार जाली असेल ते ती पाठवणें तरी चिटनिशी आणि त्याजवर तुट वरात फडनिशी.

कलम १.

त(ह)कूब रोखे चिटनिसी.
१ शेताचे.
१ बाकी त(ह)कूब जालेवर.
१ नापीक जाहले तरी त(ह)कूब वसूल पाहाणी जाहल्यावर वसूल घेतला जाईल.

३

कदीम इनाम, वतन, वर्षासन, स्वराज्य, परराज्यांत चालत असेल त्याचीं ताकीदपत्रें व भोगवट्याचीं सारीं चिटनिशी गांव, नांवसुद्धा. कलम १.

पुरातन वतनाचा इनसाफ होऊन, वतनदारी करार जालीयावरी त्याचीं पत्रें सर्व चिटनिशी, वतनदार यांचीं पत्रे अगर जिल्हेदार, सुभेदार यास पत्रें होतील. त्याजमध्यें हरकी शेरणी करार होईल ती जागा ठेवून त्याहावी. तेथेंच फडनिसानीं आमके हातें भरावे. कलम १.

नूतन हर कोणास वतन, इनाम वतन दिल्हें, त्याचें नांवाचें पत्र फडनिशी व त्याजमध्यें अमके रुपये घेतले भरावे म्हाजे जी पत्रें होतील, ते चिटनिशी कलम १.

प्रायश्चित्त देणें तरी व गोताई करावयाची आज्ञा जाशी, उपाध्ये यासी पत्रें व ब्राह्मणांस व शूद्रांस हरकोणास पत्र देणें तें चिटनिशी. प्रायश्चित्तामुळें हरकी व शेला दिवाणांत घेणें. अमके रुपये जमा म्हणोन फडनिसानें भरावे. वरकड पत्रें चिटनिशी रुपये शिवाय जाल्यास फडनिसाकडील काही नाहीं. कलम १.

हर कोणास परस्परे कज्जा होऊन, व्यवहार दिवाणांत आला तरी निवाड्याप्रमाणें खऱ्यास हरकी, खोट्यास गुन्हेगारी, याची पत्रें चिटनिशी. हरकी, गुन्हेगारी, बेरीज मात्र फडनिसानी भरावी. कलम १.

खड, गुन्हेगारी व हरकी पैदास्त बदअमलाचीं पत्रें चिटनिशी. कलम १.

हर कोणास वरात दिल्ही, ती पावण्यास दिवसगत लागलीयास ताकीदपत्र वरातीप्रमाणें, रुपये आदा करणें म्हणोन चिटनिशी आणि वरात शंभराची असली, महाली ऐवज कमी पडला त्यापैकीं पन्नास करार करून देणें, तर फडनिशी आणि एके वेळेस शंभराची वरात दिल्ही ती फिरली, फिरून करार जाली ती चिटनिशी, अधिक उणें जाल्यास फडनिशी. कलम १.

कोठीचीं व रहदारीचीं दस्तकें एकंदर चिटनिशी. कलम १.

तलब रोखा चिटनिशी. कलम १.

वतनी महालांत व बंदर, किल्ले वगैरे कानूजाबते देणें ती चिटनिशी. कलम १.

दरसाल दारुगोळा व कापड हुजुरून किल्ले, कोट, ठाणीं व जेथें रवाना करणें व तेथून हुजूर आणवणें तरी पत्रें चिटनिशी. हुजत मात्र फडनिशी. कलम १.

आल्या कागदाचा लाखोटा फोडून वाचून दाखवणें, करून रवाना करणें चिटनिशी. कलम १.

जिनसास निरख करून कानुजाबता करून देणें, तो चिटनिशी. कलम १.

हुजुरून गांवास व कोठीस व परगण्यास अंमलदार पाठविठा तरी हुजूरच्याप्रमाणें करार ह्मणोन. जिल्हेकडील सारीं पत्रें चिटनिशी. कलम १.

हरएकाची मालीयेत वगैरे जप्त करणें, ज्याची त्यास देव(वि)णें तीं पत्रें चिटनिशी. कलम १.

गड, कोट, किल्ला वगैरे देणें, हद्द देणें व एखाद्यास कैद करणें, सोडवणेंचीं पत्रें चिटनिशी. कलम १.

राजकारणी बातम्याचीं पत्रें चिटणिशी. कलम १.

खास दस्तकी, हातरोखा, मोर्तबी लिहिणें तो एकदर चिटनिशी. हरकोणास किल्ला, कोट, सरजाम देणें व इनाम वतनें व वरातीबाबद सागोन वस्त्रे पाठविणे, ते विषयीं पत्रें व खड, गुन्हेगारी, हरकी, मसाला, नजर वगैरे भरून चिटनिसानींच करावें. यादी लेहून ठेऊन दप्तरांत पाठवावी. त्याप्रमाणें त्याणी जमाखर्च करावा लाखोटा, हातरोखा चिटनिसानीं करावा व हातरोख्यास चिन्ह अथवा दाखला चिटनिसाखेरीज कोणाचा नाहीं कलम १.

तकवती, वसाहती, कौल चिटनिशी. कलम १.

घर, जागा, ठाव, ठिकाण, लांकूडफाटें, शेतभात, अमानत करणें अगर देव(वि)णें याचीं पत्रें चिटनिशी. कलम १.

जाबत्याचीं कलमें चिटनिशीचीं बत्तीस मोर्तब.

जाबता कारखानिशी व सबनिशी किले, कोट, जंजिरे, ठाणीं येथील कानु, कायदे चालण्याची राज्याभिषेक शके १ आनदनाम संवत्सरे, जेष्ठ वद्य प्रतिपदा, भानुवासरे, क्षत्रिय कुलावतस श्री राजा शिव छत्रपति.

पोतें व जामदारखाना याची हुजत व जमाखर्च सबनिसाकडे व्हावा. हुजतीवर मोर्तबाखालीं रुजू कारखानिशी. म्हणून चिन्ह कारखानिसांनीं करावें व पोतें जामदारखानीयावर खर्ची चिठ्ठी होणें, ते सबनिशीकडील व्हावी. हवालदाराचें मोर्तब खालीं. रुजू कारखानिशी म्हणोन कारखानिसांनीं करावें. व पोतें जामदारखान्याची कीर्द रोजचे रोज दोहींकडील दाखल्यानीं रुजू होऊन कीर्दीवर मबलग सबनिसाचे होऊन, हवालदाराचा शिक्का व मोर्तबाखालीं चिन्ह रुजू कारखानिशी, कारखानिसांनीं करावें. कलम १.

किल्ल्याहून मुलकांत रोखापत्र करणें जालें, तरी सबनिशीकडील व्हावें. शिक्का हवालदारांनीं करावा. मोर्तबाखालीं चिन्ह रुजू कारखानिसांनीं करावें. कलम १.

लोकांची हजेरी घेणें ती सबनिसांनीं घ्यावी. दाखल्यास कारकून कारखानिसाचा असावा. याप्रमाणें पोतें व जामदारखान्याची वाटणी जाली तरी करावें. कलम १.

मुलकांत रोखा व पत्र करणें तो नक्की कापडाचा, सबनिशी मोर्तबाखालीं रुजू कारखानिशी, कारखानिसांनीं करावें. व या खेरीज ऐनजिनसी व जाबद फर्मास याचा रोखा

होणें तो कारखानिसाकडील व्हावा. मसाला सबनिसानीं भरावा. मोर्तबाखालीं रुजू कारखानिसी करावें. सबनिसांनीं करावें. कलम १.

हिशेब हवालदारास अगर तालुकदारास अथवा सरकारात समजावणें तो सबनिशी व कारखानिशीकडील, एकबेजीं हिशेब सबनिसानीं आपलेपाशीं घेऊन समजावावें. जवळ कारखानिसांनीं बसावें. दोहीकडील हिशेब पुसणें तो सबनिसास पुसावा. कलम १.

सरकारांत अगर तालुकदारास अगर सरदारास, सुभेदारास, दुसरे किल्लेदारास कागद पत्र लिहिणें तो सबनिसानीं ल्याहावा. चिन्ह सबनिसानीं करावें. शिक्का, मोर्तब सुभेदारांचा जाहलीयावर कारखानिसानीं बार मात्र करावे. चिन्ह करूं नये. बार करून ठेविल्याखेरीज रवाना न करावे. कलम १.

मुलखातील घेण्याच्या पाहाण्या करणें, तरी सबनिशीकडून आकार करून सबनिसानीं द्यावा. जमेस कारखानिसांनीं धरावें. आकाराचा रोखा व कौल देणें तो सबनिसानीं द्यावा. शिक्का, मोर्तब हवालदाराचे जाहालीयावर कारखानिसानी रुजू चिन्ह करावें. कलम १.

एकूण सबनिशी कलमें सात मोर्तब.

ऐनजिनसी व वजनीं व सुमारी जिन्नस किंवा जमाखर्च होईल, त्याची कीर्द कारखानिशीकडील व्हावी. हुजत कारखानिसानीं द्यावी. हवालदाराचा शिक्का मोर्तब जालीयावर खालीं रुजू सबनिशी, सबनिसानीं करावें. कोठीस खर्चाची चिठी होणें, ती कारखानिसानीं ल्याहावी. हवालदाराचें मोर्तब जालीयावर रुजू सबनिशी करावें. कलम १.

ऐनजिनसी व वजनीं व सुमारी वाटणी होऊ लागली, तरी कारखानिसाकडे व्हावी. दाखल्यास कारकून सबनिसाचा असावा. कलम १.

ऐनजिनसी व वजनी व सुमारी खर्च होईल, त्याची कीर्द कारखानिसानीं ल्याहावी. त्याजवर मबलग कारखानिसाचे जालीयावरी शिक्का, मोर्तब हवालदाराचे जालीयावरी रुजू सबनिसांनीं करावें. कलम १.

मुलकात रोखापत्र ऐनजिनसी व सुमारी होणें, तो कारखानिसाचा व्हावा मसाला सबनिसानी भरावा. हवालदाराचें मोर्तब जालीयानंतर रुजू सबनिशी चिन्ह करावें. कलम १.

पैदास्ती कुणबिणी अथवा पोरगे, घोडे, गुरें आलीं तरी हुजत कारखानिसानी द्यावी. मोर्तब खालीं रुजू सबनिशीं करावें. खर्च जाला तर कारखानिसाची चिठी व्हावी. मोर्तब खालीं रुजू सबनिशीं करावें. कलम १.

इमारत जाली तरी तेथील काम घेणें, तें कारखानिसांनीं घ्यावें. देखरेख सबनिसांनीं करावी. कारखान्यावरील लोकांस वांटणी जाली तरी नक्की व कापड सबनिसांनीं करावी. दाखला कारखानिसांचा असावा. ऐनजिनसी कैली, वजनी, सुमारी वाटणी जाली तरी कारखानिसानीं करावी. दाखला सबनिसांचा असावा. कलम १.

आरमाराचा कारखाना करणें जालें तरी कारखानिसाकडील कारकुनानें ल्याहावें, काम कारखानिसानीं घ्यावें. देखरेख सबनिसानीं करावी. कलम १.

एकूण कारखानिशीं कलमें मोर्तब.
एकूण जाबत्याचीं कलमें १४ चौदा मोर्तब

---

१७ निळकंठभट बिन गंगाधरभट त्रिंबककर यांस दिलेली सनद.

वेदमूर्ती राजश्री निळकठभट बिन गगाधरभट त्रिंबककर यासी, राजश्री शरीफजी राजे भोंसले दंडवत विनंति उपरी तुह्मास आपण मनसुफचे पूर्वी सागितलें होतें, जे दीड शत प्रत्येई लिंगें करीत जाणें. सालास रुपये २५ पचवीस देऊ, ऐसें बोललों होतो. त्यावर आपणांस मनसूफ जाहली ह्मणोन तुम्ही आपणापाशीं आले. तियासी सन हजार १०८९ पासून मोकरर वर्षासन रुपये १०८ बहाल केले असेती हे साल बसाल देत जाऊं तुम्हीं श्रीची पूजा व लिंगें ९० पन्नास दरगेज आमचे नावें करीत जाणें. सुरुसन सीत सन हजार १०८९ छ २१ माहे जिलूकाद मोर्तब सुद.

१८ रामशास्त्री बिन रंगा दीक्षित यांस दिलेली सनद.

यादी वेदशास्त्र (संपन्न) राजश्री रामशास्त्री बिन रगा दीक्षित, उपनाम कामुदाल, गोत्र कौशिक, सूत्र आपस्तब, वास्तव्य वृद्धाचल यांणीं शाहूनगर नजीक किले सातारा येथील मुक्कामी स्वामीसन्निध येऊन विनति केली कीं, आपले आजे शिताराम वाजपेये यासी, पूर्वी महाराज राजश्री—थोरले कैलासवासी यांणीं राज्याभिषक शके २ राक्षसनाम संवत्सरीं कर्नाटक प्रातीं स्वारी जाली होती ते समई, धारादत्त इनाम चंदी प्रातें देहाये करून दिल्हे बितपशीलः—

मौजे इरुवेली पटु, परगणे.
विलपूर देह १.
सरकार चंदी.

मौजे कुरतूड, परगणे वृद्धाचल १.
सरकार पालमकोट्टा.

मौजे मणी एक पटु, परगणे.
तिरुवालापूर १
सरकार चदी.

लग०

येकूण देह तीन कुलबाब, कुलकानू हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी जल, तरु, तृण, काष्ट, पाषाण, निधिनिक्षेप सहित इनाम देऊन पत्रें करून दिल्हीं हे'ती, तीं जीर्ण जाहलीं. तर महाराजांनीं भोगवटीयास नूतन पत्रें करून देऊन वशपरपरेनें चालावेलें पाहिजे ह्मणून. त्यावरून मनास आणून, हे थोर, सत्पात्र, अनुष्ठाते ब्राह्मण कुटुंबवत्सल, याचे चालविलीया स्वामींस व स्वामींच्या राज्यास श्रेयस्कर ऐसें जाणून, स्वामी याजवरी कृपाळु होऊन, सदरहू तीन गाव लबाब, कुलकानू देखील हल्लीपट्टी, पेस्तरपट्टी, जल, तरु, तृण, काष्ट, पाषाण, निधिनिक्षेप

आदीकरून खेरीज हक्कदार व इनामदार करून देहाय मजकूर धारादत्त इनाम पूर्ववत् प्रमाणें यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें करार करून दिल्हे असेत. तरी तुह्मीं देहाय मजकूर सदरहुप्रमाणें यांसी व याचे वंशपरपरेनें इनाम चालविणें. प्रतिवर्षीं नूतन पत्राचा अक्षेप न करणें. या पत्राची तालिक लेहून घेऊन अस्सल पत्र भोगवटीयास याजवळीं परतोन देणें ह्मणून पत्रें.—

३ मोकदमानी देहाये मजकूर यास.
३ देशमुख व देशपाडे
१ देशाधिकारी.
१ मुख्यपत्र.

८

१ राजश्री रघोजी भोंसले, सेनासाहेब सुभा.

९

एकूण नव पत्रें देणें.

छ २४ जमादिलावल, सन सलास अर्बैन मया अलफ. पत्रें आषाढ वहुल षष्ठी, इंदुवासर, शके १९ दुंदुभीनाम संवत्सरे.

१९ चिंचवडकर गोसावी यांचे सनदेवद्दल सरहवालदार यांस दिलेलें ताकीदपत्र.

मशरुल अनाम राजश्री गगाधर मुद्गल सरहवालदार महालहाय, प्रति राजश्री शिवाजी राजे, सुहूरसन सवा सबैन व अलफ. श्री चिचवड याचें इनाम, परगणे सुपें विलायतीस आहे. गलहलफ करिता जें लागतें तें लागत, खडतें तें खडत. ऐसीयास जकिदी होत, त्याचे पैके श्रीस पावावे. ते तुह्मी झाडा करून पाववीत नाहीं ह्मणून कळों आलें. तरी हे गोष्टी तों तुह्मीं बरी करीत नाही. साहेबांस हे गोष्टी मानणार नाहीं. जरी श्रीचे सेवेस सादर असाल तरी साहेबासही बरें वाटेल. व तुह्मासही उचित आहे. ऐसें असोन इतकें अतर पडो देतां. बहुत अन्याय करिता, याउपरी साहेब तुह्मावरी ये गोष्टीकारणे खिजतील. ऐसें जाणून याउपरी ऐसी वर्तणूक करीत नव जाणें. याचे इनामाची कीर्दी जे होईल त्याचे हिशेबीं पैके वेळचे वेळेस पाववीत जाणें. मागील राहिले असतील तेही देत जाणें. पेस्तरही देत जाणें. याचा इनाम कसबे पैकी पावे ते करणें. पुढें तम्ही बोभाट येऊ न देणें. छ २० रबिलाखर परवानगी हुजूर मोर्तब सुद.

२० पुरुषोत्तमभट सोमयागभट यांस दिलेली सनद.

वेदमूर्ति राजश्री पुरुषोत्तमभट सोमयागभट बुरडी, प्रति राजश्री शिवाजी राजे वंडवत

उपरी. आह्मी श्रीस येऊन श्रीप्रीत्यर्थ येणेंप्रमाणें वार्षिक नियम केला. होन ४२० वितपशीलः—

श्रीस पूजेकारणें वर्षास होन ३०. तपशील.

६ कर्पूरदीप प्रत्यहीं दोनदा करीन जावा. त्यास होन.

१२ क्षीराब्धि अभिषेक श्रीनिवास मूर्तीस प्रत्यहीं करीत जावा त्यास होन.

१२ नंदादीप तुपाचा सर्वदा घालणें.

३०

तुह्मीं श्रीची पूजा याप्रमाणें करीत जावी. यानिमित्य तुह्मास वर्षासन देत जाऊं होन ३०.

अन्नछत्र प्रत्यहीं एक होन केला असे. तुमचे दिमत केला असे. प्रत्यहीं एक होनाचें अन्न ब्राह्मणास घालीत जाणें. जे संख्या होईल ते होईल. त्यात तुह्मीं काहीं वंचनार्थ न करणें. एकूण वर्षासन होन ३६०.

येणेंप्रमाणें हें करीत जाणें.

येणेंप्रमाणें चारशें वीस होन. याप्रमाणें केलें असेत. एक वर्षाचें द्रव्य रोख दिल्हें. पुढें प्रतिवर्षीं पाववीत जाऊ. तुह्मीं येणेंप्रमाणें व्यय करीत जाणें. तुमचें वर्षासन तुह्मीं घेत जाणें. शके १५९९ पिंगलनाम संवत्सरे, वैशाख शुद्ध द्वादशी, क्रवासरे.

---

२१ नरसिंहभट बिन गोविंदभट यास दिलेली नवी सनद.

वेदमूर्ति नरसिंहभट बिन गोविंदभट कुंभकोणकर, गोत्र वसिष्ट, सूत्र अश्वलायन, यांणीं हुजूर येऊन विदित केलें कीं, महाराज राजश्री थोरले कैलासवासी श्रीव्यंकटेश स्थळास आले. ते समयीं पुरुषोत्तमभट बिन सोमयागभट बुरडी, धर्माधिकरणी यांचे हातून श्रीची पूजा पुनस्कार करून, प्रतिवर्षीं श्रीचे पूजेस व अन्नछत्रास व वेदमूर्तीचे कुटुंब सरक्षणास वर्षासन मोईन करून दिली बद्दल पत्र शके १५९९ पिंगलनाम सवत्सरे, वैशाख शुद्ध द्वादशी, भृगुवासर, बनाम पुरुषोत्तमभट मोईन वितपशीलः—

श्रीचे पूजेस प्रतिवर्षीं होन पाा.

६ कर्पूरदीप प्रतिदिवशीं करीत जावा.

१२ क्षीराब्धि अभिषेक श्रीनिवास मूर्तीस प्रत्यहीं करीत जावा.

१२ नंदादीप सर्वदां चालवीत जावा त्यास.

३०

अन्नछत्रास प्रत्यहीं होन पाा, एक मोईन केली आणि भट गोसावी यांचे दिंमत केलें. प्रत्यहीं एक होनाचें अन्न ब्राह्मणांस घालावें. वंचनार्थ काहीं न करावा. एकूण सालीना होन पाा ३६०.

श्रीची पूजा व अन्नछत्र चालवावें. या निमित्य वेदमूर्तीस वर्षासन होन पाा ३०.

येणेंप्रमाणें च्यारशें वीस होन प्रतिवर्षीं द्यावयाची मोईन करून पत्र करून दिल्हें आणि एका वर्षाचें द्रव्य तेव्हांच दिल्हें त्याउपर कोणें वर्षीं कांहीं पावलें, कांहीं न पावलें. त्याउपर कैलासवासी राजश्री काकासाहेबांकडे चंजीचे मुक्कामीं जाऊन वर्तमान विदित केलें. त्यांनीं मनास आणून सदर्हू मोईन पावावी, यास्तव मौजे कुवानूर, तालुके अकलमंगल, परगणे पोलूर, प्रांत मजकूर हा गांव कुलबाब कुलकानू देखील हल्लींपट्टी व पेस्तरपट्टी, जल, तरु, पाषाण, निधिनिक्षेप सहित खेरीज हक्कदार व इनामदार, इनाम दिल्हा. तीं पत्रें भावनाम संवत्सरे, ज्येष्ट शुद्ध चतुर्थी, भृगुवासरची आहेत. तें मनास आणून पूर्ववत् प्रमाणें इनाम करार करून दिल्हा पाहिजे, ह्मणून त्यावरून मनास आणून व पूर्वील पत्रें पाहून श्रीची पूजा व अन्नछत्र चालवणें अवश्यक जाणून सदरहू चारशें वीस होनाचे ऐवजीं मौजे मजकूर पूर्ववत् प्रमाणें इनाम करार करून दिल्हा येविशीं पत्रें वैशाख शुद्ध अष्टमी, भृगुवासर, परिधावी संवत्सर. बारकीर्द छ १२ जिल्काद, सन इसन्ने सलासीन.

१ वृत्तिपत्र वेदमूर्तीचे नांवें.
१ मौजे मजकूर बनाम मोकदम.
१ देशमुख व देशपांडचे.
१ देशाधिकारी.

४

---

२२ मल्हार गोसावी यांस दिलेलें इनामाबद्दल नवी सनद.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ७ रौद्र संवत्सरे, ज्येष्ट बहुल द्वितीया, गुरुवासर, क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति यांणीं, राजश्री मानजी गोपाळ देशाधिकारी व देशलेखक, प्रांत कराड, यांप्रत व पुढें होणार यांसी आज्ञा केली ऐसीजेः—वेदमूर्ति राजश्री मल्हार गोसावी सदाव्रती गोसावी व वस्ती मौजे नाडोली यासी, मौजे नाडोली, तर्फ मारुल, प्रांत कन्हाड हा गांव अग्रहार पहिलेपासून चालत आला आहे. ऐसीयासी राजश्री कैलासवासी स्वामींनीं कांहीं दिवस अमान्य केलें होतें, कीं इरीति आपले राज्यांत चालिली नाहीं. यावरी स्वामी, राजश्री गोसावी यांचे भेटीस मौजे कोरटीस पन्हाळीहून रायगडावर जातां (ना) आले. तेथें भेटी जाली. भेटी नंतर कितेक संभाषण प्रसंग जाला, पाहातां बहुत प्रमाणिक, ईश्वरभक्त देखिले. यावरून स्वामींनीं कृपाळु होऊन सदरहू गांव पहिलेपासून गोसावी

यासी अग्रहार चालत आला आहे, तेणेंप्रमाणें चालवावें, ऐसा इत्यर्थ करून तो गाव गोसावीयासी दिल्हा असे तरी तो गाव कुलबाब पहिले प्रमाणें गोसावी यांचे दुमाला करणें. ते गांवीं तुह्मीं कांहीं घ्यावयासी गरज नाही. ये गोष्टीस उजूर व हरकत न करणें. प्रति लेहून घेऊन अस्सल परतून देणें लेखनालंकार.

छ १५ जमादिलोवल, इहिदे समानीन अलफ.

---

२३ हरभट बिन जनार्दनभट वगैरेनीं केलेल्या अर्जावर हुकूम.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १९ श्रीमुखनाम सवत्सरे, वैशाख शुद्ध पोर्णिमा, भोमवासरे, क्षत्रिय कुलावतस श्री राजाराम छत्रपति यांणीं, राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी सुभा, परगणे वाई यासी आज्ञा केली ऐसीजे:—वेदमूर्ति विनायकभट बिन नारायणभट आफळे व समस्त ब्राह्मण वास्तव्य स्थळ मौजे माहुली, समत निंब, कृष्णावेणी संगम याच्या विषयी वेदमूर्ति हरभट बिन जनार्दनभट व विनायकभट बिन एकनाथभट आफळे या उभयतांनीं चदीचे मुक्कामीं स्वामी सन्निध येऊन विदित केलें की, विनायकभट आफळे व समस्त ब्राह्मणांस आदिलशहाचे वेळेपासून मौजे माहुली, संमत मजकूर हा गांव इनाम चालत होता त्यावरी हा देश राजश्री कैलासवासी स्वामींस हस्तगत जाहला. त्या दिवसापासून ब्राह्मणाचें इनाम अमानत करून, ब्राह्मणांच्या योग्यता व कुटुंबें पाहून त्या त्या योग्य ब्राह्मणांस धान्य देविलें होतें. तें हा काळ पावेतों चालत आलें आहे. त्या अन्नेकडून ब्राह्मणांचीं अग्निहोत्रें व कुटुंबें संरक्षण होतात बहुत प्रयास होऊ लागले, यास्तव स्वामीसंन्निध आलों आहों. ऐसीयास महाराज धर्मप्रभू, कितेक देवब्राह्मणाचें इनाम पूर्वप्रकारें चालतें केलें तरी आपणास आदिलशहाचे वेळेस गाव इनाम चालत होता. त्या अलीकडे हा काळपावेतों इनाम गाव न चालता भोगवटा तुटला आहे. तरी पूर्वप्रकारें इनाम चालवावयासी आज्ञा केली पाहिजे, ह्मणोन श्रुत केलें. त्यावरून मनास आणितां, विनायकभट आफळे व समस्त ब्राह्मण हे बहुत थोर, भले विद्यावंत, कुटुंबवत्सल व कृष्णातिरीं वास करून राहणार असें जाणोन, यांस पूर्वी धान्य द्यावयाची मोईन आहे ते अमानत करून, हल्लीं नूतन इनाम मौजे माहुली, संमत मजकूर हा गांव १ एक कुलबाब, कुलकानू हल्लींपट्टी व पेस्तरपट्टी जल, तरु, पाशाण, निंधिनिक्षेप, झाडझडोरा पडले पानसहित, खेरीज इनामती व हक्कदार करून इनाम दिल्हा असे. तरी सदरहू वृत्ति आदिलशहाचे वेळेस सर्वमान्य ब्राह्मणांस होती. तें समयीं ज्या ज्या ब्राह्मणीं अनुभविलें असेल तें मनास आणून तेणेंप्रमाणें त्याच ब्राह्मणांस चालवणें. हे वृत्ति यांस व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवणें. वर्ष प्रतिवर्षी नूतन पत्राची अपेक्षा

न करणें. या पत्राची प्रती लेहून घेऊन, मुख्य पत्र विनायकभट आफळे यांजवळी परतोन देणें, जाणिजे. निदेश समक्ष.

मर्यादेयं
विराजते.

---

२४ सिदपूरकर ब्राह्मणांस वृत्ति मिळाल्याची सनद.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २४ ईश्वरनाम संवत्सरे, श्रावण वहुल अष्टमी, भृगुवासरे, क्षत्रियकुलावतस श्रीराजाराम छत्रपति यांनी राजश्री * * * गोपाळ मुख्य देशाधिकारी व लेखक, सुभा प्रात कऱ्हाड यांसी आज्ञा केली ऐसीजे:—कसबे कऱ्हाड ये स्थळींच्या ब्राह्मणांस * * * अदलशाहाचे कारकिर्दीस कित्येक वृत्ति * * * त्या. त्यास अलीकडे तीर्थरूप राजश्री कैलासवासी छत्रपति स्वामीस देश अर्जानीं आला. त्यांहीं कूल वतनदारांच्या वृत्ति अमानत केल्या. त्याबरावरी ब्राह्मणाच्याही वृत्ति अमानत करून, ब्राह्मण पाहोन त्यांस धर्मादायाची मोईन करून दिल्ही होती, त्याप्रमाणें चालत आलें. सांप्रत धामधूम जाली, त्यामुळें देश खराब पडिला. यास्तव आपल्या धर्मादायाप्रमाणें चालत नाहीं. म्हणून हे ब्राह्मण कष्टी होतात. ऐसीयास हें राज्य म्हणजे * * * देवाब्राह्मणांचें आहे. येथें ब्राह्मणाचें चालवावें, ब्राह्मणाही आपली स्नानसंध्यादिक कर्मानुष्ठानें आचेतन (आचरोन) स्वामीस व स्वामींच्या राज्यास कल्याण चिंतून रहावें. हें जाणोन या ब्राह्मणास अग्राहर करून देऊन याचें चालवावें हें स्वामीस अगत्य, म्हणून राजश्री रामचंद्र पंडित अमात्य हेही कसबे मजकूरच्या क्षेत्रवासी ब्राह्मणास आपल्या राज्यात धर्मादाऊ चालत होता व इना * * पूर्वी होती, ते दूर करून श्रीकृष्णा व कुकुरमतीचा संगम कऱ्हाडासन्निध जाहला आहे तेथें श्रावण वहुल जन्माष्टमीचे दिवशीं जाऊन, मौजे सैदापूर कर्यात हवेली, परगणे कऱ्हाड या गांवाचें नाव सिदपूर ठेवून, मौजे मजकूरची प्राचीन * * * युग्त खेरीज हक्कदार व इनामदार करून कुलबाब, कुलकानू सर्वमान्य देखील हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी व जल, तरु, पाषाण, निधीनिक्षेपसहीत * * * धारादत्त करून दिल्हे असत * * * प्रमाणें * * * चालवणें. सदरहू गाव अग्राहर करून दिल्हा आहे. याची भूमि यथाविभागें ब्राह्मण पाहून वांटून द्यावी, यास्तव राजश्री पडितराय यास आज्ञा केली असे. मग ते ती मनास आणून यथाविभागें करून, भूमि वाटून आपलें पत्र करून देतील. त्याप्रमाणें ब्राह्मण आपलाले पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें उपभोग करून, स्वामीस व स्वामींच्या राज्यास अभिवृद्धी चिंतून सुखरूप राहतील. हें जाणोन सदरहूप्रमाणें गांव यांच्या दुमाला करून अग्रहार चालवणें. सदरहू गांव अग्रहार दिल्हा आहे. यास मऱ्हाष्ट्र (महाराष्ट्रीय) होऊन जो खलेल लावील त्यास श्रीवाराणसीमध्यें गोहत्येचें पातक व मुसलमान होऊन जो खलेल लावील त्यास त्याच्या महजबाची शफत असे. येविषयीं धर्मशास्त्राचें वाक्य:—

स्वदत्ता पत्रदत्ता वायो हरेत् वसुधरा ॥
शष्टी वर्ष सहस्त्राणी विष्टाया जायते कृमि ॥
दानपालनयोर्मध्ये पालनं श्रेष्ठमुच्यते ॥
दानत. स्वर्गमाप्नोती पालनादच्युतं पदं ॥ १ ॥

हीं धर्मशास्त्राचीं वाक्यें स्मरोन वंशपरपरेनें चालणें. तरी तुम्हीं सदरहू गाव लिहिल्याप्रमाणें चालवणें. नवीन पत्राचा आक्षेप प्रतिवर्षी लावीत नव जाणें. ह्या पत्राची प्रती लेहोन घेऊन, मुख्य पत्र परतोन भोगवटीयास क्षेत्रवासी ब्राह्मण याजवळी देणें जाणिजे लेखनालंकार. "

---

२५ ब्रह्मपुरीकर ब्राह्मणांस इनाम जमिनीची सनद.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २९ बहुधान्यनाम संवत्सरे, आषाढ बहुल पचमी, रविवासरे, क्षत्रियकुलावतंस श्री राजाराम छत्रपति याणीं, समस्त वेदमूर्ति ब्राह्मण समुदाय, पूर्व वास्तव्य स्थान ब्रह्मपुरी, ग्रामसीमा कसबे मसूर, तर्फ उंबरज, सुभा प्रात सातारा यांस दिल्हें दानपत्र ऐसेजें·——तुह्मीं स्वामी समीप येऊन विदित केलें कीं, आपणा समस्त ब्राह्मणास पूर्वी अदलशहाचे कारकिर्दीस गावगन्ना इनाम भूमी होत्या. त्यावरून आपले योगक्षेम चालत होते. त्याउपरी हा देश संपूर्ण राजश्री कैलासवासी स्वामीस हस्तगत जाला. तेही आपली इनामत होती. ते कुली अमानत करून, ब्राह्मण पाहोन धर्मादाऊ धान्याची मोईन करून पाववित होते. तेणेंकडून उपजीविका करून होतों. त्याउपरी या देशात तांब्राची राज्यकात बहुत जाली. देश केवळ अमित्राहीं आक्रमिला. तेणेंकरून कितेक ब्राह्मण स्थळ सोडून देशातरें गेलों होतों. पुन्हा मागतीं स्वामींच्या प्रतापें करून, स्वामीस देश हस्तगत जाला. याकरिता आह्मीं ब्राह्मण स्थळातरें गेलों होतों ते मागतीं स्वस्थळास आलों. परंतु योगक्षेम चालिला पाहिजे ह्मणोन राजश्री रामचंद्र पंडित आमात्य यांपाशीं येऊन विज्ञापना केली. त्यांही मनास आणिता देश उध्वस्त जाला आहे. यास्तव आह्मास धर्मादाऊ मोईनीप्रमाणें पावत नाहीं, यन्निमित्य अदलशाहाचे वेळेसी जैसी इनाम भूमि होती, तैसे दिल्हेयानें कीर्दीकरून उत्पन्न होईल, तें भक्षून स्वामीस कल्याण चिंतून राहोन हा विचार करून, आह्मा ब्राह्मणाचें इनाम पहिलें होतें तें कुली दूर करून मौजे कोणेगाव, तर्फ उंबरज, श्री——तीरीं आहे, तेथें विसा पांडाचे मोजणीनें जमीन चावर ९ पाच इनाम देऊन, आपलें पत्र व पंडितरायाचें पत्र दिल्हें, आणि जमिनीचें नाम ब्रह्मपुरी ऐसें परियाय नाम ठेविलें. ते भूमि केवळ पडीत पडली आहे. आपण तेथें किर्दीविषयीं श्रम करवित आहों. अल्प स्वल्प उत्पन्न होतें. तेणेंकरून आह्मां सर्वत्र ब्राह्मणांचा योगक्षेम चालत नाहीं. त्यास महाराज या देशास आले आहेत. आह्मां ब्राह्मणांचा समुदाय विशेष व बहुत ब्राह्मण अनुत्पन्न व कुटुंबवत्सल आहों. त्यास सदरहू पांच चावर इनाम भूमि दिल्ही, तेणेंकरून

उपजीविका चालत नाहीं. स्वामी धर्मप्रभू देवब्राह्मणाचे प्रतिपालक आहेत. आह्मा समस्तांवरी दया करून मौजे कोणेगाव, तर्फ उंबरज हा गाव अदलशहाचे वेळेसी मोजणीनें जमीन चावर १२॥ १४ साडेबारा चावर, चवदा बिघे आहे. हा गाव अग्रहार करून दिल्हीया तेथें कीर्दीकरवून जें उत्पन्न होईल तें यथाविभागें वाटून घेऊन, आपली स्नानसंध्यादिक, वैश्वदेव, उपासना, अग्निहोत्रादिक सत्कर्में आचरोन स्वामीस व स्वामींच्या राज्यास कल्याण निरंतर चिंतून राहूं. ह्मणोन विस्तारें विदित केलें. त्यावरोन मनास आणिता, ब्राह्मण समुदाय विशेष, अग्निहोत्री, विद्यावंत, आपलीं सत्कर्में आचरण करून आहेत, व कुटुंबवत्सल, अत्यंत अनुत्पन्न, यांचा सदरहू पाच चावराहीं योगक्षेम चालोन सुखरूप राहात नाहीं. ह्मणून तुमचें चालवणें हें स्वामीस अगत्य. यास्तव श्रीपरमेश्वर प्रित्यर्थ तुह्मा समस्ता ब्राह्मणास अग्राहरास मौजे कोणेगाव, तर्फ उंबरज, सुभा प्रात सातारा या गावाचें नाम ब्रह्मपुरी ऐसें ठेऊन, मौजे मजकूरचे प्राचीन हक्कदार व इनामदार करून, कुलबाब, कुलकानू, हद्दीपट्टी व पेस्तर व मोहतर्फा व जल, तरू, पाषाण, निधीनिक्षेपसहीत सर्वमान्य तुह्मांस व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेस दिल्हा आहे. आणि सनद प्रात मजकूरच्या देशाधिकारीयास अलाहिदा सादर केली असे. तेणेंप्रमाणें ते तुमच्या दुमाला करून चालवितील. व मौजे मजकूरच्या उत्पन्नाचा यथाविभाग ब्राह्मण पाहोन वाटून द्यावयाविषयीं राजश्री पंडितराव यासी आज्ञा केली आहे. ते मनास आणून वाटून देतील. त्याप्रमाणें तुह्मी, आपले परंपरेनें उत्तरोत्तर अनुभवित जाणें. आणि सुखरूप राहोन स्वामीस व स्वामींच्या राज्यास अभिवृद्धी निरंतर चिंतीत जाणें. सहरहू गाव तुह्मांस अग्राहर दिल्हा आहे. यास कोणी हिंदू होऊन खलेल लाविल्यास, वाराणसीमध्यें गोहत्येचे (पातकाची) शपथ व मुसलमान होऊन खलेल लाविल्यास, त्याच्या महजबाची शपथ. यदर्थी धर्मशास्त्राचीं वचनें:—

स्वदत्ता परदत्ता वायोहरेच वसुंधरा ॥
सविष्टायोकृमिर्भूत्वा पित्रभिः सहमज्जति ॥ १ ॥
स्वदत्ता द्विगुणं पुण्यं परदत्तानुपालनं ॥
परदत्तापहारेण स्वदत्त निष्फलं भवेत् ॥ १ ॥

हीं पातकें स्मरोन तुह्मास उत्तरोत्तर चालवितील. जाणिजे. लेखनालंकार

मर्यादेये
विराजते.

---

२६ महजरनामा.

महजरनामा अज करार ब तारीख १९ शहर रजबूलमुरजब सन ३२ जुलूस-

वाला मुताबिक सन ११९९ बहजूर शरा शरीफ पर महकमे. कसबे पुणें, अमले परगणे मजकूर, सरकार जुन्नर, सुभे खुजदस्तेबुनियादी. सबब अंकी मालोजी नरसिंगराव व गोविंदराव शितोळे देशमुख, परगणे मजकूर जाहीर केले जेः—मौजे लवळें, तालुके कर्यातीमावळ, परगणे मजकूर आपला इनाम दरोबस्त कुलबाब, कुलकानू अजकदीम मूळ अयाम व आबाय अजदद मोकरर असे व पुश्त दरपुश्त काबीज व मुतसरफ आहों. ऐसियासी परगणे मजकुरीच्या देशपाडीयानीं हजूरच्या शिरीस्तीयामध्यें दफ्तरीं दाखला काय सबब * * * नाहीं हे तहकीक करणें. यावरी देशपाडीयास बोलावून पुरसीस करितां, रामचंद्र वल्लद बायाजीराम यांणीं एकरार केला कीं, विठोजी नाईक देशमुख याजमध्यें व बयाजीराम आपले पदर यामध्यें निफाक होता. अजि सबब दाखला दफ्तरीं लिहिला नाहीं. जे वख्तीं मिर्जा राजे जैसिंग येहीं शिवाजी भोंसले यासी सलाह करून तर्फ कर्यातीमावळ, देह ३६ छत्तीस त्याचे तसरूफ टाकिले, ते वख्तीं शिरीस्तीयामध्यें देह ३६ छत्तीस दरोबस्त शिवाजी मरहूम याच्या नावें लिहिलें. मौजे मजकूर खालीशे शरीफचे कमाविशींत नव्हता म्हणोन अलाहिदा लिहिला नाहीं. पेस्तर दाखल करावा तरी देशमुख व मोरो विठ्ठल वगैरे देशपांडीये गनिमाचे कैदेस ताहाल पावेतों होते. याकरिता आपणापासून तगाफिली जाली. हल्लीं देखमुख बहजूर करामत गजूर येऊन पोहोंचले व खलाअत फाखेर ममताज होऊन, बमुजदब हुकूम एकदस आला. सनद दरगाही व दिवाणी सरफराज जाले. ऐशीयास साबिक विठोजी नाईक व बयाजीराम हरदो जणामधें निफाक होता, ते हरदोजणही गुजरले. आपली काहीं तकसीर नाहीं. मौजे मजकूर इनाम देशमुखाचा दरोबस्त सुदामद सालाबाद गहदम चालत आला आहे. यासी नवदिगर नाहीं. म्हणोन एकरार केला. यावरी तमाम आहली व मवाली परगणे मजकूर व गिर्दनवाही जमिदार हरकोण्ही लहान थोर सागतातीं जे, मौजे मजकूर इस्तकबील बुनियादी इनाम तालुके देशमुखाचे असे व काबीज व मुतसरफ आहेती. येबाबेची तमाम शाहिदी गुजरलीयावरी सनद असनद पुरशीस करिता देशमुख मजकुरानीं जाहीर केलें कीं, इनामतीच्या सनदा अलाहिदा आपल्यापाशीं होत्या, त्या फितरतीकरिता गुम जालिया हुकाम निजामनमुलक वगैरे आपणापाशीं आहेती. यामधें वतन देशमुखीचा रुसूम व इनामती व इसापती दाखल आहे ऐसीयासी इनामती ह्मणजे मुतफकांत गावगन्ना जमीन इनाम व इसापती ह्मणजे दरोबस्त गांव बदस्तूर दखणीयाचा लेहावयाचा तमाम नवाहीस जाहीर व तहकीक मोकरर असे. यावरी हल्लीं अजरुये तहकीकाती मौजे लव्हळें, तर्फ कर्यातीमावळ, परगणे मजकूर कदीम इनाम मालोजी नरसिंगराउ व गोविंदराउ शितोळे देशमुख यांचा जाणोन बदस्तूर साबिक मोकरर केला असे. तरी मशारनिल्हे येहीं सुखें आपला खातरजमा राखोन लेंकराचे लेंकरी मौजे मजकूर कुलबाब, कुलकानू काबीज व मुतसरफ होऊन इनाम दरोबस्त खात जाणें व परगणे मजकुरीचे आबादानीस व मामुरीस सरगरम असणें. सदरहूप्रमाणें मोकरर

होऊन महजर जाला असे. सनीनहाल यासी कोण्ही नवदिगर न करणें. हा महजर सही तहरीर सदर कलमीं * *."

२७ वेळेगांव बांडेकोळी यांस इनाम दिल्याबद्दल सनद.

श्रीपति
विराजे

"सकल गुण राजमान्य राजश्री बिवाजी नाईक अवधूतराव व कावजी नाईक व दाजी नाईक बांडेकोळी यासी, पतंगशहाराजे सस्थान जव्हार सन ३९१ वर्षे ल्याहावया कारणें कीं, शिवाजी महाराजांचे वेळेस राज्य आपलें घेतलें. आपले वडील जनस्थानीं येऊन राहिले. ते समयीं तुमचे वडिलाही श्रमसाहास करून राज्य सोडविलें. त्यावर मेहेरबान होऊन मौजे वेळें, परगणे कशप हा गाव तुह्मास इनाम दरोबस्त कुलबाब, कुलकानू देखील जमीनदार बरहुकूम रकमाळा, कमावीस, खंडगुन्हेगारी, चोरी, छिनाला, निपुत्रिकी, शिंगशिगोटी हरएकबाब दरोबस्त हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी लेंकराचें लेंकरीं अवलाद, अफलाद वंशपरंपरेनें याचा उपभोग घेत जाणें. यासी आपले वंशीं कोणी अंतर करणार नाहीं. त्यास शपथ असे. जल, तरु, पाषाण, निधिनिक्षेप दरोबस्त माफ असे. महालीं नक्कल देऊन अस्सल घेऊन उपभोग घेत जाणें."

शुद्ध १ माहे चैत्रमास.

२८ शांभट बिन रामभट श्रीमहाबळेश्वरकर यांची वर्षासनाबद्दल सनद.

वेदमूर्ति शाभट बिन रामभट श्रीमहाबळेश्वरकर, सूर्यउपासिनी यांनीं हुजूर येऊन विदित केलें कीं, थोरले कैलासवासी स्वामी यांनी गोपाळभट, आपले आजे याजपासून मंत्र-उपदेश संपादिला. ते समयीं वर्षासन सुभा जावलीपैकीं करून दिल्हें:—

होन पातशाही १००.	गल्ला नवशेरी बारुळें.
वजन टकबदी.	४८ तांदूळ
.।४ तूप.	४८ नागली.
.।४ तेल.	८
.॥।३	

येणेंप्रमाणें करून दिल्हे पाहिजे. त्यावरून मनास आणून देशाधिकारी परगणे मजकूर यांकडे दिल्हे छ ८ रमजान सन अशर.

२९ सुबुधगिरी गोसावी यांस मिळालेलें इनामाची नवी सनद.

"आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री फत्तेसिंग भोंसले ताहा मोकदमानीं मौजे देगाउ तर्फ सातारा सुहूरसन इसन्ने अशर मया अलफ. सुबुधगिरी गोसावी वस्ती पर्वत पाटेश्वर यानीं विदित केलें जें, आपले गुरु रत्नगिरी गोसावी हे डोंगरावर देवासन्निध मठ बाधोन राहोन देवाची उर्जा चालवीत होते. त्यास महाराज राजश्री थोरले स्वामी कैलासवासी यानीं मौजे मजकुरीं इनाम जमीन चावर चतुःसीमा मर्यादा करून दिली आहे तेथें विहीर खणिली. जमीन वहीत करून धान्य येईल तेणेंकरून देवाची पूजा, नैवेद्य, अतीत अभ्यागत करून होते. ते महाराज राजश्री राजाराम स्वामींचे कारकिर्दीपावेतों चालिलें. त्याउपर किल्ले सातारा मोंगलानीं घेतला, तेव्हा आपला मठ जाळला. तेणेंकरून इनामपत्रें जळालीं व कालेंकरून गुरुही समाधिले. इनामाची लावणीही राहिली. सांप्रत आपण राजश्री श्रीनिवास पंडित प्रतिनिधी यास हें वर्तमान विदित करून त्यांकडून इनामपत्र घेतलें आहे. खालसा साहेबाकडे आहे. साहेबीं मोगलाई खालसाकडूनही पत्र दिलें जे, इनामाची कीर्दी करू ह्मणून विदित केलें. त्यावरून मनास आणितां अतीत भला आहे. देवासंन्निध राहातो. देवाची उर्जा चालली पाहिजे. या निमित्य सदरहू इनाम खालसा तर्फेनेंही करार करून दिला आहे. तर याचा इनाम कदीम ठिकाण आहे तो याचे दुमाले करणें. येविशीं जिल्हेकडीलही पत्र आहे. तेणेंप्रमाणें इनाम दुमाला करणें. गोसावी इनामाची कीर्दी करून धान्य निर्माण होईल तेणेंकरून देवाची पूजा, दीपनैवेद्य, अतीत, अभ्यागत करून राहील प्रतिवर्षीं नवीन पत्राचा आक्षेप न करणें. प्रती लेहून घेऊन हें पत्र गोसावीयाजवळ भोगवटीयास देणें. जाणिजे. छ ३ रजब. मोर्तबसुद. "

---

३० राणोजी बिन सुर्याजीराव काकडे यांस दिलेलें इनामपत्र.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४० विजयनाम सवत्सरे, आश्विन शुद्ध प्रतिपदा सौम्यवासरे, क्षत्रिय कुलावतस श्रीराजा शाहु छत्रपति स्वामी यानीं राणोजी बिन सूर्याजीराव काकडे यांसी दिल्हें इनामपत्र ऐसेजें.—तुम्हीं किल्ले पुरधरचे पेठेचे मुक्कामीं विनंति केली कीं, आपले बाप सूर्याजीराव बिन सोमाजी दिनकरराव काकडे यास, महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामींनीं मिरजा राजास भेटले, ते समयीं मौजे पागरें, तर्फ निरथडी प्रात पुणें येथें इनाम रक्कम छत्तीस रुकीयाची जमीन तीन चावर करून देऊन, आपली व राजश्री मिरजा राजाचीं पत्रें करून दिल्हीं. त्याउपरी महाराज राजश्री स्वामी दिल्लीस गेले. तेथून फिरोन राजगडास आले. ते प्रसंगीं तीन चावरपैकीं एक चावर जमीन करार केलेली व महाराज राजश्री महाराज साहेबीं गोरखोजी बिन विरोजी दिनकरराव काकडे यांस एक चावर इनाम जमीन करून दिल्ही होती, ती करार करून दिल्ही आहे. तरी स्वामींनीं त्याप्रमाणें

इनाम करार करून पत्रें दिवलीं पाहिजेत. त्यावरून मनास आणून तुम्हीं स्वामींचे कदीम सेवक म्हणून सदरहू इनामपैकीं महाराज राजश्री थोरले कैलासवासी यानीं राजगडचे मुक्कामीं तीन चावरपैकीं एक चावर जमीन इनाम करार केली ती हल्लीं स्वामींनीं करार करून अलाहिदा सनदा सादर केल्या आहेत. तरी त्याप्रमाणें तुम्हीं एक चावर जमीन इनाम अनुभवून पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें सुखरूप राहणें. लेखनालकार. "

---

३१ बाजी बिन भानजी राणा यांचें पत्र.

राजश्री देशाधिकारी व लेखक, वर्तमानभावी मामले दाभोळ, प्रात सुवर्णदुर्ग, गोसावी यास.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकित कान्होजी आंगरे सरखेल राम राम सुरूसन इसन्ने अशरीन मया अलफ. बाजी बिन भानजी राणा, कसबे पंचनदी, तर्फ मजकूर हुजूर येऊन विदित केलें की, महाजनकीचे हक्क दाहीजा टक्के चारशें आपणांस हशील होता. त्याजवरील महाराज राजश्री छत्रपति थोरले कैलासवासी स्वामींयाहीं बटाई करविली. हक्क लाजिमा कुल मना करून मुशाहिरा केला इत्यादि. * * *

रवाना छ ४ माहे जिल्काद.

---

३२ रामाजी बावाजी दिघे ज्योतिषी यांस मिळालेलें वतनपत्र.

छ २२ मोहरम सुरुसन सलासीन मया आलफ

यादी श्रावण बहुल नवमी, गुरुवासर, सौम्य (नाम) संवत्सर, रामाजी बावाजी उपनाम दिघे ज्योतिषी व कुळकर्णी, देह आठ वळकीखोरें, तर्फ पौनमावळ यासी दिल्हें वतनपत्र ऐसेजे:— तुम्हीं हुजूर किल्ले सातारीयाचे मुक्कामी येऊन विनंति केली कीं, वळकीखोरें येथील सोळा गांवचें ज्योतिषपण व कुळकर्ण पुरातन आपलें वतन आहे. ऐसें असता जबरदस्तीनें शिवणेकर देशकुळकर्णी, तर्फ मजकूर हे वतन अनुभवितात. ऐशास पूर्वी एक दोन वेळां हजरत अलमगीर पातशहा यांचे वेळेस तुळापुरचे मुक्कामी गोतमुखें इनसाफ जाला, तेथें शिवणेकर खोटे जाले. परंतु वग वसालतीमुळें भिडेनें कागदपत्र करून घेऊन, जोरावरीनें वतन खातात, ऐसी हकिकत आहे. तरी स्वामींनी धर्मतान्यायें बरहक्क इनसाफ मनास आणून, आपलें वतन आपले दुमाले केलें पाहिजे म्हणून. त्यावरून शिवणेकर देशकुळकर्णी यास व देशमुख व देसाई तर्फ मजकूर व सोळा गावींचे मुकदम यास तलब करून हुजूर आणिलें आणि तुह्मां हरदू वादीयास पुरशीस केली कीं, सोळा गांवींचे मुकादम हुजूर आले आहेत; हें सत्य स्मरोन तुमच्या वतनाची साक्ष देतील. त्यास राजी असिले तरी राजीनामे लेहून देणें. त्यावरून हरदूजणा तुम्हीं व शिवणेकर सोळा गांवींच्या मुकदमाचे साक्षीस रजावंद होऊन

राजीनामे लेहून दिल्हे. त्यावरून हाजीर मजालसीस सोळा गांवींचे पाटिलास पुरशीस केली कीं, आपले बेताळीस स्मरोन हरदूजणांचा करीना कैसा आहे तो सांगणें. त्यावरून सोळा पाटिलांनीं सत्य स्मरोन तकरीर केली जे, दिघे पुरातन सोळा गांवींचे ज्योतिषी, कुळकर्णी खरे, परंतु बारा टक्क्याचा दुष्काळ पडला. माणसास अन्न भक्षावयास मिळेना. माणसें मेलीं. ते समयीं दिघा कुळकर्णी परागंदा होऊन देशावरी गेला. त्याउपरी मुलखाची वसाहत जाली. ते वेळेस गांवगन्नाचे पाटलानीं कुळकर्ण चालवावयाबद्दल मुतालीक ठेऊन हिशेब गांवगन्नाचे देशकुळकर्णी यांजवळ देत होते. त्या उपरी महाराज राजश्री कैलासवासी थोरले स्वामींचे वेळेस माळवे प्रांतीं बटाईचा तह जाला. वतनदारास मुशाहिरे केले. लिहिणें वाढलें. याकरिता शिवणेकर देशकुळकर्णी सोळा गांवींचे कुळकर्णीचें लिहिणें लिहू लागले. त्यावरी मुरार पुरुषोत्तम दिघा महाराजाजवळ फिर्याद जाहला; कथला केला; इनसाफ व्हावा. तों महाराज स्वामींची स्वारी कर्नाटक प्रातें जाहली याकरिता वतन अमानत ठेविलें. इनसाफ जाहला नाहीं. हा मजकूर तैसाच राहिला. त्या अलीकडे हजरत अलमगीर पातशाहा या प्रातें आले. तेव्हा परगणीयाचे या तहाबद्दल कुल महालोमहालचे देशक हुजूर नेले. तेव्हा तर्फ मजकूरचेही अगदीं वतनदार हुजूर गेले. संचणीचे समई सोळा गावींच्या ज्योतिष कुळकर्णपणाचे कथला बावाजी रघुनाथ, रामाजीचा बाप व कोनेर फुलाजी चुलता, दिघे यांणीं केला तें वर्तमान हजरतीनें मनास आणून इनसाफ करवयास काजी शरा यास आज्ञा केली. त्यावरून हाजीर मजालसीस गोताचे साक्षीनें काजी शरा यांणी पूर्वील दाखले मनास आणून इनसाफ केला. इनसाफामुळें शिवणेकर खोटे जाले. बावाजी रघुनाथ व कोनेर फुलाजी दिघे खरे जाहले. त्यास दुमालेपत्र करून देऊन संचणीचीं वस्त्रें दिल्हीं. भोगवटा व्हावा तों धामधूम जाहली. परागदा होऊन मौजे जवळें, परगणे पारनेर येथें राहिले. त्या अलीकडे एक दोन वेळां राजश्री शंकराजी पंडित सचीव यांचे कारकिर्दीस इनसाफ जाहला. दिघे खरे जाहले. परंतु शिवणेकरानीं भिडेवरी जबरदस्तीनें दिघ्याचा भोगवटा होऊं न देता वतन अनुभविलें. भोगवटा त्यांचा आहे म्हणून तकरीर केली. त्यावरून हाजीर मजालसीस पसंत करून स्वामींनीं आज्ञा केली कीं, दिघे वतनदार पुरातन खरे; शिवणेकराचा भोगवटा आहे. ऐसीयासी दिघे नातवान टक्का द्यावयास अवसर नाहीं. याकरिता आदिअवसान पाहोन उभयताची समजावीस करणें. म्हणून गोतास आज्ञा केली. त्यावरून देशमुख व देसाई व वळकीखोरें सोळा गावचे पाटिलानीं व ठाणें नाईक, तर्फे मजकूर यांणीं करार केला कीं, शिवणेकरानीं सोळा गांवींच्या वतनामुळें कसाला सोशिला व दिघा पुरातन वतनदार खरा, परंतु तूं नातवान ऐशीयास निमें वतन शिवणेकरास द्यावें, निमें वतन दिघ्यास करार करावें. ऐसा निश्चय करून हुजूर विदित केलें. ते गोष्टी स्वामींच्या चित्तास आली. याकरितां स्वामी तुजवरी कृपाळू होऊन, सदरहू वतनाची वांटणी करून दिल्ही. देह बितपशीलः—

तुजकडे.	शिवणेकर.
१ मौजे कुलें.	१ मौजे कासिंग.
१ मौजे चालें.	१ मौजे हडसी.
१ मौजे कालबोली.	१ मौजे कोलवण.
१ मौजे होतलें.	१ मौजे साटेसाई.
१ मौजे वालणें.	१ मौजे नानेगांव.
१ मौजे भागुलवाडी.	१ मौजे सावरगाव.
१ मौजे नांदगांव.	१ मौजे दक्षणें.
१ मौजे चिखलगाव.	१ मौजे मुगवड.
८	८

येणेंप्रमाणें तुह्मां हरदूजणांस वतनाचा विभाग करून दिल्हा. तरी तूं सदरहू आठ गांवचे जोतिषपण व कुळकर्णाची सेवा करून, आपले पुत्रपौत्रादि वशपरंपरेनें वतन अनुभवून सुखरूप राहणें. शिवणेकराजवळ या वतनाच्या कथलीयाचें पूर्वील कागदपत्र असतील ते रद्द असेत. या वतनास हक्क लाजिमा, मानपान, तश्रीफ वगैरे सुदामत चालत असेल त्याप्रमाणें आठ गांवचे घेत जाणें. तुझे माथा शेरणी रुपये ५०० पांचशें रास करार केले असेत. याचा वसूल देऊन जाब घेणें. त्याप्रमाणें मजरा असेत येविशीं पत्रें:—

१ रामाजी बावाजी दिघे, कुळकर्णी व जोतिषी देहाय आठ याचे नांवे वतनपत्र एक.
१ देशमुख व देसाई व देशपाडीये याचे नावें एक.
१ मोकदम देहाये आठ यांस पत्र एक.
१ देशाधिकारी.
१ नारो पंडित सचीव यांचे नांवें.

९

३३ सुलतान नाइकीण इस दिलेलें इनामपत्र.

"सुलतान नाइकीण कलावंत वस्ती कसबा पुणें, परगणें मजकूर इणें हुजूर येऊन विनंति केली कीं, आपली आजी मता नाइकीण इजला कसबा मजकूरपैकीं इनाम जमीन चावर -॥- निम महाराज राजश्री शाहाजी महाराज यांणीं दिली होती. त्याप्रमाणें महाराज राजश्री थोरले कैलासवासी यांनीं करार करून, पत्रें देऊन देशकापासून जमीन नेमून देविली. त्या अलीकडे चालत नाहीं. याकरितां स्वामींनीं पूर्वील पत्र मनास आणून, इनाम करार करून देऊन चालविलें पाहिजे. म्हणून विदित केलें. व पूर्वील पत्रें दाखविलीं. त्याप्र-

रून मनास आणून, स्वामी कृपाळू होऊन सदरहूप्रमाणें निम चावर जमीन कुलबाब, कुलकानू देखील हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी खेरीज हक्कदार, इस व इचे अवलाद अफलाद परंपरें करार करून दिल्हा. छ ४ जमादिलाखर, सन खमस सलासीन पत्रें चिटनिशी. कार्तिक शुद्ध पंचमी, रविवासर, येविशीं पत्रें:—

१ इनामपत्र.
१ मोकदम कसबा मजकूर.
१ देशमुख व देशपांडे.
१ देशाधिकारी.
१ राजश्री पंतप्रधान."

९

३४ कंदकुडती गांव ब्राह्मणांस इनाम दिल्याबद्दल सनदपत्र.

"अग्रहारपत्रें समस्त ब्राह्मण वास्तव्य मौजे कंदकुडती, परगणे बोधन, सरकार नादेड यांसी दिल्हें इनामपत्र ऐसीजें:—वेदशास्त्रसपन्न कोनेर दीक्षित व बाळा दीक्षित बिन गोपाळ दीक्षित, गोत्र भारद्वाज, सूत्र आश्वलायन, उपनाम बरगे जोतिषी, मौजे मजकूर यांणीं सातारीयाचे मुक्कामीं स्वामींसन्निध येऊन विनति केली कीं, महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामी, भागानगर प्रातें स्वारीस आले होते ते समयीं, मौजे मजकूर समस्त ब्राह्मणांस अग्रहार इनाम करून दिल्हा आहे. त्याप्रमाणें चालत आहे. पत्रें होतीं तीं धामधूमेकरितां गत जाहलीं. हें वर्तमान आपले तीर्थरूप गोपाळ दीक्षित यांणीं चिरंजीव राजश्री फत्तेसिंग भोंसले यासी विदित केलें. त्याणीं मनास आणून आपलीं पत्रें करून दिल्हीं. आम्हीं समस्त ब्राह्मण इनाम गांव अनुभवीत आहों. परंतु महाराजाचीं पत्रें भोगवटीयासी असलीं पाहिजेत. याकरिता पत्रें करून देऊन वंशपरपरेनें इनाम चालविलें पाहिजे. म्हणऊन विदित केलें. त्यावरून राजश्री थोरले कैलासवासी स्वामी यांणीं ब्राह्मणांस अग्रहार करून दिल्हा आहे. तो चालवणें आवश्यक व श्रेयस्कर ऐसें जाणून, मौजे मजकूर समस्त ब्राह्मणांस कुलबाब, कुलकानू देखील हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी खेरीज हक्कदार करून अग्रहार इनाम करून दिल्हा असे. तरी तुम्हीं पुत्रपौत्रादि वशपरंपरेनें मौजे मजकूर अनुभवून सुखरूप राहणें. छ २९ जमादिलावल पत्रें. श्रावण बहुल दशमी, भौमवार, रौद्रनाम संवत्सर, येविशीं चिटनिशी पत्रें:—

१ इनामपत्र.
१ मोकदम मौजे मजकूर.
१ देशमुख व देशपांडे, परगणे बोधन

१ देशाधिकारी व लेखक वर्तमानभावी, सरकार नांदेड.

—

४

ताकीदपत्रें छ १८ जमादिलाखर, सन इसन्ने अर्बैन. पत्रें श्रावण बहुल चतुर्थी, सौम्यवासर, शके १८ दुर्मतीनाम संवत्सरे, मौजे मजकूर यास कुलबाब, कुलकानू हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी खेरीज हक्कदार व इनामदार करून पेशजीपासून इनाम आहे, तेणेंप्रमाणें करार असे. तरी वंशपरंपरेनें चालवणें. सालाबाद कोनेर दीक्षित व बाळा दीक्षित याजकडे वसूल देत जाणें. येविशीं पत्रें चिटनिशीः—

१ गांवास.	१ देशाधिकारी व लेखक वर्तमानभावी.
१ देशमुख, देशपाडे.	१ राजश्री लुमाजी पाढरे, सपशेरबहादर.
—	—
२	२

३५ इनाम गांवाबद्दल नवी सनद मिळणें बद्दल अर्ज.

" अर्जदस्त अर्ज परबंदगी बदेगान व बदे सेरीकर रुस्तुमखान देशमुख व चिंतामण देशपाडे, प्रात पाटोद सुरुसन हजार ११५६ आनदानाम संवत्सरे, अर्जवाल्याची प्रार्थना ऐसीजेः—साहेबांनीं बदे सेरीकरावर नजर देऊन, अर्ज खिजमतीस रोशन केला पाहिजे. अंकीं राजश्री देवजी पाटील मोकदम, मौजे मुदलगाव येथें तपोनिधी महापुरुष देवभारती, महापुरुष गोसावी रहात होते. महादेवाच्या देवालयात होते. अखड अनुष्ठान करीत. ऐसे तपस्वी होते. त्यास कोण्हे एके दिवशीं थोरले महाराज शिवछत्रपति आवढचा पट्यावर छावणी करून राहिले होते. त्यास महापुरुष गोसावी राहतो म्हणून दर्शन घेण्यास आले. सालेर व मोल्हेर किल्ले याचे मोहमीस जात होते. तेही महादेवाचे मुदलगाव येथें देवालयात महापुरुषाचें दर्शन घेण्यास आले. त्यास भगवानाहीं आशीर्वचन दिधलें कीं, "जा. नववे दिवशीं सालेर व मोल्हेर किल्ले फत्ते होतील." त्यास श्रीमहाराज शिव छत्रपति बोलले कीं, "किल्ले फत्ते जाले तर हा गांव आम्हीं तुह्मास मोकासा देऊं, ऐसें महाराज बोलले. तेव्हा जाताच किल्ले नववे दिवशीं घेतले. तेव्हां मेहरबान होऊन गाव भगवानास मोकासा करून दिधला. सनद करून दिधली कीं, यास कोणी मुजाहीम न होणें. हा गाव आम्हीं गोसावीयास इनाम दिधला. त्यास मळगांवकर, परगणे मौवास जाला. त्याकरिता मोगलाई फौजा येऊन देवालयास अग्नी लागला. सनदा आत होत्या त्या जळून गेल्या. कळलें पाहिजे. पूर्वी भगवानास महाराजानें अन्न दिधलें. तैसें साहेबानी दिधलें पाहिजे. देवमूर्ति सुभान भारती तोंड जबानी सांगतां कळों येईल. हे अर्जदस्त रोशन होय. "

३६ नीळकंठ पाठक बिन महादेव पाठक नाकील यांस इनामाबद्दल नवी सनद.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ७४ प्रभवनाम संवत्सरे, कार्तिक शुद्ध द्वितीया, रविवासरे, क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी यांणीं वेदशास्त्रसंपन्न नीळकंठ पाठक बिन महादेव पाठक नाकील उपनाम गोवर्धनकर मुळे, गोत्र गौतम, वाजसनी शाखाध्यायी, वास्तव्य मौजे नागठाणें, तर्फ वाळवें, यांसी दिल्हें इनामपत्र ऐसीजें:—तुमचे विषयीं राजश्री मुरारराव घोरपडे, वजारतमाहा यांणीं करवीरचे मुक्कामीं स्वामींसंनिध विनंति केली कीं, यांचे वडील तान पाठक हे ब्राह्मण बहुत थोर, तपस्वी, श्री उपासक; परंपरागत त्यांसी थोरले महाराज राजश्री कैलासवासी याणीं जालनापुरचे स्वारीस गेले. ते समई तान पाठक याचें दर्शन नाहलें. तेव्हां त्यांणीं महाराजास आशीर्वाद दिल्हा. त्याप्रमाणें स्वारी फत्ते जाली. त्यावरून त्यांसी इनाम मौजे नागठाणें तर्फ मजकूर या गांवीं जमीन चावर एक इनाम करून दिल्हा होता. व पत्रेंही करून दिल्हीं होतीं. त्याप्रमाणें इनाम कांहीं दिवस चालिलें. अलीकडे राजक्रांतीमुळें भोगवटा राहिला नाहीं व पत्रें होतीं तींहीं गेलीं. याकरितां महाराजांनीं नवीन पत्रें भोगवटीयासी करून देऊन इनाम चालविला पाहिजे म्हणून. त्यावरून मनास आणितां, तुम्हीं ब्राह्मण बहुत भले, तपस्वी, तुम्हास इनाम चालविल्यानें स्वामींस श्रेयस्कर. यास्तव स्वामींनीं तुमचे वडील तान पाठक यांसी पूर्वी तीर्थरूप महाराज राजश्री कैलासवासी स्वामींनीं इनाम दिला होता. त्याप्रमाणें हल्लीं तुह्मांस इनाम जमीन कुलबाब, कुलकानू, मौजे नागठाणें, तर्फ वाळवें, सुभा पन्हाळा, या गांवीं जमीन चावर १ एक इनाम सर्वमान्य करून दिली असे. तरी तुम्हीं सदरहू जमीन चतुःसीमा करून घेऊन आपले स्वाधीन करून घेणें; आणि इनाम तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवून स्नानसंध्यादि षट्कर्में आचरोन स्वामी व स्वामींच्या राज्यास कल्याण चिंतून सुखरूप राहणें. सदरहूप्रमाणें इनाम जमीन एक चावर करार करून दिली असे. स्वामी तुह्मास उत्तरोत्तर चालवितील. नाणिजे निर्देश समक्ष."

तारीख १९ जिल्काद, सुरूसन समान आर्बैन.

---

३७ धोंडो कृष्ण वगैरे यांस इनाम गांवाबद्दल नवी सनद.

शिक्का.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ७८ आंगिरानाम संवत्सरे, जेष्ट बहुल दशमी, भौमवासरे, क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभु छत्रपति स्वामी यांणीं, धोंडो कृष्ण व नारो कृष्ण व बाजी कृष्ण व गणेश कृष्ण उपनाम चिरमुले, गोत्र काश्यप, सूत्र आश्वलायन, खोत, मौजे चोरवणें, तर्फ देवळें, सुभा राजापूर, यांसी दिल्हें. इनामपत्र ऐसीजें:—तुह्मीं करवीरचे मुक्कामीं स्वामींसन्निध विदित केलें कीं, आपले आजे महादाजी कृष्ण हे किल्ले रायगडीं, थोरले महाराज राजश्री कैलासवासी शिवाजी महाराज सिंहासनारूढ जाहले. ते समयीं किल्ले मजकुरीं त्यास दफ्तरदारीचा धंदा होता. त्या उपरी हुजूर

सेवा करीत असतां, पुढें महाराज राजश्री कैलासवासी संभाजी राजे महाराज यांचे कारकिर्दींत संगमेश्वरचे मुक्कामीं मौजे मजकूर हा गांव इनाम करून देऊन सनदा देविल्या. नंतर गांवचा उपभोग करावा. त्यास मोंगलाई होऊन आपले पिते कृष्णाजी महादेव हे देशांतरास चिपळूण प्रांतें, सुभा दाभोळ येथें गेले. धामधुमेमुळें पत्रें गेलीं. याकरितां महाराजांनीं कृपाळू होऊन नवीन पत्रें भोगवटीयासी करून देविलीं पाहिजेत म्हणून. त्याजवरून स्वामींनीं मनास आणून तुह्मास नूतन इनाम, कुलबाब, कुलकानू, हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी खेरीज हक्कदार व इनामदार करून मौजे चोरवणें, तर्फ देवळें हा गाव देहे एक सर्वमान्य करून इनाम दिल्हा असे. तरी तुह्मी सदरहू मौजे मजकूर पूर्व मर्यादेप्रमाणें चतुःसीमा आपले स्वाधीन करून घेणें. आणि इनाम तुह्मीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवून सुखरूप राहणें. इनामसंमंधें तुमचे माथां शेरणी रुपये २०० दोनशें ठेविले. याचा वसूल हुजूर जाला जाणिजे. निर्देश समक्ष. मोर्तब असे."

---

३८ शिवाजी महाराज यांणीं आवरंगजेब पादशहास पत्र लिहिलें तें:—

"नेकीची इच्छा करणार, सत्य वचनी शिवाजी, ईश्वराची कृपा व बादशाहाची मेहेरबानी, हे सूर्याप्रमाणें प्रसिद्ध आहेत. त्याचा धन्यपणा मानून नंतर पत्र लिहितों. अभिष्टचिंतन करणार प्रारब्ध योगानें हुजूरुन निरोपाशिवाय आलों. परंतु यथायोग्य सेवेचे सांप्रदायात हजर आहें. ती चांगली सेवा व उत्तम प्रयत्न. हिंदुस्थान व इराण व दुराण व रूम व शाम येथील बादशहा व उमराव, मोगल व राजे लोक व राणे यास व खेरीज सात मुलूखाचे रहाणार व खुषकी व तरी येथील मुशाफर यास जाहीर आहेत. त्यापेक्षा आपलें अंतःकरण समुद्राप्रमाणें आहे. त्यासही विदित जाहलेंच असेल. याजकरितां कित्येक गोष्टी ज्यांत आबालवृद्धाचें कल्याण राही अशा लिहिल्या जातात. साप्रत आह्मीं इकडे आल्यावर पादशाही खजिना रिकामा जाहला व सारें द्रव्य खर्च जालें. याजकरितां हिंदु लोकांपासून जजियापट्टीचें द्रव्य उत्पन्न करून पादशहातीचा क्रम चालविला आहे, ऐसें ऐकण्यांत आलें. त्यास पूर्वी अकबर बादशाहा यांणीं न्यायानें बावन्न वर्षें राज्य केलें. याजमुळें इसमी व दाऊदी व महमदी वगैरे याती खेरीज ब्राह्मण व शेवडे वगैरे हिंदु लोक याचे धर्म चांगले चालले व त्या धर्माचे संस्थापनाविषयीं ते बादशाही मदत ठेवीत होते. याजकरितां जगत्गुरू अशी त्यांची प्रसिद्धी जाहली. व अशा सद्वासनेच्या योगानें हरएक स्थळीं त्यांची नजर पडत होती. तेथें यश येत होतें व कित्येक मुलूख सर केले. त्याजवर नुरूद्दीन जहांगीर बादशाहा यांणीं बावीस वर्षें बादशाही इश्वरीं लक्ष ठेऊन केली. नंतर स्वर्गास पोहोंचले. शहाजहानसाहेब किरान यांणीं बत्तीस वर्षें बादशाहात करून उपरांत राहिले. आयुष्य चागलेपणांत घालून निरंतर कीर्ति मिळविली. येविषयीं दृष्टांत, जो पुरुष जिवंत

असतांना लौकिकवान व मार्गे ज्याची चांगली कीर्ति असा जो, त्यांजला अचल लक्ष्मी प्राप्त जाहली, असें आहे. सदरी लिहिले पादशाहाचा प्रताप व पराक्रम असा कीं, त्यांणीं बस्तुर व वहिवाटी केल्या. त्यांचें रक्षण करण्यास अलमगीर फिकिरवंद जाहले. ते बादशाहाही जजियापट्टी घेण्यास समर्थ होते. परतु सारे लहानमोठे आपलाले धर्मावर आहेत ते सर्व ईश्वराचे आहेत, असें जाणून कोणावर जुलूम करावा हें त्यानीं मनात आणिलें नाहीं. त्याचे उपकाराची कीर्ति अद्याप आहे व हरएक लहानमोठे यांचे मुखीं त्याची स्तुती व आशीर्वाद आहे. जशी नियेत, तशी त्यास बरकत. त्या बादशाहाची दृष्टी लोकाचे कल्याणात होती. हल्लीं आपले कारकीर्दीत कित्येक किल्ले व मुलूख गेले व बाकी राहिले तेही जातात. कारण, जे खराबी करण्याविषयीं कमतर नाही, जे रयत लोक खराब आहेत. हरएक महालचें उत्पन्न लाखास एक हजार येणें कठीण असें जाहलें. बादशाहा व बादशाहाजादे याचे घरीं दारिद्र्याचा वास जाहला. तेव्हा पदरचे मनसबदार व उमराव यांची अवस्था कळतच आहे. साराश, शिपाई लोक हैराण, व सवदागर पुकारा करितात, व मुसलमान रडतात, व हिंदुलोक मनात जळतात, आणि कित्येक लोकास पोटास मिळत नाहीं असें आहे. तेव्हा राज्य चालविणें कसें ? त्याजवर जजियापट्टीचा उपद्रव या प्रकारचा. तो पूर्व पश्चिमेपावेतों जाहीर जाहला आहे कीं, हिंदुस्थानचे पातशाहा फकीर व ब्राह्मण व शेवडे ष जोगी व संन्यासी व बैरागी व अनाथ, गरीब व थकलेले व पडलेले असे एकंदर लोकांपासून जजिया घेतात व यातच पुरुषार्थ असें समजतात. व तैमुर पादशाहाचें नाव बुडवितात असें जाहलें आहे. अस्मानी किताब म्हणजे कुराण, ते ईश्वराची वाणी आहे. त्यांत आज्ञा केली, ती ईश्वर जगाचा किंवा मुसलमानाचा आहे. वाईट अथवा चागले असो, हे दोन्ही ईश्वराचे निर्मित आहेत. कोठें महजीद आहे, तेथें त्याचें स्मरण करून बाग देतात व कोठें देवालय आहे तेथें घटा वाजवितात त्यास कोणाचे धर्मास विरोध करणें हें आपले धर्मापासून सुटणें व ईश्वराचें लिहिलें रद्द करून त्याजवर दोष ठेवणें आहे. येविषयीं चांगलें अगर वाईट, जें पाहावें त्यास रद्द करूं नये. पदार्थाची निंदा करणें हें पदार्थ करणारावर शब्द ठेवणें आहे. न्यायाचे मार्गानें पाहतां, जजियापट्टीचा कायदा केवळ गैर. पेशजीं सुलतान अहंमद गुजराथी, हा असाच गैर चालीनें वागला तो लौकरच बुडाला. त्यास या वृद्धापकाळीं असें बद्ध होणें हे पराक्रमास अगदीं योग्य नाहीं. येविषयीं दृष्टांत जुलूम त्याजवर जाला त्याणें खेद करून 'हाय हाय' म्हणून मुखानें धूर काढल्यास त्या धुरानें जितके लवकर जळेल, तितके जलदीनें जळतां, अग्नीही समधास जाळणार नाहीं. अंतःकरण पातकानें मळीन जालें तें स्वच्छ करावें ही चागली सल्ला आहे. याजवर हिंदु लोकास पीडा करण्यांतच धर्म आहे, असें मनामध्यें आलें असल्यास आधीं राजा राजसिंग यांजपासून जजिया घ्यावा म्हणजे इकडून कठीण नाहीं. उपरांत सेवेसी हजीर आहे. परंतु गरीब अनाथ ते मुंग्या, चिलट्यासारखे आहेत. त्यास उपसर्ग करण्यांत कांहीं मोठेपणा नाहीं. पदरची मंडळी-

ही पाहतां पाहतां अग्नी तृणानें झाकीतात. यांचेंही आश्चर्य वाटतें. अस्तु. राज्याचा सूर्य हा प्रतापाचे उदयाचळापासून तेजस्वी असो."

सात मुलूखः—

१ हिंदुस्थान, २ चीन, ३ तुर्कस्थान, ४ खुरासान, ५ मावरूनहार, ६ रूम, ७ बारफ.

---

३९ श्रीमारुतीचे शेवेकरी ब्राह्मणांस इनाम जागेबद्दल सनद.

" श्री स्वामी संस्थान चाफळस्वामी स्वामींचे सेवेसी.:—

इनामपत्र बेशमी मोकदम, मौजे माजगाव, कर्यात तलबीड, प्रात पन्हाळा, पेटा तारगांव. कृतानेक सिरसाष्टांग दंडवत व अनुक्रमें नमस्कार विज्ञापना ऐसीजेः—श्री समर्थाचे हातचा श्री मारुति, मौजे मजकूरीं स्थापीत आहे. परंतु पूजा करणार ब्राह्मणांस मठ करून रहावयास जागा नाही. याजकरिता पूजा करणार व शेवेकरी ब्राह्मणांस मठाकरिता जागा मागितली. त्याजवरून मौजे मजकूरचे गावठाणपैकीं श्रीमारुतीचे संनिध जागा स्वामींस दिल्ही. ती चतुःसीमापूर्वक— पूर्वेस रस्ता वेशींतून गावात जाण्यायेण्याचा व दक्षणेस जागा गांवचीं, पश्चमेस रस्ता देशमुख याचे वाड्यात जाण्यायेण्याचा, उत्तरेस जागा रस्त्याची, नजीक होळीचें टेक. यास मोजणी बितपशीलः—

२७ पूर्व तोंड लांबी हात.	२७ पश्चम तोंड लांबी हात.
२५ दक्षण तोंड रुंदी हात.	१५ उत्तर तोंड रुंदी हात.

येणेंप्रमाणें चतुःसीमापूर्वक जागा मोजून मठास दिल्ही आहे. तरी श्रींनीं त्या जाग्यावर मठ बांधून स्वामींनीं व स्वामींचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभऊन सुखरूप राहावें जागा आह्मी आपले स्वसंतोषें देऊन इनामपत्र लेहून दिल्हें असे. मिती माघ शुद्ध १ प्रतिपदा, शके १७६५ शोभकृत (शोभन) नाम संवत्सरे, सुरुसन आर्बा आर्बैन मयातैन व अलफ."

निशाणी नांगर.

बेहुजूर.

बिकलम बापुजी विठ्ठल कुळकर्णी,
मौजे मजकूर.

---

४० मथुरेतील तीर्थपुरोहितपणाबद्दल शिवछत्रपति महाराजांचें पत्र.

"यादी मंडण चोभे व एलाचंद बिन लाला पांडे इबिन गोवर्धनभट मथुरावासी, वास्तव्य क्षेत्र मथुरा, यांसी दिल्हें तीर्थपुरोहितपत्र ऐसीजेः—तुह्मीं शाहूनगर नजीक किल्ले सातारा येथील मुक्कामीं स्वामींसन्निध येऊन विनंति केली कीं, पूर्वी थोरले महाराज राजश्री

कैलासवासी यांणीं क्षेत्र मजकूरचें तीर्थपुरोहितपण आपले आजे गोवर्धन भट व मकरंद भट यांसी दिल्हें आहे. तें पत्र आपण आणिलें आहे. तें महाराजांनीं मनास आणून पत्र करून देऊन, तीर्थपुरोहितपण पेशजीप्रमाणें चालविलें पाहिजे ह्मणऊन पूर्वील पत्रें आणून दाखविलीं. वितपशील:—

(१) वेदमूर्ति राजश्री गोवर्धन भट व मकरंद भट मथुरावासी प्रती, राजश्री शिवाजी राजे भोंसले दंडवत, सुरुसन सीत सितैन अलफ, तुह्मांस मथुरातीर्थचे तीर्थगुरुपण लिहून दिधलें होतें. त्या वेळास आठ नव वर्षें जालीं. तुह्मीं आले नाहींत. मग आणिक एक ब्राह्मण राजाराम चोभा हा मथुरावासी आला. त्यास आह्मीं तीर्थगुरुपण लिहून दिल्हें, ह्मणऊन तुह्मीं पहिला कागद तुह्मांपाशीं होता तो घेऊन आलेत. मग राजश्री भट गोसावी बैसोन तह केला कीं, जें अलीकडे लिहिलें तें रद्द, पहिलें लिहिलें तें खरें, ऐसा तह दिधला. त्यास जरी कांहीं मथुरातीर्थीचें तीर्थगुरुपण आमच्या वडिलानीं आणिक कोणास, तुह्मास आह्मीं कागद लिहून दिधला आहे त्याचे आधीं, लिहून दिधलें असेल तरी तोच तीर्थगुरु. तुह्मासी निसबती नाहीं. जरी तुमच्या कागदाच्या आधीं आमच्या वडिलांचा लिखा अगर आमचा लिखा आणिकापाशीं नसेल तरी तुह्मींच आमचे तीर्थगुरु. राजाराम चोभा यांणें न कळत आह्मांपासून कागद लिहून घेतला आहे, तो रद्द असे. छ ११ सवाल. " १.

(२) तीर्थस्वरूप राजश्री गोवर्धनभट व राजश्री मकरंदभट मथुरावासी यांसी, सेवक राजश्री उमाजी राजे दडवत. पूर्वी राजश्री तीर्थस्वरूप शिवाजी राजे यांणीं तीर्थगुरुपण दिधलें तेणेंप्रमाणें आपणही तुह्मांस दिधलें असे. हें लिहिलें सही. छ १५ माहे जमादिलावल, आश्विन वद्य द्वितीया, आदित्यवार.

निशाण कट्यार.

येणेंप्रमाणें पूर्वील पत्र आणून दाखविलें, त्याप्रमाणें करार करून देऊन पत्र करून दिल्हें आहे. तरी सदरहूप्रमाणें क्षेत्र मजकूरचें तीर्थपुरोहितपण तुह्मीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवून सुखरूप राहणें ह्मणोन तीर्थपुरोहित यांसी पत्र १. "

एकूण एक पत्र देणें.

पत्र चिटनिशी, आषाढ शुद्ध त्रयोदशी, गुरुवार.

---

४१ महादेव भट बिन श्रीधरभट वगैरे यांस दिलेलें वर्षासनपत्र.

बारकीर्द छ १ जिल्हेज सुरुसन आर्बा सलासीन.

"बादी वेदमूर्ति राजश्री महादेव भट बिन श्रीधर भट व बाबदेव भट बिन बाळंभट व

गदाधरभट बिन मोरेश्वरभट व नारायणभट बिन त्रिंबकभट, उपनाम बापट, गोत्र वशिष्ठ सूत्र हिरण्यकेशी आपस्तंभ क्षेत्रोपाध्ये वाडा गणेशपुळें, कसबे नेवरें, सुभा प्रांत रत्नागिरी यांणीं स्वामींसन्निध सातारचे मुक्कामीं येऊन विनंति केली कीं, पूर्वी थोरले कैलासवासी महाराज राजश्री श्री अधिष्ठान पुळें येथें श्रीच्या दर्शनास आले. श्रीची सेवा घडावी या करिता आपले वडील श्रीधरभट यांसी, श्रीस नित्याभिषेक पूजा व प्रदक्षणा करावयाची आज्ञा करून, वर्षासन साळीना होन पातशाही २५ पंचवीस करून दिल्हे. ते समयीं समस्त ब्राह्मण, वाडा मजकूर व माळगुंड व निंबोडी या गांवचे व पर जागाहून थोर थोर शिष्ट विद्वान् ब्राह्मण आले होते. त्यांनीं स्वामींपाशीं विनंति केली कीं, श्रीसन्निध आसमंतात्भाग ब्राह्मणांचीं घरें आहेत, यामध्यें रामा भंडारी याचे निसबतीचा भाग आहे. तेथें भंडार मजकूर माड बांधोन कापितो. त्या मार्गे आह्मीं श्रीस पूजा नैवेद्य आणावा हे गोष्टी उत्तम नसे. क्षेत्रीं ब्राह्मणांचे घराजवळी भंडारी माड कापितो हें स्वामींस श्रेयस्कर नव्हे. व शे जारी भंडारी असतां, ब्राह्मणांस आपलें घरीं अध्ययनही करितां न ये. याकरितां ब्राह्मणांचे घरामधून भंडारी याचें घर काढिलें पाहिजे ह्मणून विदित केलें. त्यावरून स्वामींनीं भंडारी मजकूरचें घर, ब्राह्मणांचे घराजवळून काढिलें. ते समयीं श्रीधरभटानीं विनंति केली कीं महाराजांनीं भंडारी दूर केला. परंतु त्याकडे ठिकाणसंमंधें लारी दाभोळीं तीनशें ठिकाणा वरी भंडारी यास दिल्ह्या आहेत, यासी काय आज्ञा? त्यावरून त्याचा कदबा वडिलांपासी होता तो पाहून मुद्दल लारी तीनशें व सवाईप्रमाणें केला तर दुमाला दीडशें लारी एकूण लारी साडे चारशें त्याकडे जाल्या. त्याबद्दल आपले वडील श्रीधरभट यांसी सदरहू ठिकाण बागाईत व जिराईत देखील जंगल मिरास करून दिल्हें. त्याप्रमाणें ठिकाणाचा उपभोग करीत आलों. त्याउपरी भंडारी मजकूर येऊन ठिकाणाबद्दल कजीया करूं लागला. हें वर्तमान रामाजी अनंत सुभेदार, प्रांत मजकूर, यांस कळलीयावरी त्यांणीं भंडारी यास पुशिलें कीं, पेशजीं तुला दूर करून ठिकाण वेदमूर्तीस मिरास करून दिल्हें असतां, मागती तुजला कटकट करावयास गरज काय? हा गुन्हा त्याचे माथां ठेऊन भंडारी यास दोनशें लारी दंड बांधला. त्यास देशक कसबे मजकूर यास जमान देऊन भंडारी पळोन बाबासाहेबांकडे गेला. त्यावर सुभेदारांनीं देशकास पैकीयाचा तगादा लाविला. तो ऐवज देशकांनीं सदरहू दोनशें लारी आपणांजवळून घेऊन सुभेदारास दिल्ह्या. आपण ठिकाणाचा उपभोग करून श्रीची पूजा, अभिषेक, प्रदक्षणा करून, महाराजांस कल्याण चिंतून होतों. दिवाणांतून वर्षासन पावत होतें. त्याउपरी कैलासवासी महाराज राजश्री काकासाहेब कर्नाटक प्रांतें गेले. त्यांचे दर्शनास श्रीधरभट चंजीस गेले. दर्शन घेऊन अवघें वर्तमान विदित केलें. त्यावरून त्यांणीं मनास आणून पूर्वी थोरले कैलासवासी स्वामींनीं पंचवीस होन वर्षासन केलें होतें त्याप्रमाणें करार करून, जाजती पंचवीस होन एकूण पन्नास होन साळीना वर्षासन करून या प्रांतें रामश्री रामचंद्र पंडित अमात्य होते त्यांस पत्रें दिल्हीं. तीं पत्रें घेऊन श्रीधरभट

देशास येऊन पंडित मशारनिल्हेस दिल्हीं. त्यांणीं पत्रें मनास आणून श्रीची पूजा, अभिषेक, प्रदक्षणा सांग होऊन ब्राह्मणांस वर्षासन सुरक्षित चालावें, याकरितां वर्षासनाचा ऐवज रुपये १९० दीडशें करून, त्यापैकीं भंडारीयाबाबत ठिकाण आपले वडिलांस मिरास करून दिल्हें आहे त्याची चतुःसीमा करून, जिराईत व बागाईताचा आकार रुपये ९० पन्नास करून वर्षासनाचे ऐवजीं दिल्हा. बाकी शंभर रुपये शेतेंवाडे महालीं आपलीं शेतें आहेत त्या ऐवजीं महालानिहाय मिळोन रुपये शंभर दिल्हे होते, त्याप्रमाणें चालत आहे. आपण श्रीची पूजा, अभिषेक, प्रदक्षणा करून स्वामींस व स्वामींच्या राज्यास कल्याण चिंतून आहों महाराजांनीं याप्रमाणें पत्र करून देऊन चालविलें पाहिजे, म्हणून विनति केली. व तीर्थरूप राजश्री कैलासवासी स्वामींचीं व रामचद्र पंडित अमात्य यांचीं पत्रें होतीं तें विदित केलीं. त्यावरून मनास आणिता, वेदमूर्ति श्रीधरभट याचे पुत्र व नातू श्रीची पूजा, अभिषेक व प्रदक्षणा करून स्वामींस व स्वामींच्या राज्यास कल्याण चिंतून आहेत. यास वर्षासन दिल्याप्रमाणें चालोन श्रीची सेवा व्हावी हें स्वामींस परम अवश्यक, यास्तव यास पूर्वी वर्षासनाचे ऐवजीं बाग, ठिकाण, वाडा, गणेशपुळें याची चतुःसीमा करून मिरास करून दिल्ही आहे, त्याचे रुपये पन्नास प्रमाणें चालत आहे, व शेतें वाडे, महालीं वेदमूर्तींच्या कुणबाव्यापैकीं व महालनिसबत रुपये शंभर पेशजी नेमून दिल्हे आहेत, त्याप्रमाणें करार केले असे. तरी तुह्मीं सदरहूप्रमाणें वर्षासन भट गोसावी यांस चालवून श्रीची पूजा, अभिषेक व प्रदक्षणा साग चाले तें करणें. सदरहू दीडशें रुपये वर्षासन यांस व यांचे वंशपरंपरेनें चालवणें. या पत्राची प्रती लेहून घेऊन हें पत्र भोगवटीयास याजवळी परतोन देणें. येविशीं पत्र राजश्री संभाजी आग्रे यांस १."

एकूण पत्र एक देणें.

---

४२ हरजोशी बिन बहिरव जोतिषी यांस जुन्या ऐवजीं दिलेलें नवें वृत्तिपत्र.

यादी हरजोशी बिन बहिरव जोतिषी, वास्तव्य कसबे गोहागर, तर्फ मजकूर, प्रात दाभोळ याणीं स्वामीसंनिध किल्ले सातारचे मुक्कामीं येऊन विदित केलें कीं, कसबा मजकूर देखील देहाय तर्फ मजकूर येथील जोतिषपणाची वृत्ति पूर्वीपासून आपली आहे, वडील वडिलांपासून अनुभवीत आलों आहों. विजापुरीं अदिलशाहा पातशाही करीत होते, ते मुदतीस सुलतान महंमुदशाहा व अल्ली अदिलशाहा पातशाही करीत असता, आपले वडिलास वृत्ति येणेंप्रमाणें करून देऊन फर्मान करून दिल्हें.

लारी दाभोळी ८०॥. आगर ठिकाणें ५. भातशेतें ठिकाणें २१.

येणेंप्रमाणें पातशाहांनीं दिल्हेप्रमाणें आपले वडील अनुभवीत होते. त्यासी महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामींनीं पातशाही मुलूक कबज करून स्वराज्य केलें. त्यांणींही सदरहू वृत्ति

करार करून आपले वडिलास दिल्ही, तेणेंप्रमाणें अनुभवीत होते. त्यावरी महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामी यांणीं स्वराज्यांत बटाईचा तह केला. ते समयीं मुलुखाचे जमिनीची पाहणी करून दस्त जमिनीचा आकारला. त्यापासून वृत्ति आमानत केल्या होत्या. आपले वडील सहकुटुंब वाराणसी यात्रेस जाऊन काशीवास करून राहिले. तेथून आपले चुलते जगन्नाथ जोतिषी बिन भास्कर जोतिषी, वाराणसीहून येऊन, राजश्री आबा स्वामी कैलासवासी याची भेटी रायगडीं घेतली. सदरहू आपले वृत्तीचा प्रसंग राजश्री जवळी केला. त्यावरून राजश्रीनीं राजश्री मोरेश्वर पंडितराव यासी आज्ञा केली जे, याची पूर्वील वृत्ति जमीन आहे ती आमानत होऊन पाहणीमुळें दस्त आकार जाला आहे. तेणेंप्रमाणें पूर्ववत् आगर ठिकाणें ५ पांच व भातशेतें ठिकाणें २१ एकवीस यांचें वृत्तिपत्र आपले मुद्रेनें करून देणें. त्यावरून पंडितरायानीं पत्र करून दिल्हें आहे. त्यावरून कित्येक वर्षें आपले वडील वृत्ति अनुभवीत होते. अलीकडे धामधूम प्रसंग बहुतच जाला त्यामुळें सुरळीत चालत नाहीं. ऐशास पूर्वील-प्रमाणें वृत्ति, पंडितराव यांचे पत्राप्रमाणें करार करून देऊन, आपणांस पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालविलें पाहिजे, बरहुकूम पत्र, पंडितराव तपशील प्रमाणें म्हणून. त्यावरून मनास आणून, तुम्हीं थोर ब्राह्मण, जोतिषी, सिद्धांतवक्ते, तुमचें चालविलीयानें श्रेयस्कर आहे जाणून, स्वामी तुम्हांवर कृपाळू होऊन, पंडितरायाचें पत्र तुम्हांजवळी आहे तेणेंप्रमाणें वृत्ति जमीन आकारसहित तुम्हांस व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें करार करून देऊन, हें पत्र करून दिल्हें असे. तरी ठिकाणें, आगर व भातशेतें आपले दुमाले करून घेऊन, वंशपरंपरेनें अनुभवून सुखरूप राहणें पत्रें:—

१ मुख्य वृत्तिपत्र हरजोशी याचे नावें.
१ देशमुख व देशपाडे महालाहाय, प्रात दाभोळ.
१ देशाधिकारी व वर्तमानभावी महाल गाव शेतें, आगर ठिकाणें, तपशील लेहून.
८ देशमुख, देशपांडे व मोकदम महालाहाय यांस पत्रें गांवगन्ना. तपशील पंडितरायांचे पत्रीं आहे, तेणें प्रमाणें लिहून तपशीलवार पत्रें.

— —

११

१ कान्होजी आंग्रे तपशीलवार, तर्फ गोहागर, पंचनदी, जालगाव, वेश्वी, हवेली.
१ विठोजी शिरके तपशीलवार, सावर्डें, वेळंब, चिपळोण.

——

१३

एकूण पत्रें तेरा देणें."

४३ दादंभट बिन नरसिंहभट वगैरे यांस जुन्या ऐवजीं दिलेलें नवें वृत्तिपत्र.

"वेदमूर्त्ति राजश्री दादंभट बिन नरसिंहभट व यांचे पुतणे नरसिंहभट बिन पुरुषोत्तमभट ऋग्वेदी, गोत्र कश्यप, सूत्र आश्वलायन, उपनाम मगळवेढे, उपाध्ये व जोतिषी तर्फ खेड, मामले दाभोळ, यांणीं हुजूर सातारीयाचे मुक्कामीं येऊन विदित केलें कीं, कसबे खेड व चाकालें, तर्फ मजकूर येथें आपल्या वडिलास पूर्वी विजापूरच्या पातशहा यांहीं इनाम दिल्हें बितपशीलः—

कसबा खेड शेतें.	मौजे चाकालें.	महाल मीठ बंदर व
१ सोनारशेत.	१ चौखंडें.	जकात कसबे मज-
१ बांबूची काठी.	१ सेमशेत.	कूरपैकीं दररोज लारी
१ ध्वजेची काठी.	——	८= निमे मोईनप्रमाणें
——	२	सालीना लारी दाभो-
३		ळी ४५.

एकूण ठिकाणें पांच व लारी पंचेचाळीस इनाम पूर्वीपासून चालत होतें. त्यास महाराज राजश्री थोरले कैलासवासी यांसी राज्य कबज जालें, तेव्हां संपूर्ण वृत्ति, इनामें अमानत केली. त्याउपरी राजश्री, किले रायेरीस सिंहासनारूढ जाहले. ते समयीं आपले पिते वेदमूर्त्ति राजश्री नरसिंहभट बिन रामचंद्रभट मंगळवेढे दर्शनास गेले. तेव्हा हे थोर भले ब्राह्मण देखोन यांसी कितेक दानद्रव्य महाराज देत होतें, परंतु यांणीं मान्य न केलें. तेव्हां राजश्रींनीं काय हेतु आहे म्हणून पुशिलें. ते समयीं आपल्या पित्यांहीं विनंति केली जे, आपणांस अदलशाहा यांणीं इनाम दिल्हें आहे, तें करार करून वृत्तीपत्रें करून देवावीं म्हणोन. ते गोष्टी सिंहासनीं असतां मान्य करून हस्तोदक ते क्षणीं दिल्हें. त्याप्रमाणें चालत आलें. त्यास तांब्रांची धामधूम अलीकडे जाहली, त्यामुळें देशाचा नाश जाहला. तेव्हां वृत्तीपत्रें होतीं तीं गेलीं. तरी स्वामींनीं पुन्हां नूतन पत्रें करून दिल्हीं पाहिजेत, म्हणून विनंति केली. त्यावरून मनास आणितां, कैलासवासी महाराजाहीं यास पत्रें करून दिल्हीं होतीं हें यथार्थ, भोगवटाही चालत आला आहे, हल्लीं वृत्ति अनुभवीत आहेत. याप्रमाणें मनास आणून येविषयीं हल्लीं राजश्री पंतप्रतिनिधी यांनीं पत्रें करून दिलीं होतीं तींही यांनीं दाखविलीं, ऐसें मनास आणून सदरहूप्रमाणें करार करून नूतन पत्र सादर केलें असे. इनाम बितपशीलः—

कसबे खेड ठिकाणें ३.	मौजे चाकालें शेतें २.	महाल मीठ बंदर
१ सोनार शेत.	१ चौखंडें.	व जकात कसबे
१ बांबूची काठी.	१ सेमशेत.	मजकूरपैकीं दर-
१ ध्वजेची काठी.	——	रोज लारी ८२ अर्ध
——	२	मोईनप्रमाणें साली-
३		ना लारी ४५.

येणेप्रमाणें कसबे येथें ठिकाणें तीन व मौजे चाकाळें ठिकाणें दोन, एकूण ठिकाणें पांच व मीठ बंदर व जकातपैकीं सालीना लारी दामोळी पचेचाळीस, पूर्वीपासून चालिल्याप्रमाणें करार करून, हें वृत्तिपत्र सादर केलें असे. तरी यांसी व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें ठिकाणें व ठिकाणावरील वरकस जमीन देखील ठिकाण मर्यादेंतील निधीनिक्षेप जल, तरु, पाषाण आदिकरून हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी खेरीज हकदार करून चालवीत जाणें. भट गोसावी वृत्तीचे लागवडीबद्दल शेतकरी ठेवितील. त्यास ठाण, घर, ट्टका, वेठ, बेगार व आडशेरी व खरीपी कुलकानू बाबती हरएक उपसर्ग याचा तगादा न करणें. प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणें, या पत्राची प्रती लेहून घेऊन हें पत्र भोगवटीयास परतोन भट गोसावी यांजवळ देणें. सुदामत चालत असिलें तरी त्याप्रमाणें चालवणें म्हणून पत्रें:—

१ देशाधिकारी यांस.
२ गांवकरी यांस.
१ जमीनदारास.

४

एकूण पत्रें चार देणें."

---

४४ रामचंद्रभट बिन केशवभट पंडित यांस जुन्या ऐवजीं दिलेलें नवें दानपत्र.

"यादी वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामचंद्रभट बिन केशवभट पंडित, उपनाम पुरोहित, गोत्र कौशिक, ऋग्वेदी, वेदाध्यायी, सूत्र आश्वलायन यांणीं स्वामीसंनिध किल्ले सातारचे मुक्कामीं येऊन विदित केलें कीं, आपले पिते राजश्री केशवभट पंडित, महाराज राजश्री थोरले कैलासवासी स्वामीसंनिध होते. त्यांचे हातून दानाध्यक्षपणाचें प्रयोजन महाराज घेत होते. त्याउपरी राजश्री कैलासवासी स्वामीसन्निध होते. कैलासवासी स्वामींही दानाध्यक्षपणाचें प्रयोजन घेऊन चालवीत होते. कैलासवासी स्वामींनीं आपले तीर्थरुपाचे मुखें रामायण पुराण श्रवण केलें. त्यावरून संतुष्ट होऊन पुराण श्रवणाची सांगता व्हावी म्हणून दक्षणा भूमिदान देहाय तालुके संगमेश्वर, प्रांत राजापूर येथें कोंड ५ व शेतें ठिकाणें ३ एकूण भूमि महसूल दामोळी लारी १६०० सोळाशेंचें भूमिदान धारादत्त देऊन, राज्याभिषेक शके ११ (शालिवाहन शके १६०६) रक्ताक्षिनाम संवत्सर, पौष शुद्ध चतुर्थी, सोमवासर दानपत्र करून दिल्हें आहे. त्यावरी राजश्री राजाराम काका स्वामी यांसनिध आपले पिते होते. त्यांनीं दोन्ही गांव व प्रांत राजापूर इनाम धारादत्त दिल्हे आहेत व राजश्री मोताई, मौजे भोगांव, तर्फ बोरगांव, प्रांत पन्हाळा हेही आपणांस मातोश्री ताराबाई स्वामीं इनाम देऊन पत्रें करून दिल्हीं आहेत. तीं पत्रें स्वामींनीं मनास आणून आपलीं पत्रें करून देऊन आपणांस चालविलें पाहिजे वितपशीलः—

महाराज राजश्री कैलासवासी स्वामी यांणीं रामायण पुराण श्रवणाचे सांगतेस दक्षणा भूमिदान कोंड व शेतें, ठिकाणें देहाय तालुके संगमेश्वर, प्रांत राजापूर.

१ कोंड कुळें.
१ कोंड बिसूत.
१ कोंड केवळें.
१ कोंड फणसवर्ण.
१ कोंड तुरव.

५

३ शेतें ठिकाणें.
१ शेत वाणी.
१ शेत कोडीई.
१ शेत सरद.

३

भूमि दाभोळी लारी १६००.
दानपत्र शके १६०६ रक्ताक्षि [नाम] संवत्सर.

राजश्री राजाराम काका यांणीं दिल्हें आहे धारादत्त. देहाय प्रांत राजापूर.

१ मौजे पलचुरी, तर्फ फुणगांव.
१ मौजे पुरीयें, तर्फ देवळें.

२

भावनाम सवत्सर वैशाख बहुल दशमी, मंदवासर.

वाडी मोताई, मौजे भोगांव, तर्फ बोरगाव १.

मातुश्री ताराबाई यांणीं ग्रहणीदानपत्र दिल्हें शार्वरी संवत्सर, भाद्रपद वद्य आमावास्या.

आभिषेक श्रावणमास- श्रीससेश्वर देव कसबा संगमेश्वर येथील अभिषेक आपणास दिल्हा आहे.

कैलासवासी स्वामींनीं दिल्हा आहे तेणें [प्रमाणें] चालवणें म्हणून पत्रें.

१ महालास.
१ जिल्हेकरी.

२

एकूण भूमि कोंड पांच व शेतें ठिकाणें ३ एकूण भूमि दाभोळी लारी सोळाशें व देह दोन्ही व वाडी एक यांचीं राजपत्रें आपणाजवळी आहेत. हीं मनास आणून आपलीं पत्रें करून चालविलें पाहिजे ह्मणून. त्यावरून मनास आणून पूर्वी वडील राजश्रीचीं पत्रें पाहून तुह्मीं पुरातन स्वामींचे, तुमचें चालवणें आवश्यक जाणोन, स्वामी तुह्मावरी कृपाळू होऊन सदरहूप्रमाणें कोंड ठिकाणें ५ पांच व शेतें ठिकाणें तीन एकूण भूमि लारी दाभोळी सोळाशें व देह दोन्ही व वाडी एक येणेंप्रमाणें तुह्मास करार करून देऊन, हें पत्र तुह्मांस करून दिल्हें असे. सदरहूप्रमाणें आपले दुमाले करून घेऊन तुह्मीं व तुमचे वंशपरंपरेनें अनुभवून सुखरूप राहणें येविशीं पत्रें.

१ राजश्री रामचंद्र पंडित यांचे नांवें.
२ देशाधिकारी.

१ प्रात राजापूर.
१ प्रांत पन्हाळा.
—
२

३ देशमुख व देशपांडे.
१ तालुके संगमेश्वर.
१ तर्फ देवळें.
१ तर्फ फुणगांव.
—
३

९ कित्तापत्रें.
५ कोंड गांवगन्ना.
३ शेतें ठिकाण गाव.
— —
१५ ८

१ वाडी मोताई, मौजे भोगांव, तर्फ बोरगांव, प्रात पन्हाळा.
२ आभिषेकाविशीं पत्रें.
———
१७

जमीदार.
देशाधिकारी संगमेश्वर.
श्रीससेश्वर, कसबा संगमेश्वर येथील.
एकूण पत्रें सत्रा देणें,

४५ गोसावी महंत यांची मठाकरितां इनाम जमिनीबद्दल विनंतिपत्रें.

यादी राजश्री तपोनिधी केवळभारती गोसावी महंत यांचे शिष्य पट्टाधिकारी शंकरभारती गोसावी महंत मठ वास्तव्य, मौजे केंजळ, संमत हवेली, परगणे वाई तुमचे बाबें देशमुख, देशकुळकर्णी परगणे मजकूर यांनीं हुजूर येऊन विनंति केली कीं, गोसावी यांचे मठ पुरातन, केवळभारती यांनीं, मौजे मजकुरीं मठ बांधोन समाधिस्थळ व मठ करून, अनुष्ठान करून बहुत थोर तपस्वी होते. ते स्थळीं शंभर वर्षें जाहल्यावरी समावोन राहिले * * * असतां, जे वखतीं थोरले कैलासवासी यांनीं वाईचा कोट कबज करायास वेढा घालून बैसले, ते वेळेस महंत यांचे दर्शनास जाऊन त्यांची भेटी घेऊन प्रसाद दिल्हे. बोलिलें जें, " कोट वाईचा आपण तुह्मांस दिल्हा.

तुह्मीं कार्यसिद्धी जाहलीयाउपरी आपणांस एक स्थळ अनुष्ठानास एकांत करून देणें." त्यांस महाराज बोलिलें कीं, " कोट हस्तगत जाहलीयाउपरी जें स्थळ मागाल तें देऊं." ते प्रसंगीं गोसावी यांस कोट हस्त (गत) जाहलीयाउपरी गोसावी यानीं स्थळ मागितलें. डोंगर धामणा, संमत हवेली त्याचे माथां जमीन वैराण कोकस्थान आहे. तेथें मठ बांधायास एकांत स्थळ अनुष्ठान आहे. त्यापैकीं एक चावर १ जमीन मठाभोंवती इनाम करून मागितली. सनद होण्याची तों महाराज उर्त्तीण उठोन गेले. ऐसीयास गोसावी जिवंत असतां सनद जाहली नाहीं. त्यांचे हेतु मठ डोंगराबर बांधायाचा होता. हल्लीं त्यांचे शिष्य शकरभारती त्यांचे नावें कृपाळू होऊन सदरहू इनामाची सनद करून दिलीयानें ते स्थळीं मठ बांधोन, मठाभोंवती जी जमीन कीर्दीची निघेल, ती मेहनत करून काढून कीर्देचा बाग, बागशाई करून मठ बांधोन, स्वामींच्या राज्याचें कल्याण चिंतून, अनुष्ठान करून, एक चावर जमीन अनुभवून राहतील. तरी त्यास सनद, राजपत्र, सुभेदारांचे नांवें व वृत्तिपत्र ऐशीं दोन्हीं पत्रें देविलीं पाहिजेत. २.

प्रकरण ५ वें.

संभाजी, राजाराम व दुसरे शिवाजी महाराज यांच्या वेळचे कागद.

१ दत्ताजी केशवजी पिसाळ यांस दिलेल्या वतनाची सनद.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १० रुधिरोद्गारी [नाम] संवत्सरे, पौष्य बहुल १२ द्वादशी, गुरुवासरे क्षत्रियकुलावतस सिंहासनाधीश्वर श्री राजा शंभु छत्रपति स्वामी यांणीं राजेश्री विठ्ठल शंकर देशाधिकारी, प्रात जावली यासी आज्ञा केली ऐसीजे.— दत्ताजी केशवजी पिसाळ देशमुख, तर्फ जोरखोरें यासी, कैलासवासी स्वामींनी हक्क, वतन करून दिल्हें आहे त्याप्रमाणें हें वर्षास मोईनप्रमाणें चालत आलें. हल्लीं कुसूर देतों म्हणून कळों आलें. तरी हे दिवसात गनीम कोकणात पेशक. या प्रसंगें हशमाचा जमाव करावया देशमुख मशारनिल्हेस आज्ञा केली असे व पुढें कितेक काम याचे हातून घेणें असता, उगेच माणूस दिलगीर करावें आणि स्वामीकार्याचा नाश करावा, हे कोण कारकुनी ? हे गोष्टीनें स्वामीचा तरी फायदा ? तरी ते कोडीइतकी गोष्ट नाहीं. ऐसे असता असें करावयास गरज काय ? या उपरी तरी देशमुख एकदर रजीस न करणें त्याचा हक्क जो सालाबादप्रमाणें चालला आहे, तेणेंप्रमाणें तुम्हींही चालवणें. कसूर कोडीइतकी न करणें. पुढें बोभाट आल्यास स्वामी तुमची भीड धरणार नाहींत हें नेमस्त समजणें. लेखनालकार "

२ कचेश्वरभट बिन सिद्धेश्वरभट ब्रह्मे यांस दिलेलें इनामपत्र.

"स्वस्तिश्री नृप शालिवाहन शके १६०७ क्रोधननाम सवत्सरे, माघ शुद्ध ७ सप्तमी बुधवार ते दिनी वेदशास्त्री राजश्री कचेश्वरभट बिन सिद्धेश्वरभट ब्रह्मे उपाध्ये, कसबे चाकण यांसी.—येसाजी वल्लद संताजी व विठोजी वल्लद बाबजी देशमुख व नारोजी चंदरस व बाळाजी बापुजी देशपाडे व समस्त मोकदम, देहाय परगणे मजकूर, दडवत अनुक्रमें नमस्कार, सुरुसन १०९५ सीत सन (फसली) कारणे आत्मसतोषें पत्र लेहून दिल्हें ऐसेजें:—सालमजकुरीं पर्जन्य मुतलक गेला. या निमित्यें किल्लेदार व फौजदार साहेबीं आम्हास फरमाविलें कीं, पाऊस गेला या कारणें कसबे मजकूरचे, परगणे मजकूरचे, समस्त ब्राह्मण मेळवून, अनुष्ठान करवून, पर्जन्य पडे ऐसें करणें. त्यावरून समस्त ब्राह्मण मेळवून, अकरा दिवस अनुष्ठान केलें. परंतु पर्जन्य न पडे. त्यावरी समस्त ब्राह्मणानीं व्यंगोक्ती केली कीं, आमचे मुख्य महंत त्यांस आम्हांमध्यें आणिलें पाहिजे. त्यावरून स्वामींस आम्हीं अनुष्ठानाच्या ब्राह्मणांत घेऊन आलों. त्यास स्वामींनीं उत्तर दिधलें कीं, या ब्राह्मणांस आज्ञा देणें. आणि हनुमंताच

देवळीं आनदगिरीचे मठीं हरीकथेस मंडप देणें कथा परमेश्वराची करू व देवाचा धावा करू म्हणजे पर्जन्य पडेल. संशय नाहीं. ऐसी स्वामीं प्रतिज्ञा केली. त्यावरून आपण समस्त मिळोन हरीकथेचें साहित्य केलें स्वामींनीं कथा आरंभितांच, पर्जन्य अहोरात्र पडला. पुरें पुरें केलें. आम्ही समस्त सुख पावलों. त्यास स्वामींचे काहीं उतराई जालें पाहिजे. म्हणून कसबे मजकूरीं, व परगणे मजकूरीं, दर गांवास टक्काशाई एक व धान्य कैली मण ४१ एक येणेंप्रमाणें करून दिधलें ऐसें पुत्रपौत्राहीं वशपरपरेनें हरदरसाल पाववीत जाऊ. यासी अन्यथा करूं अथवा आमचे वंशपरंपरेचा होऊन पुढें अन्यथा करील, त्यास श्री—ची व कुल-स्वामींची व आपल्या पूर्वजाची व ब्राह्मणाची आण असे. हें पत्र लेहून दिधलें सही तारीख ९ माहे रबिलावल "

---

३ श्रीदेव चिंचवडकर यांस इनाम गांव दिलें त्याची सनद.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ११ रुधिरोद्गारी नाम संवत्सरे, माघ शुद्ध ९ पंचमी, इंदुवासरे, क्षत्रियकुलावतस सिंहासनाधीश्वर श्रीराजा शंभु छत्रपति याणी राजश्री देशाधिकारी व देशलेखक प्रात पुणें वर्तमान व भावी यासी आज्ञा केली ऐसीजेः—श्रीदेव स्वामी वास्तव्य मौजे चिंचवड, प्रात पुणें, बागा व इनाम कारकीर्द निजामशहा व मलीकबर व कारकीर्द आदिलशहा व राजश्री महाराज साहेब व कैलासवासी स्वामी कारकीर्द दर कारकीर्द चालत आलें आहे सबब श्री स्वामी मौजे मजकूर पिढी दरपिढी राहोन, अन्नछत्र गरीब गुरीब व फकिर फकिराणा, जो कोणी येतो त्यास अन्न उदक देत आहेत, याबद्दल गांव इनाम करून दिल्हा आहे तेणेंप्रमाणें आम्हांसही चालवणें अगत्य आहे तरी तुम्हीं सालाबाद चालिलें आहे तेणेंप्रमाणें चालवणें. हरदरसाल नूतन पत्राचा उजूर न करणें. तालीक लेहून घेऊन अस्सल पत्र फिरावून देणें जाणिजे छ ४ माहे सफर लेखनालंकर."

---

४ मोरो विठ्ठल देशकुर्णी यांस नवीन सनद देण्याबद्दल पत्र.

"राजश्री बावाजी तानदेउ सुभेदार व कारकून, प्रात पुणें गोसावी यासी.

अखंडित लक्ष्मी अलकृत राजमान्य सेवक गंगाधर मोरेश्वर प्रधान, सुहूरसन खमस समानीन अलफ. मोरो विठ्ठल देशकुळकर्णी प्रात मजकूर हुजूर येऊन विदित केलें कीं, प्रात मजकुरीं आपला हक्क लाजिमा व दस्तमल व कतबा इनामती गांव मौजे न्हावी व जमीन गावगन्ना व वीरचे वणचराई वनाचा व नावा, टोकरे व झाडझडोरा मदत कदीम चालत आहे, तेणेंप्रमाणें कृपाळू होऊन ताजी सनद सादर केली पाहिजे म्हणून विनति केली. तरी सदरहू बाबहाय कदीम पासून तागाईत सालगुदस्ता भोगभोगवटा चालिला असेल तो मनास आणून तेणेंप्रमाणें चालिवणें. या पत्राची तालिक लेहून घेऊन अस्सल परतोन देणें. छ २७ रबिलाखर. "

५ वेंकटीभट बिन काशिनाथभट वाराणशीकर यांस इनाम जमिनीबद्दल सनद.

" आज दिवाण कसबे नवलगुंद, तहा मोकदमांनीं, कसबे नवलगुंद, कसबे मजकूर सुरुसन सात समानीन अलफ. बरहुकूम सनद सुभा परगणे मजकूर, छ १ सवाल पैवस्ती छ मजकूर तेथें लिहिलें जें, लखवालिंगपा देसाई मामले तोरगळ यानीं विनंति केली कीं, गतवर्षीं सुलतान तारामोगल लष्करसमवेत येऊन कसबे मजकुरीं मुक्काम करून घरें, वाडे व पेठ मोडून जाळून तलफ केली. त्या बराबरी गांवांत परम साक्षांत देवस्थान होतें तेंही छिन्नभिन्न केलें. थोर थोर देवालयें होतीं, तींही मोडून तलफ केलीं होतीं. त्या करतां गांवांत मरग सुटला. माणसें मरूं लागलीं. रयतलोक व दिवाणलोक व वाणी वळुंज गांवीं राहेनासे जाहलेवरी, गावें हुगी घालून आवतुक देवताचें स्थापन केलें. ग्रामदेवस्थानाच्या दिवसापासून पाढरी बसली. त्या दिवसाच्या स्थापनेच्या पुरातन स्थळेस मूर्ति होत्या, त्या दुरात्म्यानीं विछिन्न केल्या त्याची स्थापना झाली पाहिजे. महाराज राजश्री महाराष्ट्र राजा आहे. देवस्थानें छिन्नभिन्न असों नये या कारणें देवालयें बाधावीं, उरजा चालवावी. हयात आपण व स्वामी मिळोन जें करणें तें करीत आहों. होता होईल तें करून, तूर्त नवलगुंदासारखे गावात देवस्थान देवळेंच नाहींतसें झालें आहे. ऐसीयास हुगी घालतेसमयीं श्रीदेवस्वामींची स्थापना करावी. देवळें इमारती बाधाव्या. तूर्त मूर्ति स्थापना करून पूजा चालवावी. नित्य पुराण श्रवण चालावें. त्यास एक भला ब्राह्मण योग्य पाहून दोनी मार इनाम आजरामराहमत करून देऊन पुराण श्रवण चालतें करावें आणि पुढें वरकड देवाची उरजा चालवावी, ऐसें वचन गुंतलें आहे. ऐसीयास वेदमूर्ति वेंकटीभट बिन काशिनाथभट वाराणशीकर बहुत योग्य आणि भले ब्राह्मण आहेत. यासी श्रीच्या पुराणाबद्दल इनाम खालसात जमीनपैकीं हुलमार २ दोनी यास देऊन चालविलें पाहिजे. ह्मणजे प्रतिदिवशीं पुराण, श्रवण सांगतील. तेणेंकरून देवस्थानाची स्थापना होऊन शात होईल. उरजाही चालेल. ह्मणजे महाराज राजश्री छत्रपति साहेबास हें श्रेय येईल आणि आपणही वचन चालविलें असें होऊन, पुढेंही गावाची आबाद मामुरी होईल. पुढें आवंतुक देवस्थान बांधणस उरजा चालविणें ते चालविले पाहिजे. ह्मणोन विनति केल्यावरी, वस्तुता विचार मतें हीं पाहतां, हिंदुकीची गोष्टी खरीच, या कारणें सदरहूप्रमाणें चालविणें उचित आहे. उदंड खर्चवेंच महाराजाचे दरबारांत होऊन जातो, अगर पड जंगलही पडतें. त्यापरीस श्रीचे उरजे अर्पित राजगृहातून जरी वेच जाहला, तरी ज्याचें नाव त्याचें पुण्यें महाराज राजश्री छत्रपति साहेबास श्रेय येईल. ऐसें पाहून श्रीचे उरजेबद्दल भट गोसावी यांसी पुराणाबद्दल इनाम खालसात पैकीं हुलमार २ दोनी मार सर्वमान्य करून दिल्हे असे. कसबेपैकीं मशाती छेतीस बिघेचा मार ऐसे दोनी मार अजरामऱ्हामत दुमाला करून देणें. भट गोसावी यांचा भोगवटा आपण व पुत्रपौत्रीं कमावीस करून घेतील, आणि श्रीचे देवळीं पुराण सागून

सुखी असतील. त्याप्रमाणें तुम्हीं कारकून हाल व इस्तकबील व नाडगीर कसबे मजकूर ग्रामस्त यानीं चालवणें. साल दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें तालिक लिहून घेऊन अस्सल फिराऊन देणें. यासी कोणीही हिदु, मुसलनान जे कोणीही इस्कील करतील, त्यास आपल्या महाजाबाची आण असे. ह्मणोन आज्ञा आज्ञेप्रमाणें कसबे मजकुरीं सदरहू इनाम खालसातपैकीं हुलमार दोनी सालमकूरपासून हद्दमहदूद घालून देऊन सर्वमान्य चालवणें. तालिक लिहून घेऊन अस्सल सनद इनामदार मजकूरापाशीं परतून देणें. साल दरसाल ताजे मिसलीची उजूर न करणें. छ १ सवाल मोर्तबसुद. "

---

६ शंकरभट बिन तोरणवभट जोशी यांस दिलेलें दानपत्र.

विष्णुशक्तिसमुत्पन्ने शखवर्णे महीतले ॥
अनेक रत्नसंभूते श्री भूमिदेवि नमोस्तुते ॥ १ ॥
नमस्तुगी सिरःस्तुंगी चद्र चामर चारवे ॥
त्रैलोक्ये नगरारंभे मुलस्तंभाय शाभवे ॥ २ ॥

स्वस्तिश्री नृपशालिवाहन शके १६०७ प्रवर्तमानें क्रोधननाम संवत्सरें, आषाढ वद्य अमावास्या, भौमवासरे, सूर्यग्रहणें, पुण्य दिवसे, तद्दिनें श्रीमत् यजन याजन, अध्यायन, अध्यापकदान, दानप्रतिग्रह, षट्कर्म, आचरत वेदमूर्ति राजश्री तोरवणभट पुत्र शंकरभट जोशी, अश्वलायनशाखा, मौद्गल्य गोत्र, गोसावी यासी –शिवजी विठ्ठल मुजमुदार, किल्ले शिकंदरगड ऊर्फ बदामी. सुहूरसन सीत समानीन व अलफ कारणें ऐसीजे सूर्यग्रहण महापवणी पुण्यदिनीं किल्लेमजकुरीं अगस्ती तीर्थी श्रीभूतेश्वरसनिधानीं तुम्ही महा संकल्प विधानपूर्वक सागितलेवरी सत्पात्र साधुवृत्तीनिष्ठ ब्राह्मण पाहून श्रेयस्व यावें व पुण्यसामग्री संचित व्हावी ह्मणोन आमचे इनाम उमलीगाव मौजे तोरे भास्करापुरीं खालसाती जमीनपैकीं किल्ले मजकुरांचे शिवेस लागले होते. कजेनबेची गणेशाननीक मसब पटी .॥. निमे तुह्मास हद्दमहदूद घालून कुलबाब, कुलकानू, वेठबेगार हुगी हंचबलीं बलुते देखील धारादत्त करून दिलें आहे ॥ कलप्रासे दाने धन भूदानंच विशेषतः ॥ सत्पुत्रवशजो धारा वृत्ति पारा परंपरं ॥ १ ॥ श्रीशैल्ये सप्तभी नयाशि सप्तभीःभुप्रदक्षिणं एकविंशति । कासीना भूदानमधिकं फलं ॥ २ ॥ प्रयागे माघमासेतु कासीवास त्रिभिर्दिनै ॥ कुरुक्षेत्रं तु य.र्दानं भूदानमधिकं फल ॥ ३ ॥ नित्यं भागीरथी स्नान नित्यं लिंगार्चनं फलं ॥ अन्नदान समं तुलं भूदानमधिकं फल ॥ ४ ॥ सर्वेषा छेर्दिता भूरीयो भुंक्ते छर्दिते यदि ॥ तत. कष्टातरोनिचा स्वय दत्तापहारका ॥ ५ ॥ स्वदत्तं द्विगुणं पुण्यं परदत्तानुपालनं ॥ परदत्तानुहारेण स्वदत्ता निष्फला भवेत् ॥ ६ ॥

भूदानाचें श्रेयस्व विशेष्य पाहून आह्मीं सर्वमान्य इनाम करून धारादत्त दिल्हें आहे. तुमचे परमंपर स्नानसंध्या, देवतार्चन, वैश्वदेव, औपासन करून, अहर्निशी आह्मास आशी-

वाद वेदोक्त देऊन, कल्याण इच्छून आपली वृत्ति कीर्दीमामुरी करून, आपला योगक्षेम करून सुखी असिले पाहिजे. या धर्मकार्याचे वृत्तीस चातुर्वर्णीचे जन नष्टपण करून इस्कील व नवीन कानू जो कोण्ही करील, त्यास त्याचे वर्णाश्रमाची व मातृपितृाची आण असे. हें लिहून दिल्हें दानपत्र सही. "

तारीख २८ माहे साबान

---

७ रघुनाथाचार्य बिन श्रीनिवासाचार्य यांस जुन्या ऐवजीं दिलेलें नवें दानपत्र.

"यादी वेदशास्त्रसंपन्न रघुनाथाचार्य बिन श्रीनिवासाचार्य पैठणकर, गोत्र श्रीवत्स सूत्र आश्वलायन यांणीं शाहूनगरनजीक किल्ले सातारा, येथील मुक्कामीं स्वामींसंन्निध येऊन निवेदन केलें जे ---पूर्वी राजश्री हरजी राजे महाडीक चंदी प्रातें होते. त्याणीं आमचे तीर्थरूप श्रीनिवासाचार्य बिन नरहराचार्य यासी सुहूरसन समान समानीन अलफ, शालीवाहन शके १६०८ प्रभव [नाम] सवत्सरें, पौष्य अमावास्या, रविवार ते दिवशीं महोदय पर्वकाळीं मौजे अकंड नेलूर, तर्फ अयूर, परगणे त्रिकोळीर, सरकार त्रिणामल, प्रात कर्नाटक हा गाव कुलबाब कुलकानू जजी व पुजी हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी व घरपट्टी व बाजे कमाविसी व झाडझडोरा आदिकरून देखील पडिलें पान खेरीज स्थानमान, देवस्थान, इनाम, भट ब्राह्मण व ग्रामस्थ व आगांतुक व बाजे इनामदार तागाईत पूर्वीपासून चालत आले असतील ते खेरीज करून, वरकड कुलगाव, जल, तरु, तृण, पाषाण निधीनिक्षेप आदिकरून चतुःसीमापूर्व मर्यादा धारादत्त इनाम वशपरपरेनें करून देऊन पत्रें करून दिल्हीं आहेत. त्याप्रमाणें चालवावें. मोगलाई तर्फेनेही पत्रे करून घेऊन, मौजे मजकूर इनाम अनभवीत आहों भोगवटीयास महाराज स्वामींनीं पत्रें करून देऊन वशपरंपरेनें चालविलें पाहिजे. ह्मणऊन निवेदन करून, राजश्री हरजी राजे महाडीक याचें पत्र आणून दाखविलें. तें मनास आणून, हे बहुत थोर सत्पात्र, याचे चालविलीया श्रेयस्कर जाणून, मौजे मजकूर पूर्वी यासी धारादत्त इनाम आहे, त्याप्रमाणें स्वामींनीं करार करून दिल्हा असे. तरी यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरपरेनें मौजे मजकूर सदरहूप्रमाणें इनाम चालवणें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रति लेहून घेऊन हें अस्सल पत्र भोगवटीयास यांजवळ परतोन देणें येविशीं पत्रें:—

१ मौजे मजकूर
१ देशमुख, देशपाडे.
१ देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी.
१ इनामपत्र.

—

४

एकूण चार पत्रें देणें,

कीर्दीस बार छ २३ रमजान, सुरुसन सलास आर्बैन मया अलफ.

---

८ चिंचवडचे श्रीदेव यांस उपद्रव न देणेंबद्दल सक्तीचें ताकीदपत्र

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १४ प्रभवनाम संवत्सरे, श्रावण शुद्ध षष्ठी, गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस सिंहासनाधीश्वर श्री राजा शभु छत्रपति स्वामी यांणीं, सुभेदारानी व जुमलेदारांनी व कारकुनानी व हवालदारानी व बारगिरानी व अफरादानी व बाजेलष्कर व हुजरात व सुभेहाय व हशम यांसी आज्ञा केली ऐसीजेः—मौजे चिंचवड, प्रांत पुर्णे हा गाव श्री देव यांकडे चालतों. तेथें आपल्याला कांहीं उपद्रव देऊं नये, अशी पहिल्यापासून स्वामींची आज्ञा. असें असतां तुह्मीं रहदारीस नाहक दरफ्ती करिता. मौजे मजकुरीं उपद्रव देऊन धामधूमही करितां रयतीकडून गैरसनदी मनास येईल तें मागत होता ह्मणोन कळों आले. तरी या गावीं तुह्माला धामधूम कराया काय गरज? हें ढग स्वामींस कैसे मानों पाहतात? याउपरी ही बदराहा वर्तणूक केलीया, तुमचा एकदर मुलाहिजा होणार नाहीं जो धामधूम करील, त्याला स्वामी जिवेंच मारितील हें जाणून मौजे मजकुरास तसदी न देणें बोभाट येऊं न देणें. ताकीद असे जाणिजे लेखनालकार "

मर्यादेयं
विजयते

---

९ नागोजी बिन रताजी यांस सरदेशमुखी दिल्याबद्दल वतनपत्र.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १७ प्रजापतीनाम सवत्सरे, चैत्र बहुल नवमी, मंदवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपति यांणीं, राजश्री नागोजी बिन रताजी माने यासी दिल्हें अभयपत्र ऐसीजेः—तुह्मीं पूर्वी ताब्राकडे होतात. ऐसीयासी स्वामींचें राज्य ह्मणिजे देवताभूमि. या राज्यास ताब्राचा उपद्रव न व्हावा, महाराष्ट्रधर्म रहावा, स्वामींच्या राज्याची अभिवृद्धी व्हावी, या उद्देशें स्वामींच्या पायासीं एकनिष्ठता धरून, कर्नाटकात चंदीचे मुक्कामीं स्वामींपाशीं आलेंत. येऊन विनंति केली कीं, आपणांस देशांत सरदेशमुखीचें वतन करून दिल्हें पाहिजे बितपशीलः—

१ कसबे ह्मसवड देखील बारा वाडीया.	१ कर्यांती दहींगाव.
१ कर्यांती सांगोलें	१ कर्यांती भाळवणी.
१ कर्यांती अठपाडी.	१ कर्यांती नाझरें
१ कर्यांती ब्रह्मपुरी	१ कर्यांती कासेगाव.
१ कर्यांती आकलुज.	१ कर्यांती येळापूर.
१ कर्यांती मंगळवेढें.	१ कर्यांती कलढोण.
६	६

एकूण महाल १२ बारा महालचें वतन करून द्यावया आज्ञापत्र देविलें पाहिजे ह्मणोन विदित केलें ऐसीयासी तुह्मीं स्वामी सेवेवरी एक चित्तें वर्तत आहा. तुह्मावर स्वामी कृपाळू होऊन नूतन सरदेशमुखीचें वतन सदरहू बारा महालचें करून दिल्हें असें. तुह्मीं व तुमचें पुत्रपौत्रीं अनुभवून सुखरूप असणें निर्देश समक्ष "

तारीख २१ रजब, सुरुसन इहिदे तिसैन.

१० खंडभट शाळिग्राम यांचें वर्षासन वाढविल्याबद्दल पत्र.

"पत्र वर्षासन वेदशास्त्रसंपन्न राजश्री खडभट शाळिग्राम आश्रित राजमंडळ, सुरसन इहिदे तिसैन अलफ. वेदमूर्ति बहुत थोर योग्य आहेत. यासी पहिलें वर्षासन एकशें होन करून ठेविलें. ऐसीयास सालगुदस्ता शेख निजामानें ठाणें संगमेश्वरीं घातलें होतें, व सर्जाखान सातारीयास वेढा घालून बैसला होता, त्याला मारून काढावे हा विचार केला. यावरी वेदमूर्तीनें मुमुहूर्त दिल्हा त्या मुहूर्तेंच राजश्री पतसचीव जमावानिशीं स्वार होऊन, संगमेश्वरीच्या ठाणीयावरी गेले. तेथें युद्धप्रसग करून, गनीम पराभवातें पाविला. तैसेंच सातारीयास सर्जाखानावरी लष्करनिशी गेले तेथेंही युद्धप्रसंग करून सर्जाखान अगदीं कबिल्या देखील पाडाव केला. त्यामुळें कुली मुलुख व कितेक गड, कोट हस्तगत जाले. यास्तव वेदमूर्ति योग्य भले जाणोन, वर्षासन देखील कदीम सरंजामी केली. सालीना होन पादशाही ५०० बेरीजेचें.

कदीम वर्षासन सालीना १०० होन यासी. एकूण पांचशें होन सालीना रास.
जाजती वर्षासन सालीना होन ४००
यासी छ मजकुरी पाठवून

एकूण वर्षासन सालीना होन यासी पांचशें रास केले असेत. इस्तकबील छ मजकुरापासून कदीम व जाजती मिळोन आश्रिताच्या दंडके माहे दरमाहे पावेल. परवानगी हुजूर."

११ अमृतराव बिन तुकाराम निंबाळकर यांस देशमुखीबद्दल दिलेलें वृत्तिपत्र.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १८ आगिरानाम सवत्सरे, माघ बहुल द्वितीया, भानुवासरे, क्षत्रिय कुलवतंस श्रीराजाराम छत्रपति यानी, अमृतराव बिन तुकाराम निंबाळकर देशमुख, परगणे फलटण व कर्यात खानापूर व कर्यात सावर्डे यांसीः—

वृत्तिपत्र दिल्हें ऐसेजे, ताब्र अवरगशहा दक्षणेस येऊन विजापूर व भागानगर हीं स्थळें हस्तगत केलीं. यानंतर स्वामींही कर्नाटक प्रातात आले ऐसीयास तुम्ही ताब्राकडे सेवा करीत होता. स्वामीचें राज्य म्हणजे देवब्राह्मणाची भूमि. या राज्याची अभिवृद्धी व्हावी आणि महाराष्ट्र धर्म रहावा, या उद्देशें स्वामींच्या पायाशीं एकनिष्ठता धरून, देशी स्वामींकडे येऊन, तिकडे एकनिष्ठपर्णे सेवा केलीयानतर चंदीस ताब्र येऊन बहुत आक्रम केला होता म्हणऊन देशीहून एक भाव धरून कर्नाटकप्रातास चदीस येऊन, ताब्रासीं युद्ध करून पराभवार्ते पाविविला यास्तव तुह्मावरी कृपाळू होऊन तुम्हास तुमचे देशमुखीचे महाल इनाम करून दिल्हे आहेत बितपशील·—

१ परगणे फलटण १ कर्यात खानापूर, १ कर्यात सावर्डे

एकूण महाल ३ तीन रास कुलबाब, कुलकानू हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी झाडझाडोरा पडलें पानसहित खेरीज हक्कदार व इनामदार व देवस्थान करून दिलें असे इनाम करून दिला आहे. तरी तुम्हीं आपले स्वाधीन करून घेऊन सुखरूप असणें व तुमचे पुत्रपौत्रापि वशपरंपरेनें अनुभऊन सुखरूप असणें व सदरहू तिनी महालाचें सरदेशमुखीचें वतन तुम्हास दिलें आहे तरी तेंही परपरेनें अनुभऊन करणें. यासी कोण्ही अन्यथा करील त्यासी श्लोकः—

स्वदत्ता परदत्ता वा यो हरेच्च वसुंधरा ।
षष्ठि वर्ष सहस्राणि विष्ठाया जायते कृमि ॥

जाणिजे.

---

१२ श्रीज्ञानेश्वर महाराज यांचे आळंदी येथील समाधीबद्दल आज्ञापत्र.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १८ प्रजापतीनाम संवत्सरे, भाद्रपद शुद्ध तृतीया, रविवासरे, क्षत्रिय कुलावतस श्रीराजाराम छत्रपति याणीं, राजश्री बयाजी नारायण देशाधिकारी व लेखक प्रांत जुन्नर यासी आज्ञा केली ऐसीजे·—श्रीज्ञानेश्वर स्वामीची समाधी मौजे आळदी, परगणे चाकण, प्रात मजकूर येथें आहे. या समाधिस्थळीं पूजा पुनस्कार चालिला पाहिजे म्हणून, कैलासवासी महाराज व कैलासवासी मातुश्री जिजाऊ व कैलासवासी राजेसाहेब या त्रिवर्गानीं आपलाले वेळेस नियत करून दिल्ही. तेणेंप्रमाणें श्रीस्वामींची पूजा सांग चालत आली. त्याउपरी तांब्राचें अवांतराकरिता भोगवटा तुटला आहे. ऐसीयासी पूर्वील मोईनप्रमाणें चालवावें व स्वामींनीं आपलीयाकडू-

नही विशेष * * स मोईन करून देऊन, यथासांग पूजा पुनस्कार चालावया [स] स्वामींनीं आज्ञापत्र करून देविलें पाहिजे. म्हणून मोरो भास्कर कुळकर्णी, मौजे मजकूर यांणीं चदीचे मुक्कामीं स्वामींसन्निध येऊन विनंति केली. त्यावरून मनास आणितां, श्री-स्वामींचें सिद्धस्थान, या स्थळीं बहुत साक्षात्कार आहे; तेथें पूजा पुनस्कार यथासांग चालले पाहिजेत. यानिमित्य पूर्वी कैलासवासी त्रिवर्ग साहेबीं पूजेस नियत करून दिधली आहे. तेणेंप्रमाणें चालवावें. या वेगळे स्वामींनीं आपल्याकडून मोईन पुजेस करून दिल्ही आहे. पूर्वील हल्लीं एकूण मोईन बितपशीलः—

दररोजीना.

कैली कोठी मापें.	वजनी टकबंदी.
६६॥. तांदूळ बारीक.	६६१ डाळ.
६६॥. कणीक.	६६॥ तूप.
	६६३ तेल नंदादीप.
६६१	

नक्त (रुक्के).

६६४॥.	
६८ पानसुपारी व शाख.	
।४ दक्षणा.	
।॥.	

वर्षास श्रीविठ्ठल व रुकमिणीस वस्त्रें.

श्रीस्वामींस.	श्रीदेवींस.
८ धोतरें.	४ लुगडीं.
८ शेले.	४ चोळ्या.
१६	८

आषाढी व कार्तिकी द्वादशीयास क्षीराब्धी कारणें.

चणीयाची डाळ.	वजनी गूळ.
कैली कोठी मापें.	६४
१८	

कदीम मोईन चालिली आहे बरहुकूम.
जबानी मशारनिल्हे कुळकर्णी मजकूर.

दररोजीना.

कैली.	वजनी वजन.
६६। तांदूळ.	६६॥. डाळ.
६६। कणीक.	६६॥. तूप.
	६६१॥ तेल नंदादीप.
६६॥.	

नक्त.

६६२॥.	
६४ पानसुपारी व शाख.	
६८ दक्षणा.	
।.	

वर्षास श्रीस्वामींस व रुकमिणींस वस्त्रें.

श्रीस्वामींस	श्रीदेवीस.
४ धोतरें.	२ लुगडीं.
४ शेले.	२ चोळ्या.
८	४

आषाढी व कार्तिकी द्वादशीयास क्षीराब्धी कारणें.

डाळ चणेची कैली.	वजनी गूळ.
।॥.	६२

राजश्री महाराज साहेबांनीं मोईन करून दिल्ही बितपशीलः—

दररोजीना.

कैली कोठी मापें.	वजनी टकबंदी.
६६= तांदूळ.	६६। डाळ.
६६ कणीक.	६६६९ तूप.
——	६६॥. तेल.
६६=	——
नक्त.	६६॥॥९

६२ पानसुपारी व शाखेस.
६४ दक्षणा.
—
६६

प्रती मोईन.

वर्षास श्रीस्वामींस व रुकमिणींस वस्त्रें.		आषाढी व कार्ति- की क्षीराब्धीस.
स्वामींस	देवींस	डाळ चणेची
२ धोतरें.	१ चोळी.	कैली .।
२ शेले	१ साडी.	वजनी टंकबंदी
—	—	गूळ ६१.
४	२	

मातोश्री जिजाऊसाहेब याही नंदादिपास तेल मोईन करून दिल्हें, वजन टकबंदी ६६॥.

राजश्री छत्रपति कैलासवासी स्वामींनीं मोईन करून दिल्ही बितपशील.—

दररोजीना.

कैली कोठी मापें.	वजनी टकबंदी.
६६= डाळ.	६६। डाळ.
६६= कणीक.	६६६९ तूप.
——	६६॥. तेल.
६६।	———
नक्त.	६६॥॥९

६२ पानसुपारी व शाखेस
६४ दक्षणा.
—
६६

वर्षास स्वामींस व रुकमिणींस वस्त्रें.

श्रीस्वामींस.	श्रीदेवींस.
२ धोतरें.	१ साडी.
२ शेले	१ चोळी.
—	—
४	२

आषाढी व कार्तिकी क्षीराब्धीस.

डाळ चणीयाची.	गूळ वजन.
कैली .।	टकबदी ६१.

हल्लीं स्वामींनीं आपल्यांकडून पुजेची नियत करून दिल्ही आहे बितपशीलः—

सांप्रत नूतन मोईन.

दररोजीना.

कैली कोठी मापें.	वजनी टकबंदी.
६६। तांदूळ.	६६॥ डाळ.

वर्षास श्रीस्वामींस व रुकमिणींस वस्त्रें.

श्रीस्वामींस.	श्रीदेवींस.
४ धोतरें.	२ लुगडीं.

६६। कणीक,	६६। तूप.	४ शेले,	२ चोळ्या.
—	६६१॥ तेल.	—	—
६६॥.	———	८	४
नक्त.	६६२।	आषाढी व कार्तिकी द्वादशीयास	
६४ पानसुपारी		क्षिराब्धी कारणें	
व शाखेस.		डाळ चणीयाची.	वजनी गूळ.
६८ दक्षणा.		कैली कोठी मापें.	टकबंदी
—		.॥.	६२
.। .			

एकूण मोईन दररोजीना कैली कोठी मापें एक पायली व वजनी टकबंदी साडेचार शेर व नक्त रुके चोवीस व वर्षास वस्त्रें चोवीस सनगें, व आषाढी कार्तिकीस क्षीराब्धीस डाळ चणीयाची कैली कोठी मापें एक खंडी व गूळ वजन चार मण, येणेंप्रमाणें पुजेस मोईन करून देऊन, मौजे अळंदी, परगणे चाकण, प्रात मजकूरपैकीं देविले असे. इस्तकबील सनद पैवस्तीपासून सदरहू मोईनप्रमाणें यथासाग पूजा पुनस्कार चालवणें. वर्षप्रतिवर्षी नूतन पत्राची आपेक्षा न करणें. या पत्राची प्रती लिहून घेऊन, मुख्य पत्र सालाबाद ज्यापाशीं द्यावयाचें असेल, त्यांजपाशीं परतोन देणें. जाणिजे निर्देश समक्ष."

तेरीख १ जिल्हेज, सुरुसन इसन्ने.

१३ गुणाजी सांवत व त्यांचे भाऊबंद यांस दिलेलें अभयपत्र.

"मश्रूल अनाम राजश्री गुणाजी सावत, पदाती, पंचसहस्री यासी, शंकराजी नारायण सचीव, सुरुसन सलास तिसैन अलफ. तुम्हीं हुजूर येऊन विदित केलें कीं, धामधुमीच्या प्रसंगीं आपण श्रीभिमाशंकराच्या डोंगरीं होतों. त्यांसी कोरीगड कुलाबेकरानीं व राजश्री सोनजी फर्जंद याकडील लोकानीं हस्तगत केला. हें वर्तमान आपणास कळलें. त्यावरी आपणही जमाव करून, किल्ले सिंदगड हस्तगत केला. गनीम मारून काढिला. गडावरी शिल्लक मनास आणिता, नागली दीड मण होत्या. हें वर्तमान * * जुन्नरकर गनिमास कळलें. त्याजवरून अलीबेगा जमावनिशीं जुन्नरीहून स्वार होऊन, सिंदगडचे माचीस येऊन, वेढा घालून बसला. खालीं स्वारी शिकारी करावी, तरी मार्ग एकंदर चालेना. गडावरी तो सामान एका दिवसाचें नाहीं. ते समयीं आपण सिंदगडीहून स्वार होऊन जमाव करणें. सोनजी फर्जंद कोरीगडास होते. याजवळी आलों. वर्तमान सांगितलें. वेढा माराया कारणें जमाव मागितला. त्यासी मशारनिल्हेनीं जमाव द्यावयासी अनमान केला. मागें अलीबेगा यानें गडावरी लोक होते, त्यासीं राजकारण केलें. आमचा भाऊ राजजी सांवतही होता. त्यासी पांचशें रुपये देऊं केले. लोकांनीं भक्षावयासी नाहीं, याकरितां धीर सोडिला. याकरितां

पांचशें रुपये घेऊन, गड द्यावा ऐसा निर्वाह केला. अलीबेगा यांसी केला. त्यावरी त्याणें पांचशें रुपये गडावरी पाठऊन कौलगड घेतला. आम्हांकडील लोक वरले: राजजी धरून नेला. पाचशें रुपये फिरोन घेतले. आणि राजजीस दस्त करून हुजूरास नेला. आपण सोनजी फर्जंद यांचा निरोप घेऊन गडास गेलों. तों गड मोगलांनीं घेतला. ऐसें वर्तमान कळलें. तेव्हा तेथेंच राहिलों. राजजीस दोनी रात्रपावेतों अदबखान्यात ठेविले होते. त्याउपरी प्रयत्न करून, राजजी सोडवून आणिला. ऐशासी राजश्री चांदजी कदम स्वामींनीं सन इहिद्देमध्यें स्वारीस त्या प्रांतांत पाठविलें होते. त्या समयीं आपण सिंदगडचें राजकारण करून, सिंदगड हस्तगत केला. ऐशासी पूर्वी पांचशें रुपये घेऊन, गड गनिमास दिल्हा, त्याचा लौकिक जाला आहे. याकरिता राजजी सावत शक धरीत आहे. करीणा तो ये जातीचा आहे. येविषयीं काय आज्ञा केली पाहिजे ? म्हणून विदित केलें. ऐशासी गनिमानें गडास वेढा घातला. गडावरी भक्षावयासी नव्हतें. ते समयीं गनिमानें हुन्नर भरोन दगा दिल्हा. ये गोष्टीचा अन्याय तुमचा काय आहे ? हल्लीं तुम्हीं व राजजी सावत व वरकड तुमचे भाऊबंद एकनिष्ठतेनें सेवा करीत आहात. तुह्मास ये गोष्टीचा अन्याय लागणार नाहीं. येविषयीं समाधान असो देणें. छ ६ सवाल. परवानगी हुजूर."

---

१४ श्री नारायण देव चिंचवडकर यांस इनाम गांव दिला त्याबद्दल सनद.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १८ प्रजापतीनाम संवत्सरे, फाल्गुन बहुल त्रयोदशी, मंदवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा छत्रपति याणीं, राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी, प्रांत पुणें यांस आज्ञा केली ऐसीजे.—श्रीमोरोबा गोसावी देव याचे पुत्र, श्री नारायण गोसावी देव, वास्तव्य चिंचवड, हे बहुत थोर, साधु, मंगलमूर्तीचे वरदायक, अनुष्ठाननिरत, सत्पुरुष योगेश्वर, बहुत प्रसिद्ध, याचा महिमा अपार आहे. ऐसें स्वामींनीं जाणून, श्रीप्रीत्यर्थ नूतन इनाम मौजे चिंचवड, तर्फ** परगणे मजकूर देह १ एक कुलबाब, कुलकानू हल्लीपट्टी, पेस्तरपट्टी, जल, तरु, पाषाण, निधिनिक्षेप, झाड झाडोरा पडलें—पानसहित गांव चतुःसीमा भूमि सर्वमान्य दत्त करून दिधला असे. हा गांव देव गोसावी याचे स्वाधीन करून, यांस व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें सुरक्षीत गाव इनाम चालवणें. वर्ष प्रतिवर्षीं नूतन पत्राची अपेक्षा करीत नव जाणे या पत्राची प्रती लिहून घेऊन, मुरुय पत्र यांजपाशीं देणें. जाणिने निर्देश समक्ष"

तारीख २६ जमादिलाखर, सन इसने.

श्री राजाराम नरपति हर्षनिदान मोरेश्वरसुत नीळकंठ मुख्य प्रधान.

श्रीलक्ष्मि नृहरि प्रीते सुद्रानीराजि जन्मना ॥ राजाराम प्रतिनिधे प्रल्हादस्य विराजते

मर्यादय विराजते.

१५ शंकराजी बिन मकाजी घारगे यांस सरदेशमुखी वतनाबद्दल वृत्तिपत्र.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १९ आंगिरानाम संवत्सरे, श्रावण शुद्ध सप्तमी, भानुवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपति यांणीं, शंकराजी बिन मकाजी घारगे यासी दिल्हें वृत्तिपत्र ऐसीजे:—तुम्हीं पूर्वी ताब्राकडे होतेत. त्यानंतरी स्वामींच्या पायासीं एकनिष्ठता धरून सन इहिदे मध्यें चंदीचे मुक्कामीं स्वामींकडे आलेती. येऊन सेवा एकनिष्ठपणें करितां; लष्करपणाची हद्द जैसी होती तैसी केली. दर भांडणीं मोगलासीं गांठी घालून, बरी झुंजें दिल्हीं. त्याजवरून तुमच्या शिपाईपणास स्वामी मानवोन, तुह्मावरी कृपाळू होऊन, तुह्मांस नूतन वतन सरदेशमुखीचें करून दिल्हें. महाल ३ बितपशील.—

कर्यांती निमसोड १. कर्यांती माइणी १. कर्यांती विटें १.

कर्यांती तीन रास येथील सरदेशमुखीचें वतन करून, अजरामन्हामत दिल्हें असे. या वतनास हक्क, लाजीमा सालाबाद जो चालिला असेल, तेणेंप्रमाणें तुह्मीं व तुमचे लेंकराचे लेंकरी अनुभऊन सुखरूप असणें. एकनिष्ठपणें सेवा करीत जाणें. यास जो कोणी हिल्ला हरकत करील, त्यास गोहत्या, ब्रह्महत्येचें पातक आहे. व म्लेंछास सोराची आण असे. जाणिजे. निदेश समस्त.

तारीख ९ जिल्काद, सुरुसन सलास तिसैन. अलफ."

---

१६ चिंचवडकर देव यांस माणगांव इनाम दिल्याबद्दल सनद.

"राजश्री काकाजी नारायण सुभेदार व कारकून हाल व इस्तकबल प्रांत मावळे, तालुका लोहगड गोसावी यास

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक शंकराजी नारायण, नमस्कार. सुरुसन आर्बा तिसैन अलफ. श्री देव वास्तव्य चिंचवड याचे आशीर्वादें, महाराज राजश्री छत्रपति स्वामींची राज्याभिवृद्धी जाहली. हें देवब्राह्मणाचें आशीर्वादाचें राज्य याकरितां मौजे माण, तर्फ कर्यातमावळ, हा गाव कुलबाब कुलकानू, खेरीज हक्कदार व इनामदार इनाम दिल्हा असे. तरी मौजे मजकूर श्रीचे दुमाले करणें. वशपरंपरेनें पुत्रपौत्रीं चालवणें. दरसाला पत्राची तालिक लेहून घेऊन, अस्सल पत्र परतोन देणें प्रतिवर्षीं नूतन पत्राचा आक्षेप न करणें." छ २ रजब. श्री शंकराजी नारायण. परवानगी हुजूर. पत्रावधि रयं भाति.

---

१७ बाजी सर्जेराव जथे देशमुख यांचे पराक्रमाचें शिफारसपत्र.

"राजश्री मल्हार येसाजी सुभेदार व कारकून तर्फ मावळ, परगणे राजगड गोसावी यांसी.

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक शंकराजी नारायण, नमस्कार.

पुरुसन आर्बा तिसैन अलफ. बाजी सर्जेराव जधे देशमुख, तर्फ भोर, तर्फ रोहिडखोरें, यांणीं विदित केलें कीं, आपण राज्यामध्यें कष्टमशागती केली. तांब्राची फिसाद जाहली, त्या प्रसंगामध्यें आपण एकनिष्ठपणें राहून सेवा केली आहे. विलायती खराब पडली होती. त्यास रयतेस धीर भरंवसा देऊन, वसाहत केली आहे. ** त्यावरून मनास आणितां, यांणीं राज्यामध्यें बहुतच कष्टमशागती केली आहे. राजश्री छत्रपति स्वामी कर्नाटक प्रातास गेले. त्या समयीं मोगलाची फिसाद बहुतच जाहली होती. मशारनिल्हे एकनिष्ठेनें राहोन, लोकांचा जमाव करून, किल्ले विचित्रगड गनिमापासून हस्तगत केला. त्यावरी विलायती कुल खराब पडली होती. त्याची लावणी संचणी केली. * * * "

---

१८ चिंचवडकर शाळिग्राम यांस इनाम दिल्याबद्दल वृत्तिपत्र.

श्री धर्म प्र-
द्योतिता शेष व-
र्णोदाशरथेरिव
राजारामस्य मुद्रे-
य विश्ववद्या
विराजते.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २ १ भावनाम संवत्सरे, कार्तिक शुद्ध चतुर्दशी, भानुवासर, क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपति यांणीं, वेदमूर्ति श्री गोसावी गोत्र हरित, सूत्र आश्वलायन, उपनाम शाळिग्राम, वास्तव्य स्थळ चिचवड, तर्फ हवेली, प्रांत पुणें यासी दिल्हें वृत्तिपत्र ऐसेजेः—तुम्हीं बहुत थोर, विद्यासंपन्न, सिद्धपुरुष, सत्पात्र, श्री मंगळमूर्तीचे उपासक, श्रौतस्मार्त-

श्री ॥ राजाराम
नरपति हर्षनिदान
मोरेश्वरसुत नील-
कंठ मृड्य प्रधान.

श्री लक्ष्मी
नृहरि प्रीति
मुद्रानिराजि-
जन्मता ॥ राजा-
राम प्रतिनिधे
प्रल्हादस्य
विराजते.

कर्मानुष्ठाते, तुमची लीला अलौकिक, वरदी पुरुष, विश्ववंद्य, जगत्पावन व तुम्हीं अन्नदान बहुत करीत आहा. यानिमित्य तुम्हांस एक गांव इनाम देऊन, अन्नदान तुमचें चालविलीयानें स्वामींस व स्वामींच्या राज्यास कल्याणाभिवृद्धि आहे ऐसें जाणोन, श्रीविघ्नविनाशनाप्रीत्यर्थ अन्नदान चालावया कारणें, तुह्मांस नूतन इनाम मौजे चिखली, तर्फ हवेली, प्रांत पुणें, देह १ एक रास कुलबाब, कुलकानू देखील हद्दीपट्टी व पेस्तरपट्टी, जल, तरु, पाषाण, तृण, निधिनिक्षेप पडलेंपानसहित, खेरीज हक्कदार व इनामदार करून ग्राम चतुःसीमा भूमि पूर्वमर्यादेप्रमाणें, सिलाशासनपूर्वक सहिरण्योदकें, धारापूर्वक सर्वमान्य करून

दिल्हा असे. तुम्हीं आपले स्वाधीन करून घेऊन, तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवून सुखरूप असणें. निदेश समक्ष." मर्यादेयं विराजते.

१९ महादजी बिन गंगाजी बाबर यांस इनाम गांव दिल्याबद्दल आज्ञापत्र.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २२ धातृ (धाता) नाम संवत्सरें, चैत्र शुद्ध एकादशी, भृगुवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपति यांणीं, राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान भावी, प्रात कऱ्हाड यांसी आज्ञा केली ऐसीजेः—महादजी बिन गंगाजी बाबर याचे विशीं राजश्री धनाजी जाधवराऊ, सरलष्कर उमदेतुल्मुलुक, यांणीं चंदीचे मुक्कामीं, स्वामीसमीप विनंति केली कीं, महादजी बाबर यांचे बाप गंगाजी बाबर देशमुख, कर्याती नाणेघोळ, यांणीं आपल्या समागमें येऊन, छ १४ रजबी, झुलपिकारखानाची गांठी पडिली, ते समयीं समरांगणीं युद्धीं स्वामीकार्यावरी देह दिल्हा. बरा मर्दानी माणूस होता. यांसी राजश्री रामचंद्र पंडित अमात्य हुकमतपन्हा याणीं एक गाव मौजे केळाली, कसबे मजकूर हा गांव जमीन चावर पाच आहे, तो इनाम दिल्हा आहे. तो चालत आहे. त्याखेरीज आणीक एक गांव इनाम याचे पुत्र मशारनिल्हे यासी देविला पाहिजे ह्मणोन विदित केलें. त्याजवरून याजवरी स्वामी कृपाळू होऊन, पेशजी केळाली इनाम आहे. ती करार करून, हल्लीं नूतन इनाम मौजे दांडोली, कर्याती मजकूर देहे १ एक रास कुलबाब, कुलकानू देखील हल्लींपट्टी व पेस्तरपट्टी, झाडझाडोरा पाडिलेंपानसहित खेरीज हक्कदार व इनामदार करून, ग्राम जमीन दुमाला चावर २।।।२० पावणे तीन चावर, वीस बिघे आहे. ऐसें जाणोन इनाम दिल्हा आहे. याचे दुमाले करून यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें सुखरूप चालविणें. प्रतिवर्षीं नवीन पत्राची अपेक्षा न करणें. या पत्राची प्रती लिहून घेऊन, मुरुयपत्र इनामदार मजकुरास परतोन देणें. निदेश समक्ष."

रवाना छ. २९ रमजान, सीत तिसैन अलफ.

२० अंबरोजी बिन बाळोजी ढमाले यांस इनाम गांव दिल्याबद्दल सनद.

"राजश्री नरहरी त्रिमल, सरसुभेदार व कारकून परगणे मावळ गोसावी यांसीः—

ध् अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक शंकराजी नारायण सचीव, सुरुसम सीत तिसैन अलफ, मोकदम आंबराजी ढमाले याचा बाप बाळोजी ढमाले हशमाची पांच हजारी होती. ऐसीयासी किल्ले कोरीगड सालमजकुरीं गनिमानें घेतला. त्याचे मदतीनें

मनसूरखान गनीम जमावानशीं किल्ले मजकुरास येत होता. त्यास मार्गीं हशमाचा लष्करा चा जमाव गनिमाशीं गांठी घातली, आणि गनिमास नतीजा पाऊन, कुली माघारा घातला. ते समयीं मशारनिल्हेनें तरवारेची शर्त करून, स्वामीकार्यावरी ठार जाले. त्यांचा पुत्र आंबरोजी ढमाला याचें चालवणें अगत्य ह्मणून, त्यास नूतन इनाम मौजे आपस खुर्द, तर्फ पौडखोरें देहे १ एक. यास कुलबाब, कुलकानू खेरीज हक्कदार व इनामदार वजा करून इनामगांव दिल्हा असे. तरी मौजे मजकूर मशारनिल्हेचे स्वाधीन करून, तेथील जो ऐवज होईल तो यास व याचे वशपरंपरें पुत्रपौत्रादि इनाम चालवणें. हरदरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें. या पत्राची तालिक लिहून घेऊन, अस्सल भोगवटीयाबद्दल परतोन देणें. मौजे मजकूर बरहुकूम सनदेप्रमाणें पाववून इनाम चालवणें जाणिजे."

छ १५ जमादिलोवल

---

२१ येसाजी बिन बजाजी दाभाडे यांस इनाम गांव दिल्याबद्दल आज्ञापत्र.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २३ धातृ (धाता) नाम संवत्सरे, आषाढ शुद्ध त्रयोदशी, गुरुवासर, क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति, राजेश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी, प्रात जुन्नर यांसी आज्ञा केली ऐसीजे.—येसजी बिन बजाजी दाभाडे मोकदम, मौजे तळेगांव नजीक इंदुरी, प्रांत चाकण यांणीं, स्वामींस जेष्ठ बहुल पंचमीस, भोमवासरीं पुत्रोत्साह जाहला, ते समयीं चंदीचे मुक्कामीं विनंति केली कीं, मौजे तळेगाव आपले पाटिलकीचा आहे. तो इनाम देवविला पाहिजे ह्मणोन विदित केलें. त्याजवरून मनास आणिता, याणीं स्वामीसेवा बहुत एकनिष्ठपणें केली व पुढेंही करीत आहेत. दृढ निश्चयाचे सेवक, याचे चालवणें स्वामींस अगत्य, यास्तव यांजवरी स्वामी कृपाळु होऊन, नूतन इनाम मौजे तळेगांव नजीक इंदुरी, परगणे चाकण, प्रात मजकूर देहे १ एक रास कुलबाब, कुलकानू देखील हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी, झाडझाडोरा पडिलेंपानसहित, खेरीज हक्कदार व इनामदार करून इनाम दिल्हा असे. यांचे स्वाधीन करून यांसी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें सुरक्षीत चालवणें. प्रतिवर्षीं नूतन पत्राची अपेक्षा न करणें. या पत्राची प्रती लिहून घेऊन, मुख्य पत्र यांस परतोन देणें. निर्देश समक्ष. मोर्तब असे."

तारीख १२ जिल्हेज. सुरुसन सबा तिसैन अलफ.

---

२२ मुधोजी नाईक बिन बजाजी नाईक निंबाळकर यांस दिलेलें इनामपत्र.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २३ धातृ (धाता) नाम संवत्सरे, अश्विन बहुल प्रतिपदा, गुरुवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्रीराजाराम छत्रपति यांनीं, राजश्री मुधोजी नाईक

बिन बजाजी नाईक निंबाळकर देशमुख, परगणे फलटण, यांसी दिल्हें इनामपत्र ऐसीजें, बितपशीलः—

तुह्मीं चंदीचे मुक्कामीं स्वामींसमीप विनंति केली कीं, परगणे फलटण महाल पूर्वी आदिलशहाचे कारकीर्दीस पादशहा अल्ली आदिलशहा यांणीं, राजश्री नाईक आपले बाप यांस दरोबस्त इनाम दिल्हा होता आणि दिवाणामध्यें शंभर स्वार चाकरीस द्यावे, ऐसा निर्वाह केला होता तरी स्वामींनीं तेणेंप्रमाणें फलटण महाल आपणास इनाम देविलीयानें शंभर स्वार दिवाणामध्यें चाकरीस देऊ. ह्मणोन विदित केलें त्यावरून दिवाणामध्यें शभर स्वार चाकरीस तुह्मीं द्यावे. ऐसा निश्चय करून, परगणे फलटण महाल १ एक रास कुलबाब, कुलकानू दरोबस्त देखील हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी व जकायती परगणे मजकूर व सरदेशमुखी व टोकरी निरानदीचा हाशील व झाड, झाडोरा पडिले पानसहित खेरीज हक्कदार व इनामदार करून महाल इनाम १.

कित्ता विनंति तुह्मीं केली कीं, राजश्री कैलासवासी बजाजी नाईक आपले पिते, हे कसबे बावडें, परगणे इंदापूर येथें क्रमले आहेत तरी तो गाव आपणास इनाम देविला पाहिजे. ह्मणोन विदित केलें त्यावरून तुह्मीं थोर घराण्याचे लोक असें जाणून, स्वामी तुह्मावरी संतोषी होऊन, तुह्मांस नूतन इनाम कसबे बावडें, परगणे इंदापूर देह १ एक रास कुलबाब, कुलकानू देखील हल्लीपट्टी व पेस्तरखेरीज हक्कदार व इनामदार करून, गाव इनाम दिल्हा असे देह १.

एकूण महाल एक व गाव एक, सदरहूप्रमाणें इनाम दिल्हा असे. तरी परगणे फलटण बेशमी शंभर स्वार दिवाणात चाकरीस देऊन, हरदरसाल चाकरी करून महाल खाणें व गांव इनाम आपले स्वाधीन करून घेऊन, तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवून सुखरूप असणें यासी हल्लीं कोणी कथला करील त्यास, गाई ब्राह्मणाची आण असे. व मुसलमान इस्कील करील त्यास, मक्केमध्यें सोर मारीलेचें पाप लागेल. ऐसी पापें जाणून इनाम चालवितील. निर्देश समक्ष. मोर्तब.

तारीख छ. १४ रबिलोवल, सुरुसन सबा तिसैन अलफ."

---

२३ हणमंतराऊ बिन कृष्णाजी घोरपडे देशमुख यांस इनाम गांवाबद्दल आज्ञापत्र.

" स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २३ धातृ (धाता) नाम संवत्सरे, पौष शुद्ध ११ गुरुवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपति यांणीं राजश्री हणमंतराऊ बिन कृष्णाजी घोरपडे देशमुख, किल्हे वंदन, कसबे आंगापूर यांस आज्ञा केली ऐसीजेः—तुम्हीं चंदीचे मुक्कामीं आपणांस * * नूतन इनामगांव कर्याती आगापूर, प्रांत सातारा पैकीं आपले देशमुखीचे वतनाचे गांव आहेत. ऐसीयास स्वामींच्या

पायाशीं एकनिष्ठता धरून, कर्नाटक प्रांतास स्वामीसन्निध आलों. त्यावरी आयेवारकुटीयाचे मुक्कामीं संताजी घोरपडे व राजश्री धनाजी जाधवराव या उभयतांमध्यें झुंज जाहलें. त्या समयीं आपण कष्ट मेहनत बहुतच केली. ते स्वामींस विदित आहे. स्वामींनीं कृपाळू होऊन आपणांस इनाम गांव देविले पाहिजे. देहे २ दोन्ही बितपशीलः——

मौजे गोजेगाव देहे १ एक. मौजे कांबेरी देहे १ एक.

प्रांत वाई, संमत कोरगांव पैकीं मौजे एकंबें व आपले पाटिलकीचा वतनी गांव आहे. या गांवापैकीं आपणास इनाम भूमिः——

कदीम इनाम मौजे मजकूर पैकीं भूमि चावर जिराईत १ एक, आदिलशहाचे कारकीर्दीस चालत होता. त्याउपरी श्री स्वामी हस्तगत जाहल्यावर इनाम दिवाणांत अनामत करून, सत्रा खंडीस पांच ५ खंडीप्रमाणें गल्ला देत होते तेणेंप्रमाणें चालत असे. हल्लीं स्वामींनीं कृपाळू होऊन, आदिलशहाचे कारकीर्दीस इनाम चालिल्याप्रमाणें इनाम देविली पाहिजे. येणेंप्रमाणें भूमि इनाम देविली पाहिजे.

हल्लीं नूतन * * मौजे मजकुरीं आंबराई आपल्या मिरासीच्या शेतामध्यें इनाम जमीन बिघे ४५ पांच स्वामींनीं कृपाळू होऊन, नूतन इनाम करून दिल्ही पाहिजे.

येणेंप्रमाणें आपणांस दिधलें पाहिजे. म्हणोन विनंति केली. त्याजवरून मनास आणितां, तुम्हीं देशीहून कर्नाटक प्रातास स्वामींच्या पायाशीं एकनिष्ठता धरून, स्वामीसन्निध आलेत. त्यावर आयेवारकुटीयाचे भाडणीं, आमृतराऊ निंबाळकर येहीं उडी टाकिली. त्याबरोबर तुम्हीं सेरीक होऊन, ते प्रसंगीं उडी टाकून, तुम्हीं शूरत्वाची सीमा केली. एकनिष्ठ सेवक, तुमचें चालवणें स्वामींस आगत्य, यास्तव स्वामी तुम्हावर कृपाळू होऊन, तुम्हास येणेंप्रमाणें करून दिधलें असे. सदरहूप्रमाणें किल्ले वंदन, कर्याती आंगापूर येथील देशमुखीचें वतन आदिलशहाचे फरमानाप्रमाणें व नूतन इनाम देहे २ दोनी कर्याती आंगापूर पैकीं व पाटिलकीचे गांवपैकीं इनाम भूमि, आदिलशहाचे कारकीर्दीस चालिल्याप्रमाणें १ एक चावर जिराईत व नूतन आबराई बिघे ४५ पांच रास दिल्ही असे. तरी किल्ले वंदनचे देशमुखीस हक्कलाजिमा व इनामाबद्दल फरमान आदिलशहा बाब देहे २ दोनी कुलबाब, कुलकानू देखील हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी, झाडझाडोरा पडले पानसहित सदरील हक्कदार व इनामदार करून व इनाम भूमि एक चावर, पांच बिघे कुलबाब, कुलकानू देखील हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी सदहू हक्कदार करून, आपले स्वाधीन करून घेऊन, तुम्हीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरपरा अनुभवून सुखरूप असणें. यास हिंदु कोणी कपला करील त्यांस, वाराणसीमध्यें गोहत्या

केल्याचें पातक लागेल अगर मुसलमान कोणी इस्कील करील त्यांस, मक्केमध्यें सुवर मारल्याचें पातक लागेल. असें जाणून तुम्हांसी चालवितील. जाणिजे. निर्देश समक्ष."

छ १२ रमजान, सबा तिसैन अलफ

---

२४ चिंतामणभट बिन नरसिंहभट चित्राव यांस दिलेलें वृत्तिपत्र.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २३ धातृ (धाता) नाम संवत्सरे, मार्गशीर्ष बहुल नवमी, भौमवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपति यांणीं, वेदमूर्ति चिंतामणभट बिन नरसिंहभट, गोत्र कौशिक, सूत्र आश्वलायन, उपनाम चित्राव, वास्तव्य स्थळ कसबे वाई, यांसी दिल्हें वृत्तिपत्र ऐसेजें:—तुम्हीं वैराट क्षेत्र कृष्णातीर येथील पुरातन स्थाईक. ऐसीयासी वैराट क्षेत्र पुराणप्रसिद्ध आहे. तें स्थळीं स्वामींकडील तीर्थ पुरोहित असिला पाहिजे म्हणोन, तुम्हीं भले, वैदिक, सत्पात्र, शिष्ट ऐसे जाणोन तुम्हांस स्वामींनीं तेथील आपले तीर्थ पुरोहितपणाची वृत्ति दिल्ही असे. तरी स्वामी व स्वामींचे वंशपरंपरेनें तुम्हीं तीर्थपुरोहितपण तुमचे वंशपरंपरेनें चालवीत जाऊन सुखरूप असणें. जाणिजे. निर्देश समक्ष."

---

२५ गोविंद गोसावी साबळे यांस दिलेलें इनामपत्र.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २४ ईश्वरनाम संवत्सरे, कार्तिक शुद्ध द्वादशी, भानुवासर क्षत्रिय कुलावतस श्री राजाराम छत्रपति यानीं, राजश्री देशाधिकारी व लेखक, वर्तमान भावी, प्रांत नेवासें यांसी आज्ञा केली ऐसीजे:—सोकरोबा गोसावी यांचे पुत्र गोविंद गोसावी व शामजी गोसावी व रामजी गोसावी गोत्र कात्यायन, सूत्र कात्यायन, माध्यंदिनी शाखा, उपनाम साबळे, वास्तव्य कसबे सोनई यांजपैकीं गोविंद गोसावी यांणीं चंदीच्या मुक्कामीं स्वामीसमीप विदित केलें कीं, आपण श्री स्थळ त्रिपती येथें यात्रेस पोवा यात्रेकरी घेऊन येत असतो. मार्गीं अतीत अभ्यागत, तडी तापडी यांस अन्न देऊन संभाळून आणावे लागताती. मार्गीं वेच (वाट) खर्च लागतो. त्यास कांहीं उत्पन्नता नाहीं. तरी स्वामी धर्मप्रभु आहेत. काहीं इनाम करून देविलीयानें तेथील अन्न उत्पन्न होईल तें या धर्मकार्थीं व्यय करून तें पुण्य स्वामींचें, तेणेंकरून स्वामींस व स्वामींच्या राज्यास कल्याण आहे म्हणोन विदित केलें. त्याजवरून मनास आणितां, ब्राह्मण बहुत सात्विक सत्पात्र ऐसें जाणोन, यांसी सद्व्यय करावयासी नूतन इनाम मौजे करंजगांव, परगणे नेवासें, प्रांत मजकूर देहे १ एक. रास कुलबाब, कूलकानू देखील हलीपट्टी व पेस्तरपट्टी, झाडझाडोरा पडिले पानसहित खेरीज हक्कदार व इनामदार करून ग्राम इनाम दिल्हा असे. तरी याचे स्वाधीन करून यांसी व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें सुरक्षित चालवणें. प्रतिवर्षी

नूतन पत्राची अपेक्षा न करणें. या पत्राची प्रती लिहून घेऊन, मुख्य पत्र यांसी परतोन देणें. निर्देश समक्ष. "

रवाना छ १९ रबिलाखर.

---

२६ नागोजीराव व चांदजीराव पाटणकर देसाई यांस इनाम देण्याविषयीं पत्र.

" राजश्री रामाजी अनंत हवालदार व कारकून, परगणे पाटण गोसावी यासी.:—

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक त्रिंबक कृष्ण सभासद, नामजाद, सुभा महालाहाय, प्रांत व्याघ्रगड, नमस्कार. सुरुसन इहिद्दे तिसैन अलफ. बेशमी पत्र रमजान छ १३ मोहरम दरवल सन तिसा तिसैन व हल्लीं ताकीद छ २९ रमजान सालमजकूर. पैवस्ती छ ११ मोहरम तेथें आज्ञा कीं, नागोजीराव व चादजीराव पाटणकर देसाई परगणे मजकूर हे वतनदार घराणेचे लोक, यावरी राजेश्री स्वामी कृपाळू होऊन सेवा, सेना पंच-सहश्री सांगितलें आहे. यानीं इमानें इतबारें एकनिष्ठा धरली. हें राज्य मराठे, देवांब्राह्मणांचे. राजे यांनीं मोगलांनीं जमाव केला आहे. याकरिता पाटणकरानीं गनिमाच्या फौजा मारून गर्देसी मिळविलें. दळ मेहनत खस्त जाहले. पाटणकरानीं जमाव केला. त्याहीं सैादागरांचें कर्ज घेतलें व आपला हिस्सा तमाम जमावाचे भरीस घालून मामला राखोन राज्य रक्षावयाची महती केली. यावरून मजकूर देसाई पाटणकर यासी बक्षीस द्यावें ऐसा तह केला होता. त्यासी देसाई मशारनिल्हे यांनी राजेश्री पंत राजाज्ञा यांसी विनंति केली कीं, आपण आजीवरी कष्ट मशागती केली कीं, आपलें उर्जित जाहलें पाहिजे. तवर आता आपले उर्जित कीं, आपण वतनदार, आपणांस इनाम इसाफतीबद्दल फर्मान हुमायून आदिलशहाचे कारकीर्दीसी अजराम-हामत इनाम देहाय १२ चालीले आहे. हल्ली कृपाळू होऊन सदरहू इनाम देहाय बारा दिल्हे पाहिजे, म्हणून पाटणकर यानीं राजेश्री पंत राजाज्ञा यांसी विनंति केली. त्यावरून कृपाळू होऊन इनाम सदरहू देहाय बारा दिल्हे * * * "

---

२७ चंदनीराऊ कादटकर वगैरे बंधु यांस दिलेलें इनामपत्र.

" राजश्री सुरो विठ्ठल हवालदार व कारकून, तर्फ बामणोली, गोसावी यासी.

६१ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक त्र्यंबक कृष्ण सभासद, नामजाद, सरसुभा, प्रांत व्याघ्रगड, नमस्कार. सुरुसन मया अलफ, मौजे कादट पेशजीं कैलासवासी स्वामींपासून कादटकरास इनाम आहे. हल्लीं दरम्यान चालिलें नाहीं. हल्लीं औरगजेब गनीम येऊन साताऱ्यास वेढा घालून बैसला आहे. यास मारून हाकून काढावा. कादटकर चंदनीराऊ व यमाजीराऊ व तान्हाजीराऊ गेले आहेत व सुभानजीराऊ जमावानसीं आबवला घाट राखावया ठेविले आहेत. त्यांणीं अर्ज केला जे, पुरातन आपलें इनामगाव कादट आहे,

तें आपले दुमाला केलें पाहिजे. आपण स्वामीकार्यावर एकनिष्ठ आहों. त्याजवरून मनास आणून मौजे कादट, पुरातन इनाम होतें, तें कादटकरास इनाम दिल्हें असे. दुमाला करणें. यांस व पुत्रपौत्री पेशजी चालत आलें आहे, तेणेंप्रमाणें हल्लीं चालवणें. पत्राची तालिक लेहून घेणें आणि अस्सल पत्र भोगवटीयास परतून देणें. जाणिजे. "

२८ श्रीदेव चिंचवडकर यांस पूर्ववत् माण हा गांव इनाम दिल्याबद्दल पत्र.

" स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २५ बहुधान्यनाम संवत्सरे, मार्गशीर्ष बहुल द्वितीया, भृगुवासर, क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपति याणीं, मशरुल अनाम गोविंद लिंगाजी पारपत्यागार व लेखक कर्यात मावळ यांसी आज्ञा केली ऐसीजे:—मौजे माण, कर्यात मजकूर हा गाव श्री देव चिचवड यास इनाम होता. सांप्रत भुजबळराव सेना सप्त-सहस्री यांकडे जमावाच्या बेगमीस दिल्हा होता. ऐसी-यास श्रीदेव यांचें चालवावें हें स्वामींस अगत्य आहे. याज-करिता भुजबळरावाकडील गांव दूर करून, श्रीकडे पूर्वी जसा इनाम चालत होता त्याचप्रमाणें करार केला आहे. तरी तुम्हीं श्रीकडे मौजे मजकूर दुमाले करून चालवीत जाणें. येथील उत्पन्न होईल ते श्रीकडे पावेल. तुम्हीं महालीहून एकजरा उपसर्ग न देणें. जाणिजे लेखनालंकार. "

श्री ॥ राजाराम
नरपति हर्षनिदान
मोरेश्वरसुत नीलकठ
मुख्य प्रधान

तारीख २९ जमादिलाखर, सुहूरसन तिसा तिसैन अलफ.

मर्यादेयं
विराजते.

२९ विठोजी बाबर यांस दिलेलें इनामावर दाहीजा व चौथाई न घेणेंबद्दल पत्र.

" स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २७ विक्रमनाम संवत्सर, पौष शुद्ध तृतीया, भौम-वासरे, क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति याणीं, राजश्री भानजी गोपाळ देशाधि-कारी प्रात कऱ्हाड यासी आज्ञा केली ऐसीजे:—विठोजी बाबर देशमुख, कसबे नाणेघोळ हा स्वामींचें पायाशीं एकनिष्ठेनें वर्ततो ऐसीयास साप्रत असीनखान, कऱ्हाडी व काळे व तारगाव येथें कोट बांधावयास येत आहे. ये प्रसंगीं देशमुख मजकुराचा दिलासा राखावा लागतो. त्यास तुम्हीं दाहीजा चौथाईचा अजार देता, म्हणून तो दिलगीर आहे. त्यावरून तुम्हांस हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी तुम्हीं नाणेघोळास दाहीजा चौथाईचा उपसर्ग न देणें व त्याचें इनामगांव असतील त्यासही तोशीस न देणें हरएकविशीं त्याचा दिलासा राखून तो निष्ठेनें वर्ते असें करणें. त्याचे इनामगाव आहेत तेथें दाहीजा, चौथाई न घेणें. वरकड दर वर्षाप्रमाणें घेणें. जाणिजे निर्देश समक्ष. "

३० शंकराजी पंडित सचीव यांस राजदेशमुखी वगैरे हक्क दिल्याबद्दल पत्र.

" स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २७ विक्रमनाम संवत्सरे, अधिक आश्विन बहुल चतुर्दशी, इंदुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शिव छत्रपति यांणीं, समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री नरहरी रुद्र, शनाकर्त (सेनाकर्ते) यांसी आज्ञा केली ऐसीजेः— राजेश्री शंकराजी पंडित सचीव यांणीं, या राज्यांत श्रमसाहस करून, राज्याभिवृद्धि केली. याकरितां कैलासवासी स्वामींनीं, त्यांस कृपाळू होऊन, राजदेशमुखी दरसदे चौहोत्रा व सरदेशकुळकर्ण दरसदे दोहोत्रा व राजपट्टी दरसदे चौहोत्रा, एकूण रयत निसबतीनें दिवाण दस्ताचे बेरीजेस दरसदे दाहोत्रा वेतन करून दिल्हें होतें. ऐसीयास हे स्वामींचें एकनिष्ठ सेवक, यांचें चालवणें स्वामींस आगत्य, यास्तव स्वामींनीं करार करून चालवावयाची आज्ञा केली असे. तरी तुम्हीं यांचें वेतन सदरहूप्रमाणें खंड गुन्हेगारी देखील कमावीस बाब दाहोत्रा चालवणें. पंडित मशारनिल्हेकडील कारकून वसुलास येतील. त्याकडे वसूल देववीत जाणें. खलेल होऊं न देणें. परमुलखांत खंडण्या घ्याल व खंड कुळें धरून आणाल त्यांसही यांचा दाहोत्रा चालवीत जाणें. जाणिजे. बहुत लिहिणें तरी तुम्हीं सूज्ञ असा."

---

३१ नावजी नाईक बलकवडे यांस इनाम दिल्याबद्दल पत्र.

" राजेश्री माहादाजी शामराज सुभेदार व कारकून, प्रात मावळ, तर्फ लोहगड गोसावी यांसी.

स्वस्ति अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक केसो त्रिमल नमस्कार. सुरुसन इहिदे मया व अलफ. राजश्री नावजी नाईक बलकवडे पदांत—सप्तसहस्त्री यांणीं हुजूर येऊन विनंति केली कीं, आपण या राज्यांत बहुत कष्ट मेहेनत केली. किल्ले कोरीगड व किल्ले सिंहगडचे थारे लागोन किल्ले फत्ते केले. राजश्री छत्रपति कैलासवासी याचे सेवेसीं, वर्तमान विदित करून, आपल्यावरी स्वामी कृपाळू होऊन, दोन्ही देहे आपणाम इनाम पौत्रपौत्री करून दिल्हे आहेत. देह बितपशीलः—

मौजे सांवरगाव, तर्फ पौनमावळ देह १. मौजे दारवली, तर्फ पौडखोरें देह १.

एकूण देह दोन्ही आपणांस इनाम चालत आहे. तरी स्वामींनीं कृपाळू होऊन इनाम चालविलें पाहिजे म्हणोन विदित केलें. त्यावरून मशारनिल्हेस सदरहू दोन्ही देहे इनाम खेरीज हक्कदार हुजूर करार केले असत मशारनिल्हेस वंशपरंपरेनें चालवणें. प्रांतमजकुरीं इनामतीचें नावें खर्च लिहिणें. जाणिजे. छ १६ रजब, आज्ञाप्रमाण."

---

३२ शंकराजी पंडित सचीव हे राज्याभिवृद्धीचे उपयोगी पडल्याबद्दल पत्र.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २७ विक्रमनाम संवत्सरे, अधिक आश्विन बहुल त्रयोदशी, रविवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति यांणीं. समस्त सेनाधुरंधर वि-

श्वासनिधि राजमान्य राजेश्री जयसिंग जाधवराव सेनापति जत्फतनमुलूक यांसी आज्ञा केली ऐसीजेः—राजेश्री शंकराजी पंडित सचीव यांणीं या राज्यांत श्रमसाहस करून राज्याभिवृद्धि केली * * * ."

३३ श्री तुकाई तुळजापूरचें देवीस इनाम दिल्याबद्दल सनद.

" स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २७ विक्रमनाम संवत्सरे, आश्विन शुद्ध सप्तमी, भोमवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति याणीं, राजश्री देशाधिकारी व कारकून, प्रांत परांडे यांस आज्ञा केली ऐसीजेः—श्री तुकाई तुळजापूर हें मूळपीठ बहुत जागृत, स्वामींचें कुलदैवत, येथील पुजा उत्साह ताम्राचे धामधुमीकरिता चालत नाहीं. म्हणोन श्रीचे पूजकांनीं येऊन विदित केलें. त्याजवरून मनास आणितां, हें राज्य श्रीच्या पदाचें, तेथील पुजा उत्साह (यथा) सांग चालिला पाहिजे. याकरितां स्वामींनीं श्रीच्या पूजा उत्साहानिमित्यें मौजे आलनापूर, मौजे रातांजन, प्रांत मजकूर हा गांव कुलबाब, कुलकानू देखील हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी झाडझाडोरा, जल, तरु, पाषाण पडिलें पानसहित चतुःसीमा—गांव पूर्व मयोदेप्रमाणें देह १ एक रास, खेरीज हक्कदार व इनामदार करून दिल्हा आहे. तर मौजे मजकूर श्रीचे स्वाधीन करून तेथील उत्पन्न श्रीस प्रविष्ट करून इनाम सुरक्षित चालवणें. साल दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें. या पत्राची तालिक लेहोन घेऊन, अस्सल पत्र श्रीचे पुजारी यांजवळ देणें. जाणिजे लेखनालंकार. "

तारीख ६ जमादिलावल, सुरुसन इहिदे मयातैन.

३४ शेटी बिन नागनाक महार यांस पाटिलकीबद्दल दिलेला महजर.

" महजरनामा तेरीख ९ माहे जिल्हेज, बिलापूर, हजीर मजालस, गोत परगणे वाई, सरकार नबिशादुर्ग उर्फ परनाळा, सुभे दारुल विजापूर, सुरुसन हजार १११९ सन इसने मया अलफ.

देशमुख व देशपांडे, प्रांत मजकूर.

राजश्री दत्ताजी केशव व सूर्याजी नाईक पिसाळ देशमुख, परगणे मजकूर. किता वाईकर.	रामाजी शंकर व गिरमाजी लिंगो देशपांडे, परगणे मजकूर. बावधनकर.

जमाल पाटील मोकदम, कसबे मजकूर. (नि० नांगर).	तुकोजी पाटील पिसाळ मोकदम, कसबे मजकूर. (नि० नांगर).	अंबाजी पाटील भिताडे, कसबे मजकूर. (नि० नांगर).
गोपाळ शेट्या व मल्हारजी चौधरी व भान शेट्या, कसबे मजकूर.		

(नि० तांगडी).	बहिरजी शेट्या,	शिवाजी चौगुला,
गोपाळशेट शेट्या	कसबे मजकूर.	कसबे मजकूर.
(मो) कदम, कसबे वाई.	पसरणी मोकदम.	
(निशाणी तागडी).	(निशाणी नागर)	

या हुजूर शेटी बिन नागनाक महार, मौजे नागेवाडी, संमत मुऱ्हे परगणे मजकूर यासी लेहून दिल्हा महजर ऐसाजे:—तुवां हुजूर येऊन जाहीर केलें कीं, मौजे नागेवाडीं येथील कदीम पाटिलकी आपली मिरासी आपले वाडवडील चालवीत आले. देवाचे पुजेस गुरव धांडेघरकर एक व गुरव गोडोलीकर एक गावात आणून ठेविले. त्याणीं रहिवास होतांच आपल्या वडिलाचे मोरचुरे करून मिरासी घेतली. आपण महार दूर उभा राहून असों. गुरव जवळी सुस पत्र देऊन मिरासीस जडला. आपण कदीम बुनादी आहे. साहेबीं आपणास हातीं धरून, पांढरीवरी बैसऊन आपल्या हातें नफरी घेतली पाहिजे. ह्मणवून विदित केलें. त्यावरून मनास आणिता, गुरवास एकदोन वेळा बोलाविलें, परतु ते येऊन उभे राहिनात, अगर पदर झाडीनात. तेव्हा दिसोन आलें कीं, गुरव गैरमिरासी. शेटी मजकूर यानें दरीवरुत जडला ह्मणऊन सागितलें तें खरें, व सिवजडे मोकदम यासही विचारिलें कीं, कदीम मिरासी कोणाची हें सत्य स्मरोन सागणें. त्यास त्याणीं सागितलें कीं, मौजे मजकूरची पाटिलकी कदीम महाराची मिरास ऐसें आह्मांस दखल आहे आमचे वाडवडील सांगत आले आहेत. ऐसी साक्ष दिल्ही. मग मौजे मजकूरची पाटिलकी मिरास तुज दिली असे. तुवां लेंकराचे लेंकरी पाटिल (की) खाऊन गांव लावणी संचणी करणें. पाटिलकीचे हक्क लाजिमा, पट्टीपासोडी, गाउड मोट, इनाम मानमानुक खाऊन सुखें असणें. गुरवानें गांवचे देव श्री नागवडसिद्ध पुजून असावें. पाटिलकीस अर्थाअर्थी सबंध नाहीं. आतां महारानें पाटिलकी खाऊन असावें. यासी पेस्तर हिल्ला हरकत करील तो गोताचा अन्याई, दिवाणाचा गुन्हेगार. हा महजर सही. ”

---

३५ राघोजी राउतराव ढमाले देशमुख यांस इनाम जमीन दिल्याबद्दल पत्र.

“ राजश्री माहादाजी शामराज, नामजाद व कारकून वर्तमानभावी, प्रात मावळ, तर्फ लोहगड गोसावी यांसी.

६७ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक बहिरो मोरेश्वर प्रधान, नमस्कार. सुरुसन इसने मया अलफ. मशारनिल्हे राघोजी राउतराव ढमाले देशमुख तर्फ पौडखोरें येहीं हुजूर येऊन विनंति केली कीं:—आपण स्वामींच्या राज्यात बहुतच कष्ट मेहनत केली. सालगुदस्ता नावजी बलकवडा यानें हरामखोरीचे ढंग करून, किल्ले सुधागडचा आसरा करून, तोतयाचा बहाणा केला; आणि लोक जमाव करून, मुलखांत स्वारी घालून गांव मारून

नेऊं लागला. त्यास नतीजा त्याचे कर्तव्यानुरूप जाला. पुढेंही स्वामींचे सेवेसी एकनिष्ठपणें सेवा करून आहों. ऐसीयास स्वामींनीं कृपाळू होऊन, नूतन इनाम देविलीया वतनावरी राहून सेवा करूं. म्हणून विनंति. ऐसीयास देशमुख मजकूरही पूर्वीपासून राजश्री छत्रपति स्वामीच्या पायाशीं निष्ठेनें वर्तताती. गतवर्षी जावजी बलकवडा यास लोकांचा जमाव करून सजा दिल्ही. पुढेंही स्वामींच्या पायाशीं एकचित्तें वर्तावे. यानिमित्य त्यास नूतन इनाम मौजे वडवथर पैकीं थलमलई खालीसा जमीन रक्कम ढेप कैली ८०॥ आडीच मण हे भूमि दिधली असे. सदरहू इनाम खेरीज इनामदार व हक्कदार, वतनदार खेरीज करून दिल्हे असे. यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवीत जाणें. या पत्राची तालिक लिहून घेऊन, मुख्य पत्र देशमुखास भोगवटीयास देणें. हरदरसाल नूतन पत्राची आपेक्षा न करणें. जाणिजे. छ २४ रविलोवल. आज्ञाप्रमाण. मोर्तब असे."

---

३६ श्रीचें चिंचवड गांवास काडीइतका उपद्रव होऊं न देणेंबद्दल आज्ञापत्र.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २९ चित्रभानुनाम संवत्सरे, कार्तिक शुद्ध दशमी, इंदुवासर, क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति यांणीं राजश्री समस्त सरदारांनीं पा * * * व



शिलेदार यांस आज्ञा केली ऐसीजेः—श्री चिंचवडीं राहतात, त्यांस कोण्हाचा उपसर्ग न लागतां निरूपद्रव राहिले पाहिजेत. याकरितां तुह्मांस हें आज्ञापत्र सादर केलें असे. तरी तुह्मीं स्वारी शिकारीस जाल, तेव्हां चिंचवडास काडीइतकी तोशीस न देणें. मुक्काम करणें जालें तरी चिंचवड डावे उजवे टाकून पिछाडी गांवावरी राहत जाणें. कदाचित चिंचवडानजीक राहाल म्हणिजे तुमचा उपद्रव गांवास लागेल. एखादे प्रसंगीं गनीम तुह्मांवरी धाविला तरी त्यामुळेंही गांवास व श्रीचे स्थळास उपद्रव होईल. याबद्दल स्वामींचे आज्ञेप्रमाणें वर्तोन चिंचवडास उपसर्ग न लागे, श्रीसंतोषरूप राहात, ऐसें करणें. जाणिजे निर्देश समक्ष."

मर्यादेयं विराजते.

---

३७ रामचंद्र नीळकंठ यांस जुन्या इनाम व वृत्तिबद्दल दिलेलीं नवीन पत्रें.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३० तारणनाम संवत्सरे, चैत्र शुद्ध प्रतिपदा, मंदवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति यांणीं राजश्री रामचंद्र नीलकंठ, उपनाम भादाणेकर, गोत्र भारद्वाज, सूत्र आश्वलायन, यांसी दिल्हें इनामपत्र व वृत्तिपत्र ऐसेजें:— तुम्हीं स्वामींसंन्निध विनंति केली कीं, आपण स्वामींचें पुरातन सेवक, वाडवडिलापासून सेवा निष्ठेनें करीत आलों. याकरितां कैलासवासी राजश्री ——— स्वामींनीं आपणांवरी कृपाळू होऊन पुरातन आपलें इनाम व वतनें आहेत. त्यांचा बहुत दिवस भोगवटा तुटला होता तीं इनामें व वतनें आपलें स्वाधीन करून पत्रें दिल्हीं व आपली निष्ठा श्रमसाहस जाणून नूतन इनामें व वतनें दिल्हीं आहेत. तेणेंप्रमाणें उत्तरोत्तर सुरक्षित चालवावयाविषयीं स्वामींनींही पत्रें द्यावयाविषयीं आज्ञा केली पाहिजे म्हणून विनंति केली. त्यावरून मनास आणिता, तुम्हीं स्वामींचे पुरातन सेवक, तुमचे बाप राजश्री निळो सोनदेव यानीं, थोरले कैलासवासी राजश्री स्वामींचे वेळेस या राज्यानिमित्य निःसीम श्रमसाहस करून, नूतन देशदुर्गादि संपादून, राज्याभिवृद्धि केली. याकरितां थोरले कैलासवासी स्वामी त्यावरी कृपाळू होऊन, मजमूचा हुद्दा सागोन बहुत प्रकारें चालविलें. त्याउपरी ते राज्यभार चालवीत असता कालवशास्तव निधन पावले. त्यानंतर त्यामागें थोरले कैलासवासी स्वामींनीं तुमचे बहुता प्रकारें चालविलें. थोरले कैलासवासी स्वामींस कैलासवास जाहलीयाउपरी राजश्री संभाजी राजे काका याणीं तुह्मांस सुरनिशीचा हुद्दा सागोन, कुडाळापासून नरगुंद तुंगभद्रापर्यंत देश तुमचे स्वाधीन करून रवाना केलें. ते समयीं तुम्हीं श्रमसाहस करून कित्येक देशदुर्गादि संपादन केले. तदनंतर अवरंगजेब दक्षणेवरी चालोन आला. विजापूर, भागानगर या पादशाही हस्तगत करून राजश्री संभाजी राजे काका यांवरी सेना पाठविली. ते समयीं ते ताब्रास हस्तगत जाले. त्याउपरी तीर्थरूप राजश्री कैलासवासी स्वामी सिंहासनारूढ जालें असता, अवरंगजेब पादशहा यानें सक्ती करून संपूर्ण राज्य आक्रमावयाचा उद्योग केला, आणि आक्रमीत चालिला. ते समयीं इकडील राज्यभार तुह्मावरी टाकून, कैलासवासी स्वामी स्वार होऊन कर्नाटक प्रातें चंजीस गेले. मागें तुह्मीं सेनासंभार मेळऊन तांब्राच्या फौजा मारून चालविल्या. कित्येक देशदुर्ग ताब्राक्रात जाली होती ती पुन्हा हस्तगत करून, गेले राज्य संपादून, वरचेवरी संतोषवार्ता चंजीस पाठवीत गेले. त्यावरून कैलासवासी राजश्री स्वामी तुह्मावरी संतोषी होऊन मजमूचा हुद्दा पहिले तुमचे बाप निळो सोनदेउ यास होता, तो तुह्मास सागोन तुह्मावरी कृपा दिवसेंदिवस विशेष केली. तुम्हींही निष्ठापूर्वक वर्तोन स्वामींचें राज्य ताब्राक्रात जालें होतें, तें संपूर्ण यथापूर्व हस्तगत केलें. चंजीस कैलासवासी स्वामी असता, तिकडे तांब्राची रजबेहून चंजीस परिघ

पडिला. ते समयीं तुह्मीं या प्रांतींहून कर्नाटकात सेनासंभार पाठवून, कैलासवासीं स्वामींचें संकट निरसन केलें. त्याउपरी चर्जाचे मुक्कामीं कैलासवासी स्वामींस तुह्मीं विनंति सांगोन पाठविली कीं, आपण स्वामींच्या राज्यानिमित्य श्रमसाहस करून राज्याभिवृद्धि केली. याकरितां स्वामींनीं आपला मजमूचा हुद्दा जीर्णोद्धार करून आपणांस सांगितला परंतु हुद्दा ह्मणजे भारगीर वस्तु आहे. याकरिता स्वामींनीं आपलीं पाहिलीं वतनें व इनामती आहेत, त्यांचा भोगवटा बहुत दिवस तुटला आहे. तीं वतनें व इनामती आपण वंशपरंपरेनें चाले ऐसें करावें. व नूतनही इनामती व वतनें अजरामऱ्हामत करून वंशपरंपरेनें चालेत ऐसी आज्ञा केली पाहिजे. ह्मणून त्यावरून कैलासवासी स्वामी तुह्मावरी मेहेरबान होऊन तुमचीं कदीम वतनें व इनामती भोगवटा तुटला होता, तीं व नूतन इनामती वतनें देऊन पत्रें करून दिल्हीं. बितपशीलः—

पुरातन वतनें व इनामती तुमचे वडील अनुभवीत होते, त्याचा भोगवटा बहुत दिवस तुटला, त्याचें वर्तमान पूर्वातर धर्मनीतीनें मनास आणून, तुमचीं वतनें व इनामें खरीं जालीं, तीं तुह्मांस अजरामऱ्हामत करून देऊन पत्रें दिल्हीं आहेतः—

(१) तर्फ सोनवळें, प्रांत भिवंडी येथील देशमुखीचें वतन पूर्वी तुमचे वडील निळोपंत होते, त्याणीं द्रव्य देऊन घेतलें. आणि भानजी मुरार याचे वडील काळोपंत यास मुतालिकीस ठेऊन, आपण चाकरीनिमित्य बेदरास गेले. मागें काळोपंतानें बळास येऊन वतन आटोपिलें. हें वर्तमान निळोपंतास कळतांच तिहीं वतनावरी येऊन काळोपंतास धुडकाऊन बेदरच्या पादशाहाचें फरमान करून घेऊन, वतन कितेक दिवस आनुभविलें. त्याउपरीं काळोपंत, जव्हारकर कोळी यांकडे जाऊन, त्यांचा आश्रा करून, निळोपंताकडील १४ चवदा खून केले त्यामध्यें नारोपंत, निळोपंताचे नातू, कृष्णाजीपंताचे पुत्र यास त्याचे मातेनें जिन्यांत लपऊन वाचविलें. आणि वतन सोडून, बायको आपल्या माहेरास घाटावरी येऊन, मुलाचें प्रतिपालन केलें. त्याचे वंशीचे सोनाजीपंत. सोनाजीपंताचे पुत्र निळो सो-

(२) मौजे तांदळी जवकांची, तर्फ रांजणगाव येथील कुळकर्ण व ज्योतिषपण पुरातन तुमचें, तुह्मी वडील वडिलापासून अनुभवीत आहा. त्याप्रमाणें राजश्री कैलासवासी स्वामी तुह्मावरी व आबाजी सोनदेऊ तुमचे चुलते यावरी कृपाळू होऊन कुळकर्ण व ज्योतिषपण अजरामऱ्हामत करून देऊन या वतनास हक्क लाजीमा, इनामत, इसाफत व बाजेबाब पूर्वीपासून चालत आहे. त्याप्रमाणें चालवावयाची आज्ञा करून पत्र दिल्हें आहे. तरी तुह्मीं मौजे मजकूरचें कुळकर्ण व ज्योतिषपण अनुभवीत आहां. त्याप्रमाणें उत्तरोत्तर उपभोग करणें.

मौजे केळवडें, तर्फ खेडेबारें या गांवीं शेतस्थळ नायगांवीं शिवेचा पाणलोट नजीक पिंपरी बाबत हरी गोविंद लंबे शेत चावर १ एक पहिलेपासून इनाम चालत आलें आहे. त्याप्रमाणें तुह्मांस व राजश्री आ-

नदेऊ. तुमचे बाप व आबाजी सोनदेऊ तुमचे चुलते. काळोपंताचा वंश भानजी मुरार हल्लीं वतनावरी आहे. तुमचें वतन खरें पूर्वोत्तर मनास आणितां भोगवटा बहुत दिवस तुटला आहे. तें वतन कैलासवासी स्वामींनीं मेहेरबान होऊन, भानजी मुरार मधेंच जडला होता त्यास दूर करून, तर्फ मजकूरचीं देशमुखी तुह्मांस अजरामऱ्हामत करून दिली आहे. या वतनास हक्क लाजीमा, इनामत, इसाफत, मान, पान, तश्रीफ, शिक्का, नांगर व बाजेबाब सालाबाद चालिल्याप्रमाणें चालवावें म्हणून पत्र दिल्हें आहे.

बाजी सोनदेऊ यास सदरहू शेत इनाम चालवावयाची आज्ञा करून कैलासवासी स्वामींनीं पत्र दिल्हें आहे. त्याप्रमाणें हें शेत तुह्मीं पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम अनुभवणें.

लंग ०

(ब) नूतन वतनें तीर्थस्वरूप राजश्री कैलासवासी स्वामी रायगडीं असतां, तांब्रांनीं संकट केलें म्हणून स्वार होऊन पन्हाळीयास आले. ते प्रसंगीं तांब्राचे उठाण विशेष देखोन तुह्मास या प्रांतीच्या राज्य संरक्षणास ठेऊन आपण स्वार होऊन कर्नाटकप्रांतीं गेले. तुह्मीं या प्रांतें राहून सेनासंभार मेळवून, तांब्राचा पराजय करून, देशदुर्गे तांब्रांनीं घेतलीं होतीं तीं पुन्हां हस्तगत करून, संतोषवार्ता वरचेवरीं पाठवीत गेलांत व या प्रांतीहून चंदीचे मदतीस सेना पाठवीत गेलांत. याकरितां कैलासवासी राजश्री स्वामींनीं कृपाळू होऊन तुह्मांस नूतन वतनें दिल्हीं आहेत.

(१) तर्फ आजिरें या महालाचे देशकुळकर्ण पूर्वी विठ्ठल पुंडलिक शेणवाई यास चालत होतें. तो मृत्यु पावला. त्यास पुत्रसंतान नाहीं. याकरितां हें वतन अमानत होऊन दिवाणचें जालें. म्हणून कैलासवासी स्वामींनीं कृपाळू होऊन तुह्मांपासून दिवाणांत शेरणी होन पादशाही १००० एक हजार घेऊन तर्फ मजकूरचे देशकुळकर्ण दिवाणचे होतें तें तुह्मांस वतन अजरामऱ्हामत करून दिल्हें आहे. या वत-

(४) तपें साळसी येथील सरदेशमुखी पूर्वी आदिलशहानें दयानतरायास वतन करून दिल्ही होती. त्याचा भोगवटा चालिला नाहीं. वतन दिवाणांत आमानत होतें. तें कैलासवासी स्वामींनीं कृपाळू होऊन, तुह्मांस वतन अजरामऱ्हामत करून दिल्हें. या वतनास हक्क लाजीमा व इनामगांव मौजे चिंदर व मौजे त्रिंबककुलबाब, कुलकानू दिल्हे आहेत. त्याप्रमाणें तपें साळसी येथील सरदेशमुखी व

नास हक्क लाजीमा, इनामत, इसाफत पूर्वापार चालिल्याप्रमाणें तुह्मांस चालवावें ऐसी आज्ञा करून पत्रें दिल्हीं. तेणेंप्रमाणें स्वामींनीं करार करून दिल्हें आहे.

(२) तपें खारापट्टण येथील सरदेशमुखी पहिलेपासून कोण्हास वतनी नव्हती. हें वतन दिवाणचें याकरिता कैलासवासी स्वामी तुह्मावरी कृपाळू होऊन, हें वतन तुह्मांस आजरामऱ्हामत करून दिल्हें आहे. या वतनास हक्क लाजीमा, इनामत, मोईन करून दिल्ही आहे.

हक्क दिवाणदस्ताचे बेरिजेस दरसदे दाहोत्राप्रमाणें मोईन करून दिल्ही आहे.

इनामगांव कुलबाब, कुलकानू.
१ मौजे पोंबुर्ले,
१ मौजे कोकिसरें.
—
२

येणेंप्रमाणें मोईन करून दिल्ही आहे. तेणेंप्रमाणें स्वामींनीं करार केलें असे. तरी तुह्मीं तपें खारापट्टण, प्रांत राजापूर येथील सरदेशमुखीचें वतन वंशपरंपरेनें अनुभवीत जाणें.

(३) तुमची जेष्ठ स्त्री सौभाग्यवती जानकीबाई ही राजश्री मोरोपंत प्रधान यांची कन्या (तिचें) चालवणें अवश्यक, याजकरितां तीर्थस्वरूप कैलासवासी राजश्री स्वामींनीं तीस साडीचोळीनिमित्य कृपाळू होऊन मौजे राशिवडें, तर्फ आडलें, परगणे तारळें हा गांव कुलबाब, कुलकानू इनाम दिल्हा आहे. तेणेंप्रमाणें स्वामींनीं करार केला असे. तरी तुह्मीं मौजे मजकूर वंशपरंपरेनें इनाम अनुभवीत जाणें.

या वतनास सदरहू दोन्ही गांव इनाम तुम्हांस वंशपरंपरेनें चालवावयाची आज्ञा केली आहे.

(५) मौजें मुरादपूर, तपें देवरुख, प्रांत राजापूर या गांवीं तुमचे मातेचें वृंदावन आहे. तेथें धर्मकृत्य चालिलें पाहिजे. याकरितां मौजे मजकूर कैलासवासी स्वामींनीं धर्मकृत्यानिमित्य इनाम दिल्हा आहे. तेणेंप्रमाणें स्वामींनीं इनाम करार करून दिल्हे असे.

(६) तुह्मांस पुत्रसंतान नव्हतें. राजश्री भगवंतराव हे तुह्मांस पुत्र जाले. हे संतोषवार्ता कैलासवासी राजश्री स्वामीस श्रुत जालीयावरून कैलासवासी—स्वामी कृपाळू होऊन राजश्री भगवंतराव रामचंद्र यांस दुधभातानिमित्य मौजे सेळाली, तर्फ खानापूर, परगणे तारळें हा गांव इनाम दिल्हा आहे. तेणेंप्रमाणें स्वामींनीं करार केलें असे. तरी तुह्मीं मौजे मजकूर वंशपरंपरेनें इनाम अनुभवीत जाणें.

(७) मौजे तांदळी जवकाची, तर्फ रांजणगांव येथील कुळकर्ण व ज्योतिष पुरातन वतन तुमचें आहे. वतनाचा गांव ह्मणून कैलासवासी स्वामींनीं मौजे मजकूर तुह्मांस इनाम दिल्हा आहे. तेणेंप्रमाणें स्वामींनींही करार केला असे. तरी तुह्मीं मौजे मजकूर पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम अनुभवीत जाणें.

येणेप्रमाणें वतनें तुमचीं पुरातन दोन देशमुखी व कुळकर्ण व नूतन वतनें, कलमें ६ तीन व इनामती तुमच्या पुरातन शेत चावर १ एक व नूतन इनामती गांव ४ चार एकूण वतनें ९ पांच व इनामती गांव ४ चार व चावर एक, कैलासवासी राजश्री स्वामींनीं तुह्मास अजरामरहामत करून दिल्हें आहे. त्याप्रमाणें तुह्मांस व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें सदरहू वतनें व इनामती चालवावयाचा निर्वाह करून निराळीं आज्ञापत्रें सादर केलीं आहेत. त्याप्रमाणें तुम्हीं वंशपरंपरेनें सदरहू वतनाचा व इनामतीचा उपभोग करीत जाणें. हीं वतनें व इनामती स्वामी तुह्मास पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें कैलासवासी स्वामींच्या पत्राप्रमाणें चालवितील. तुम्हीं सदरहू वतनाचा व इनामतीचा वंशपरंपरेनें उपभोग करीत जाणें. याप्रमाणें चालवावयास कांहीं अंतर होणार नाहीं. येविषयीं तुम्हीं आपलें समाधान असो देऊन, कैलासवासी स्वामींच्या पत्राप्रमाणें सदरहूचा उपभोग करीत जाणें. हें वतनपत्र दिल्हें असें. जाणिजे लेखनालंकार.

तारीख २९ जिल्काद, सन आर्बा मया अलफ. "

---

३८ खंडोजी व सितोजी थोपटे यांस इनाम जमिनीबद्दल सनद.

" राजश्री देशाधिकारी व देशलेखक, प्रांत मावळे गोसावी यांसीः—

छ अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक शंकरजी नारायण सचीव, नमस्कार. सुहूरसन आर्बा मया अलफ. खंडोजी थोपटे व सितोजी थोपटे सरनाईक, किल्ले सिंहगड, यांणीं विनंति केली कीं, किल्ले मजकूरची सरनाईकी आपली वतनी आहे. ऐशास आपण या राज्यात पूर्वीपासून कष्टमेहनत केली आहे. सिंहगड व राजगड या किल्ल्यास औरंगशहा पादशहा वेढा घालून बैसला होता, ते समयीं दोही किल्ल्यावरी वेढीयात राहोन कष्टमेहनती केली; आणि आपल्यास इनाम जमीन नाहीं. तरी स्वामींनीं नूतन इनाम करून दिल्हें पाहिजे, म्हणून विनति केली. त्यावरून मनास आणिता यांणीं सिंहगडीं व राजगडीं वेढीयांत किल्ल्यावरी राहोन कष्टमेहनत केली. स्वामीकार्याचे एकनिष्ठ. याचें चालवणें अगत्य. यानिमित्य याजवरी मेहरबान होऊन, मौजे खामगाव, तर्फ कर्याती मावळ पैकीं नूतन इनाम जमीन पडीपैकीं अव्वल, दुम, सीम, च्यारुम, ती प्रतीची जमीन खेरीज हक्कदार, कुलबाब, कुलकानू दिल्ही बिघे -।- तीस बिघे जमीन विसा पांडाच्या बिघीयानें दिल्ही असे. तरी सदरहू जमीन यांस नेमून देऊन, सदरहू इनाम यांस व यांच्या पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालवणें. साल दरसाल ताजे सनदेचा ऊजूर न करणें. तालेक लेहून घेऊन अस्सल सनद भोगवटीयास परतोन देणें. छ २ जिल्काद परगणे हुजूर. "

सुरुसुद्र बार

पैवस्ती छ २ जिल्हेज.

---

३९ श्रीराजा शिव छत्रपति यांणीं जयसिंग जाधवराव सेनापति यांस केलेला हुकूम.

"स्वस्तिश्रीं राज्याभिषेक शके ३० तारणनाम संवत्सरे, वैशाख शुद्ध चतुर्थी, सौम्यवासर, क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शिव छत्रपति याणीं, समस्त सेनाधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री जयसिंग जाधवराऊ सेनापति जत्फत्न मुलुक यांसी आज्ञा केली ऐसीजे * *

---

४० बेरड लोकांस गैर वर्तणूक न करणेंबद्दल सक्तीची ताकीद.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३१ तारणनाम संवत्सरे, पौष बहुल अष्टमी, रविवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति यांणीं, माजई व बडलई बेरड यांसी आज्ञा केली ऐसीजेः—मौजे चिंचवड व माण व बाणेरें व रावतें व चिखली, प्रांत पुणें, हे गांव श्री-

श्रीशिव
नरपति हर्षनिदान
मोरेश्वरसुत नील-
कठ प्रधान.

श्रीआई
आदिपुरुष श्रीराजा
शिव स्वामी कृपानिधि
तस्य परशुराम त्र्यबक
प्रतिनिधि.

वास्तव्य चिंचवड यांकडे आहेत. तेथें तुम्हीं धामधूम करून उपसर्ग देतां व चिंचवडामध्यें व वरकड गांवीं बेरड पाठवून देऊन चोरी छपी करितां, म्हणून हुजूर विदित जालें. तरी श्रीच्या स्थळीं व गांवीं ऐसी बदराहा वर्तणूक करितां येथेंकडून तुमचा मुलाहिजा होणार नाहीं. एक वेळ क्षमा करून, हें आज्ञापत्र सादर केलें आहे. तरी याउपरी हुशार होणें आणि चिंचवड इत्यादिक सदरहू गांवीं चोरी छपी एकंदर न करणें व कांहीं उपसर्ग न देणें. फिरोन हुजूर बोभाट आलीया तुमचा मुलाहिजा होणार नाहीं. हें बरें समजोन लिहिलेप्रमाणें वर्तणूक करणें. ताकीद असे. जाणिजे. लेखनालंकार."

मर्यादेयं
विराजते.

---

४१ श्रीक्षेत्र तुळजापूर येथील देवतांस गांव इनाम दिल्याबद्दल सनद.

स्वस्तिश्री राज्याभिषेक ३२ पार्थिवनाम संवत्सरे, कार्तिक बहुल पंचमी, गुरुवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति यांणीं, राजश्री देशाधिकारी व कारकून, वर्तमान व भावी, प्रांत परांडे यांसी आज्ञा केली ऐसीजेः—श्रीक्षेत्र तुळजापूर हे स्वामींचें आराध्य दैवत,

शिक्का १. शिक्का १.

बहुत थोर, जागृत स्थळ अनादि, येथील पूजा उत्साह सांग चालावयाकरितां स्वामीनीं मौजे ब्राह्मणी, तर्फ औवशे परगणे बालेघाट इनाम करून दिल्हा होता. ऐसीयासी सांप्रत मौजे मजकूर लष्करांत मोकासा आहे, याकरितां सुरळीत चालत नाहीं म्हणून

विदित केलें. तरी श्रीचा उत्साह सांग चालवावा हें स्वामींस अगत्य आहे. याकरितां स्वामींनीं हल्लीं, मौजे ब्राह्मणी मोकासा इनाम दिल्हा होता तो दूर करून, नवीन इनाम, कुलबाब, कुल देखील हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी झाडझाडोरासहवर्तमान खेरीज इनामदार व हक्कदार करून, मौजे शेलगांव, तर्फ रातंजन देह १ एक रास इनाम श्रीस दिल्हा आहे. तरी तुम्हीं पूर्व मर्यादेप्रमाणें चतुःसीमा गांव श्रीचे स्वाधीन करून, इनाम श्रीस उत्तरोत्तर चालवणें. साल दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणें. या सनदेची तालिक लेहून घेऊन, अस्सल सनद श्रीच्या पुजारीयाजवळ परतोन देणें आणि इनाम सुरक्षित चालवीत जाणें. जाणिजे. लेखनालंकार. "

तेरीख १८ रजब, सुरुसन सीत मया.

---

४२ नागोजी कनोजा यांस जमीन इनाम दिल्याबद्दल आज्ञापत्र.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३२ पार्थिवनाम संवत्सरे, मार्गशीर्ष बहुल सप्तमी, इंदुवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति यांणी, राजश्री देशाधिकारी व लेखक, वर्तमान व भावी, प्रांत सातारा यांसी आज्ञा केली ऐसीजे.—नागोजी कनोजा यांस कैलासवासी राजश्री स्वामींनीं मौजे जिहे, तर्फ सातारा, प्रांत मजकूर या गांवीं जमीन १। एक चावर, तीस बिघे इनाम दिल्ही आहे. ती जमीन याचे दुमाला जाली नाहीं. म्हणून हुजूर विदित जालें. ऐशास सदरहू जमीन यास इनाम चालवणें स्वामींस अगत्य, याकरितां हें आज्ञापत्र सादर केलें आहे. तरी तुम्हीं हें जाणून कैलासवासी स्वामींचे सनदेप्रमाणें मौजे मजकुरीं पैकीं सदरहू जमीन याचे दुमाला इनाम बिलाकुसूर चाले ऐशी गोष्ट करणें. आणिजे. "

---

४३ गुणाजी सांवत यांस नेहमी एकनिष्ठेनें राहून उर्जितावस्थेस येणेंबद्दल पत्र.

"स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३२ पार्थिवनाम संवत्सरे, आषाढ शुद्ध तृतीया, सौम्यवासर, क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शिव छत्रपति यांणीं, गुणाजी सांवत यांसी आज्ञा केली ऐसाजेः—तुम्हीं राजश्री बहिरो पंडित प्रधान यांचे आज्ञेवरून जाऊन कस्त करून, किल्ले राजमाची हस्तगत केली. हे वर्तमान पंडित मशारनिल्हेनीं हुजूर लिहिलें. त्याजवरून तुमचे सेवेचा मजरा जाला. तरी तुम्हीं एकनिष्ठ स्वामीकार्याचे तैसेच आहां. पुढेंही येच रीतीनें पंडित मशारनिल्हेचे आज्ञेप्रमाणें स्वामीकार्य करून, आपला विशेष मजरा करून घेणें. म्हणजे तुमजी सर्फराजी होईल. जाणिजे. लेखनालंकार. "

---

४४ गुणाजी सांवत यांस कल्याण करूं म्हणून अभयपत्र.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३३ सर्वजित [नाम] संवत्सरे, जेष्ठ शुद्ध दशमी, गुरुवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति यांणीं. गुणाजी सांवत यांसी आज्ञा केली ऐसीजेः—तुम्हीं जमावानिशीं पंताजी शिवदेव यांसमागमें जाऊन, राजश्री शंकराजी पंडित सचीव यांचे आज्ञेप्रमाणें कस्त करून, किल्ले राजगड हस्तगत केला. हें वर्तमान पंडित मशारनिल्हेनीं हुजूर लिहिलें. त्यावरून तुमचे सेवेचा मजरा जाला. तरी तुम्हीं कार्यकर्ते, मर्दानें, एकनिष्ठ असेंच आहां. तुम्हांपासून स्वामीकार्यास अंतर होणार नाहीं. पुढेंही येच रीतीनें स्वामीकार्य, पंडित मशारनिल्हेचे आज्ञेप्रमाणें करून, आपला विशेष मजरा करून घेणें. स्वामी तुमची सर्फराजी करितील. जाणिजे. लेखनालंकार.

४५ शितोळे देशमुख यांचे इनाम गांव व शेतीची तिजाई माफ केलेबद्दल पत्र.

७ मशरुल अनाम मालोजी नरसिंगराऊ व गोविंदराऊ शितोळे देशमुख, परगणे पुणें यांस.

शंकराजी नारायण सचीव, सुरसन समान मया अलफ. किल्ले पुरंदर हस्तगत केला, ते समयीं तुम्हीं कष्टमेहेनत बहुतच केली. निष्ठेस अंतर केलें नाहीं. याकरितां तुम्हांस इनाम गावची व इनाम शेताची तिजाई माफ केली असे. बितपशीलः—

इनाम गाव तर्फ कर्यातमावळपैकी देहे.	इनाम शेतें गांवगन्ना व
१ मौजे लवळें.	कसबें पुणें येथें पुरातन
१ मौजे पासीणें देखील वाडी करंदी.	आहेत.
—	
२	

एकूण दोन्ही देहे व इनाम शेतें आहेत. त्याची तिजाई माफ केली असे. तुम्हांस साल दरसाल तिजाईचा उपसर्ग करणार नाहीं. सुखरूप आपल्या इनामगांवाचा व इनाम-शेताचा भोगवटा वंशपरंपरेनें अनुभऊन वतनाचा मामला चालवून राहणें. छ १६ साबान-परवानगी हुजूर. मोर्तब.

---

४६ देशमुख व देशपांडे पारनेर यांस आज्ञापत्र कीं शाहू महाराज यांस न मानणें.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३४ सर्वजित [नाम] संवत्सरे, आश्विन शुद्ध द्वितीया भौमवासर. क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शिव छत्रपति यांणीं, देशमुख व देशपांडे पारनेर यांसी आज्ञा केली ऐसीजेः—परगणे मजकूरच्या बाबती मातोश्री आईसाहेबांकडे देऊन, राजश्री विठ्ठल जिवाजी सुभेदार, प्रांत जालनापूर यांच्या ताब्यानें केल्या आहेत. तुम्हीं स्वामीकार्याविषयीं त्यांचे आज्ञेंत वर्तोन, बाबतीचा वसूल मशारनिल्हेचे विद्यमानें देत जाणें. म्हणोन पूर्वी आज्ञापत्रें सादर केलीं आहेत, ऐसीयास सांप्रत राजश्री शाहू राजे तांब्राच्या

सेनेंतून निघोन, त्या प्रांतें आले आहेत. ते कागदपत्र चालवितील. नसता कथला करितील. तरी त्यांस कांहीं संबंध नाहीं. याकरितां त्याचे कागदपत्र एकदर न घेणें व त्याकडे परगण्यांपैकीं वसूल न देणें. जो कोणी याउपरी त्याचा कागदपत्र मानील, त्याचा परिछिन्न मुलाहिजा होणार नाहीं. हें जाणून, विठ्ठल जिवाजी याचे आज्ञेप्रमाणें वर्तोन, परगणें मजकूरच्या बाबतीचा ऐवज मशारनिल्हेकडे देऊन, आपला मजरा करून घेणें. जाणिजे. लेखनालंकार.

---

४७ कृष्णाचार्य बिन नृसिंह पंडिताचार्य यांस दिलेलें इनाम पत्र.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३४ सर्वधारीनाम संवत्सरे, वैशाख बहुल अष्टमी, भानुवासर, क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी यांणीं, वेदमूर्ति शिरोमणी कृष्णाचार्य बिन नृसिंह पंडिताचार्य वास्तव्य मागले यासी इनामपत्र दिल्हें ऐसीजे:—तुम्हीं मौजे खानापूर, प्रात तारळें येथील मुक्कामीं स्वामीसन्निध येऊन विदित केलें कीं, आपण स्वामींच्या राज्यांत राहोन स्वामींस कल्याण चिंतीत आहों. त्यास धामधुमेच्या प्रसंगाकरितां या प्रातींहून कुटुंबसह जाऊन ताम्रपर्णीचें तीरीं राहिलों. साप्रत स्वामी स्वराज्यांत आले. ऐकोन स्वामींच्या दर्शनास आलों. याउपरी कुटुंब या प्रांतें आणून, स्नानसंध्यादि कर्में करून, स्वामींस कल्याण चिंतीत आहों. त्यास योगक्षेम चालिला पाहिजे. याकरिता नूतन इनाम देविलें पाहिजे. म्हणून विनंति केली. त्यावरून मनास आणितां, तुम्हीं भले, सत्पात्र, वेदशास्त्रसंपन्न, तुमचें चालवणें स्वामींस अगत्य. याकरितां तुम्हांस नूतन इनाम करून दिल्हें असे.

श्री०
शिव
नरपति हर्षनिधान
मोरेश्वरसुत भैरव
मुख्य प्रधान.

मौजे आरळें, तर्फ वारुण,	तर्फ संगमेश्वर पैकीं जमीन आनाजी-
प्रांत मलकापूर. देह १,	पंताचे धारीयाची ३०० लारी.

एकूण इनामगांव एक व तीनशें लारीची जमीन कुलबाब, कुलकानू, हल्लीपट्टी व पेस्तरपट्टीसहित जल, तरु, पाषाणनिधि निक्षेप चतुःसीमा पूर्वक मर्यादेप्रमाणें धारादत्त सर्वमान्य खेरीज हक्कदार व इनामदार इनाम करून दिल्ही असे. तरी तुम्हीं सदरहू एक गांव व तीनशें लारीची भूमि पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभऊन सुखरूप राहणें. हे वृत्ति तुम्हांस दिल्ही आहे. जाणिजे. निर्देश समक्ष.

मर्यादेय विराजते.

तारीख २१ सफर,
सुरुसन समान मया.

---

४८ गंगाजी खाडे यांस इनाम जमीन दिल्याबद्दल आज्ञापत्र.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३४ सर्वधारीनाम संवत्सरें, वैशाख बहुल द्वादशी, गुरुवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्रीराजा शाहु छत्रपति स्वामी यांणीं, राजश्री महिपतराव अनंत देशाधिकारी व देशलेखक वर्तमान भावी, प्रांत कराड यांसी आज्ञा केली ऐसीजेः—मार्फत गंगाखाडे दिमत पथक बंदुकबारदार यांणीं चिकवडीनजीक किल्ले प्रसिद्धगडचे मुक्कामीं स्वामींसन्निध विनंति केली कीं, आपण पुरातन राज्यातील सेवक, कष्ट मशागत बहुत केली. किल्ले सातारा व किल्ले पन्हाळा व किल्ले विशाळगड येथें औरंगजेब याणें वेढा घातला. ते प्रसंगीं आपण तरवारेची शर्थ केली. त्याजवरून राजश्री परशराम पंडित यांणीं आपणांस नूतन इनाम मौजे कुसूर, तर्फ कोळें येथें इनाम जमीन चावर एक दिल्हा आहे. तेणेंप्रमाणें हा स्वामींनीं कृपाळू होऊन नूतन करार करून देविला पाहिजे. त्याजवरून मनास आणितां गंगाजी खाडे पुरातन सेवक एकनिष्ठपणें सेवा केली. पुढेंही स्वामीकार्य करावयासी उमेद धरितो. हा हेत. याचें चालवणें स्वामीस अगत्य. याजबद्दल स्वामी कृपाळू होऊन मौजे मजकूर पैकीं इनाम जमीन चावर एक अजरामऱ्हामत करून दिल्ही असे. पंडित मशारनिल्हेनीं देविल्याप्रमाणें यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरपरेनें इनाम सुरक्षित चालवणें. प्रतिवर्षी नूतन पत्राची आपेक्षा न करणें. या पत्राची प्रती लेहून घेऊन मुख्य पत्र मशारनिल्हेजवळ परतोन भोगवटीयासी देणें.

---

४९ दत्ताजी केशवजी नाईक पिसाळ याची देशमुखी असलेबद्दल पत्र.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३९ विरोधीनाम संवत्सरे, चैत्र शुद्ध त्रयोदशी, मंदवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी यांणीं राजश्री आण्णाजी जनार्दन देशाधिकारी व कारकून वर्तमान व भावी प्रांत वाई यांसी आज्ञा केली ऐसीजेः—दत्ताजी केशवजी नाईक पिसाळ देशमुख परगणे वाई यांणीं स्वामींसन्निध येऊन विनंति केली कीं, आपलें वतन पिढी दरपिढी देशमुखी वडीलपण मानपान, शिक्का, नांगर, सेवधार, हक्क, गांवगन्ना व इनामती गांव व इनाम जमीन गांवगन्ना व बिघावणी व जकाती विस्वा ऐसा भोगवटा वंशपरंपरेनें अनभवीत असतां, औरंगजेब पादशहा या प्रांतें आले. तमाम ठाणीयांची कबीजात बसत चालिली. वाईस ठाणें काबीज करावयासी न्याहारखान गोरी फौजदारी करून आले. ठाणें काबीज केलें. ते समयीं आपण जाऊन न्याहारखानास भेटावें ते भेटलों नाहीं. आपण नेणता होतों. आपली माता पिलाईआऊ होती. तिनें ठाणीयांत रुजू

व्हावें ती न जाली. याजकरितां न्याहारखान गोरी यार्णी पादशहास गैरवाका इलतमास जाहीर केली कीं, वाईस देशमुख नाहीं. हजरत आपणावरी मेहरबान होऊन देशमुखी आपणास दिलीयानें आपण पादशाही काम कितेक किफायतीचें करीन. त्यावरून पादशहास न्याहारखानाच्या वकिलांनीं इलतमास गुदराविली. हजरतीचा संवाद इलतमासीवर झाला कीं, बेवारीस वतन असलें तर तहकीक करून देणें. त्यावरून वकिलाची लिहिलीं न्याहारखानास आलीं कीं, हजरतीचा देशमुखीचा हुकूम जाला. सनदपत्रेंही चालिलीं. तुम्हीं हवाला अमल करणें. हें वर्तमान किमपि आपणास दखल नव्हतें. आपण गोळेवाडीस होतों. मोगलाच्या स्वारीया येऊन, मुलकाचा सत्यानास होऊं लागला. त्याकरिता जरूर जाणोन न्याहारखानाचा कौल घेऊन वाईस गेलों. भेट घेतली. कांहीं दिवस आपल्या देशमुखीचा अमल करीत होतों. त्यास न्याहारखानानें मनात कृत्रिम धरून आपणास व आपले मातेस कैद करून ठेविलें आणि परगण्याचे मोकदम जमा करून सुरत महजर करूं लागला कीं, देशमुखीस कोणी वारस नाहीं. ऐसा महजर करून देणें. त्यावरून वाईच्या काजीची व न्याहारखानाची कटकट बहुत जाली तेव्हा आपणास कृत्रिमसें दिसोन आलें. मग आपण उपाय करून तेथून पळोन पादशाही लष्करास तुळापूरच्या मुक्कामास गेलों. तमाम मोकदम व गंगाजी शंकर, गिरमाजी झुंगो देशकुळकर्णी व चादशेट शेटीया कसबे मजकूर हेही लष्करास आणिले. हजरतीजवळी फिर्याद केली. न्याहारखान तगीर केला. वतन बहाल करून घेतलें. सनद असनाद द्यावयाचा हुकूम जाला. सनदा तयार व्हाव्या तों जुलपिकारखान रायगडची मसलत सुरू करून लष्करास आले. त्याजपाशीं सूर्याजी पिसाळ बिराजर मोकदम मौजे वोझर्डे हा पूर्वी गांवीं मोकदमी चालवीत असतां, रायगडीहून वजाईची वरात जाली. वसूल द्यावयास मवसर नाहीं. याजकरिता गांव सोडून पळोन गेला. तो खान मशारनिल्हेजवळी राहिला. तेथें रायगडचे मसलतेमुळें मनसबा करून मावळीयाची सरदारी केली. गडास मोर्चे लाविले व दरामतींत पडोन, खानास गड हस्तगत करून दिल्हा. ये गोष्टीकरिता खान मशारनिल्हेची कृपा त्यावरी विशेष जाली. खान हजरतीच्या दर्शनास आले. तेव्हा सूर्याजीची स्तुती हजरतीपावेतों करून, सिरनाहाणी करविली. हा अस्करा लष्करात बहुत जाला. त्याउपरी आह्मीं लष्करांत होतों. हें वर्तमान सूर्याजीस कळलीयावरी आमचे भेटीस आला. आपलें यश सर्वस्वी सांगितलें. आणि आम्हास पुसों लागला कीं, तुम्हीं काय निमित्य आला? त्यावरून आह्मीं पूर्ववृत्त सूर्याजीस सांगितलें. त्यावरून आह्मास ह्मणों लागला कीं, बरें, अवघ कार्य तुमचे हातून चुकलें आहे. याउपरी सनद असनाद करणें आहे. त्यास आपली भीड येथें विशेष आहे. टक्का खर्च पडणें तोही आपले भिडेनें थोडका पडेल. तुम्हीं बहुत श्रमी जाला आहां. आपले स्वाधीन पूर्वील सनदा काय असतील त्या करणें. त्यावरून तुमची सनद असनाद जें तयार करणें, तें करून देतों. टक्का खर्च पडेल तो चहू वर्षांत परगणीयांत

उगऊन देणें. म्हणून बहुत माया दाखविली आणि विश्वास लाविला. त्यास आम्हींही विचार केला कीं, हा जातीचा पिसाळ आहे आणि वोझर्डेकरांची कदीम तक्षीम ही देशमुखींत आठ गाव आहेत. त्याचे तक्षिमेंतील हा भाऊ आहे. याचेही वाटणीस आठ गांवापैकीं निमें तडवळेंबुद्रुक, संमत कोरेगांव येथील हक्क येत आहे. ह्मणजे आठ गांवापैकीं सोळावे तक्षिमेचा भाऊ आहे जरी बेइमानें वर्तेल आणि टक्का थोडका खर्च करील, तरी हें कार्य याचे हवालें करावें आणि आपण परगणीयात जावें. ऐसा विचार केला. सूर्याजीचें इमान घेतलें आणि गंगाजी शंकर व गिरमाजी झुंगो देशपांडे व भुलाजी पाटील वाघोलकर व वाकोजी पाटील ढवळे नादवाहलकर व मानशेट शेटीया कसबें वाई हे त्याजपाशीं ठेविले कीं, जो टक्का खर्च करणें तो या पाचाजणाचे विद्यमानें करावा. हे पांचजण आपणांस सांगतील तो आपण टक्का चहू वर्षात उगऊन देऊं. म्हणून करार करून सूर्याजीजवळ आपले कदीम वडिल वडीलांचें फर्मान होतें. [तें] नव्या सनदा करावयास दिल्हें आणि आम्हीं खिजमत तलबखान फौजदार पाहून परगणीयास कारभारास आलों. मागून मानशेट टकीयाबद्दल आला. त्याजबराबरी रुपये ३००० तीन हजार सनदेच्या खर्चाबद्दल पाठविले. तो सवेच सूर्याजीनें आमचा तह एकीकडे ठेऊन, रुद्रो चिमणाजी कानगो, सुभे विजापूर यापासून, अल्ली आदिलशहा यांचे मोहरेनिशीं कोरीं वडळें खरिदी करून, त्यामध्यें केशवजी दत्ताजी नाईक व फिर्गोजी सूर्याजी नाईक देशमुख म्हणून लेहून, तें कृत्रिम फर्मान कचेरींत नेऊन रुजू केलें. आमचें कदीम फर्मान होतें तें एकीकडे ठेवलें आणि कृत्रिम सनदेप्रमाणें ताजी सनद पादशाही दो नांवाची करून घेतली. हें वर्तमान गंगाजी शंकर व गिरमाजी झुंगो देशपांडे यार्णी व मोकदम यांणीं आपणास लेहून पाठविलें कीं, यार्णे तों ऐसी कृत्रिम वतेणूक माडिली. आपण याजपाशीं कटकट करावी अगर द्वाही द्यावी, तरी लष्करात याची भरभर फार, हा तात्काळ आमचा सत्यानास करील. तरी तुम्हीं याची काय पैरवी ते करणें म्हणून लिहिलें. त्यावरून आपण फिरोन लष्करांत जाऊन आपली सनद दुरुस्त करावी, तों वाईचें ठाणें राजश्री रामचंद्र पंडित अमात्य व राजश्री शंकराजी पंडित सचीव व संताजी घोरपडे व जाधवराव यार्णी येऊन मारून काढिलें. खिजमत तलबखान दस्त केला. त्याबराबरी आपणही सापडलों. सर्वस्वें हरास जाला. एके दिवशींच भक्षावयास नाहींसें जालें. याजकरितां फिरोन उत्पात करायाचा प्रसंग अगदींच राहिला. आपण उभयता पंत स्वामींपाशीं आपलें वतनाचा कारभार करून होतों. त्यावर देशपाडे व मोकदम लष्करात होते, तेही उठोन आम्हांजवळ आले. त्यांणीं सूर्याजीचा करीना सांगितला. तो आम्हीं उभयतां पतास विदित केला आणि आपल्या वतनावरी होतों. त्यावरी झुलपिकारखान चंजीवरी मोहिमेस गेले. त्याबराबरी सूर्याजीही मावळीयाचा जमाव घेऊन गेला. तेथें गेलीयावरी मोगलाकडून पारका होऊन कैलासवासी राजश्री काकासाहेबांकडे अनुसंधान

लाऊन, आपण वाईचा देशमुख आहे, आपणापाशीं पादशाही सनद आहे. त्याप्रमाणें महाराज आपली देतील तरी आपण येतों. कितेक कार्यप्रयोजन करून देतों. म्हणून. त्यावरून काकासाहेबीं देशमुखीचीं पत्रें दिल्हीं. पादशाही सनदेंत निमेचा दाखला नांवामुळें होता, त्यास सूर्याजी कितेक कार्यास अनुकूल होईल, ऐसें जाणून सारींच वतनें मऱ्हामत करून पत्रें दिल्हीं तीं घेतलीं. आणि राजश्री काकासाहेबांची आज्ञा घेऊन या प्रांतें आलों. सरकारकून यास पत्रें दाखऊन, त्यांचीं पत्रें करून घेऊन वतनास खलेल केलें. मग आपण साताऱ्याचे मुक्कामीं रामचंद्रपंत व शंकराजीपंत यापाशीं जाऊन उभा राहिलों, आणि आपलें आद्यंत वर्तमान विदित केलें. त्याणीं सूर्याजीस बोलाऊन आणिलें आणि आपला व त्याचा करीना साबाजी घाटगे देशमुख, कसबे मलवडी, व साबाजी गाढवे देशमुख, सातारा व शाहाजी रामाजी बाहादूरजी शिंदे देशमुख, तर्फ कुडाळ व पदाजी चिकणे देशमुख, तर्फ मेंढें व सटवोजी जाधव मोकदम, मौजे उंबरज, परगणे कऱ्हाड व गोत परगणे मजकूर व गंगाजी शंकर, गिरमाजी झुगो देशपाडे व मोकदम गावगन्ना व चांदशेट शेट्या वाईकर यांचे विद्यमानें मनास आणता, गोतमुखें सूर्याजी खोटा जाला. आपण खरे जालों. तेव्हां सूर्याजी वतनास दूर करून आपलें वतन पूर्वापारप्रमाणें आपले दुमालें केलें आणि पत्रें करून दिल्हीं व आपण वतन अनुभवूं लागलों. तों राजश्री काकासाहेब चंजीहून या प्रांतास आले. तेव्हा सूर्याजी जाऊन सातारीयाचे मुक्कामीं उभा राहिला. निमें वतनाचीं पत्रें करून घेतलीं. खटपट कराया लागला. त्यास आपण राजश्री—पाशीं जावें तों राजश्री स्वारीस गेले. तिकडून येऊन सिंहगडास कैलासवास केला. मग आपण विशाळगडचे मुक्कामीं राजश्री शिवाजीराजेसाहेबापाशीं जाऊन उभा राहिलों. आपला करीना विदित केला. तो मनास आणून उभयतां पंतास विचारिलें. त्यांणीं गोतमुखें निवाडा जाला होता तो निवेदन केला. आपले जुने कागदपत्रही मनास आणिले. मग आपणावरी कृपाळू होऊन सूर्याजीस वतनास दूर करून, आपलें वतन आपणास बहाल केलें. शपथपूर्वक पत्रें करून दिल्हीं, आपण महालास येऊन आपलें वतन अनुभवूं लागलों. हें सूर्याजीस कळलीयावरी मागती मोगलाईत जाऊन फजुलाखानास भेटला. चंदनवंदन, नांदगिरी हे किल्ले हस्तगत करून देऊन फजुलाखान मेहेरबान करून घेतला. पांडवगड घेऊन देतों ऐसी कबुलात करून, इस्मालखान मीया वाईस फौजदार आणिला. त्यांपाशीं मुद्दा घातिला कीं, तुम्हीं दत्ताजीपासून निमें वतनाची वाटणी करून, आपणास देऊन महजर करून देणें. आपण पांडवगड घेऊन देतों. म्हणून त्यावरून इस्मालखानानें त्याचा अभिमान धरून, आपणास नेऊन अटक केली. देशपांडेही आपदखाना ठेविले. आठ दिवस होतों. निमें वतनाची वांटणी करून सूर्याजीस देणें; नाहीं तरी तुम्हांस यातीभ्रष्ट करितों; ह्मणोन अतिशय केला. तेव्हां संकट पाहोन जसा सूर्याजीनें वांटणी जाबता करून मागितला तैसा दिला, आणि आपली मोकळीक करून

घेऊन, विशाळगडाखाले पादशहा होते तेथें गेलों. फिर्याद केली. इस्माइलखान तगीर करून परगणा खालसा केला. खालसाचा दिवाण महंमद अकल व यासीनखान फौजदार घेऊन आपल्या वतनाचा मामला दुरुस्त करून परगणीयास आलों. अमल करू लागलों मग सूर्याजी लष्करांत मागती गेला. परंतु यत्न न चाले. शेवटीं मुसलमान जाला. तरी पादशहापावोतों झुटासारिखे जाहीर जाले. साहास केलीयाचें सार्थक न जालें. त्यावरी महमद अकल मयत जाला. खोजेखान फौजदार व जागीदार होऊन परगणीयास आला. त्याबराबरी गड किल्लयाचे मनसबे रचून मागती सूर्याजी आला. गावात आलीयावरी कारभारांत घालमेल करूं लागला. मग आपण रुसवा खोजेखानावरी करून, परगणे मजकूरचे देशपांडे व मोकदम घेऊन बुधास गेलों. तेव्हा खान मशारनिल्हेनीं इमामशहा मध्यस्त घालून, आपली समजावीस करून वाईस आणिलें. आणि कुल हाली मवाली जमा करून, आम्हांस व सूर्याजीस बोलाऊन सूर्याजीपासून येजीतखत आपणास लेहून देवविलें कीं, आपली पिढी दरपिढीची तक्सीम वतनात जें असेल तें खाऊन असेन. आपणास याउपरी तुमचे वतनासीं संमंध नाहीं. ऐसें लेहून दिल्हें आणि आपले गावास गेला. याउपरी थोराताचा आश्रा करून मुलकांत धामधूम मांडिली. त्यावरी स्वामींचें आगमन या प्रातें जालें. आपण स्वामींचे पायापाशीं येऊन रुजू जालों. सूर्याजी थोराताबराबरी होता. आपण साताऱ्याच्या मुक्कामीं राजश्री जयसिंग जाधवराव याच्या विद्यमानें वतनाचें पूर्वोतर वर्तमान विदित केलें. त्यावरून स्वामींनींही चर्चा मनास आणितां, सूर्याजी म्हणजे लाइनी गळा पडतो ऐसें जालें. दुसरे दिवशीं मनसुफी करून आपला व सूर्याजीचा कथला तोडावा. तों लष्कराचा चलचलाव जाला. स्वामींनीं आपणास आज्ञा केली कीं, तुम्हीं समागमें येणें. जेथें मुक्काम होईल तेथें बरहक निवाडा करून, वतनाचा कलंक दूर करून, तुमची स्थापना केली जाईल. आज्ञेप्रमाणें आपण चिकेवाडीपावोतों आलों. मागती चिकेवाडीस स्वामींस अर्ज केला. तेव्हा स्वामींनीं आज्ञा केली जेः—तूर्त पर्जन्यकाळ आला, लावणीसंचणीचा हंगाम आहे. तुम्हीं जिल्हेचे खावंदाबराबरी परगणीयास जाणें. पेस्तर हुजूर येणें. तुमचा इनसाफ स्वामी करितील म्हणोन. त्यावरून परगणीयात आलों. मागें सूर्याजीनें थोराताचे मालुमातीनें गैरवाका अर्ज करून इस्माइलखान मका याचे वेळेचा वांटणी जाबिता होता, तो स्वामींस विदित केला. त्यावरून स्वामींनीं निमें वतनाचीं पत्रें करून दिलीं. त्या पत्राच्या आश्रियावरी येऊन नरसोजी मोरे दिमत थोरात यांची स्वारी वाईवरी आणून, आपला वाडा व मुतालिकांचीं घरें लुटून जाळून सत्यानास केला. मुलखांतही स्वारांचें बळें हक्क म्हणून बेमबलगा टका घेतला. ऐसा तो वारंवार आपणासी कटकट करितां राहत नाहीं. स्वामी धर्मपरायण आहेत. आपल्या वतनास कलंक लागला आहे. तो निष्कलंक करून वतनावरी आपली स्थापना केली पाहिजे, म्हणोन पुरंदरचे मुक्कामीं विनंति केली. त्यावरून स्वामींनीं दत्ताजी केशवजी नाईक देशमुख

यांचा भोगवटा व कागदपत्र मनास आणितां, विदित जालें कीं, परगणें मजकूरचें देशमुखीचें वतन दत्ताजी केशवजी याचें खरें आहे. सूर्याजी नाहक गळा पडतो. त्यास निमें वतनाशीं संमंध नाहीं ऐसें बहुत मुखें कळों आलें. त्यावरून स्वामी, दत्ताजी केशवजी नाईक पिसाळ यावरी कृपाळू होऊन, सूर्याजीस कथला करावया गरज नाहीं ऐसें करून, दत्ताजी केशवजी नाईक याचे देशमुखीचें वतन हक्क लाजीमा मानपान, शिक्का, नागर, सेवधार, इनामती गांव, इनामजमीन गांवगन्ना व बिघावण व विस्वा, जकाती, दत्ताजी केशवजी नाईक पिसाळ याचा सालाबाद चालिला आहे त्याप्रमाणें चालवावें, ऐसें केलें असें. तरी तुम्हीं दत्ताजी केशवजी नाईक पिसाळ यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें वतनाचा भोगवटा चालत आल्याप्रमाणें चालवणें. याचें वतनासी सूर्याजीस अर्थाअर्थीं संमंध नाहीं. पेस्तर सूर्याजी आला, तरी वोसर्डेकराचे तक्षीमेचें आठ गांव आहेत. त्यांपैकीं जे तक्षीम त्याचे वाटणीस येईल तें त्याणें खाऊन सुखरूप असावें. दत्ताजी केशवजी नाईक पिसाळ याचें वतनासी दखल व्हावया गरज नाहीं. निंबाळकर व थोरात याचें कर्ज सूर्याजीकडे असिले तरी त्यांणीं व सूर्याजीनीं समजोन घ्यावें. दत्ताजी केशवजीशीं व याचे वतनासीं किमपि कथला करावया संमंध नाहीं. सूर्याजीनें इत्फदायेपासून कागदपत्र घेतलें असतील ते रद्द असेत. परगणें मजकूरचे देशमुखीचें वतन दत्ताजी केशवजी नाईक पिसाळ याचे दुमाले केलें असे. तुम्हीं बिलाकुसूर चालवणें. या वतनास दत्ताजी केशवजी नाईक पिसाळ याचे माथा शेरणी रुपये ४००० चार हजार करार केली असे. याचा वसूल राजश्री नारो पंडित सचीव यांकडे होईल. या पत्राची प्रती लेहून घेऊन, अस्सल पत्र दत्ताजी केशवजी नाईक पिसाळ देशमुख याजवळ भोगवटीयास परतोन देणें. जाणिजे. लेखनालंकार.

पैवस्ती छ २१ मोहरम.

---

५० भिकाजी जाधव यानें एकनिष्ठ सेवा केल्याबद्दल इनाम देण्याची आज्ञा.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ३७ विकृतिनाम संवत्सरे, कार्तिक शुद्ध पंचमी, इंदुवासर क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शाहू छत्रपति स्वामी याणीं, राजश्री कृष्णाजी बल्लाळ देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी, प्रांत सातारा यांसीं आज्ञा केली ऐसीजे:—भिकाजी जाधव याणें स्वामींच्या राज्यांत बहुत एकनिष्ठेनें सेवा केली. पूर्वी किल्ले सज्जनगडास ताब्रानें वेढा घातला ते समयीं वं तांब्राकडील लोकांनीं सुलतान ढवा मेला ते समयीं नफरमजकुरानें बहुत कष्ट मेहनत केली. सुलतान ढवा मारून काढिला तेव्हां जातीनें शर्थ केली. म्हणोन स्वामी कृपाळू होऊन इनाम द्यावयाची आज्ञा केली.

---

५१ कृष्णाजी महादेव गोडबोले यांस पतकीपणाचें वतन दिल्याबद्दल पत्र.

७१ मश्रुद अनाम देशमुख व देशपांडीये, तर्फ परळी यांसी, परशराम त्र्यंबक प्रतिनिधी, मुरसन सीत अशर मया आलफ. कृष्णाजी महादेव गोडबोले याणें किल्ले सातारीयाचे मुक्कामीं हुजूर येऊन विनंति केली जे;—आपला भाऊ गोविंद महादेव यास जकायत तर्फ सातारा व तर्फ परळी येथील कमाविसी स्वामींनीं सांगितली होती. पंधरा सोळा वर्षें कमाविसी केली. कितेक किफायत केली. त्यावरी पादशाहा (आवरंगजेब असें दुसरें सनदेत आहे) किल्ले सातारीयास व किल्ले सज्जनगडास येऊन परीघ देऊन बैसले. किल्ले सज्जनगडास दंगा करून घ्यावयास लोक चढविले होते. ते समयीं आपला भाऊ गोविंद महादेव याणें गडावरी राहून, लोक तांब्राकडील दंगा करून चढले होते त्यांस मारून काढून खाले घातले. स्वामींचीं फत्ते केली. ते समयीं स्वामींनीं वचन दिल्हें कीं, जकायत तर्फ सातारा व परळी येथील पतकी मिरासदार कोणी नाहीं. पतकीपणाचें वतन म्हणजे तुम्हांस अजरामरहामत करून दिल्हें म्हणून. त्यावरी किल्ले सातारा तांब्रानें हस्तगत केला. तो फिराऊन घ्यावयासी हवी करावयास स्वामींनीं रवाना केला होता. तो तांबीचे नदीमध्यें बुडोन स्वामी कार्यावरी मृत्यु पावला. आपणांस स्वामीनें जकायत मजकुरची कमाविसी सांगितली. ते समयीं आपण विनंति केली कीं, पतकीपणाचें वतन स्वामीनीं आपल्या भावास दिल्हें होतें. कागदपत्र करून घ्यावयाचें राहिलें ते देऊन, वंशपरंपरेनें चालवावें म्हणून. त्याजवरून स्वामींनीं आज्ञा केली जे, जकायतीची कमाविसी चौकस करून किफायत करणें. म्हणजे वतनपत्रें करून देऊं म्हणोन. त्याजवरून श्रमसाहास करून पंधरा वर्षें कमाविसी केली. कितेक किफायत केली. आपल्या भावानें व आपण तीस बत्तीस वर्षें कमावीस केली. आपला भाऊ स्वामीकार्यावरी खर्च जाहला. याजउपरी स्वामींनीं कृपाळू होऊन पतकीपणाचें वतन आपल्यास करार करून पंशपरंपरेनें चालवावें म्हणोन विनंति केली. त्यावरून मनास आणितां, गोविंद महादेव याचा भाऊ, याणें ब्राह्मण होऊन शिपाईपणाची शर्ती केली, शेवटं स्वामीकार्यावरी खर्च जाहला व कृष्णाजी महादेव याणेंही कमाविसी चौकस केली, किफायत केली. तीस बत्तीस वर्षें यांणीं श्रमसाहास केलें याबद्दल याचें चालवणें अवश्यक जाणोन याजवर कृपाळू होऊन तर्फ परळी येथील जकायतीचें पतक यांस व याचे वंशपरंपरेनें वतन करून दिल्हें असे. याचे दुमाला करून पंशपरंपरेनें चालवीत जाणें. या वतनास हक्कलाजीमा बरहुकूम डांगी जकायत तर्फ मजकूर यास चालत आहे. त्याप्रमाणें पतकी मजकुरास करार केला असे. चालवीत जाणें. याचे माथां शेरणी तर्फ सातारचें पतक व पतक तर्फ मजकूर मिळोन रुपये ५०० करार करून हुजूर वसूल घेतला असे. या पत्राची प्रती लिहून घेऊन, मुख्य पत्र भोगवटीयास पतकी मजकुरापाशीं परतोन देणें छ ७ रजब. निर्देश समक्ष.

५२. रखमशेट बिन माणकशेट, स्वामीकार्यीं खराबीस आला म्हणून इनामपत्र.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ४२ दुर्मुखनाम संवत्सरे, श्रावण वहुल नवमी, सौम्यवासरे, क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी यांणीं, रखमशेट बिन माणकशेट कुंदक वस्ती किले सिंहगड यांस दिल्हें इनामपत्र ऐसीजेः—त्वां स्वामीसंनिध किले सातारचे मुक्कामीं येऊन विनंति केली जे, आपण पूर्वी किले मजकुरीं होतों. ते समयीं औरंगजेब पादशहाचा वेढा किले मजकुरास आला. ते समयीं आपण किल्लेदार राहोन किल्लेयास दाणा व सामान दिल्हें. तें कर्जे राजश्री सचीवपंत यांचे स्वारीस जमा आहे व आपली वस्तभाव दाणादुणा सर्वस्व गेलें. तैसेंच दुसरे वेळेस जुलपुकार-[जुल्फिकार] खान याचा वेढा किले मजकुरास आला. ते समयींही आपण किल्लेदार राहोन किल्लेयास सामानसुमान जिन्नस पुरविला. तेंही कर्जे राजश्री पंडित मशारनिल्हे यांचे स्वारीस व किले मजकुरीं जमेस आहे व आपली वस्तभाव दाणादुणा गेला. ऐसें साहेबांचे किल्लेयामुळें आपण बहुतच खराब जाहलों. दिवसांत कर्जे गुंतलें तें न उगवे. राजश्री सचीवपंताजवळी मागावयास गेलों. त्यास जिल्हे खराब नाहली त्यामुळें कर्जे उमवून न येई ऐसें जाहलें. आपला तो योगक्षेम चालिला पाहिजे. याकरितां पंडित मशारनिल्हेंनी तर्फ खेडेबारें येथें जमीन एक चावर दिल्ही, त्याचीं स्वामींनीं इनामपत्रें करून दिल्ही पाहिजेत म्हणून विनंति केली. त्यावरून मनास आणितां, वाणी मजकूर किल्लेयामुळें स्वामीकार्यावरी खराब जाहलास, तुझें चालवणें अवश्यक, याकरितां स्वामी तुजवरी कृपाळू होऊन इनामजमीन खालीसा पडपैकी अव्वल, दुम सीम तीन प्रतीची कुलबाब, कुलकानू खेरीज हकदार देहाय तर्फ खेडेबारें प्रांत मावळ येथें देविली असे वितपशीलः—

कसबे खेडेबारें, प्रांत मावळ -॥- चावर. मौजे आर्वी, तर्फ मजकूर -॥- चावर.

एकूण चावर एक तुजला पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम दिली असे. तरी सदरहू जमीन देहाय मजकूरपैकी चतुःसीमापूर्वक आपले दुमाले करून घेऊन, इनाम अनुभवून सुखरूप राहणें. ज्याणिजे. लेखनालंकार मोर्तब.

तारीख २२ सावान, सुहूरसन सबा.

---

५३. खंडोजी बिन नरसोजी कारंजकर यांस एकनिष्ठ राजानिष्ठेबद्दल मोकासा दिला.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ९९ कीलकनाम संवत्सरे, पौष वहुल दशमी, इंदुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी यांणीं राजमान्य राजश्री रखमाजी सालोंखे नामजाद व राघो मानाजी काटे कोल्हापूर यांसी आज्ञा केली ऐसीजेः—राजश्री खंडोजी कारंजकर बिन नरसोजी कारंजकर हे पुरातन स्वामींच्या राज्यांतील एकनिष्ठ सेवक, तीर्थस्वरूप राजश्री थोरले कैलासवासी स्वामीपासून हा काळपर्यंत एकरूप निष्ठेनें सेवा

करीत आहेत. तीर्थस्वरूप राजश्री संभाजी राजे काका यांचीही सेवा निष्ठेनें करून, त्यांची कृपा संपादून आपली आज्ञा करून घेतली. त्यानंतर तीर्थस्वरूप राजश्री कैलास-वासी स्वामी चंजी प्रांतें जातां, या प्रांतें राजश्री रामचंद्र पंडित आमात्य हुकुमतपन्हा व राजश्री परशराम पंडित यांजवरी कुलमुख्तीयार देऊन ठेविलें. मशारनिल्हेसही यांजवळ ठेविले. ते प्रसंगीं यांणीं स्वामींच्या राज्याभिवृद्धीविषयीं बहुतच श्रमसाहास केले. त्याउपरी औरंगजेब पादशाहायांणीं किले सातारा व सज्जनगड व वसंतगड व विशाळगड आदिकरून परीघ घालून बैसले. ते समयीं मशारनिल्हेनीं गडकिल्लाचास सामान व दाणा पावऊन गडकिल्ले स्वधीनें भांडविले. राजश्री शिवाजी राजे दोन्ही यांची सेवा निष्ठेनें केली. स्वामी राज्यासनारूढ जालीयापासून स्वामींच्या पायासीं निष्ठा धरून, त्रिकर्ण सुधीनें सेवा केली. स्वामींच्या पायाविना दुसरें जाणत नाहीं. याचें सर्व प्रकारें उर्जित करून चालविणें हें स्वामींस परम अवश्यक. यांचा वृद्धापकाळ यानकरितां स्वामी याजवरी कृपाळू होऊन मौजे मुडसिंगी, तर्फ हवेली कोल्हापूर, हा गाव खासगीचा, यासी मुकासा दिल्हा होता. तो हल्लीं स्वामीनीं यांस नूतन इनाम कुलबाब, कुलकानू, हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी जल, तरु, पाषण, निधीनिक्षेपसहित खेरीज हक्कदार व इनामदार करून यांसी इनाम अजरामरहामत करून दिल्हा असे. तरी तुमीं मौजे मजकूर पूर्व मर्यादेप्रमाणें यांचे स्वाधीन करणें आमि इनाम यांसी व यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें चालविणें. या पत्राची प्रती लेहून [घेऊन] अस्सल पत्र परतोन देणें. बहुत काय लिहिणें. मर्यादेयं राजते

---

५४. श्रीकराचार्यास महाराजांनीं दिलेलें दानपत्रावरूनचा निवाडा.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ९६ सौम्यनाम संवत्सरे, श्रावण बहुल एकादशी, मंदवासरे, क्षत्रियकुलावतंस श्री राजा शंभुछत्रपति स्वामी यांणीं, वेदशास्त्रसंपन्न राजश्री नरसिंह पंडिताचार्य यांचे पुत्र कृष्णाचार्य व माधवाचार्यांचे नातू नारायणाचार्य यांचे पुत्र नरसिंहाचार्य व श्रीपत्याचार्यांचे नातू शामाचार्यांचे पुत्र वासुदेवाचार्य व श्रीधराचार्यांचे पुत्र श्रीनिवासार्य यांस आज्ञा केली ऐसीजेः—तीर्थरूप राजश्री कैलासवासी स्वामी चंजीस गेले. त्याबराबरी वेदशास्त्रसंपन्न राजश्री नरसिंह पंडिताचार्य यांचे पुत्र श्रीकराचार्य गेले. त्यांणीं तीर्थरूप राजश्रीजवळ राहून बहुत श्रम केले व कर्नाटक विद्यापीठ येथील पंडितामध्यें यांचे विद्यापरिश्रम राजश्रीनीं पाहिले. मग यावरी संतुष्ट होऊन राजश्री कैलासवासी स्वामींनीं यांस मौजे मांगले, कसबे सातवें, प्रांत पन्हाळा हा गांव सकुशहिरण्योदक हातावरी घालून यांसी धारादत्त दान दिल्हें. यांनीं गांवाचें राजमत्रीं भावाचंदाची ममता धरून आपले जेष्ठ बंधु माधवाचार्य यांचे पुत्र नारायणाचार्य व दुसरे बंधु श्रीकराचार्य यांचे पुत्र शामा,

चार्य हे दोघे पुतणे व आपले पुत्र हरी राजारामाचार्य व आपले कनिष्ठ बंधु श्रीधराचार्य व कृष्णाचार्य या पांचाच्या नांवाचा लेख करून पत्र केलें होतें. त्यावरी राजश्री देशास आले. सिंहगडीं कैलासवास केला. त्यावरी राजश्री शिवाजीराजे बाजी, विक्रम संवत्सरीं, विशाळगडीं राज्यासनारूढ जाहले. श्रीमंत मातुश्री ताराबाईसाहेब राज्यभार चालवीत होती. तेव्हां श्रीकराचार्य यांणीं त्यांपाशीं मौजेमजकुरचे भोगवटीयास पत्र मागितलें, आणि पूर्वील पत्र आणून दाखविलें. त्या पत्रामध्यें सदरहू पांचा जणांचीं नांवें त्यांनीं ऐकिलीं, आणि मग बोलिले कीं, चंजीमध्यें तुह्मां एकल्यास हातावरी पाणी घालून आम्हां देखत गांव दान दिल्हा. तुमचे पुत्र हरी राजारामाचार्य चंजीमध्यें होते. हे आह्मांस ठाऊक आहेत. वरकड तुमचे भाऊ पुतणे हे चौघे देखील ऐकिले नाहींत. यांचे नांवें तुह्मीं गांवाचें पत्रीं काय ह्मणून घातलीं ? आह्मीं तुमच्याच नांवें राजपत्र देतों. वरकडांचें आम्हांस प्रयोजन नाहीं. ऐसें बोलून एकलें श्रीकराचार्यांचें नांवें गांवाचें पत्र दिल्हें. तें राजश्री रामचंद्र पंडित आमात्य व परशराम पंडित प्रधान व शंकराजी पंडित सचीव यांचीं निशाणें व मुद्राकित आहे. तेव्हांच सदरहू पांचाचें नावें राजपत्र श्रीकराचार्य यांणीं केलें होतें तें राहिलें. त्याउपरी विक्रमनाम संवत्सराचे दुसरें वर्षीं, वृषनाम संवत्सरीं, श्रीकराचार्यांचें शरीरीं व्यथा जाहली. यास्तव श्रीनारायण देव वस्ती मौजे वाफवली व श्रीरामेश्वरदेव आदिष्ठान कसबे आचरें, या देवस्थानीं श्रीकराचार्य सेवा करावयास गेले. राजगृहासही येत जात असत. असें असतां, श्रीकराचार्य संनिध नव्हते. तेव्हा शामाचार्य यांणीं खरनाम संवत्सरीं प्रसिद्धगडीं ताकीदरोखा ह्मणून गांवाचे विषयीं राजपत्रें घेतलीं. त्यास पूर्वीं श्रीकराचार्य यांणीं पांचाचीं नावें घातलीं होतीं. त्याच्या विपर्यासें नावें घालून एक पत्र देशाधिकारी यांचे नांवें व एक पत्र मांगलेचे मोकदमाचे नांवें ऐसीं दोन पत्रें घेतलीं. तीं विक्रमनाम संवत्सराचे बारावे वर्षीं खरनाम संवत्सरीं घेतलीं. त्याउपरी श्रीरामेश्वरदेवाचें प्रसाद श्रीकराचार्य यांचे शरीरीं आरोग्य जाहलें. राजश्री शिवाजी राजे बाजी व मातुश्री ताराबाईसाहेब प्रसिद्धगडाहून किल्ले पन्हाळीयास आली. श्रीकराचार्य देवाचा निरोप घेऊन, विजयनाम संवत्सरीं पन्हाळीयास आले. ते श्रीपत्याचार्यांचे घरीं एकत्र राहिले. तेव्हां मांगलेचे पाटील, कुळकर्णी व रयतावा, देसाई व देशकुळकर्णी गांवचे लावणीचा कौल मागावयास यापाशीं आले. श्रीपत्याचार्य, श्रीकराचार्य यांसी कौलाची बोलीचाली करून तह केला. त्याप्रमाणें कौल द्यावयाविषयीं श्रीपत्याचार्यास, श्रीकराचार्यांनीं म्हटलें कीं, कौल तुमच्या आमच्या उभयतांचें नांवें देऊं. श्रीपत्याचार्य व शामाचार्य हद्दीं बोलले कीं, आह्मांस मांगले गांव नलगे. तुह्मीं आपले नावें कौल द्या. आम्हांस तुमचे गांवाविणें प्रयोजन नाहीं. ऐसें बोलिले. त्यास श्रीकराचार्यांनीं म्हटलें कीं, ऐसें कां ह्मणतां ? त्या उभयतांनीं आग्रह करून गांव यांचें याकडे टाकिलें आणि गांवचीं ताकिदीचीं राजपत्रें सदरहू शामाचार्य यांणीं पांचांचें नावें दानें घेतलीं होतीं, तींही श्रीकराचार्य यांपाशीं दिल्हीं. तीं देसाई, देशकुळ-

कर्णी व पाटील, कुळकर्णी व रयतादेखत दिल्ही. मग पोसोपंत देशकुळकर्णी याचे दस्तुरें गांवास कौल श्रीकराचार्य यांणीं आपले एकल्याचें नांवें दिल्हा. तो पोसोपंताचे दस्तुरचा कौल अद्यापि आहे व ही गोष्ट हल्ली पोसोपंतासही ठाऊक आहे. त्याउपरी श्रीकराचार्यास वाडा बांधावयास जागा पूर्वी दिल्ही होती, तेथें श्रीकराचार्यांनीं वाडा बांधिला. त्याउपरी किल्ले पन्हाळा येथें जयनाम संवत्सरीं [राजशके ४१ शालिवाहन शके १६३६ सन १७१४ इसवी सालांत राजा शंभु गादीवर बसला; त्या वेळेस त्याची चुलती तारा आईसाहेब शाहूराजाबरोबर सातारा किल्ल्यास भांडत होती; तेव्हां कोल्हापुरास तिला लावून दिली. सातारा किल्ला शाहूराजानें घेतला. ताराऊ व संभाजी असे कोल्हापूरचें राज्य करीत होते. त्या संभाजीचा व शाहूचा तह सन १७३० सालांत झाला आहे. ताराऊसाहेब राजशक ८८ सन १७६१।६२ सालांत कोल्हापूरचे राज्यावर असताना मयत झाली.] स्वामी राज्यासनारूढ जाहले. ते वर्षी रामचंद्र पंडित सन्निध असतां त्यांचे विद्यमानें स्वामींनीं श्रीकराचार्य यांचें नांवें मौजे मजकूरचें भोगवटीयास राजपत्र दिल्हें. त्याउपरी कृष्णाचार्य व शामाचार्य यांणीं मांगले विषयीं श्रीकराचार्यासी कटकट आरंभिली. गावाचे पत्रीं आमचीं नांवें घातलीं आहेत. यास्तव आह्मांस गांवाचा अंश द्यावा म्हणून शामाचार्यांनीं तो बहुत हट्टनिग्रहें व्यवहार आरंभिला. तेव्हा श्रीकराचार्यांना ममता सोडून व्यवहारास प्रवर्तावें लागले. ते समयीं श्रीमत् तपोनिधि श्रीपादस्वामी पन्हाळ्यास आले. त्यापाशीं श्रीपत्याचार्य संनिध असतां, रामचंद्र पंडित यांणीं प्रसंग केला कीं, चंजीमध्यें मांगले गांव श्रीकराचार्य यांस राजश्रीनीं दिल्हा. गांवाचें पत्रीं श्रीकराचार्य यांणीं पांचांचीं नांवें घातलीं. यास्तव कलह होत आहे. याचा निर्णय धर्मशास्त्रानुसार स्वामींनीं करून दिल्हा पाहिजे. म्हणून प्रसंग केला. तेव्हां श्रीकराचार्य व कृष्णाचार्य व शामाचार्य यांस श्रीपादस्वामींनीं विचारिलें, निर्णय करूं त्यांस तुह्मीं मान्य आहां कीं काय? त्यास श्रीपत्याचार्य बैसले असतां, श्रीकराचार्य व कृष्णाचार्य व शामाचार्य यांणीं श्रीस्वामीपुढें शपथ केली कीं, जो स्वामी निर्णय करितील त्यास आह्मीं मान्य आहों. तोंवरी आह्मीं कांहीं मांगलेचें नांव घेणार नाहीं. म्हणून रामचंद्र पंडित या देखत शपथ केली. त्याउपरी श्रीस्वामी बोलिले कीं, गदगहून मठावर जावें लागतें. तेथें गेल्यावर पंडिताचे संमतें धर्मशास्त्रानुसार निर्णय करून पाठवितों. म्हणोन बोलले. गदगहून मठास गेले. तेथून पत्र येईल त्याप्रमाणें यांणीं वर्तावें. त्यास स्वामींचीं पत्रें आल्या पूर्वी कृष्णाचार्य गांवास जाऊन तेथें बहु धान्य होतें, त्याचा विभाग करून घेऊन गेले. हें वर्तमान श्रीस्वामींस विदित जाहल्यानंतर श्रीस्वामींनीं रामचंद्र पंडित यांस पत्र पाठविलें. तेथें लिहिलें कीं, श्रीकराचार्य व कृष्णाचार्य व शामाचार्य यांणीं तुह्मांदेखत आह्मांपुढें शपथ केली कीं, निर्णयपत्र येईल तों आह्मीं कोण्ही मांगलेचें नांव घेणार नाहीं. म्हणून त्यास आमचें पत्राची प्रतिक्षा श्रीकराचार्य

करित राहिले, आणि आमचें पत्राची प्रतिक्षा न करितां पत्रांतून पूर्वी कृष्णाचार्य व शामाचार्य एकमत जाले आणि कृष्णाचार्य गांवास जाऊन धान्याचा विभाग करून घेऊन गेले. आह्मांपुढें शपथ केली असता, शपथ मोडून वर्तणूक केली. आह्मयावत कधींच मर्यादातिक्रम कोण्ही केला नाहीं आणि यांणीं मर्यादातिक्रम केला. तेव्हांच त्यास शिक्षा व्हावी. परंतु आता क्षमा केली असे. पुढें ऐसी वर्तणूक केल्यामें शिक्षा विशेष होतील. असें लेहून निर्णय लिहिला कीं, अविभक्त बंधू असतां पितृद्रव्य (येन) [नव्हे] करिता एकानें आपले श्रमसाहासें करून विद्यापरिश्रम करून जें मिळविलें तें ज्याणें मिळविलें त्यासच उपभोग. वरकड त्याचे भाऊबंदास संबंध नाहीं. गांवदान श्रीकराचार्य यांणीं घेतलें आणि गांवाचें राजपत्रीं पाचाचीं नावें घातलीं म्हणून सांगितलें. तरी तैसें पत्र सर्व शास्त्रविरुद्ध. तें प्रमाण नव्हे. ऐसें निर्णयपत्र धर्मशास्त्रवचनयुक्त रामचंद्र पंडित यास पाठविलें. श्रीपत्याचार्यास ऐसें पत्र पाठविलें. तेथें लिहिलें कीं, आह्मांपुढें कृष्णाचार्य व शामाचार्य यांणीं शपथ करून शपथ मोडिली. आमचें निर्णयपत्रां(तून) खेरीज पूर्वीच कृष्णाचार्य मांगले गावास जाऊन धान्याचा विभाग करून घेऊन गेले म्हणून ऐकिलें. त्यास तात्काळ शिक्षा व्हावी. परंतु आतां क्षमा केली आहे. पुढें ऐसें चालिलेनें शिक्षा विशेष होतील. ऐसें श्रीपत्याचार्यास पत्र पाठविलें आणि श्रीकराचार्यास पत्र पाठविलें. तेथें लिहिलें कीं, धर्मशास्त्रानुसार निर्णय अवघी रामचंद्र पंडित यांचें पत्रीं लिहिला नाहीं. आह्मीं त्याप्रमाणें मांगले ग्राम तुम्हांसच उपभोग, वरकड तुमचे भाऊबंदास संबंध नाहीं. तुह्मीं ग्राम उपभोग करून सुखें राहाणें. ऐसें श्रीकराचार्याचें नावें राईस पत्र पाठविलें, ऐसीयास श्रीपादस्वामी तुमचे गुरु व जगत्गुरु त्यापाशीं शपथ करून, अन्यथा वर्तणूक करावी हें तुह्मास उचित नव्हे. व्यवहार तो रामचंद्र पंडित यांस श्री स्वामींनीं पत्र पाठविलें त्यांत खंडक आणिखी गोष्टींनें मौजे कालगांव, तर्फ तारगांव इत्यादि व श्रीकराचार्यास बाबती देखील मुकासा, राजश्री कैलासवासी यांचे वेळेपासून चालिला, त्याविषयीं राजश्री शिवाजीराजे यांणीं पत्र पूर्वी चालिल्याप्रमाणें दिल्हें. तीं गावें याचे वेळेसही श्रीकराचार्यास चालिलीं. तो गांव कृष्णाचार्यानीं राजश्री शाहूराजे बाजी यांजकडून(न) सर्व मान्य इनाम करून घ्यावयाचा उद्योग केला. तेव्हां श्रीकराचार्य यांणीं कृष्णाचार्यास पत्र लिहिलें कीं; तुह्मीं मौजे कालगांव इनाम करून घ्यावयाचा उद्योगकरितां, युक्त नव्हे. तो गांव आम्हास बहुत दिवस चालिला आहे. तुह्मीं इनाम गांव घ्यावयाचा तो दुसरा गाव घेणें म्हणून लिहिलें. तें श्रीकराचार्य यांणीं चित्तीं धरिलें कीं, राजश्री शाहूराजे थोर आहेत, आपण विद्यावंत आहों. आमचा गांव आह्मांस चालवितील, असें चित्तीं धरून लिहिलें. असें लिहिलें असतांही कृष्णाचार्यानीं मौजे कालगांव राजश्री शाहू राजे बाजी याकडून सर्व इनाम करून घेतलें. आणि त्या गांवचें राजपत्र आपलें एकट्याचें नावें घेतलें. त्या पत्रीं श्रीकराचार्यांचें नांव घातलें नाहीं आणि श्रीकराचार्यानीं पत्र लिहिलें होतें, त्यामें

प्रतीउत्तर लिहिलें कीं, हें गांव तुम्हांस पूर्वी चालिलें होतें म्हणून बक्षानेंही आम्हांस दिल्हें. तुम्हांस चालिलें नसतें, तरी आम्हांस प्राप्त होणें असे. भावीत ऐसें कृष्णाचार्यांनीं संस्कृतें करून स्वहस्ताक्षरें पत्र लिहिलें. एवंच नानाप्रकारें श्रीकराचार्यांचें कृष्णाचार्यांनीं घेतलें. तो गांव श्रीकराचार्यास पूर्वी चालिल्याप्रमाणें स्वामींनींही देऊन राजपत्र दिल्हें आहे. आमली गोष्ट ऐसीजे, श्रीपादस्वामींपाशीं व्यवहारप्रसंग पडिला, तेव्हां कृष्णाचार्य, श्रीकराचार्यांचेंच घरीं होते. श्रीकराचार्यांनीं आदरें करून घरीं राहून घेतलें होतें. भोजन नित्य तेथेंच करीत होते. ऐसें असतां कृष्णाचार्यांनीं, श्रीकराचार्यांशीं विश्वासघात केला ऐसाजे. शामाचार्यांनीं मांगलेविषयीं ताकिदींचीं सदरहू राजपत्रें पांचांचें नांवें घेतलीं होतीं, तीं शामाचार्यांनीं श्रीकराचार्यांचें मांगलें गांव श्रीकराचार्यांकडे टाकून श्रीकराचार्यांपाशीं दिल्हीं होतीं; तीं श्रीकराचार्यांचे पोथीमध्यें होतीं. त्या दोन्ही पत्रांमधून गांवकऱ्याचें नांवें पत्र होतें. तें कृष्णाचार्यांनीं श्रीकराचार्यास न कळत, पोथींतून चोरून नेलें, आणि साताऱ्यास जाऊन, राजश्री शाहू राजे बाजी यांजकडून पांचांचें नांवें पत्र करून घेतलें, आणि मांगलें गांवीचें उत्पन्न सातारतर्फेनें आपण एकलेच खात आहोंत. इकडे श्रीपादस्वामींकडून मांगलें गांबास आपणांस संबंध नाहीं असें जालें. मग तिकडून या प्रकारें पांचांचें नांवें पत्र करून घेतलें. ऐसें श्रीकृष्णाचार्यांनीं विश्वासघात करून पत्र चोरून नेलें. हें कृष्णाचार्यांनीं अमीप (अनुचित) कर्म केलें. श्रीपादस्वामी व्यवहार खंडिले. नंतर शामाचार्यांनीं स्वामींपाशीं विनंति केली कीं, महाराजांनीं आमचा योगक्षेम चालावयास एक गांव दिल्हा पाहिजे म्हणून विनंति केली. त्याजवरून स्वामींनीं यांचा योगक्षेम चालवावयास्तव मौजे आमनूर, तर्फ तारळें हा गांव यांस सर्वमान्य इनाम दिल्हा. त्या गांवचें राजपत्रीं शामाचार्य यांनीं आपले पिते श्रीपत्याचार्य यांचें एकट्याचें नांव घातलें. श्रीकराचार्यांचें नांव घातलें नाहीं. अमनूर इनाम जाहल्यानंतर श्रीपत्याचार्यांनीं शामाचार्यास म्हटलें कीं, श्रीकराचार्यास मांगले इनाम, आम्हांस अमनूर इनाम जाहलें. आतां तूं मांगलें विषयीं कटकट करूं नको म्हणून सांगितलें. त्यावरी श्रीपत्याचार्य बारा वर्षें जिवंत होते. तोंपर्यंत शामाचार्य उगेच होते. गांवाचा भोगवटा अविच्छिन्न श्रीकराचार्यासच असतां शामाचार्य औरंगाबाद प्रांतें, स्वामी स्वारीस गेले असतां, स्वामीसन्निध आले. आणि स्वामींपाशीं गैरवाका सांगितला कीं, मांगलें गांव चंजीमध्यें कैलासवासी स्वामींनीं पांचांस धारादत्त दान दिल्हें असें. महाराजांनी पांचांचें नांवें पत्रें दिल्ही पाहिजेत. म्हणून गैरवाका सांगितला. त्याकरून स्वामींनीं मातुश्री आईसाहेबांस एक पत्र दिल्हें कीं, गांव चंजीमध्यें कैलासवासी स्वामींनीं पांचांस धारादत्त दान दिल्हें आहे. वास्तव पांचाजणांस चालवणें. म्हणून श्रीकराचार्यास पत्र कीं, तुम्हीं पांचजण गांवाचा उपभोग करणें; व गांवकऱ्यांस पत्र कीं, गांवाचा देवज उत्पन्न होईल तों पांचाजणांस देत जाणें. म्हणून अशीं तीन पत्रें घेऊन, शामाचार्य पन्हाळ्यास आले. आणि त्या पत्रावरून श्रीकराचार्यांशीं गांवांतिलीं

पुन्हां कटकट आरंभिली. त्याउपरी स्वामी स्वारींतून पन्हाळ्यास आले. तेच प्रसंगीं श्रीमत् शंकराचार्य स्वामी मठ संकेश्वर हे पन्हाळीयास आले होते. शामाचार्यांनीं मांगलेविषयीं श्रीकराचार्याशीं कटकट आरंभिली आहे. हें वर्तमान स्वामींस विदित जाहलें. मग हा व्यवहार निवडावयाविषयीं श्रीस्वामींस, स्वामींनीं सांगितलें कीं, धर्मशास्त्रानुसार व्यवहार निवडून दिल्हा पाहिजे. म्हणून सांगितलें. आणि राजश्री सदाशिवभट उपाध्ये व दशरथ जोशी व कवींद्र व आणखी पंडित व सरकारकून व आणखी कारकून व प्रतिष्ठित हुजुरी, श्रीस्वामीसन्निध हा व्यवहार निवडावयास पाठविले. त्यावरी श्रीस्वामींनीं श्रीकराचार्य व शामाचार्य यांस विचारिलें कीं, आम्हीं धर्मशास्त्रानुसार व्यवहार निवडूं, त्यास तुम्हीं मान्य आहां कीं काय? त्यास श्रीकराचार्यानीं आगत्य, आम्हीं मान्य आहों, ऐसें म्हणून राजीनामा लेहून दिल्हा. शामाचार्यानीं आम्हींही मान्य आहों म्हणून राजीनामा लेहून दिल्हा. राजीनामे लेहून देते वेळेस श्रीस्वामींनीं शामाचार्यास म्हटलें कीं, तुम्हीं चौघेजण श्रीकराचार्याशीं व्यवहार सांगत आहां. त्यास तुम्हीं एकलेनीं राजीनामा लेहून दिल्हा. वरकड तिघांचें कैसें? म्हणून त्यास शामाचार्य बोलिले कीं, आपण एकले आपणांसाठीं व्यवहार सांगत नाहीं. आपण चौघांसाठीं व्यवहार सागतों. मजमध्यें चौघे आहेत. असें समस्त मजालसींदेखत श्रीस्वामीसन्निध बोलिले. ते व्यवहारप्रसंगीं कृष्णाचार्याचे पुत्र माधवाचार्यही होते. शामाचार्यानींही राजीनामा लेहून दिल्हा. त्यावरी श्रीस्वामींनीं समस्तांस विचारिलें कीं, मुख्य गोष्टी, गाव हातावरी पाणी घालून धारादत्त दान कोण्हास दिल्हें म्हणून विचारिलें. हें स्वामींस विदित जालेवरी स्वामींनीं तत्वतः हे गोष्ट मनास आणिलीच; मध्यें गांवही होते वेळेस मुख्य मातुश्री आईसाहेब तेथें होत्या त्यास विचारिलें. त्याणीं निर्वाहरूप परी सांगितलें कीं, गांव चंनीमध्यें आम्हा देखत श्रीकराचार्याचे हातावरी पाणी घालून, ग्रहणीं श्रीकराचार्यास दान दिल्हा आहे. म्हणून सागितलें. व ते समयीं प्रतिष्ठित कारकून अंताजी त्रिमळ आदिकरून व हुजूर बयाजी मोरे व शंकराजी भानगिरे व आणखी होते. त्यांसही विचारिलें. त्यांणीही परिच्छिन्न तैसेंच सागितलें. तें श्रीस्वामींस विदित जालें व श्रीस्वामींनीं विज्ञानेश्वर व व्यवहारमयुख व दानकमलाकर हे ग्रंथ आवघे सभेदेखतां वाचून तेथील वचनानुसार निर्णय करून सांगितलें कीं, ग्राम अथवा भूमि धारादत्त दान दिल्हें आणि यांचें पत्र पंतास विपरीत जालें असोन, तें तरी पत्र प्रमाण नव्हे; व पंतास विपरीत पत्र तें अप्रमाण. तैसें पत्र कदाचित् जालें तरी पत्र परतून पंतानुसारें पत्रीं करून द्यावें. तैसा पंतास विदित पत्रलेख ज्याणें केला त्यांणीं एक हजार ऐशी दबू दंड दिवाणांत द्यावा. ऐसा निर्णय सांगितला. त्याचे रुपये पंचेचाळीस हिशेब जाहले. श्रीकराचार्यानीं आपण गांवदान घेऊन गावाचें पत्रीं ममतेनें पाचाचीं नांवें घालून शास्त्रविरुद्ध पत्र केलें. यास्तव पंचेचाळीस रुपये श्रीकराचार्यानीं दिल्हे. त्या वेळेस श्रीस्वामींनीं निर्णयपत्र करून

द्यावें. तरी तें समयीं नवरात्रोत्सव बहुत समीप आला, यास्तव श्रीस्वामी कोल्हापुरास गेले. त्यानंतर शामाचार्य महिन्यानीं दिसगत जाहले. त्या माघारे त्यांचे पुत्र वासुदेवाचार्य याणीं श्रीकराचार्याशीं पुन्हा मांगलें विषयीं कटकट आरंभिली. हट्टनिग्रहें व्यवहारास प्रवर्तले. तेव्हा स्वामींनीं राजश्री सदाशिवभट उपाध्ये व दशरथ जोशीराव व उभयतां कवींद्र व सरकारकून व आणखी कारकून व हुजरे यास आज्ञा केली कीं, तुम्हीं अवघे इसमानीं हा व्यवहाराचा इत्यर्थ करून स्वामींस सागा. म्हणून आज्ञा केली. त्यावरून अवघे बैसोन इत्यर्थ केला कीं, हा व्यवहार निवडायाविषयीं श्रीमंत स्वामींपाशीं, राजश्रीनीं सांगितलें. त्याणीं व्यवहार निवडला आहे. त्यास राजपत्र पाहून ते ज्याप्रमाणें निर्णयपत्र पाठवितील, त्याप्रमाणें भाग वारू (टू) न द्यावा, ऐसा इत्यर्थ केला. तो स्वामींस त्यांणीं सांगितला. तो स्वामींनीं, हें बहुत उत्तम केलें ऐसें म्हणून, श्रीस्वामींस पत्र लिहावें, त्याचें निर्णयपत्र येईल, त्याप्रमाणें निर्वाह करावा. ऐसा दृढ निश्चय करून, श्रीस्वामींस निर्णय लिहून, तें पत्र श्रीस्वामींस पावल्यानंतर श्रीस्वामींनीं पूर्वी निर्णय केला होता व पुन्हा धर्मशास्त्रविवेचन करून त्याप्रमाणें स्वामींपाशीं निर्णयपत्र पाठविलें व स्वामींचें पत्राचें प्रत्युत्तरपत्र पाठविलें. त्या पत्रात निर्णय लिहिला ऐसाजे, श्रीकराचार्याकडे साधकें पांच आहेत ऐसीजेः—राजश्री कैलासवासी स्वामी यानीं चंजीमध्यें मौजे मागलें श्रीकराचार्याचे हातावरी पाणी घालून त्यासच दान दिल्हें. हें मुख्य एक साधक दुसरें साधक, मातुश्री आईसाहेब आदिकरून कारकून, हुजरे श्रीकराचार्यासच गाव दिल्हा येविषयीं साक्षी आहेत. तिसरें साधक, गांवींचा भोगवटा बहुत दिवस श्रीकराचार्यासच आहे. चवथें साधक, श्रीपादस्वामींनीं या उभयताचे गुरु त्याचें निर्णयपत्र अनेक धर्मशास्त्रवचनयुक्त आहे कीं, श्रीकराचार्यासच मांगलें गांव उपभोग. वरकड श्रीकराचार्याचे भाऊबंदास संबंध नाहीं. व पांचवें साधक विज्ञानेश्वर व व्यवहारमयूख, दानकमळाकर हे ग्रंथ मनास आणिता श्रीपादस्वामींच्या निर्णयास एकार्थता जाहली ऐसीं पांच साधकें श्रीकराचार्याकडे आहे (त). यानंतर सदरहू चौघाकडे साधक पाहाता, श्रीकराचार्य याणीं आपण एकल्यानें मांगलें गांव ग्रहणीं दान घेतलें, ममतेनें लाभादि उपाधि करून सदरहू चौघांचीं नांवें पत्रीं लिहिलीं एवढें मात्र साधक भासतें. परंतु दान एकानें घेऊन पत्रीं दुसऱ्याचें नावें लेख केला. तो धर्मशास्त्राविरुद्ध. लेख प्रमाण नव्हे. यास्तव श्रीकराचार्यानीं पांचाचीं नांवें घालून पत्र केलें. तें दूर करून श्रीकराचार्यास पत्र दिल्हें आहे. त्याप्रमाणें श्रीकराचार्याचें नावें पत्र करून दिल्हें पाहिजे. ऐसें निर्णयपत्र व स्वामींचें पत्राचें प्रत्युत्तरपत्र तेथेंही हाच अर्थ लिहून दोनीं पत्रें पाठविलीं. त्याउपरी दोनींही पत्रें स्वामींनीं अक्षरशा वाचून पाहून, राजश्री सदाशिवभट उपाध्ये व सरकारकून व हुजरे यांसमक्ष श्रीकराचार्याना दिल्हीं. मुख्य अर्थ हा कीं, जो ग्राम, भूमि इत्यादि वस्तूंचें दान ब्राह्मणांस देतो तें आपलें नाम गोत्रोच्चारण व या ब्राह्मण

नाम गोत्रोच्चारण व त्या ग्रामादि याचें नामोच्चारण करून " अहं तुभ्यमिदं संप्रददे " म्हणजे मी तुजकारणें देतों. ऐसें ह्मणोन सकुश हिरण्योदकपूर्वक ग्रामादि दान ग्रहणादि पर्वकाळीं देतों. त्याचें दानपत्रीं त्याच दात्याचें नांव, अथवा ज्या ब्राह्मणानें प्रतिग्रह घेतलाच नाहीं त्या ब्राह्मणाचें नांव, अथवा जी वस्तु दिल्हीच नाहीं त्या वस्तूचें नाम लिहून दानपत्र केलें तरी तें दानपत्र अप्रमाण. तैसें पत्र ज्यानें केलें त्याणें एक हजार ऐशीं ढबू राजगृहीं द्यावे. ऐसें धर्मशास्त्र आहे. व तसें पत्र पूर्वील राजाचे कोणी एकानें लोभादि उपाधि करून केलें असेल, आणि तें वर्तमान जो राजा आहे त्यास कळलें कीं, ज्या ब्राह्मणास दान दिल्हें नाहीं त्याचें नावें हें पत्र जाहलें आहे, असें कळलें तरी तें पत्र दूर करून, यथास्थित ज्या ब्राह्मणास दान दिल्हें त्याचें नावें आणखी दुसरें पत्र करून द्यावें हा धर्मन्याय आहे. अन्यथा दोष आहे. यास्तव राजश्री कैलासवासी याणीं श्रीकराचार्यास मांगलें गांव दिल्हें आणि श्रीकराचार्य याणीं दुसऱ्याचीं नावें लिहून तें पत्र अप्रमाण. यास्तव तें पत्र दूर करून श्रीकराचार्याचें नावें दुसरें पत्र करून द्यावें. हा अर्थ श्रीमत् श्रीपादस्वामींनीं व तथा श्रीमत् शंकाराचार्य स्वामींनीं परिच्छिन्न निवडिला. यास्तव श्रीकराचार्यानीं दानास विपरीत दुसऱ्याचीं नावें लाभादि उपाधि करून लिहिलीं, ह्मणून एक हजार ऐशी ढबू ह्मणजे पंचेचाळीस रुपये हिशेबीं जाहले, ते श्रीकाराचार्यानीं दिल्हे. स्वामींनीं अवघा अर्थ यथान्याय मनास आणून मौजे मागलें हा गाव कुलबाब, कुलकानू हल्लीपट्टी व पेस्तरपट्टी जलतरुपाषाणनिधीनिक्षेप सहित करून, खेरीज हक्कदार व इनामदार करून, तीर्थस्वरूप राजश्री कैलासवासी याणीं शास्त्रविधीनें सर्वमान्य इनाम श्रीकराचार्यास दिल्हेप्रमाणें यांचा गांव याचे स्वाधीन करून तुम्हांस हें पत्र सादर केलें असे. येविशयीं आलाहिदा देशाधिकारी यांचें नावें व मौजे मजकुराचे मुकदमाचें नावें पत्रें सादर केलीं असेत. तुम्हापाशीं सदरहू पांचाजणांचें नावें पूर्वील जीं पत्रें असतील तीं कुल रद्द असेत. व शामाचार्यानीं धारूचे मुक्कामीं मौजे मागलें पाचास धारादत्त दिल्हें आहे ह्मणून जे गैरवाका सागून पांचाचें नावें पत्रें घेतलीं तीं रद्द असत. पाचास धारादत्त दिल्हें नाहीं. श्रीकराचार्यास धारादत्त दिल्हें. तुह्मां चौघांस मागलें गावाशीं संमंध नाहीं. यास्तव मांगलें गांव श्रीकराचार्य पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम अनुभवितील. बहुत काय लिहिणें.

मर्यादेय विराजते.

---

५५. राणोजी बिन पिराजी घोरपडे यांस दिलेलें वतनपत्र.

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ५८ विरोधकृतनाम संवत्सरे, आषाढ शुद्ध द्वितीया, गुरुवासर, क्षत्रियकुलावतंस श्रीराजा शंभू छत्रपति स्वामी यांणीं, राजश्री राणोजी बिन पिराजी घोरपडे

नवकस देशमुख, मामले मिरज यासी, दिल्हें वतनपत्र ऐसीजेः—तुह्मीं मनोळीचे मुक्कामीं स्वामीसंनिध विनंति केली कीं, आपले आजे राजश्री संताजी घोरपडे यांणीं, तीर्थस्वरूप राजश्री कैलासवासी स्वामींची सेवा मनोभावें केली. या करितां कैलासवासी स्वामी आपले आजे याकरितां मेहरबान होऊन, मामले मिरज येथील देशमुखींचें वतन, पूर्वी जैन व ब्राह्मण यांचें होतें. त्यास थोरले महाराज राजश्री कैलासवासी याचे पायाशीं आनराहाट केली. यास्तव त्यांचे वतन दूर केलें होतें, तें मशारनिल्हेस चंजीचे मुक्कामीं मन्हामत करून दिल्हें. त्याप्रमाणें आपले आजानीं अनुभविलें. त्या मागें आपले चुलते राणोजी घोरपडे यांणीं अनुभविलें. ते स्वामीकार्यावरी पडले. त्याउपरी आपले बाप राजश्री पिराजी घोरपडे यांणीं अनुभविलें. हल्लीं वतन सेवकाकडे चालत आहे. परंतु भोगवटीयासी पूर्वील पत्रें होतीं तीं अवांतर प्रसंगामुळें गेली. पुढें भोगवटीयास पत्रें पाहिजेत. ऐसीयास सातारीयास राजश्री शाहूराजे यांसी विनंति केली. त्यांणीं आपलीं पत्रें करून दिल्हीं आहेत. तरी स्वामींनीं आपलीं पत्रें भोगवटीयासी करून दिल्हीं पाहिजेत. ह्मणोन तुह्मीं विनंति केली, आणि तीर्थस्वरूप राजश्री शाहूराजे आबासाहेब याचीं पत्रें दाखविलीं. राजश्री संताजी घोरपडे यांणीं राज्याभिवृद्धीविषयीं श्रम असाधारण केले. त्यामागें राजश्री राणोजी घोरपडे यांनीं निष्ठेनें सेवा केली. राजश्री पिराजी घोरपडे यानीं सेवा स्वामींची एकरूप निष्ठेनें केली. हल्लीं तुह्मीं स्वामींची सेवा मनोभावें करीत आहां. तुमचे सर्व प्रकारें चालवणें स्वामींस परम आवश्यक. यास्तव पूर्वी तीर्थस्वरूप राजश्री कैलासवासी तुमच्या वडिलास, मामले मिरज कर्याती येथील देशमुखींचें वतन मन्हामत करून दिल्हें. त्याप्रमाणें स्वामी तुम्हावरी कृपाळू होऊन तुह्मास देशमुखींचें वनत पूर्ववत्प्रमाणें आजरामन्हामत करून दिल्हें असे. कर्याती एकूण आठरा. एकूण देहे एकशें शहात्तर. मामले मजकूर येथील देशमुखींचें वतन तुह्मांस आजरामन्हामत करून दिल्हें असे. या वतनास हक्क व लाजिमा, मानपान, तश्रीफ व बाजे कानू व इनामती व इसाफती, महत्कदीम चालत आहे. तरी त्याप्रमाणें करार केलें असे. तुह्मीं मामले मजकूरचे देशमुखीचे वतनाची सेवा करून, वनत तुह्मीं व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें अनुभवणें आणि स्वामींच्या पायाशीं निष्ठा धरून, वतन अनुभवून सुखरूप राहणें. निर्देशसमक्ष.

तारीख १ मोहरम, सुरुसन इसन्ने.

---

५६. श्रीकराचार्यास महाराज यांनीं दिलेलें दानपत्र.

॥ श्री ॥

॥ दानपत्रं ॥ स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके १७ प्रजापतिसंवत्सरे वैशाखशुद्धाक्षततृतीयायां भौमवासरे श्रीमत्समस्तनिगमागमप्रतिपादितसद्धर्मप्रसाधनाभ्युदयशालिना प्रवृ-

द्धकलिकल्मषप्रकृष्टतिमिरविध्वंसनदक्षदीक्षेण निखिलप्रत्यर्थिवदनमालिन्यकरानन्यसामान्यप्रतिपत्तेजःसंवर्धमानेन प्रत्यर्थिसिमंतिनीशृंगाररससशोषणपूर्वकतन्नयनवारिवृष्टिकर्मकरघनानीककादंबिनीपरिवृतेन सकलकल्याणनिकेतनेन भूवलयवर्तिक्षत्रियकुलावतंसेन महाराजछत्रपतिराजारामवर्मणा तत्तदनेकभूपतिचतुरंगवाहिनीविराजमानस्य प्रकृष्टतरयशःप्रतापस्य श्रीमन्मालोजीराजवर्मणः प्रपौत्रेण धरणिमंडलवर्त्यनेकभूपसमूहाचरमगणनांकगोचराभिधानस्य निरंतराभिवर्धमानप्रभूततरविभवप्रकृष्टतमप्रतापविशदतरयशश्चिरायप्रपूरकद्रविणादिप्रदानानित्यव्रतस्य श्रीमत्शाहाजीराजवर्मणः पौत्रेण तत्तदनेकोपाख्यानोपवर्णिते गागेयार्जुनादिसजातीयस्वविक्रमविभावुककलिकालीनवीरदर्पखद्योतभावापादकवीरतेजस्तोमस्य स्वभुजमात्रसहायनिर्जितनानाजनपदस्य समुज्वलसर्वातिगप्रतापयशःप्रकाशितभूवलयस्य श्रीमन्महाराजछत्रपतिशिवराजवर्मणः पुत्रेण निखिलनृपतिमुकुटमाणिक्यप्रभासंवलितचरणनखद्युतिना राजाधिराजेन शास्त्रप्रतिपन्नपात्रतास्पदेभ्य ऋग्वेदशाखाध्यायिभ्यः शिराळेसज्ञकग्रामवासिभ्यः पंचब्राह्मणेभ्यः शिराळेसंज्ञकनगराधस्तनकानदेसंज्ञकखेटकगता तत्स्थलीयपारिभाषिकपरिमाण विशेषरूपरूकाचतुष्टयपरिमिता भूर्दत्ता । ते च ब्राह्मणाः । नृसिंहाचार्यसुतमाधवाचार्यपुत्रो नारायणाचार्यः ॥ नृसिंहाचार्यसुतः श्रीपत्याचार्यः । नृसिंहाचार्यसुत. श्रीकराचार्य. । नृसिंहाचार्यसुत श्रीधराचार्यः ॥ नृसिंहाचार्यसुतः कृष्णाचार्यः । इति पच । एतेभ्य. एषा भूः समानपंचविभागान्कृत्वा ईषदपि निमित्तमनुद्दिश्य वृत्तिरूपेण श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं सकुशोदकधारापूर्वकं दत्ता । इयंहि भूमिः शिवराजकृतराष्ट्राक्रमणात्प्राक्प्राचीनैरेतेभ्यो ब्राह्मणेभ्यो दत्ताऽभूत् ॥ तदूर्ध्वं चास्मदीयैस्तत्समयपरिकल्पितव्यवस्थाविशेषेण तद्वृत्तिप्रयुक्तधान्यप्रदानेन एतेभ्यो ब्राह्मणेभ्यश्चालिता संप्रति एतेषां ब्राह्मणानां सुखेन योगक्षेमोपपत्त्यर्थं कृपया यथास्थितभूवृत्तिरुपेणैव दत्ता । एतदुत्तरोत्तरमेतद्ब्राह्मणपुत्रपौत्रादिवंशपरपरया चालनीयं ॥ अत्र राजसंबंधेन ग्रामसंबंधेन च इतर ग्रामसाधारणा एतद्ग्राममात्रे असाधारणाश्च नियताः केनचित्गृह्यमाणा अंशविशेषास्तदन्ये उपसर्गाश्च वर्तमाना भाविनश्च ये स्युस्ते सर्वेऽपि निर्मुक्ताः कृताः सन्ति । तद्विषये कैरप्युपद्रवो न कार्यएतदन्यथाकर्तुर्ब्रह्महत्यागुरुतल्पादिमहापातकानि भविष्यंति ॥ भूमिदानमाहात्मे धर्मशास्त्रवचनानि-ग्रामं वा नगरं वाऽपि विप्रेभ्यो यः प्रयच्छति ॥ क्षेत्रं वा सस्यसंपन्नं सर्वपापैः प्रमुच्यते ॥ अपि गोचर्ममात्रेण सम्यक्दत्तेन भूमिप. । धौतपापो विशुद्धात्मा स्वर्गलोके महीयते ॥ येऽपि संकीर्णकर्माणो राजानो रौद्रकर्मिणः ॥ तेभ्यः पवित्रमाख्यातं भूमिदानमनुत्तमं ॥ अपि पापकृतां राज्ञा प्रतिगृण्हंति साधवः । पृथिवीह्येव तदिछति नान्यदिछति पावनं ॥ किमत्र चित्रं दातारं यत्समुद्धरते धरा । प्रतिग्रहं ग्रहीतारमपि तारयते द्विजं ॥ इति । तदन्यथाकरणे नरकाद्यनर्थावेदकानि च धर्मशास्त्रवचनानि—षष्टिर्वर्षसहस्राणि स्वर्गे वसति भूमिदः ॥ आच्छेत्ता चानुमंता च तावंति नरके वसेत्॥स्वदत्तां परदत्तां वा यो हरेच्च वसुंधरा । षष्टिर्वर्षसहस्राणि स्वर्गे वसति भूमिदः ॥ आछेत्ताचानुमंताचतावतिनरके वसेत् ॥ स्वदत्तांपरदत्तां वायोहरेच्च वसुंधरां ॥ षष्टिर्वर्षसहस्राणि विष्ठायां जायते कृमिः ॥ एकैव भगिनी लोके सर्वेषामेव भूभुजां । न

भोग्या न करग्राह्या विप्रदत्ता वसुंधरा ॥ इत्येवमादीनि । तस्मान्निरस्तनिखिलोपद्रवं सर्वैः सुरक्षितं चालनीयं । पालयितुरपि फलाधिक्यविषये वचनम् दानपालनयोर्मध्ये दानाच्छ्रेयोनुपालनं ॥ दानात्स्वर्गमवाप्नोति पालनादच्युतं पदमिति ॥ निदेशसमक्ष ॥

---

५७. बोरखळ गांवाबद्दलचे दानपत्राची नक्कल.

श्रीमंगलमूर्तयेनमः

नक्कल.

नमस्तुंगाशिरश्चुंबिचंद्रचामरचारवे ॥
त्रैलोक्यभावनारंभमूलस्तंभाय शंभवे ॥

स्वस्तिश्रीमन्नृप शालिवाहन शके १६१४ स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १९ अंगिरानाम संवत्सरे आषाढ शुद्ध द्वादश्यां शुभतिथौ श्रीमदखिलनृपधुरंधरयशःप्रस्तावनिर्वर्णनीयनिरवद्यगुणनिकेतनस्य श्रीमत्मालजीराजवर्मणः प्रपौत्रेण संगरसंमुखप्रबलप्रतिभटनिखिलाद्यनिर्धूननस्ववारिसुदरीभोगप्रदकृत्तनिकृत्ततत्तदवयवस्रवदजस्रधारासमुद्गमाकृपाणपाणेः श्रीमत्शाहाजीराजवर्मणः पौत्रेण निजभुजमात्रपरिकीलितानेकजनपदतद्वृत्तिचिरंतननिखिलगिरिभूदुर्गतदवनविधिविरचिताभिनवसुदुस्तरगिरिदुर्गवर्गस्य श्रीमत्शिवराजवर्मणः पुत्रेण अनन्यशरणदेवद्विजसंस्थापनमात्रप्रयोजनाभ्युपेतमहितमहिततरक्षात्रधर्मेण दिगंतविश्रांतयशस्तोमेन कौशिकगोत्रोत्पन्नेन राजारामवर्मणा नृपमुकुटोत्तंसेन श्रौतस्मार्तकर्मानुष्ठायिने वाईग्रामनिवासाय चित्रावोपनामकनृसिंहभट्टशर्मणः पुत्राय ऋक्शाखाध्यायिने कौशिकगोत्रोत्पन्नाय चिंतामणिशर्मणे ब्राह्मणाय वांईप्रांतमध्यवर्तीनिंबसंमतास्ख्यावांतरप्रदेशमध्यवर्तीबोरखलं नामक ग्रामे पारिभाषिक चावरपरिमाणपरिमितं क्षेत्रं तथा वाईप्रांतमध्यवर्ती हवेली संमताख्यप्रदेशमध्यवर्ती पसरणीनामकग्रामे पारिभाषिकार्धचावरपरिमाणंपरिमितं क्षेत्रं च वृत्तिरूपतया निरुपाधिकं केवलपरमेश्वरप्रीत्यर्थं सकुशोदकधारापूर्वकं दत्तं तस्मिन् क्षेत्रे राजविभागवन्नियंततया देया राजसंबंधेन ग्रामसंबंधेन च देया इतरग्रामसाधारणः तत्क्षेत्रग्रामवर्तिनश्च ये ये अवांतरविभागाः स्युः ते सर्वेपि तत्क्षेत्रवद्दत्ताः तथा क्षुद्रा उपसर्गाश्च सर्वे निर्मुक्ताः कृताः एतत्क्षेत्रं अयं ग्राम उत्तरोत्तरमस्मद्वंशीयैरन्यैश्च एतद्ब्राह्मणपुत्रपौत्रकादिवंशपरंपरया यथा प्रदानं चालनीयः यद्यत्र कोप्ययथाकुर्यात् स एक विंशतिपूर्वान् एकविंशतिपरांश्च निजपुरुषान् रौरवे पातयिष्यति। तस्य काश्यां ब्रह्महत्यादि पातकानि अन्यजातीयस्य तत्तच्छास्त्ररीत्या महापातकानि स्युः । अस्मिन्नर्थे प्रमाणानि दत्तानुपालने सुकृतविशेषप्रमापकानि—दानपालनयोर्मध्ये दानात श्रेयोनुपालनं । दानात्स्वर्गमवाप्नोति पालना-

दच्युतं पदं ॥ स्वदत्तात् द्विगुणं पुण्यं परदत्तानुपालनं ; परदत्तापहारेण स्वदत्तं निष्फलं भवेत् ॥२॥ इत्यादीनि । तथा परदत्तापहारे प्रत्यायकानि—स्वदत्तां परदत्तां वा याहेरच्चेच वसुंधरां । सविष्ठायां कृमिर्भूत्वा पितृभिः सहमज्जति ॥ एकैव भगिनी लोके सर्वेषामेव भूभुजां । न भोग्या न करग्राह्या विप्रदत्ता वसुंधरा ॥ इत्यादीन्यालोच्य निरस्तनिखिलोपद्रवं निरंतरायतया सुरक्षितं सर्वैश्चालनीयं सत्यमिदं दानपत्र जाणिजे निदेश समक्ष.

---

५८. विनायक गोसावी चिंचवडकर यांस दिलेलें दानपत्र.

नक्कल

॥ श्रीः ॥

राजश्री चिंचवाडनिवासि
विनायक गोस्वामिभ्यः

दानपत्रं ॥ स्वतिश्री राज्याभिषेक शके १८ प्रजापतिनाम संवत्सरे ज्येष्ठकृष्ण द्वितीयायां भौमवासरे श्रीमत्समस्तनिगमागमप्रतिपादितसद्धर्मप्रवृत्तिप्रसाधनाभ्युदयशालिना प्रचुरप्रवृद्धकलिकल्मषप्रकृष्टतिमिरविध्वंसनदक्षदीक्षेन निखिलप्रत्यर्थिवदनकैरवमालिन्यकरानन्यसामान्येतजः संवर्धमानेन प्रत्यर्थिसीमंतिनीशृंगाररससंशोषणपूर्वकतन्नयननीरातिवृष्टिकरसमुच्छळत्कृपाणिकासौदामिनीभासुरभयंकरघनानीकाकादंबिनीपरिवृतेन सकलकल्याणनिकेतनेन मार्तंडान्वयसंभवेन क्षत्रियकुलावतंसकेन श्रीमन्महाराजछत्रपतिराजारामवर्मणा तत्तदनेकभूपतिसमृद्धचतुरंगवाहिनीविराजमानस्य प्रभूततरयशःप्रतापस्य श्रीमन्मालोजीराजवर्मणः प्रपौत्रेण धरणिमंडलवर्त्यनेकभूपसमूहाचरमगणनांकगोचराभिधानस्य निरंतराभिवर्धमानप्रभूततरविभवप्रकृष्टतमप्रतापविशदतरातत्यशश्चित्ताशयप्रपूरकद्रविणादिप्रदाननित्यव्रतस्य श्रीमन्महाराजशाहाजीराजवर्मणः पौत्रेण तत्तदनेकोपाख्यानोपवर्णितगागेयार्जुनादिविक्रमसजातीयस्वविक्रमविभावुककळिकाळीनवीरदर्पखद्योतभावापादकवीरतेजःस्तोमस्य स्वभुजमात्रसहायनिर्जितनानाजनपदस्य समुज्वलसर्वातिगप्रताप यशःप्रकाशितभूवळयस्य श्रीमन्महाराजछत्रपतिशिवराजवर्मणः पुत्रेण निखिळनृपतिमुकुटमाणिक्यप्रभासंवळितचरणनखद्युतिना राजाधिराजेन शास्त्रप्रतिपन्नपात्रतास्पदेभ्यः तपःसदाचारविधूतकल्मषेभ्यः खेडेबारेसंज्ञकग्राभाधस्तनकेळवर्डे संज्ञकग्रामे तत्रत्यपरिभाषासंकेतितचावरारूयपरिमाणपरिमिता तथा जांवें संज्ञकग्रामे तादृश अर्धचावरारूय परिमाणपरिमिता तथा हींजवर्डीसंज्ञकग्रामे तादृश अर्धचावरपरिमिता भूः ॥ तथा हींजवर्डी संज्ञकः सर्वोपि ग्रामः इतिचतुष्टयं वृत्तीकृत्यदत्तं ॥ तच्च पारिभाषिक व्यवहारेणेत्थं । मौजे केळवर्डे तरफखेडेबोरें चावर १ ॥ ॥ मौजे जांबेतरफ हवेली प्रांत पुर्णे चावर -॥- मौजे हींजवर्डी तरफ कर्यातिमावळ चावर .॥. इत्येवं चावरद्वयं॥ तथामौजे हिंजवडीतरफ कर्यातिमावळ संपूर्णग्राम १ इत्येवंप्रकारेण चावरद्वय परिमिताभुः तथा एकः

संपूर्णो ग्रामश्च नूतनवृत्तिरूपेण ईषदपि निमित्तमनुदिश्य भाषया अजरामच्छामतीकृत्य सकुशोदकधारापूर्वकं दत्तं ॥ इयं वृत्तिः श्रीमद्वोस्वामिवंशपरंपरया उत्तरोत्तरं चालनिया ॥ एतद्वृत्तौइतरग्रामसाधारणास्तग्राममात्रे असाधारणाश्च नियताः करवत्गृह्यमाणा अंशविशेषाः तदन्ये क्षुद्राउपद्रवा राजसंबंधेन ग्रामसंबंधेन विद्यमाना भाविनश्च ये स्युस्ते सर्वेपि निर्मुक्ताः कृताः संतित द्विषये कैरप्युपद्रवो न कार्यः॥ दत्तवृत्त्यन्यथा कर्तुर्ब्रह्महत्यामातृगमनादि महापातकानि भविष्यंति ॥ भूमिदानमाहात्म्ये धर्मशास्त्रवचनानि ॥ ग्रामं वा नगरं वापि विप्रेभ्यो यः प्रयच्छति । क्षेत्रं वा सस्यसंपन्न सर्वपापैः प्रमुच्यते॥अपि गोचर्ममात्रेण सम्यक्दत्तेन भूमिपः॥ धौतपापो विशुद्धात्मा स्वर्गलोके महीयते ॥ अपिपापकृतां राज्ञां प्रतिगृण्हंति साधवः ॥ पृथिवीं ह्येतदिछंति नान्यदि छंति पावनं । येपि संकीर्णकर्माणो राजानो रौद्रकर्मिणः ॥ तेभ्यः पवित्रमाख्यातं भूमिदानमनुत्तमं ॥ किमत्रचित्रं दातारं यत्स मुद्धरतेधरा ॥ प्रतिग्रहग्रहीतारमपितारयते द्विजं ॥ इत्यादीनि ॥ पाळयितुरपिफळाधिक्ये वचनं ॥ दानपाळनयोंमध्ये दानाच्छ्रेयोनुपाळनं ॥ दानात्स्वर्गमवाप्नोति पाळनादच्युतं पदं इति॥ अन्यथाकर्तुस्तु नरकानर्थावेदकधर्मशास्त्रवचनानि ॥ षष्टिर्वर्षसहस्राणि स्वर्गे वसति भूमिदः ॥ आछेत्ता चानुमंता च तावंति नरके वसेत् ॥ स्वदत्तां परदत्तांवा यो हरेच्च वसुंधरां ॥ स विष्ठायां कृमिर्भूत्वा पितृभिः सहमज्जति ॥ एकैव भगिनी लोके सर्वेषामेव भूभुजां ॥ न भोग्या न करग्राह्या विप्रदता वसुंधरा इत्यादीनि संति ॥ एतत्सर्वमालोक्य सर्वैर्निरस्तनिखिळोपद्रवं सुरक्षितं चालनीयं निदेश समक्ष.

---

५९. विवायक गोसावी चिंचवडकर यांस दिलेलें दानपत्र.

॥ श्री ॥

(संस्कृत सनदेचे नकलेचा तर्जमा मराठींत.)

राजेश्री चिंचवडी राहणार विनायक गोसावी यांस.

दानपत्र ॥ कल्याण असो राज्याभिषेकापासून १८ वें वर्ष प्रजापति संवत्सरांत ज्येष्ठ माशीं कृष्णपक्षीं द्वितीयेस मंगळवारीं सारे वेदांत व शास्त्रांत सांगितलेला उत्तम धर्म चालण्याचे साधनांचा उदय ज्याचे राज्यांत झाला आणि फार वाढलेला जो कलियुगांतील पातकरूप आधेर त्याचा नाश करणेविषयीं ज्याणें नेम केला आहे आणि सारे शत्रूंचीं तोंडें हीं कोणीएक कमळें त्यांना म्लान करणारा ज्याचा प्रताप आहे आणि शत्रूंचे बायकांचे जे शृंगाररस त्यांना सुखवून त्या बायकांचे डोळ्याचे पाण्याची वृष्टि करणाऱ्या आणि विजेसारख्या तेजस्वी चमकणारे तरवारींनीं युक्त मेघाप्रमाणें ज्याचे हात दृढ आहेत आणि संपूर्ण कल्याणाचें स्थान व सूर्यवंशीं उत्पन्न झालेला आणि क्षत्रिय कुळाचा जसा तुरा आणि संपूर्ण राजांचे सेनेपेक्षां उत्कृष्ठ सेनेकडून शोभायमान मोठा यशस्वी असा जो मालोजी राजा

याचा पणतू पुन्हां पृथिवींतले राजांची गणना करावयाची तेव्हां शेवटीं या राजाचे नाव घेत असत आणि दिवसेंदिवस संपत्ति, प्रताप आणि यश ज्याचे वाढतात व नेहमीं द्रव्यदानादिक दानें करणारा जो शहाजी महाराज याचा नातू पुन्हां शूरांचें तेज ज्याचे तेजापुढें काजव्यासारखें आहे आणि ज्यांच्या कथा नानाप्रकारें करून वर्णिल्या आहेत असे जे भीष्म व अर्जुन त्याप्रमाणें पराक्रमी आणि एकट्यानें नाना देश जिंकिले आणि सर्वांपेक्षां पृथिवीमंडळावर ज्याचे कीर्तीचा आणि यशाचा प्रभाव अधिक आहे. असा जो छत्रपति शिवराजा त्याचा पुत्र पुन्हा सारे राजांचे मुकुटाचे माणकाचे तेजानें युक्त आहे ज्याचे पायाचे नखाची कांती असा जो राजाराम छत्रपति यानें शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें योग्य व सदाचारेंकरून संपूर्ण पातकें ज्यांची नष्ट झालीं आहेत अशास खेडेबारें गांवाखालचे केळवडें गांवी तेथें चाहूर असें म्हणतात तो चाहूरभर आणि जांबेगावीं त्या प्रमाणेंच अर्धा चाहूरभर आणि हिंजवडी गांवांत अर्धा चाहूरभर जमीन आणि हिंजवडी गांव सारा अशीं चार इनाम दिलीं॥ वर लिहिलें तें प्राकृत भाषेत याप्रमाणें ॥ मौजे केळवडें तर्फ खेडेबारें चाहूर १ मौजे जांबे तर्फ हवेली प्रांत पुणें चाहूर -॥- मौजे हिंजवडी तर्फ कर्यातमावळ चाहूर -॥- याप्रमाणें दोन चाहूर आणि मौजे हिंजवडी तर्फ कर्यातमावळ हा सारा गांव याप्रमाणे दोन चाहूर जमीन आणि एक सारा गांव कोणतेही कारणाशिवाय (म्हणजे कांहीं कामाबद्दल नव्हे केवळ धर्मार्थ) हातांत दर्भ घेऊन हातावर पाणी घालून चरितार्थ चालायासाठीं दान दिले ॥ हें दान मशारनिल्हे गोसावी यांचे वशास पुढें चालवावें ॥ या गावात दुसरे किंवा विशेष या गांवासच (करवद्गुमाणाः याचा अर्थ बरोबर कळत नाहीं परंतु कर किंवा हिस्सा असा ह्या शब्दांचा अर्थ आहे असें वाटतें) हिस्से आहेत त्याशिवाय दुसरे लहान साहान उपद्रव सरकाराकडील किंवा गांवाकडील हल्लीं आहेत किंवा पुढें होतील ते सारे सोडले असत. त्याविषयीं कोणी कांहीं उपद्रव करू नये ॥ दिलेले इनामांत फेरफार करणारास ब्रह्महत्येचें व मातृगमनाचें पातक लागेल ॥ भूमीदानाचे माहात्माविषयीं धर्मशास्त्रांतील श्लोक ॥ जो गांव किंवा शहर ब्राह्मणांस देतो किंवा उत्तम पिकाचे शेत देतो त्यांचीं सर्व पापें जातात । शेवटीं गाईचे कातड्या एवढी भूमि राजानें उत्तम प्रकारें करून दिली असतां त्याचीं सर्व पापें जाऊन तो स्वर्गीत पूज्य होतो ॥ पापी राजांपासूनही भूमिदान साधू घेतात. कारण कीं याप्रमाणें दान घेणें पवित्र आहे असें दुसरें नाहीं ॥ जे राजे वाईट व क्रूर कर्म करणारे आहेत त्यापासूनही भूमिदान घेतलें असता उत्तम आहे ॥ पृथिवी दान करणाराचा उद्धार करिते यांत आश्चर्य काय ? परंतु जो ब्राह्मण दान घेतो त्यालाहि तारीत्ये ॥ अशीं अनेक आहेत ॥ दिलेलें चालविणारास अधिक फळ आहे या विषयीं ॥ दान देणें आणि दिलेलें चालविणे यांत दिल्यापेक्षां चालविणें अधिक पुण्याचें काम आहे ॥ दानेंकरून स्वर्गप्राती होत्ये ॥ आणि चालविण्यानें मुक्ती होते. जो दिलेलें फिरवितो (म्हणजे हिसकून घेतो) त्याला नरकप्राप्ति होते. या विषयीं धर्मशास्त्रांतील वाक्यें ॥ जो भूमि देतो तो साठ हजार वर्षें स्वर्गीं

राहातो आणि जो अपहार करतो किंवा अपहार करण्यास जो संमत देतो, तो तितकींच वर्षें नरकांत राहातो ॥ आपण दिलेली किंवा दुसऱ्यानें दिलेली भूमि जो हिसकून घेतो, तो आपले पितरासुद्धा किडा होऊन नरकांत बुडतो ॥ ह्या लोकात ब्राह्मणास दिलेली जमीन सारे राजांस बहीण एकच आहे तिचा भोग घ्यावयाचा नाहीं आणि वसूल घ्यावयाचा नाहीं ॥ याप्रमाणें साऱ्याचा सर्वांनीं विचार करून काहीं एक उपद्रव न करिता सुरक्षीत चालवावें.

समक्ष हुकूम.

---

६०. श्रीकराचार्यास महाराजांनीं दिलेलें दानपत्र.

॥ श्रीरस्तु ॥

ताळीक

नमस्तुंगशिरश्चुंबिचंद्रचामरचारवे ॥
त्रैलोक्यनगरारंभमूलस्तंभाय शंभवे ॥

शिका

स्वतिश्री राज्याभिषेक शके २२ धातृनाम संवत्सरे वैशाखपौर्णमास्या सौम्यवासरे श्रीमदखिलनृपधुरंधरयशःप्रशस्तिप्रस्तावप्रथमनिर्वर्णनीयनिरवद्यगुणनिकेतनस्य श्रीमत् मालजीराजवर्मण प्रपौत्रेण संततसमुच्चितदिगंतसमागतार्थिजनमनोरथातिगवसुवितरणविस्मारितकर्णबलिप्रमुखवदान्यवीरस्य श्रीमत्शाहाजीराजवर्मणः पौत्रेण निजभुजबलमात्रनिर्जितानेकजनपदस्य परमपौरुषाक्रांतचिरंतनगिरिदुर्गभूदुर्गवर्गाभिनवविरचितसुदुस्तरगिरिदुर्गपते. श्रीमत् शिवराजवर्मण पुत्रेण देवद्विजसंस्थानप्रतिष्ठापनाभ्युपेतमहिततरक्षात्रधर्मेण दिगंतविश्रातयशसा कौशिकगोत्रोत्पन्नेन राजारामवर्मणा माधवाचार्यपुत्र. नारायणाचार्य. तथा श्रीपत्याचार्यपुत्रः शामाचार्य तथाश्रीकराचार्य पुत्रः हरिराजाचार्य· तथानरसिंहपंडिताचार्यपुत्र· श्रीधराचार्य तथानरसिंहपंडिताचार्यपुत्र कृष्णाचार्य इतिपंचभ्य. काश्यपगोत्रोत्पन्नेभ्यः ऋक्शाखायिभ्य· अधीतवेदशास्त्रेभ्यो ब्राम्हणेभ्यः पूर्वमांगले ग्रामकृतनिवासिभ्य. पन्नाळे नामकस्य महागिरि गिरिदुर्गप्रथमाभिधेयप्रभूतगुणविराजमानगिरिदुर्गस्य प्रातवर्ति सातवें नामकावांतरसंग्राहकग्रामस्याधस्तन मांगलेनामको ग्राम चतु.सीमासहित निधिनिक्षेपवनोपवनजळतरुतृणपाषाणादि यावद्ग्रामेण वस्तुजातेन सहितः किंचिदपि निमित्तमनुद्दिश्य केवलं श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं नूतनतया वृत्ती कृत्य स्वग्रासग्रस्तास्तरूपचंद्राराहूपरागे महापर्वणि सदक्षिणं सकुशोदकधारापूर्वक एतद्ब्राम्हणवंशपरंपरया दत्त. ॥ अस्मिन्ग्रामे राजसंबंधेन ग्रामसंबंधेन प्राचीनवृत्त्यंशव्यतिरिक्ताः इतरग्रामसाधारणास्तद्ग्राममात्रवृत्तिनश्च वर्तमाना भाविनश्च राजविभागवहेया नियता अनियताश्च

ये येविभागविशेषाः स्युस्ते सर्वेपि तद्ग्रामवत्प्रदत्ताः ॥ तथा सर्वे अवांतरोपसर्गाश्च दूरीकृताः ॥ अयं ग्राम उत्तरोत्तरमस्मद्वंशीयैरन्यैश्च एतद्ब्राह्मणवंशपरंपरया यथाप्रदानं चालनीयः ॥ अत्र यदि यः कोप्यन्यथा कुर्यात् स एकविंशतिपूर्वान् एकविंशतिपरांश्च निजवंशपुरुषान् नरके पातयिष्यति ॥ तस्य काश्या ब्रह्महत्यादि पंचमहापातकानि अन्यजातीयस्य तच्छास्त्रप्रमाणतया तदभिमतमहापुण्यक्षेत्रे तदभिमतमहापातकानि च स्युः ॥ अस्मिन्नर्थे प्रमाणानि धर्मशास्त्रवचनानि ॥ दत्तानुपालयितु सुकृतविशेषविषये ॥ दानपालनयोर्मध्ये दानाच्छ्रेयोनुपालनं ॥ दानात्स्वर्गमवाप्नोति पालनादच्युतं पद ॥ तथा स्वदत्तात् द्विगुणपुण्यं परदत्तानुपालन ॥ परदत्तापहारेण स्वदत्तं निष्फल भवेत् ॥ इति ॥ तथा स्वदत्तपरदत्तापहारानिमित्तकप्रत्यवायविषये ॥ स्वदत्ता परदत्तां वा यो हरेश्च वसुंधरा ॥ स विष्ठाया क्रिमिर्भूत्वा पितृभि सह मज्जति ॥ एकैव भगिनी लोके सर्वेषामेव भुभुजां ॥ न भोग्या न करग्राह्या विप्रदत्ता वसुंधरा ॥ इत्यादीन्यलोक्य निरस्तनिखिलोपद्रवं सर्वैः सुरक्षिततया चालनीयं ॥ अयं च धर्म. सर्वै. परिपालनीय. ॥ इतीदं यथाप्रदानं सत्यं दानपत्रं निदेश समक्ष मोर्तब.

---

६१. जिवाजी खंडेराव चिटनिवीस यांस इनाम गांवें दिल्याबद्दल पत्र.

स्वतिश्री राज्याभिषेक शके ६१ आनंदनाम संवत्सरे, चैत्र शुक्ल पचमी, गुरुवासरे, क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामी याणीं, राजकार्य लेखन धुरधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री जिवाजी खंडेराव चिटनिवीस यांसी, आज्ञा केली ऐसीजेः—तुह्मीं विनंति केली कीं, आपले वडील आजे व तीर्थरूप यांनीं स्वामीसेवा केली. त्याजवरून कृपाळू होऊन, चिटनिशीचा दरख वतनी वंशपरंपरेनें करून दिल्हा व कारखानिशी जमेनिशीं दोन धंदे व सर्व राज्यातील परंपरेनें देऊन, शपथयुक्त पत्रें करून दिल्हीं. त्याअन्वयें स्वामींनींही अभयपत्र दिल्हें. चिटनिशी वेतनास गाव जमिनी मोकासे लाऊन दिल्हे. तें इनाम चालावेसें अभय वचन दिल्हें. त्याप्रमाणें पत्र करून देऊन चालविलें पाहिजे म्हणोन. त्याजवरून पूर्वीपासून कागदपत्र व वृत्त मनास आणितां, तुमचे आजे बाळाजी अवजी, थोरले कैलासवासी स्वामींनीं राज्य साधन केलें ते समयीं बहुतच श्रमसाहस करून उपयोगी पडले. त्यानतर दिल्लीस जाण्याचे प्रसंगीं संकट पडलें असता, बरोबर फार सेवा केली व राज्याभिषेकाचे समयी उपयागा पडोन स्वामींचे मनोरथ सिद्धी केली. त्याजवरून सतोषी होऊन अष्टप्रधानांतील पद द्यावयाची योजना केली असता, चिटनिशींच वतनी परंपरेनें द्यावी ऐसी विनंति केली. यावरून प्रसन्न होऊन शपथयुक्त पत्र करून दिल्हें. नंतर थोरले महाराज कैलासवासी जालीयावर कैलासवासी तीर्थरूप स्वामी याणीं कोण्ही गैरवाका समजाविल्यावरून राज्यभारप्रसंगीं सरकारकून यासी शिक्षा केल्या. त्यात यासही केली असतां, तुमचे वडील खंडो बल्लाळ यांणीं बहुत निष्ठेनें वागून, स्वामींस गोव्याचे लढाईत शूरत्वें करून व

समुद्राचे भरतीस स्वामींचा घोडा पाण्यांत पोहणी लागला असतां धरून, उडी टाकून घेऊन निघाले. याजवरून बहुतच संतोषी होऊन, शपथ करून वचन दिल्हें. सर्फराज केले. तोही प्रसंग यवनाचें प्राबल्य होऊन विज्वर जाला. स्वामींसही यवनाचे संन्निध जाणें आलें. तेथें गेलों असतां, कैलासवासी काकासाहेब चंदीकडे जाऊन, राज्यरक्षण करण्याच्या प्रयत्नास लागले. तेव्हा जातेसमयीं त्यासी संकट समय प्राप्त झाला असता, त्यास काढून देऊन आपण क्लेश भोगिले. त्यानंतर चदीस जाऊन तेथेंही सेवा निष्ठेनें केली. तेथें संकटाचा प्रसंग प्राप्त होऊन, निघणें दुर्घट पडलें असता, झुलपिकारखान व गणोजी शिर्के यासी संधि करून दामोळचें वतन दिल्हें होतें. तें शिर्के यांस देऊन त्यांचे मोच्यीतून पाळण्यांत बसवून, काढून घेऊन येऊन देशीं सेवा केली. त्यानंतर काकासाहेब समाप्त जाले. यवनास दिल्लीचें व्यसन प्राप्त जालें. तेव्हां स्वामींस त्यानीं निरोप देऊन लाऊन दिल्हें. देशीं येणें घडलें असतां काकासाहेब यांची स्त्री आईसाहेब यांस, आपला पुत्र घेऊन राज्यभार करण्याची इच्छा होऊन, दुर्बुद्धि धरली. फौजा देऊन सेनापती व परशराम त्रिंबक प्रतिनिधी रवाना केले, त्याबरोबर खंडोबास दिल्हें असतां, स्वामींस गुप्तरूपें भेटून सेनापती व सरदार याच्या खातरजमा करून सर्वांस स्वामींचे लक्षीं आणिलें. लढाई जाली. प्रतिनिधी पळून गेले. स्वामी विजयी होऊन, राज्यभार साधन प्रसंगांत सर्व स्थळें व सरदार व प्रतिनिधी सरकारकून यास स्वामीचे लक्षीं लागण्याचे उद्योग बहुत केले. पुढें तुम्हींही त्याअन्वयेंच स्वामींचे ठाईं एकनिष्ठता धरून आंगेर वगैरे मातुश्रीचे लक्षातील सरदार स्थळें वगैरे स्वामींचे लक्षीं वागण्याचा उपयोग करीत आहा. याजवरून तुम्हावर कृपा करणें अवश्यक जाणोन, चिटनिशी तुम्हास पूर्वी शपथयुक्त दिल्ही आहे. ती व कारखानिशी, जमेनिशी दोन धंदे राज्यांतील दिल्हे. त्याप्रमाणें करार करून देऊन चिटनिशी वतनास गांव व मोकासे व जमिनी लागले आहे. तें इनाम करार करून दिल्हें बितपशीलः—

१ मौजे बोरगांव, परगणे शिराळें देखील सरदेशमुखी दरोबस्त मुताल्किी वगैरे.
१ मौजे माजगांव, कर्यात तलबीड, दरोबस्त.
१ मौजे जैतापूर, तर्फ सातारा दरोबस्त देखील पाटील, कुळकर्ण वतनें.
१ मौजे नाकेली, परगणे सुर्पे दरोबस्त.
१ मौजे निंबणी, कसबे कवठें, प्रांत मिरज दरोबस्त.
१ मजरें भाबटमाळ, मौजे सालवें, तर्फ हिरडस मावळ दरोबस्त.
१ मौजे विंझर, तर्फ कानदखोरें दरोबस्त.
२ तालुके रत्नागिरी, प्रांत राजापूर.

१ मौजे वणगुलें, तर्फ लांजे दरोबस्त वतनी खोतीसुद्धां.

१ मौजे कलबस्तें, तर्फ संगमेश्वर मोकासा.

१ मौजे धामणेर, संमत कोरेगांव, प्रांत वाई मोकासा व रमणा शेरी जमीन वगैरे.

१ मौजे खोजेवाडी, तर्फ सातारा मोकासा व कुरणें.

१ मौजे मुरुड, तर्फ तारळें मोकासा.

१ मौजे हमदाबाज, तर्फ सातारा मोकासा व शेरीबाग जमीन.

२ कसबे सासवड, देह मोकासा.

१ मौजे कोळोली.

१ मौजे कारखळें.

१ मौजे वडगाव, तर्फ कर्डे राजणगांव मोकासा वगैरे कुरणसुद्धां.

१ कसबे वडनेर, प्रांत चादवड मोकासा बाबती वगैरे.

१ कसबे खेडगांव, परगणे वण मोकासा बाबती व सावोत्रा.

१ मौजे पिंपरी, परगणे नाशिक मोकासा.

२ कसबे तिसगांव व मौजे कोडेगांव, परगणे शेवगाव मोकासा जकात

१ मौजे लोहारे, तर्फ बिरवाडी मोकासा.

३ प्रांत जुन्नरपैकीं गांव.—

१ मौजे कवठें मोकासा व बाबती वतनी.

१ मोजे वरुडें मोकासा.

१ मौजे निंबगाव मोकासा.

१ मौजे चिंबली परगणे पाटोदें मोकासा बाबती.

१ मौजे खातगाव, तर्फ चाभारगोंदें मोकासा बाबती निम् चौथाई.

१ मौजे कानडी, तर्फ माडवगण मोकासा बाबती निम् चौथाई.

१ मौजे कलमंडू, परगणे बाहल मोकासा बाबती.

१ मौजे लोहटार, परगणे उत्राण मोकासा बाबती.

१ कसबे धाड, मोकासा व जकात.

३ मौजे पाटोदें, प्रांत पडनूर मोकासा बाबती वगैरे व कसबे हेबळी, परगणे आवसें व मौजे मगरूळ, परगणे धारूर.

१ मौजे भुंगलें, कसबे शिरपूर मोकासा बाबती जकात.

१ मौजे वल्होळी, तर्फ सासवड मोकासा.

१ मौजे थेरगाव, परगणे बीड मोकासा.

१ मौजे बोरगांव, परगणे येळापूर मोकासा.

१ मौजे वणसगाव. परगणे चांदवड मोकासा सावोत्रा जकात.
६ इनाम जमीनी.
१ मौजे निगडी, तर्फ सातारा चावर २ दोन.
१ मौजे सोनगांव, तर्फ सातारा चावर -।- पाव.
१ कसबे निंब, प्रात वाईपैकीं जमीन बिघे ८१०
१ मौजे वेणेगाव, तर्फ उबरज चावर -॥- निमे.
१ मौजे निसरें, तर्फ उबरज, प्रांत कऱ्हाडपैकीं जमीन बिघे ८१९.
१ मौजे चिचणेर, तर्फ वंदन, प्रात वाईपैकीं जमीन बिघे ९ पाच.

४९

येणेंप्रमाणें महाल व गाव व जमिनी तुह्मास इनाम करून दिले असेत. तरी तुह्मीं व तुमचे पुत्रपौत्रादि वशपरपरेनें सदरहूचा अनुभव करून, सेवा करून सुखरूप राहाणें. जाणिजे. येणे प्रमाणें सेवा केली आहे. वतनी धंदे करून इनाम खाणें बहुत काय लिहिणें. मोर्तब.

६२ तजवीजनामा.

तजवीजनामा, नागोजी माने याचे नावे आसफदौला याचे मोहरेनिशीं एक हजार जात व पाचशें स्वार जाजती व्हावयासी व आणखी पाच महिन्याचा रोजमुरा तजवीज जाहली आहे. आणखी उमेदवार आहे कीं, बादशहास विनति करावी कीं, कबूल व्हावें. त्याजवरून आसफदौला याचा शेरा जाहला आहे कीं, एक हजार जात पांचशें स्वार जाजती व पाच महिन्याचा रोजमुरा करून दिल्हा. नागोजी माने, कैलासवासी संभाजी राजे याचे आप्त ह्मणून करून दिल्हे असे. उमेदवार आहेत. चार हजारी जात आहे, ही मुकरार आहे. हल्लीं जाजती एक हजार जात व पाचशें स्वार व पाच महिन्याचा रोजमुरा सर्फरास करावा. या पत्रावर मुसेखान दक्षणेचे बक्षी याचा शेरा आहे. त्यात मजकूर तजवीज ह्माल्याप्रमाणें हुजूर विनति करावी. पाच हजारी जायदाते, दीड हजार स्वार पाच महिन्याचा रोजमुरा यास तपशील —

अस्सल आहेत तेः—	जाजती केले तेः—
चार हजार जात व एक हजार स्वार.	एक हजार जात व पाचशें स्वार, याप्रमाणें मुकरार.

तेरीख छ १ जिल्हेज, सन ४५ जुलूस